# जगायचं कशासाठी?

डॉ. निर्मलकुमार फडकुले



# जगायचं कशासाठी ?

निर्मलकुमार फडकुले

प्रतिमा प्रकाशन

जगायचं कशासाठी' हे श्री निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक १९९२ साली 'प्रतिमा प्रकाशन' यांनी प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे वारसदार श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# जगायचं कशासाठी

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

### हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई(तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!
वाचायला तर हवंच!
पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...
...आणि स्वतःही लिहायला हवं.

▷ **प्रकाशन क्रमांक : ८१**

▷ **प्रकाशक :**
अरुण वि. पारगावकर,
प्रतिमा प्रकाशन,
१३५९ सदाशिव पेठ, नवा विष्णू चौकाजवळ,
पुणे ४११ ०३०

▷ © **निर्मलकुमार फडकुले**
" विवेक ", १० विद्यानगर, उत्तर सदर बाजार,
सोलापूर ४१३ ००३.

▷ **मुद्रक :**
**अजय ऑफसेट**
१११३/ब, शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.

▷ **अक्षरजुळणी :**
**टाइपो आर्टस्**
१४८१ शुक्रवार पेठ,
पुणे ४११ ००२.

▷ **प्रथमावृत्ती :**
**२६ जानेवारी १९९२**

▷ **मुखपृष्ठ :**
**अभय पुरंदरे**

▷ **मूल्य : ५० रुपये.**

*अनघा आणि सागर*

*या आनंदी बालकांना.*

*यांच्या सहवासात*

*माझं हरवलेलं बाल्य मला सापडलं.*

# अनुक्रम


| | | | |
|---|---|---|---|
| १. | कॉलेजातले दिवस | .. | ७ |
| २. | हसा आणि लठ्ठ व्हा! | .. | १३ |
| ३. | नाटक | .. | २० |
| ४. | होनी-अनहोनी | .. | २६ |
| ५. | जगायचं कशासाठी? | .. | ३२ |
| ६. | सतारीचा झंकार | .. | ४१ |
| ७. | द्रौपदीचे वस्त्रहरण | .. | ४६ |
| ८. | तो येक मूर्ख! | .. | ५० |
| ९. | लग्न पहावं करून! | .. | ५४ |
| १०. | खेळ मांडियेला... | .. | ६० |
| ११. | संवाद तुकोबाशी | .. | ६६ |
| १२. | मुलखावेगळी माणसे | .. | ७२ |
| १३. | कीर्ती सदा कुमारी! | .. | ७९ |
| १४. | अशी पुस्तकं! | .. | ८३ |
| १५. | काळपुरुषाची भेट | .. | ८९ |
| १६. | प्रकाशवेडच्या पतंगाची कहाणी | .. | ९४ |
| १७. | रुपेरी पडद्यावरची स्वप्ने | .. | ९९ |
| १८. | आमच्या माँसाहेब इतक्या सुंदर असत्या तर...! | .. | १०३ |
| १९. | स्वप्नांविषयी थोडेसे... | .. | १०९ |
| २०. | नियतीवादाचे तुणतुणे | .. | ११३ |
| २१. | अजून येतो वास फुलांना | .. | ११७ |

# संवाद

अलीकडच्या तीनचार वर्षांत मी ललितलेखन विशेष आवडीनं केलं. 'हिरव्या वाटा' आणि 'आनंदाची डहाळी' हे दोन ललितलेखसंग्रह यापूर्वीच प्रकाशित झाले आहेत. वाचकांना ते आवडले आणि अनेकांनी उत्स्फूर्तपणानं पत्रं पाठवून आपली प्रतिक्रिया कळवली. आपलं लेखन रसिकप्रिय होत आहे याचा आनंद कोणत्या लेखकाला होणार नाही ? मी 'स्वान्त: सुखाय' लिहितो, हे विधान स्वत:चा अहंकार कुरवाळण्यासाठी ठीक आहे; पण आपल्या आणि रसिकांच्या अनुभवाची तार जुळावी, संवादी सूर उमटावेत यात एक आगळा आनंद आहे. याचा अर्थ वाचकांच्या अभिरुचीचा अनुनय करीत लेखकानं लिहावं असं मला मुळीच सुचवायचं नाही.

आयुष्याच्या वाटेवरून चालताना प्रत्येकालाच जाणवतं की आपल्या वाटेवर गडद धुकं पसरलं आहे. या धुक्यातून वाट शोधत आपल्याला चालायचं आहे. कधी कधी धुकं विरळ होतं आणि एक सौम्य मधुर चांदणं आपली वाट उजळून काढतं. धुकं आणि चांदणं यांचं चमत्कारिक मिश्रण जीवनात झालेलं असतं. वाटेत काटे असतात, खाचखळगेही असतात. क्वचित् एखाद्या वळणावर खुरट्या वेलीला एखादं टपोरं फूलही लागलेलं असतं. जगण्याचा अनुभव तसा गुंतागुंतीचा असतो. द्वंद्वात्मक असतो. अर्थ कळतही असतो आणि तो नीटसा कळला नाही हेही कळत असतं. स्वत:विषयी आणि आजूबाजूच्या जगाविषयी आपण कळत नकळत काहीतरी चिंतन करीत असतो. या चिंतनशीलतेतच लालित्याचं मिश्रण करून जीवनाच्या काही क्षणांवर आणि कणांवर मी आपल्या परीनं प्रकाश टाकला आहे. धुकं आणि चांदणं मिसळून गेलेल्या वाटेवरून चालण्याचा हा एक नम्र प्रयत्न आहे.

ललितगद्य हा वाङ्मयप्रकार आता फुलत चालला आहे असं मला वाटतं. चौकटीतून मुक्त झालेला, कधी काव्याच्या तर कधी विनोदाच्या, आणि काहीशा तत्त्वचिंतनाच्या अंगांनी विकास पावणारा हा वाङ्मयप्रकार लेखकाच्या जीवनदृष्टीवर पोसलेला असतो. लेखकाच्या मन:प्रकृतीचे सूक्ष्म रंगही स्वैर ललितगद्यात प्रकट होतात.

प्रस्तुत संग्रहात ते कितपत प्रकट झाले आहेत हे वाचकांनी पाहायचं आहे.

निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रकाशित झालेले हे लेख आता पुस्तकरूपानं वाचकांसमोर येत आहेत. हे लेखन वाचकांना आवडेल असा मला विश्वास वाटतो. यापेक्षा काही अधिक मी माझ्या लेखनाविषयी सांगत नाही.

माझं ललितलेखन प्रतिमा प्रकाशनाचे संचालक श्री. अरुण पारगावकर यांनी स्नेहभावानं प्रकाशित केलं याबद्दल मी त्यांचा मन:पूर्वक आभारी आहे.

**—निर्मलकुमार फडकुले**

# १. कॉलेजातले दिवस

फर्ग्युसन कॉलेजच्या फाटकातून आत जाताना माझ्या मनात विचार आला - टिळक - आगरकरांनी स्थापन केलेलं आणि महाराष्ट्राच्या शैक्षणिक, साहित्यिक जीवनावर परिणाम करणारं हेच ते महाविद्यालय. इथंच मराठी काव्य - नाटकांवर आपल्या प्रतिभेची सुंदर लेणी घालणारे राम गणेश गडकरी विद्यार्थी होते. आपल्या कथा-कादंबऱ्यांनी मराठी सारस्वत अलंकृत करणारे भाऊसाहेब खांडेकर याच कॉलेजात शिकले. या संस्थेनं महाराष्ट्रालाच नव्हे, तर देशाला क्रांतिकारक देशभक्त दिले. सावरकरांसारखा तेजस्वी लोकनायकही इथल्याच वातावरणातून आकाराला आला. ही सामान्य शिक्षणसंस्था नाही. मी मनोमन रोमांचित झालो. मी फर्ग्युसनचा विद्यार्थी आहे असं अभिमानानं स्वत:शीच म्हणालो आणि वर्गात येऊन बसलो. वर्ग भरलेला. विद्यार्थिनींचीही चांगलीच उपस्थिती होती. पाठीमागच्या बाकावर जागा होती. कसाबसा अंग चोरून बसलो. खरं तर त्या महाविद्यालयात मी बुजून जायला नको होतं, पण थोडासा गोंधळलो होतो यात शंका नाही. माझी कुणाशीच ओळख नव्हती.

सुटाबुटातल्या एका प्रौढ व्यक्तीनं वर्गात प्रवेश केला. आम्ही सारे उभे राहिलो. माझ्या शेजारी बसलेले दोन विद्यार्थी पुटपुटले, 'जोग सर.' हेच का ते प्राध्यापक रा. श्री. जोग? महाराष्ट्रातले एक मान्यवर साहित्यसमीक्षक. त्यांचे कित्येक लेख मी वाचलेले होते. साहित्याच्या क्षेत्रात जोगांचा दबदबा होता. आज प्रथमच मी त्यांना पाहात होतो. आपल्या हातातली तीनचार जाडजूड पुस्तकं त्यांनी टेबलावर ठेवली. वर्गाकडं एक स्मितयुक्त दृष्टिक्षेप केला आणि त्यांनी आपल्या व्याख्यानाला संथपणानं सुरुवात केली. साहित्यशास्त्र हा विषय ते शिकवीत होते. कवीची प्रतिभा ही जन्मजात असते की ती अभ्यासातून उत्पन्न होते यासंबंधी ते साधकबाधक चर्चा करीत होते. त्यांच्या बोलण्यात वक्तृत्वाची चमक फारशी जाणवली नाही. लालित्यापेक्षा पांडित्याचा प्रभाव मात्र त्यांच्या भाषणावर अधिक पडलेला होता. काहीसा रूक्षपणाही होता. त्यांच्या भाषणाच्या आधारानं सारेच विद्यार्थी टिपणं तयार करीत होते. मी मात्र त्यांचं व्याख्यान मन:पूर्वक ऐकत होतो. एखादा मुद्दा स्पष्ट करताना संस्कृतातली अनेक वचनं

उच्चारून त्यांचं स्पष्टीकरण ते करीत होते. संस्कृत साहित्याचा त्यांचा खोल व्यासंग आहे हे पावलोपावली जाणवत होतं. व्याख्यानांत त्यांची चिकित्सक वृत्ती कशी धारदार आहे याचाही प्रत्यय येत होता. विवेचनाच्या ओघात एखादा सूक्ष्म विनोद ते सहज करीत असत. उदाहरणार्थ, 'विद्वान म्हटला की त्या विद्वानाचा शुद्धलेखनात पाय मोडला पाहिजे असा नियम आहे.' असं म्हणून ते सौम्यपणानं हसायचे. एखाद्या प्रेमकवितेतली ओळ म्हणून त्या कवीच्या लेखनाची संयमी शब्दात चेष्टा करायचे. ते अभ्यासपूर्ण व्याख्यान ऐकून मी फारच प्रभावित झालो. जोगांनी विवेचनाच्या ओघात सांगितलेल्या पुस्तकांपैकी एकदोन तरी पुस्तकं ताबडतोब वाचून काढावीत म्हणून ग्रंथालयाकडं निघालो. माझ्या शेजारी बसलेला विद्यार्थीही तिकडेच निघाला होता. त्याला मी नाव विचारलं. तेव्हा आपलं संपूर्ण नाव त्यानं सांगितलं. - सदाशिव शिवराम भावे. तो साताऱ्याचा होता. हाच तो स. शि. भावे. पुढं एक चोखंदळ समीक्षक म्हणून तो उदयाला आला. वाङ्मयाच्या एकाच व्यासपीठावरून आम्ही परस्परांवर टीका केली होती. पण आमच्या निखळ स्नेहात कधी अंतर आलं नाही. जोगांच्या व्याख्यानाबद्दल आम्ही थोडा वेळ बोललो. भावेनं त्यांच्या व्याख्यानातले सगळे मुद्दे टिपून घेतले होते. त्यावरून एक लेख तयार करून तो कुठल्यातरी मासिकाकडं प्रसिद्धीसाठी पाठवणार होता.

फर्ग्युसन कॉलेजातलं ते वर्ष तसं मी उनाडण्यातच घालवलं. कॉलेजच्या लायब्ररीत बसून हाती येतील तितकी पुस्तकं त्यावेळी मी अधाशासारखी वाचून टाकली. वाचनाचं एक अनिवार व्यसन मला जडलं. त्या वाचनात कसलीही शिस्त नव्हती. निवड करून योजनापूर्वक वाचलं पाहिजे ही दृष्टी मला जोगांनी दिली. एकदा माझी ट्यूटोरियल्सची वही घेण्यासाठी मी त्यांच्या घरी गेलो होतो. माझ्या हातात हार्डीची एक कादंबरी होती. ती पाहून त्यांनी विचारलं, 'हार्डीच्या कोणकोणत्या कादंबऱ्या तुम्ही वाचल्या आहेत ?' मी म्हटलं, 'हे पहिलंच पुस्तक हाताशी आलं. दोनचार पानं वाचली. कादंबरी बरी वाटली. अजून संपूर्ण वाचली नाही.' आपलं सौजन्यपूर्ण स्मित करीत प्रा. जोग म्हणाले,

"प्रथम लेखक निवडावा. आणि त्या लेखकाची सर्व ठळक पुस्तकं सलग वाचावीत. हे वाचन आपल्याला त्या लेखकाच्या विचारांचं आणि व्यक्तित्वाचं समग्र दर्शन घडवतं. जत्रेत फिरताना मनुष्य कुठेच स्थिर होत नाही. तो नानाप्रकारची दृश्यं पाहात असला तरी त्याच्यावर होणारे संस्कार पुसट असतात. वाचनाच्या क्षेत्रात जत्रेतल्यासारखं भटकू नये. प्रत्येक पुस्तक रुची घेऊन वाचावं. आणि वाचलेल्या पुस्तकावर मित्रमंडळीत बोलावं. एखादं टिपण तयार करावं. पुष्कळसे वाचक रसिक फुलपाखरासारखे असतात. मला फुलपाखरापेक्षा मधमाशा अधिक आवडतात. मध साठवला पाहिजे आणि तो साठवण्यासाठी निवड केली पाहिजे. थोडे परिश्रम केले पाहिजेत. तुम्हाला वाचनाचा चांगला नाद आहे, पण या नादाला आणि छंदाला

उद्योगाचं आणि कर्तव्याचं रूप येऊ द्या. '' ते आस्थेनं बोलत होते. आपल्या विद्यार्थ्यांवर त्यांचं बारीक लक्ष असायचं. 'गेल्या पंधरा दिवसांत नवीन काय वाचलंत ?' हा प्रश्न ते प्रत्येकाला विचारायचे. अभ्यासातून कोणती तरी शंका घेऊन गेलेले विद्यार्थी त्यांना आवडायचे. विद्यार्थ्यांत आणि पुस्तकांत रमलेले जे थोडे प्राध्यापक मी पाहिले त्यात रा. श्री. जोग हे एक आहेत. माझी ट्यूटोरियल्सची वही उघडून त्यांनी मला म्हटलं, 'तुमच्या लेखनाला मी 'ए' दर्जा दिला आहे. सहसा माझ्या हातून इतके मार्क्स् सुटत नाहीत. कुणाच्याही लेखनातले मला दोष प्रथम जाणवतात. माझी वृत्ती गुणग्रहणाची असली तरी मी दोषांकडे दुर्लक्ष करीत नाही. माधवराव पटवर्धनांचं 'विरहतरंग' काव्य माझ्या आवडीचं आहे, पण त्यावर देखील मी टीका केलेली आहे. तुम्ही लिहिलेला हा लेख मला आवडला. पण तुमच्या भाषेचा कल अलंकाराकडे अधिक झुकलेला वाटतो. भाषा अधिकच संस्कृतप्रचुर वाटते. मराठी वळणाची सोपी भाषा लिहिली पाहिजे असं मला वाटतं.' मी हसून म्हणालो, 'आपली सूचना मला मान्य आहे. पण आपल्या पुस्तकांतली आणि व्याख्यानांतली भाषासुद्धा संस्कृतप्रचुरच नाही का? आपल्याच भाषेचं थोडं अनुकरण मी केलं असेल.'

जोगांच्याही मुद्रेवर हसू चमकलं. आणि मग भाषेची उपासना कशी करावी यावर ते मनसोक्त बोलले. ज्ञानेश्वर आणि गडकरी हे कवी आपल्या अद्वितीय भाषासौंदर्याने कसे मुग्ध करतात याची उदाहरणं त्यांनी दिली. 'निशिगंध' या टोपण नावानं त्यांनी केलेल्या काही कविताही त्या दिवशी आपल्या घोगऱ्या आवाजात वाचून दाखवल्या आणि स्वत:च त्या कवितांची थोडीशी टरही उडवली. आपल्याच काव्यनिर्मितीकडं तटस्थपणानं पाहण्याची त्यांची वृत्ती मला तरी निराळी वाटली. 'मी कदाचित् कवी होऊ शकणार नाही, पण कोणत्याही कवीपेक्षा त्याच्या काव्याचं रसग्रहण मी अधिक चांगलं करू शकेन असं मी विधान केलं तर ते फारसं चुकणार नाही असं मी नम्रतेने म्हणालो.' नम्रतेला अहंकाराचा किंचित स्पर्श झालेलं त्यांचं हे विधान मला आजही आठवतं. आणि सहजच मनात असा विचार येतो की आपल्या सौजन्याचा इतका सहजाविष्कार करणारे लेखक, कवी आणि समीक्षक 'इये मराठीचिये नगरी' किती आढळतील? कोणत्याही विद्यार्थ्याचा त्यांनी कधीही अधिक्षेप केला नाही. वर्गात त्यांचा स्वर संतापानं चढल्याचं उदाहरण क्वचित एखाददुसरं असेल. पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्यालासुद्धा त्यांनी कधी 'अरे-तुरे' म्हटलं नाही.

एकदा आमच्या वर्गात कोणीतरी विद्यार्थी त्यांची कुचाळी करण्यासाठी चमत्कारिक स्वर काढून मोठ्यानं हसला. सर्व विद्यार्थी शांत होते. कुणीही त्याला प्रतिसाद दिला नाही. या टवाळ विद्यार्थ्याने जाणूनबूजून आपल्या व्याख्यानात व्यत्यय आणला याचा राग साहजिकच जोगांना आला. ते अस्वस्थ झाले. त्यांच्या कपाळावर नापसंतीची आठो दिसू लागली. ते आता रागावून काहीतरी बोलणार, किंवा त्या विद्यार्थ्याला वर्गाच्या बाहेर घालवणार असं आम्हाला वाटलं. पण यातलं त्यांनी

काहीच केलं नाही. त्या विद्यार्थ्याकडं क्षणभर त्यांनी पाहिलं आणि ते म्हणाले,

'वर्गात प्रसिद्धी पाहिजे असेल तर काहीतरी बौद्धिक पराक्रम करावा. तुमचा पराक्रम वेड्याच्या इस्पितळात झाला असता तर तो अधिक शोभून दिसला असता. तुम्ही चुकीच्या ठिकाणी आला आहात, हे मी नम्रपणे तुमच्या निदर्शनाला आणतो. योग्य ठिकाणी आपण लवकरच जावं ही विनंती.'

वर्गात हास्याची एक लाट उचंबळून आली. त्या विद्यार्थ्यानं खाली घातलेली मान लवकर वर केली नाही. पण वर्गात काय किंवा वाङ्मयीन व्यासपीठावर काय, जोग सहसा विनोद करीत नसत. त्यांची विनोदबुद्धी सूक्ष्म आणि संवेद्य होती. एखाद्या वेळेस मिस्कीलपणानं विनोदाचे सौम्य चिमटे त्यांच्या भाषणात आढळत. पण कोणाचीही त्यांनी हेटाळणी केली नाही. 'सौजन्यमूर्ती जोग' असंच आम्ही त्यांना म्हणत असू. एकदा मी त्यांना माझी एक कथा अभिप्रायासाठी दिली. पंधरा-सोळा पृष्ठांची ती कथा त्यांनी संपूर्ण वाचली. तिच्यात काही दुरुस्त्याही सुचवल्या. आणि फर्ग्युसनच्या 'साहित्यसहकार' या मंडळाच्या बैठकीत ती मी वाचून दाखवावी व सदस्यांनी त्यावर चर्चा करावी असं त्यांनी योजलं. माझ्या कथेबद्दल साशंक होतो. आता सुदैवानं ती कथा माझ्या स्मरणात नाही, पण ती एखादी प्रेमकथा असावी. कॉलेजच्या त्या निःशंक खुल्या वातावरणात बहुधा प्रेमकथाच सुचणं शक्य होतं. कथालेखनात कितपत नाविन्य होतं हे सांगता येणार नाही. अध्यक्षस्थानी जोगच होते. वीस-पंचवीस सदस्यांच्या उपस्थितीत - त्यात दोन-तीन प्राध्यापकही होते - मी कथा वाचन केलं. स.शि.भावे हा माझा वर्गमित्र होता. त्यानं कथेवर टीका केली. तो म्हणाला,

"प्रीतीचा काहीही अनुभव न घेता लिहिली गेलेली कथा. असंच या लेखनाचं स्वरूप आहे. ज्या साहित्याच्या मुळाशी अनुभव नाही, असलं साहित्य लिहिलं जाऊ नये असं माझं मत आहे." आणखी एकदोघांनी आपापल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या. एकानं 'कथेत मनोविश्लेषण चांगलं साधलं आहे.' असं प्रशस्तिपत्र दिलं. दुसऱ्यानं 'कथेचा शेवट शोकपूर्ण करायला नको होता.' असं सांगितलं. आक्षेपांना मी उत्तरं द्यावीत असं अध्यक्षांनी सुचवल्यावर मी म्हणालो, 'सर्वांच्या अभिप्रायाबद्दल आभारी आहे. प्रेमाचा प्रत्यक्ष अनुभव न घेता मी प्रेमकथा लिहिण्याचा गुन्हा केला असं भावे म्हणतात. साहित्याचं लेखन करताना प्रत्यक्ष अनुभवाचं सर्टिफिकेट जवळ ठेवावं लागतं याची मला कल्पना नव्हती. मी लवकरच फासावर जाणाऱ्या माणसाच्या मनःस्थितीचं दर्शन घडवणारी कथा लिहिणार आहे. ती लिहितानासुद्धा मी प्रत्यक्ष अनुभव घ्यावा असं माझ्या मित्राचं म्हणणं आहे काय? माझ्या या प्रश्नानं थोडी खसखस पिकली. प्रा. जोगांनी अध्यक्षीय समारोप केला. त्यावेळी त्यांनी 'अनुभव' या संकल्पनेचे वेगवेगळे अर्थ समजावून सांगितले. जोगांसारख्या समीक्षकानं माझ्या कथेतल्या काही विशेषांबद्दल गौरवोद्गार काढले, या आनंदात मी एकदोन दिवस तरंगत होतो. माझी हीच कथा पुढं एका विशेषांकात प्रकाशित झाली. सुदैवानं तो अंक आता माझ्याजवळ

नाही.

फर्ग्युसन कॉलेजातलं ते वर्ष मला विसरता येणार नाही. केवळ जोगांच्याच व्याख्यानांनी माझ्यावर परिणाम केला असं नव्हे. पुण्यात दररोज ठिकठिकाणी विविध विषयांवर अनेक नामवंत वक्त्यांची, सामाजिक व राजकीय पुढाऱ्यांची भाषणं होत असत. बहुधा संध्याकाळी कुठल्यातरी व्याख्यानाला जाण्याची मला सवयच जडली. यातली बरीचशी व्याख्यानं सामान्य असत. असल्या कार्यक्रमात मी वेळ दवडू नये असं माझे मित्र मला सांगत असत. पण कधी कधी अत्यंत उत्कृष्ट दर्जेदार भाषणं ऐकण्याची मला संधी मिळाली. स. प. कॉलेजच्या सभागृहात 'जुन्या मराठी वाणीची घडण' या विषयावर डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांची दोन व्याख्यानं मी ऐकली. सहस्रबुद्धे यांचं वक्तृत्व आक्रमक पद्धतीचं असे. त्यांच्या बोलण्यात केव्हा केव्हा नको तितका फटकळपणाही असायचा. बालकवी ठोंबऱ्यांना ते वेडपट म्हणायचे. संतांचं मराठी साहित्य गबाळं, रटाळ आणि निरर्थक असून ते पुरुषार्थाला मारक आहे अशा आशयाचा जोरदार हल्ला त्यांनी संतवाङ्मयावर आवेशानं चढवला. या संतांनी रसरशीत साहित्यनिर्मिती केली असती तर इस्लामी आक्रमण आपण परतवून लावलं असतं. पण हे केवळ टाळ कुटीत बसलेले लोक होते, वगैरे मुद्दे त्यांनी मांडले. ही दोन्ही व्याख्यानं भलतीच खळबळजनक ठरली. पण त्यानंतर पुढच्याच आठवड्यात त्याच सभागृहात प्रा. गं. बा. सरदार यांनी सहस्रबुद्धे यांना उत्तर देण्यासाठी दोन व्याख्यानं दिली. स्वत: डॉ. सहस्रबुद्धे उपस्थित होते. खरं तर आधी झालेल्या भाषणांना उत्तर देणं काहीसं अवघड होतं. सरदारांचं व्याख्यानही मी प्रथमच ऐकत होतो. पहिल्या पाच मिनिटांतच त्यांनी सभेला आटोक्यात घेतलं. स्वच्छ, मधुरवाणी, दीर्घ व्यासंग, वाङ्मयाकडं पाहण्याचा समतोल असा सामाजिक दृष्टिकोन, प्रत्येक विचार मृदुतेनं पण तरीही सुस्पष्टपणानं समजावून सांगण्याची विशिष्ट शैली यामुळं सरदारांची ही व्याख्यानं पुण्यात फार गाजली. दोन्ही दिवस सभागृह तुडुंब भरलेलं. विद्यार्थी आणि नागरिक जागा मिळेल तिथं उभं राहून शांतपणे ऐकत होते. वैचारिक आणि वाङ्मयीन व्याख्यानांना इतका प्रचंड प्रतिसाद पुण्यात मिळतो याचं मला आश्चर्य वाटलं. संतांच्या साहित्यावर आणि विचारसरणीवर सहस्रबुध्दयांनी जे प्रहार केले होते ते एकूण एक आपल्या अभ्यासू भाषणांतून सरदारांनी धुवून काढले. वक्तृत्वाचे दोन अत्यंत चांगले नमुने या प्राध्यापकांच्या प्रतिपादनातून मला अनुभवता आले. आज इतक्या वर्षांनंतरही ही व्याख्यानं माझ्या स्मरणात इतकी ताजी आहेत की दोघांनी केलेले कोटिक्रम, एकमेकांना घेतलेले मार्मिक चिमटे, परस्परांच्या युक्तिवादाची केलेली चिरफाड आणि त्यावेळी योजलेली आक्रमक पण सुंदर भाषा मला जशीच्या तशी आठवते. जोग, सहस्रबुद्धे आणि सरदार या तिघांकडेही मी मधूनमधून जात असे. आपल्या अभ्यासविषयात जन्मभर रमलेल्या या विद्वानांनी वैचारिक मतभेद असणाऱ्या कुणाही व्यक्तीबद्दल कधीच अनुदार उद्‌गार काढला नाही. 'पुणेरी विद्वान' हा शब्दप्रयोगच

अहंकार आणि तुसडेपणा यांचा द्योतक आहे. अनेक विद्वानांचा वेळ निंदानालस्ती, द्वेष, मत्सर आणि स्वत:ची प्रशंसा यातच व्यतीत होतो. पण मला भेटलेले हे तिन्ही गुरुवर्य कमालीचे प्रांजळ, निर्मळ मनाचे होते. आज तिघेही जगात नाहीत. पण त्यांची आठवण झाली की मनात आदराचे आणि आत्मीयतेचे सूर जागे होतात.

कॉलेजातले ते दिवस सुगंधी होते. रंगीबेरंगी होते. स्वप्न फुलवणारे होते. चैतन्याच्या कोवळ्या उन्हाचा वर्षाव करणारे होते. उत्साहाला उधाण आणणारे होते. सुंदर सुंदर कवितांत गुरफटून टाकणारे होते. उत्तम वाङ्मय आणि तेजस्वी विचार यांचं रसायन पाजणारे होते. कधी कधी संध्याकाळी फर्ग्युसनच्या टेकडीवर आम्हा वाङ्मयप्रेमी मित्रांचा अड्डा जमायचा. हास्य - विनोदाला पूर यायचा. एका प्रसिद्ध कवीची कन्यका त्यावेळी आमच्या वर्गात होती. तिच्यावर अनेकांनी कविता लिहिल्याचं मला आठवतं. तिच्यासाठी झुरणारा माझा एक मित्र आज रत्नागिरीला वकिली करीत आहे. त्या कविकन्यकेनं अनेकांना झुलवलं. कित्येकांना भुलवलं. तिचं दर्शन साऱ्यांनाच खुलवायचं यात मात्र शंका नाही. सौंदर्याच्या पंखावर बसून आलेले काही लोभसवाणे क्षण तिनं आमच्या वर्गात दिलखुलासपणानं उधळले. एक होतकरू कवी तर म्हणाला,

"तुझ्या एका कटाक्षासाठी आम्ही हसतमुखानं फासावर जायला तयार आहोत." फासात अडकून पडलेल्या या कवीचं पुढं काय झालं ते मात्र मला माहीत नाही. पण साहित्यसहकार मंडळात वाचल्या जाणाऱ्या बहुतांश कविता फर्ग्युसनमधल्या प्रेमी कवींनी लिहिलेल्या असायच्या. दोनचार नवशिके प्राध्यापकही त्या सुंदरीभोवती आपली प्रतिभा ओवाळत होते. अनेकांना काव्यस्फूर्ती देणारी ही काव्यदेवता अखेर एका डॉक्टरचा संसार मांडती झाली. कधी कधी आपलं स्थूल झालेलं शरीर सांभाळीत बालगंधर्व रंगमंदिरात नाटक पाहायला आलेली दिसते. तेव्हा कॉलेजातले ते दिवस पुन्हा आठवतात.

काळ वेगानं धावत असतो. येणारा प्रत्येक क्षण भूतकाळाच्या सदरात जमा होतो. कॉलेजातले ते दिवस खरं तर आता जुने झाले. त्यांचं निर्माल्य झालं. जुन्या आठवणींचे पत्ते पिसत राहण्यात काहीच अर्थ नसतो असं कुणीतरी म्हणेल, पण मला तसं वाटत नाही. तारुण्यसुलभ सुखदु:खांचे हे दिवस आता परतून येणार नाहीत. घड्याळाचे काटे मागं फिरवले तरी उलटलेली वर्षं फिरून भेटत नाहीत. त्यांच्या ज्या बऱ्यावाईट पाऊलखुणा आपल्या मनाच्या भूमीवर उमटलेल्या असतात. त्यांच्याकडं एक दृष्टिक्षेप करून पुन्हा नव्या उत्साहानं पुढची वाट चालत राहिलं पाहिजे. काही आठवणी सदैव हिरव्यागार राहतात. चालून आलेली ही हिरवी वाट इतक्या वर्षांनंतर तशीच हिरवी राहिली आहे. निदान मी असेपर्यंत तरी तिच्या हिरवेपणाला एक सुंदर अर्थ आहे. तिच्याकडं पाहिलं की मन गाऊ लागतं –

हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणाच्या मखमालीचे.

□□□

# २. हसा आणि लठ्ठ व्हा!

ज्याला विनोदबुद्धी आहे, ज्याच्या मुद्रेवर प्रसन्न हास्याचा प्रकाश पसरू शकतो, ज्याला विनोदाचा सहज आस्वाद घेण्याची रसिकता लाभली आहे तो माझ्या दृष्टीने भाग्यवान आहे. काही माणसांना हसण्याची कला अवगत नसते. हास्यविनोदाने स्वत:चे मन कसे उजळून काढावे हे त्यांना समजत नाही. आता अशा कळकट मनोवृत्तीच्या अरसिकांना आपण हसावे आणि विसरून जावे हेच बरे नाही का? गडकरी हे जितके कल्पक आणि प्रतिभासंपन्न होते तितकेच ते विनोदप्रिय होते. गडकऱ्यांच्या बैठकीत त्या काळातले अनेक लेखक, कवी मोठ्या आनंदाने बसलेले असत. गडकऱ्यांच्या तोंडून नानाप्रकारची विनोदवचने बाहेर पडत. कोटचांचा, वात्रट कल्पनांचा, चमत्कृतिपूर्ण व खोडकर सुभाषितांचा त्या बैठकीत लखलखाट व्हायचा. सारेजण गडकऱ्यांच्या विनोदाचा मनमुराद आस्वाद घ्यायचे. धारदार विनोदबुद्धीमुळे त्यांची जीभ वेगाने आणि अवखळपणाने नृत्य करीत राहायची. एकदा त्यांचे गुरु विनोदाचार्य तात्यासाहेब कोल्हटकर यांनी गाढवावर एक खुमासदार कोटी केली. त्या कोटीत कोल्हटकरांच्या मिस्कील आणि मार्मिक विनोदबुद्धीचा चांगलाच प्रभाव पडलेला होता. दोन-तीन मिनिटे बैठकीत हास्याचे फटाके वाजत होते. त्यानंतर गडकरी म्हणाले,

"वा तात्यासाहेब! गाढवावरची तुमची ही कोटी फारच गमतीदार आहे. आता जेव्हा जेव्हा मला गाढव दिसेल तेव्हा तेव्हा मला तुमची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही." हे वाक्य ऐकल्याबरोबर दुप्पट जोराने हशा उसळला. शिष्याने गुरुवर मात केली असेच सर्वांना वाटले. गडकरीही स्वत:च्या विनोदावर भलतेच खूष झाले. त्यांनी विचारले, "काय तात्यासाहेब, खरं की नाही?" तात्यासाहेब क्षणार्ध विचारात पडल्याप्रमाणे गंभीर मुद्रा करून म्हणाले,

"माझ्या कोटीवरची तुमची ही कोटी खरोखर पराकोटीची आहे. इतकी की, आता जेव्हा जेव्हा मला तुम्ही दिसाल तेव्हा तेव्हा गाढवाची आठवण झाल्याशिवाय राहणार नाही." झाले! त्या बैठकीत आता हास्याचे अनेक स्फोट होऊ लागले.

गडकरी आणि कोल्हटकर हे विनोदाचे राजे-महाराजे होते. दोघांनीही मराठी माणसांना मनसोक्त हसायला शिकवले, यात शंका नाही. मुळात मराठी माणूस हा भांडखोर वृत्तीचा आहे. कसले ना कसले तरी भांडण उकरून काढण्यात आणि ते चालू ठेवण्यात मराठी माणूस वाकबगार आहे. आपले कोणतेही भांडण तात्त्विक स्वरूपाचे आहे असेही समजण्याचा वेडेपणा तो करीत असतो. मराठी माणसांसंबंधी हे विधान मी केले म्हणून काही शूर मराठी लोक माझ्याशी भांडायला आवेशाने पुढे सरसावतील असा मला विश्वास वाटतो. "आपण कसे भांडखोर नाही" या विषयावर ते अस्तन्या मागे सारून दोन-चार तात्त्विक शिव्यांची खैरात करून मला पटवून देण्याचा प्रयत्न करतील. "मराठी मनुष्य भांडणप्रिय आहे" हे विधान मुळात माझे नाही. ते अकराव्या शतकात प्राकृत भाषेत लिहिल्या गेलेल्या "राजीमतीप्रबोध" या ग्रंथातले आहे. वेगवेगळ्या माणसांच्या स्वभावविशेषांची वर्णनं राजदरबारात एक कवी करीत आहे. त्यात मराठी माणसाबद्दल तो म्हणतो, "दिले-घेतले म्हणणारा, सावळ्या रंगाचा, फार उंच नसलेला, पण कलहशील असलेला मराठी माणूस" असे वर्णन "कलहशील मरहट्ट" माणसाचे केलेले आहे. भांडणाच्या बाबतीत माघार नाही हे आमचे ब्रीद असते. पण मी मघाशी म्हटल्याप्रमाणे गडकरी, कोल्हटकरांनी आणि त्यानंतर अत्रे, पु. ल. देशपांड्यांनी कलहशील असलेल्या मराठी माणसाला विनोदरसिक बनवण्याचा चांगला प्रयत्न केला. सध्या मराठी वृत्तपत्रांतून, नियतकालिकांतून, अनेक हास्यचित्रे व हास्यकथा येतात. आमच्या मराठी नाटकांतून हास्यविनोदाला मानाचे स्थान आहे. विनोदाची अभिरुची हे खरे तर सुसंस्कृत मनाचे सुंदर लक्षण आहे. सभा-संमेलनांत, दैनंदिन संभाषणात, फार काय म्युनिसिपालिटीच्या सभांत सुद्धा तोंडी लावायला विनोद असला म्हणजे मैफल किंवा ती बैठक खुलत जाते. भांडतानासुद्धा विनोदबुद्धी जागी असली तर कडवटपणा संपून जातो. नानाप्रकारच्या काळज्या, अनेक रीतीचे कडवट प्रसंग विनोदबुद्धीच्या निर्मळ झऱ्यात वितळून जातात. खळखळून हसण्यासाठी एका सुंदर मनाची जरूर असते. जगाच्या बाजारात रसिकतेने देवाण-घेवाण करणाऱ्या प्रेमळ माणसालाच हे मन विनामूल्य मिळू शकते. पण आम्ही मात्र बाजारी मनोवृत्तीने या बाजारात हिंडत असतो. व्यावहारिक स्वार्थाने मळून गेलेल्या आणि क्षुद्र मत्सराच्या आगीने जळून गेलेल्या मनाच्या भूमीत हास्यविनोदाची प्रसन्न वेल कशी उगवणार?

गडकरी एकदा तापाने फणफणत होते. ताप वाढत हेता. चार-सहा दिवस झाले तरी ताप उतरण्याची चिन्हे दिसेनात. घरात चिंतेचे वातावरण होते. दोन तज्ज्ञ डॉक्टर गडकऱ्यांच्या बिछान्याजवळ बसून हलक्या आवाजात चर्चा करीत होते. चर्चेच्या शेवटी त्यांनी निष्कर्ष काढला, "इतकी औषधे दिली, पण पेशंटला घाम येत नाही. घाम आल्याशिवाय ताप उतरणार नाही. कोणत्यातरी उपायाने प्रथम घाम आला पाहिजे. काय करावे बरे?" गडकऱ्यांच्या अंगात त्राण उरले नव्हते. ते अगदी पेंगळून गेले होते. ही चर्चा ऐकताच त्यांनी आपले डोळे उघडले. त्या क्षीण डोळ्यांत मिस्कीलपणाची

एक चमक आली. डॉक्टरांकडे पाहून ते म्हणाले, "अगदी सोपा उपाय आहे. डॉक्टरसाहेब, तुमचे बिल पाठवून द्या. ते बिल पाहिल्यावर मलाच काय पण घरातल्या साऱ्यांना घाम येईल." तशाही अवस्थेत हा मार्मिक विनोद गडकऱ्यांना सुचावा याचा अर्थ त्यांची विनोदप्रतिभा अगदी निकोप होती. मरण्याच्या दिवशीसुद्धा त्यांनी अशीच एक गमतीदार कोटी केली. ते म्हणाले,

"काय गंमत आहे पाहा, मी नवसारीला जन्माला आलो आणि आता सावनेरीला मरत आहे. मी नाटककार असूनही असले नाट्य मला सुचले नसते. परमेश्वर हाच मोठा नाटककार आहे" शब्दांची उलटापालट करणे, शब्दांवर कोट्या करीत राहणे आणि त्यातून चमत्कृतिजनक विनोद निर्माण करणे यात गडकऱ्यांसारखा दुसरा निष्णात विनोदी लेखक झाला नाही असेच मी म्हणेन. त्यांना काय कमी दुःखे होती? दारिद्र्य आणि रोग त्यांच्या पाठीमागे हात धुवून लागले होते. पण या दोन्ही गोष्टींची या प्रतिभावंताने कधीच पर्वा केली नाही. ते जेथे जातील तेथे त्यांच्या विनोदाची मशाल आजूबाजूचे वातावरण उजळून टाकीत होती. सहज मनात विचार असा येतो की, हसत खेळत जगणे माणसाला शक्य असूनही तो लहानसहान विवंचनांचे अवडंबर का माजवीत बसतो? खळखळून हसण्याने अंतःकरण स्वच्छ होऊन जाते. माझे एक शिक्षक मला आठवतात. गणित आणि भूगोल हे रूक्ष विषय ते फार गमतीने शिकवायचे. त्यांच्या तासाला मुले आवर्जून बसायची. गणिताच्या तासाला न कंटाळणारा विद्यार्थी सापडणे कठीण! पण हे शिक्षक मुलांना हसवीत खेळवीत आपला विषय समजावून सांगायचे. हास्यवृत्तीने आयुष्याचे अवघड गणित सोडविण्याची युक्ती सहज सापडते यात संशय नाही. निदान आयुष्याचा कंटाळा तरी येणार नाही. कवीच्या प्रतिभेची उज्ज्वल परिणती विनोदातच होऊ शकते असे म्हणतात.

एकदा एक कवी पहाटे फिरायला गेला. (हा कवी प्राचीन काळातला असावा. आधुनिक कवी पहाटेच उठल्याची उदाहरणे सापडत नाहीत. बिचारे काव्यवाचनाच्या परिश्रमाने गाढ झोपलेले असतात. श्रोते मात्र "काव्य" ऐकल्यामुळे जागेच असतात. उत्तम काव्यामुळे झोप उडते हे खरेच आहे.) या कवीला एका घरातून जात्याचा घरघराट ऐकू आला. पहाटेच्या सुंदर वेळी कुणीतरी सुंदरी धान्य दळीत असावी. (खरोखरच प्राचीन काळ असावा. पहाटेच्या वेळी उठून आपल्या घरात दळण करीत बसलेली एखादी आधुनिक तरुणी सापडणे शक्य आहे काय? शोधण्याचा प्रयत्न करा. अशा एखाद्या तरुणीचे नाव कळवा, हजार रुपये मिळवा) जात्याची घरघर ऐकून या रोमँटिक कवीला असे वाटले की ते जाते रडत आहे. कवीची विनोदबुद्धी जागी झाली. तो जात्याला उद्देशून म्हणाला,

रे रे घरट्ट मा रोदीः कं कं न भ्रामयत्यमूः।
तिर्यक् कटाक्षपातेन हस्ताकृष्टेन किं पुनः॥

"अरे जात्या, रडू नकोस. या स्त्रिया कुणाकुणाला बरे फिरवीत नाहीत? त्यांनी

नुसता तिरपा कटाक्ष टाकला तरी आम्ही फिरू लागतो. मग तुला तर ती हाताला धरून फिरवीत आहे. आता रडून काय उपयोग ? '' वात्रट प्रतिभेचा हा एक खोडकर नमुना. खरोखरच रुचकर आहे. काही चतुर वक्ते बोलता बोलता सहज अगदी अकल्पितपणे मार्मिक विनोद करतात. आचार्य अत्रे हैद्राबादच्या साहित्य संमेलनात भाषण देण्यासाठी व्यासपीठावर आले. श्रोत्यांची प्रचंड गर्दी होती. संमेलनाच्या चिटणीसाने '' आचार्य कोणत्या विषयावर बोलणार ?'' असे व्यासपीठावरच त्यांना विचारले. अत्र्यांनी भाषणाला सुरुवात केली. ते म्हणाले, '' मित्रहो ! मी इथे व्यासपीठावर येईपर्यंत अनेकांनी मला विषयाबद्दल विचारले. संयोजकांनी पृच्छा केली '' विषय कोणता ? '' अध्यक्षांनी विचारले, '' विषय काय ? '' आता सेक्रेटरीही विषयाबद्दलच विचारतात. मित्रहो, तुम्हीच सांगा, इतकी तीव्र विषयवासना चांगली आहे काय ? '' हजारो श्रोत्यांनी या '' वैषयिक '' विनोदाला मनसोक्त हसून दाद दिली. पहिल्या दोन वाक्यांतच अत्र्यांनी आपल्या विनोदाची ओव्हर बाऊंड्री मारली. एखाद्या तुफानी फलंदाजाने आक्रमक खेळ करून फटक्यामागून फटके मारावेत तसे अत्र्यांचे भाषण असायचे. अत्रे आणि हास्य दोघेही अभिन्न होते. आज मी जेव्हा आचार्य अत्र्यांच्या लोकप्रियतेचे मूल्यमापन करू लागतो तेव्हा त्यांची उदंड लोकप्रियता त्यांच्या विनोदवृत्तीवर, विनोदप्रतिभेवर, खेळकर आणि खोडकर जीवनदृष्टीवर अवलंबून होती असेच निष्कर्ष काढावे लागतात. गडकऱ्यांच्या नंतर अत्रे हेच मराठी विनोदपीठाचे प्रमुख आचार्य झाले. '' हसणारा सिंह '' अशी एक कल्पना आहे. अत्र्यांच्या बाबतीत ती सार्थ होती असेच म्हणावे लागेल. मी त्यांची अनेक व्याख्याने ऐकली. त्यांचे साहित्य तर अनेक वेळा वाचले. हास्य-विनोदाच्या माध्यमातून जीवनातल्या उदात्त मूल्यांची पूजा बांधणारा हा निर्भय वृत्तीचा एक बलदंड लेखक होऊन गेला. अत्र्यांना कोंडीत पकडून त्यांच्यावर विनोद करण्याचा कित्येकांनी प्रयत्न केला.

एकदा अत्र्यांच्या 'मराठा' कार्यालयाजवळच एक गाढव मरून पडले होते. दोन दिवस झाले तरी ते तिथून हलवण्यात आले नाही. म्युनिसिपालिटीने या कामाकडे दुर्लक्ष केले होते. आता त्या गाढवाच्या कुजत चाललेल्या शरीराची दुर्गंधी सुटली होती. वैतागलेल्या अत्र्यांनी म्युनिसिपल अधिकाऱ्यांना फोन केला.

'' अहो, आमच्या '' मराठा '' कचेरीजवळ गेल्या दोन दिवसांपासून गाढव मरून पडले आहे. ते ताबडतोब हलवण्याची व्यवस्था करा. घाण सुटली आहे. यात तातडीनं लक्ष घाला. दोन दिवसांत इकडे कुणी ढुंकून पाहिले नाही. हे काय चालले आहे ? '' अत्रे फोनवर गरजत होते. अधिकाऱ्याला वाटले, आचार्य अत्र्यांची थोडीशी फिरकी घेऊ. त्याने उत्तर दिले, '' अत्रेसाहेब, तुम्ही अशी तक्रार करावी याचे आश्चर्य वाटते. खरे तर तुमच्या '' मराठा '' मधून तुम्ही सगळ्या जगाची घाण काढता. मेलेले गाढव तुम्हाला काढता येत नाही का ? '' अत्र्यांनी ताडकन् फोनवर उत्तर दिले,

'' अहो, ते मी सहज करू शकेन. पण आमच्या हिंदुधर्मपरंपरेप्रमाणे मृताच्या

नातेवाईकांना आधी कळवले पाहिजे, म्हणून तर तुम्हाला तातडीने फोन केला. समजले?" त्या अधिकाऱ्याच्या हातातून फोन गळून पडला असेल. कारण आता गाढवाचे नाते गळ्यात पडले होते. अत्र्यांच्या साऱ्याच साहित्यात, व्याख्यानांत आणि संभाषणांत विनोदाचे लखलखीत स्फुल्लिंग वाटेल तितके सापडतात. जीवनाकडे पाहण्याची ज्याची दृष्टी खिलाडूपणाची असते अशी माणसे आयुष्याची लढाई आशावादी मनाने खेळू शकतात. कित्येक थोर पुरुषांच्या स्वभावात खट्याळ विनोदबुद्धीची एक लहर असते. लोकमान्य टिळक, छत्रपती शाहूमहाराज, आगरकर, म. गांधी ही थोडीशी नावे उदाहरणादाखल पुरेशी आहेत. या व्यक्तींचे राजकीय आणि सामाजिक कार्य महान आहे. यांची व्यक्तित्वे उन्नत आहेत. पण यांच्याही अंतःकरणातून हास्य-विनोदाचा एखादा चिमुकला झरा झुळझुळताना दिसतो. ही मोठी माणसे आपल्याला त्यामुळे जवळची वाटतात. माणसांशी जवळीक साधण्यासाठी प्रकांड पांडित्यापेक्षा प्रसन्न विनोदबुद्धीच अधिक उपयोगी पडते. विनोदबुद्धी हा माझ्या मते माणुसकीचा सुंदर आविष्कार आहे. सहजासहजी गमतीदार विनोद करून ताण हलका करण्यासाठी खोडकर विनोदाचा, मिस्कील मल्लिनाथीचा, थोड्याशा खट्याळ, खोचक बोलण्याचा निश्चितच परिणाम होतो. गाण्याने ज्याप्रमाणे परिश्रम हलके वाटतात, त्याप्रमाणे विनोदाने मनावरचे ओझे कमी होते." हेही नसे थोडके. लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरण्यात आला. त्यावेळी कोणता वकील द्यावा याची चर्चा त्यांच्या उपस्थितीत मित्रमंडळींनी सुरू केली. निरनिराळी नावे सुचविण्यात आली. एक हितचिंतक उत्साहाने म्हणाले,

"आपण एका वकिलाच्या ऐवजी दोन मोठे नामवंत वकील देऊ. दोन वकिलांच्या युक्तिवादामुळे आपली बाजू दुप्पट बळकट होईल." त्या हितचिंतकाची सूचना ऐकून लोकमान्य टिळकांच्या एरवी गंभीर भासणाऱ्या मुद्रेवर खोडकरपणाचे सूक्ष्म हसू चमकले. टिळक हे देखील वकीलच होते. युक्तिवादाला अत्यंत पक्के. ते हितचिंतकाला म्हणाले,

"भल्या गृहस्था, तुला एका चौदा वर्षांच्या नवरीला अठरा वर्षांचा एक नवरा आण म्हणून सांगितले तर तू नऊ नऊ वर्षांचे दोन नवरे आणशील. अरे, दोघांचे काय काम? एक चांगला वकील पुरेसा आहे."

लो. टिळकांचा हा विनोद ऐकून सारेच खळखळून हसू लागले. वातावरणातला गंभीर ताण आपोआप कमी झाला. टिळकांनी केलेला हा विनोद बराच खोडकर असला तरी तर्कशुद्ध होता.

न्यायालयातसुद्धा कधी कधी विनोद घडतात. बहुधा कोर्टाचे वातावरण रूक्ष, गद्यप्राय असते. कोर्टात कुणी मोठ्याने हसला तर ते अशिष्टपणाचे मानले जाते. न्यायाधीशांचा चेहरा उग्र-गंभीर असतो. काळा डगला चढवलेले वकील काळपुरुषासारखे दिसतात. अशा वातावरणात एकदा एका खटल्याची सुनावणी चालली असताना दोन वकील भांडू लागले. भांडणाच्या आवेगात ते एकमेकांना शिव्या देऊ

लागले. एकजण म्हणाला, "तुम्ही गाढव आहात." दुसरा म्हणाला, "तुम्हीच गाढव आहात" प्रत्येकजण दुसऱ्याला "तुम्ही गाढव आहात" असे ठासून सांगत होता. असा प्रकार सात-आठ वेळा घडल्यानंतर न्यायाधीश वकिलांना उद्देशून म्हणाले, "सभ्य गृहस्थहो, मी इथे हजर असताना, माझी काहीच दखल न घेता तुम्ही एकमेकाला गाढव म्हणत आहात हे योग्य नाही." न्यायाधीशांच्या या बोलण्यावर कोर्टातले सारेच लोक हसू लागले. आपल्या बोलण्याचा नेमका अर्थ काय होतो हे न्यायाधीशांच्या ध्यानातच आले नाही. अनवधानाने असे विनोद घडून जातात. एक वकील साक्षीदाराला विचारीत होता, "आरोपीने कोणत्या शिव्या दिल्या त्या इथे सांगा." साक्षीदार म्हणाला, "त्याने अत्यंत घाणेरड्या शिव्या दिल्या. पण त्या इथे सभ्य लोकांत सांगण्यासारख्या नाहीत." यावर वकील म्हणाला, "अस्से! तर मग त्या न्यायाधीशांच्या कानात सांग." यावर लोक का हसले याचा उलगडा बिचाऱ्या वकिलाला लवकर झाला नाही. त्याच्या डोक्यातली ट्यूब बऱ्याच उशिराने पेटली. पंडिताला सुद्धा विनोदबुद्धी असतेच असे नव्हे. विनोदचतुर मनुष्य पंडित असू शकतो. पण पंडितमनुष्य कित्येक वेळा विनोदाच्या नावाने भोपळा असतो. माझ्या माहितेचे एक महापंडित आयुष्यात कधीही हसले नाहीत. हसणे हे पोरकटपणाचे बुध्दिहीन कृत्य आहे. तस्मात हास्यविनोदासारख्या अर्थशून्य उथळ कृत्यात आपण आपल्या अमोलिक आयुष्याचा अकारण अपव्यय करू नये, असे या पंडितवर्यांचे मत होते. आता असल्या पांडित्याला घेऊन काय करायचे ? हास्याशी शत्रुत्व करणाऱ्या गांभीर्याला मी तरी मूर्खपणाचीच आवृत्ती मानतो.

सोलापूरच्या एका सभेत "नाटक"या विषयावर बोलताना पु. ल. देशपांडे सहज म्हणाले, "माणसे नाटकात कुठलीही भूमिका करतात. मी तर असे पाहिले आहे की, व्यवहारात वकील असलेला माणूस नाटकात मात्र सज्जनाची भूमिका करतो याला काय म्हणावे ?" सभेत प्रचंड हशा पिकला. सोलापुरातले अनेक नामवंत वकील सभेला उपस्थित होते. बहुतेकजण व्यासपीठाजवळच्या रांगेत बसलेले होते. पु. ल. देशपांडे यांच्या या वात्रट विनोदामुळे सारी सभा जरी खळखळून हसली तरी काही वकिलांचे चेहरे मात्र "प्रेक्षणीय" झाले. विनोद करण्यासाठी केवळ कोटिबाजपणा, कल्पकता आणि मिस्कीलपणा एवढेच भांडवल पुरत नाही. मनाचा स्वच्छपणा हे सर्वात महत्त्वाचे साधन आहे. दुसऱ्याविषयीच्या घाणेरड्या मत्सरातून जेव्हा विनोद आकार घेतो तेव्हा तो विनोद नसून दुर्गंधी विकाराची घृणास्पद अभिव्यक्ती असते. अब्राहम लिंकनला आपल्या कुरूपतेवर हितशत्रूंचे पुष्कळ मत्सरी विनोद सहन करावे लागले. पण लिंकन हा खरोखरच अत्यंत उमद्या मनाचा, विशाल अंत:करणाचा, सुसंस्कृत प्रवृत्तीचा, विलक्षण विनोदप्रिय असा रसिक होता. क्षुद्र जातीच्या हलक्यासलक्या कुचाळीच्या डबक्यात डुंबणाऱ्या मत्सरग्रस्त कीटकांची त्याने कधीच कदर केली नाही. रसिक विनोदबुद्धीमुळे त्याची लोकप्रियता वाढतच गेली.

विनोदबुद्धी हे एक श्रेष्ठ वरदान आहे. विनोदबुद्धीची ढाल हातात असली आणि रसिकतेचे चिलखत अंगात घातले की मग मनुष्य कोणत्याही आपत्तीशी आत्मविश्वासाने लढू शकतो. एका अत्यंत किडकिडीत माणसाला लठ्ठ होण्यासाठी डॉक्टरांकडून औषध हवे होते. त्या अशक्त दुबळ्या आणि चिरचिऱ्या माणसाच्या आंबलेल्या चेहऱ्याकडे पाहून डॉक्टर म्हणाला,

"तुमचा रोग मी ओळखला आहे. या रोगाचे औषध कोणत्याही दुकानात विकत मिळत नाही. हे औषध तुमच्याजवळच आहे." रोगी गोंधळला. त्याला काहीच समजेना. त्याचा गोंधळलेला अडाणी चेहरा पाहून डॉक्टर मोठ्याने हसून म्हणाले,

"भल्या माणसा, तुला दहालाखाची गोष्ट सांगतो. ऐक. सकाळी झोपेतून उठल्यापासून रात्री झोपी जाईपर्यंत अनेक वेळा हसत जा. हसणे, खिदळणे हे निसर्गाचे वरदान प्रत्येकापाशी असते. तुझा एरंडेल प्याल्यासारखा चेहरा तिऱ्हाइताच्या नजरेने आरशात पाहा आणि खळखळून हसत रहा. तुझ्या हृदयातून जेव्हा हास्यविनोदाचे कारंजे उचंबळून येईल तेव्हा त्या शुभ्र धारेबरोबर सगळे रोग वाहून जातील. दिवसातून पाचपंचवीस वेळा बेदरकारपणे हसून घे. हसता हसता तू बदलशील. हसण्याच्या प्रत्येक स्फुरणाबरोबर तुझे वजन वाढेल. "हसा आणि लठ्ठ व्हा" हाच माझा संदेश आहे. या डॉक्टरी सल्ल्याबद्दल पंचवीस रुपये खिशातून काढ."

आता तो दुबळा रोगी शहाणा झाला होता. पैसे काढ म्हटल्याबरोबर तो खळखळून हसला आणि डॉक्टरला अंगठा दाखवून निघून गेला. आता डॉक्टरचा चेहरा मात्र कडू औषध प्यायल्यासारखा झाला.

□□□

# ३. नाटक

"काव्येषु नाटकम् रम्यम्" असं म्हणतात ते अगदी खरं आहे. नाटक हे दृश्य काव्य आहे. ते जितकं दर्शनीय तितकंच श्रवणीय असतं. ते आपल्या मनावर विलक्षण प्रभाव टाकतं. अनेक अभिनेत्यांनी रंगभूमीवर आपल्या कलेचा जो उत्कट आविष्कार केला तो पाहिलेल्या आणि अनुभवलेल्या रसिकांचं भावजीवन संपन्न झालं यात शंका नाही. हजारो प्रेक्षकांच्या समोर प्रकाशाच्या झोतात एखादा अभिजात नट आपल्या अभिनयाचं जेव्हा प्रत्ययकारी दर्शन घडवीत असतो तेव्हा तो नवनिर्मिती करीत असतो. नटवर्य नानासाहेब फाटक यांनी साकार केलेला हॅम्लेट जेव्हा मी पाहिला तेव्हा माझ्यासमोर तो डेन्मार्क देशाचा तरुण, भावनाप्रधान, चिंतनशील, उतावळा आणि सत्प्रवृत्त पण निराश झालेला, आतून उद्ध्वस्त बनलेला राजपुत्र साक्षात उभा राहिला. खरं तर शेक्सपीअरच्या बहुरूपी आणि बहुमिती प्रतिभेनं चितारलेला हा हॅम्लेट जो नानासाहेबांनी कधी पाहिला नव्हता तोच त्यांनी आपल्या व्यक्तित्वातून निर्माण केला आणि त्या हॅम्लेटशी आम्ही सारे प्रेक्षक एकरूप होऊन गेलो हा केवढा चमत्कार आहे! नाटककारानं लिहिलेला शब्द आणि रंगवलेलं व्यक्तिमत्त्व एखादा नट किंवा नटी त्यात जीवनाचा रस ओतून जिवंत बनवते याचं कुणाला आश्चर्य वाटणार नाही? नानासाहेब फाटकांच्या आधी गणपतराव जोशी हॅम्लेटची भूमिका करीत असत. गणपतरावांच्या दृष्टीत, वृत्तीत, हालचालीत आणि श्वासनिःश्वासात तो मनस्वी प्रकृतीचा हॅम्लेट संचारलेला असायचा असं मी ऐकलं आहे. ज्याला मराठीतलं एक अक्षरही कळत नव्हतं असे लोक त्यात - कित्येक युरोपिअनही - असायचे. त्यांनाही गणपतरावांनी आपल्या सामर्थ्यानं प्रभावित केलेलं असायचं. गणपतरावांची ही कीर्ती जुन्या पिढीतली माणसं अजूनही भावनावश होऊन सांगतात आणि म्हणतात, "अरे, गणपतरावाला वेगळ्या भूमिकांत पाहणं, जीवनानं सळसळणारे त्यांचे शब्द ऐकणं हा एक साक्षात्कारी अनुभव होता. एखादा टीकाकार हॅम्लेटवर फार झालं तर पांडित्यपूर्ण व्याख्यान देईल. हॅम्लेट असा होता अन् तसा होता असं सांगत बसेल. पण माझी खात्री आहे की, आपला हॅम्लेट पाहण्यासाठी शेक्सपीअरचा आत्मादेखील गणपतरावांचं दर्शन घेण्यासाठी नाटकगृहात येऊन बसत असेल. आणि या माणसाचं वैशिष्ट्य असं

की, हॅम्लेटइतकीच तो तुकारामाची भूमिकाही जबरदस्त ताकदीनं उभी करायचा. खुद्द तुकाराममहाराज देखील आपलं "सुंदर ते ध्यान" पाहून आनंदून गेले असते.

मागील पिढ्यांत होऊन गेलेले हे कलावंत आता केवळ कौतुकाचा विषय होऊन राहिले. नानासाहेब फाटकही निघून गेले. नवनिर्मिती करणारा कलावंत देखील मग तो चित्रकार, गायक, अभिनेता, नर्तक, नाटककार, कोणीहि असो, काळाच्या प्रवाहाबरोबर एक दिवस वाहून जातो. पण असंख्य रसिकांच्या मनावर आपल्या हृदयातलं प्रतिभेचं आणि कलेचं सुगंधित अत्तर काही काळ शिंपीत राहतो. कलावंतांनी आपल्या आत्म्याच्या चंद्रकलेचं चांदणं आम्हाला दिलं नसतं तर आयुष्याच्या वाळवंटात अगदीच कोरड्या मनानं आम्ही वणवणत राहिलो असतो. पण दुर्दैवाची गोष्ट अशी की, कलावंतांना ओळखण्याची आणि रसिकतेनं त्यांना कवेत घेण्याची हिरवी शक्ती आजच्या विज्ञानयुगात दुर्मिळ होत चालली आहे. अमृतमधुर ओवीतून आपल्या मनी-मानसीची कोवळीक गोवणारा ज्ञानेश्वर काही चमत्कार होऊन आज अवतीर्ण झाला तर त्याला "या बसा" म्हणण्याइतकी अभिज्ञता आजच्या जगात असेल का? कालिदास अन् शेक्सपीअर आज आले तर त्यांची दखल घेण्यात येईल काय? फार तर एखाद्या राज्यपालाच्या किंवा मंत्र्याच्या हस्ते त्यांना राज्यपारितोषिक देऊन आम्ही त्यांच्या ऋणातून मुक्त होऊ. कोणी काही म्हटलं तरी जो समाज कलावंतांना ओळखत नाही, कलावंतांच्या सौन्दर्यपूर्ण समर्थ आविष्कारात हरवून जात नाही तो समाज कितीही सुशिक्षित असला आणि श्रीमंत असला तरी माझ्या मते तो कंगालच म्हटला पाहिजे. सवंगपणा आणि मनोवृत्तीचा कंगालपणा हे आजच्या जगाचे ठळक दुर्गुण होऊन बसले आहेत, अशी खंत वाटत राहते.

माझ्या एका मित्राबरोबर "रंगभूमी आणि नाटक" या विषयावर मी रंगून बोलत होतो. तो म्हणाला,

"गेलेल्या गोष्टीबद्दल हळहळत राहणं आणि चालू पिढीला शिव्या देणं ही एक आजकालची फॅशन होऊन राहिली आहे. अरे, कलावंत तर प्रत्येक पिढीत जन्माला येतात. सत्तेचं सिंहासन जसं रिकामं पडत नाही, ते घेण्यासाठी ज्याप्रमाणं अनेक महत्त्वाकांक्षी माणसं धूर्तपणानं टपून बसलेली असतात, त्याप्रमाणंच कलेच्या सिंहासनावरही नवे राजे आणि नव्या राण्या येतच असतात. पूर्वीसारखा कलावंत आज निर्माण होणं शक्य नाही, असल्या निराशावादात काय अर्थ आहे? कालचा सूर्य मावळला तर उद्याचा निश्चित उगवणार आहे. कालची फुलं सुकली तर सुकू द्या. शेकडो फुलं फुलवण्याची जादुगिरी सृष्टीत असतेच. एक लाट विरून गेली म्हणून काय झालं? लाटांमागून लाटा उचंबळत राहतात."

हे प्रतिपादन "आशावादी" असलं तरी ते संपूर्णतया तर्कशुद्ध मात्र नव्हतं. शेकडो फुलं नेहमीच फुलत नाहीत. ती फुलावीत म्हणून फुलझाडांची जोपासना करावी लागते. उचंबळत्या लाटांचा सागर कधी कधी नको तितका संथ आणि शांत असतो.

त्याच्या प्रचंड लाटांचं नर्तन सुरू होण्यासाठी वातावरणातही बदल व्हावा लागतो. मी मित्राला म्हणालो, "तुझं म्हणणं थोडंसं खरं आहे आणि पुष्कळसं खोटं आहे. कोणत्याही क्षेत्रातले कलावंत आपल्याला "तयार" करता येत नाहीत. कवी, नट, गायक आणि चित्रकार एखाद्या कारखान्यात आपण बनवू शकलो असतो तर आज या कलावंतांच्या स्पेअर पार्टस्‌ची आपण खरेदी-विक्री केली असती. लक्षात ठेव, सोन्याचं फूल सोनाराला आपल्या ऐरणीवर घडवता येतं, पण त्या सोन्यात सुगंध निर्माण होण्यासाठी निसर्गाची किंवा परमेश्वराचीच शक्ती असावी लागते. टेलीव्हिजन सेटचे कारखाने आहेत, पण टेलीव्हिजनवरून गाणारे कलावंत कोणत्या कारखान्यात आपण प्रोडयूस करणार आहोत ? हे प्रॉडक्शन काही आपल्या हातातलं नाही. व्यास एकच झाला, ग्यानबा आणि तुकाराम एकेकच झाले. तसेच काही असामान्य गायकही पुन्हा जन्माला आले नाहीत. एकच उदाहरण देतो. बालगंधर्वांसारखा गायक नट पुन्हा उदयाला येईल का ? असा बालगंधर्व आता न होणे हेच खरे!

माझ्या मित्रानं हा मुद्दा मात्र तात्काळ मान्य केला. त्याला बालगंधर्वांविषयी फार आत्मीयता होती. एखाद्यानं या गायकाविषयी काहीसा प्रतिकूलतेचा उद्‌गार काढला की तो चिडून म्हणायचा, "मिस्टर, जगातल्या कोणत्याही माणसावर तुम्ही टीका केली तरी मी शांतपणानं सहन करीन, पण बालगंधर्वांबद्दल काही वेडंवाकडं बोलाल तर आपलं डोकं भडकल्याशिवाय राहणार नाही." त्याच्या गंधर्वप्रेमानं मला बरं वाटतं. एखाद्या लेखक कवीला, कलावंताला आपली भावफुलं वाहणारी रसिक माणसं मला आवडतात. आवडत्या व्यक्तीचे दोष सुद्धा दुसऱ्या कुणी दाखवलेले काही जणांना आवडत नाहीत. त्यांची प्रतिक्रिया फार तीव्र असते. एकदा गडकऱ्यांसमोर कुणीतरी रँगलर परांजप्यांची थोडीशी निंदा केली. परांजप्यांविषयी बोलताना त्यानं त्यांच्या आकडे वळवलेल्या मिशांचा उपहासपूर्वक उल्लेख केला. परांजपे हे गडकऱ्यांचे गुरू. गुरुनिंदा त्यांना मुळीच सहन झाली नाही. ते ताडकन्‌ त्या निंदकाला म्हणाले, "का हो! परांजप्यांच्या मिशा टोचतात अशी तुमच्या "घरातून" तक्रार तर आली नाही ना ?" गडकऱ्यांचे हे खट्याळ, संतप्त उद्‌गार समर्थनीय असोत की नसोत, पण त्यातून त्यांची अभंग निष्ठा मात्र सहज जाणवते. आपले काही मानबिंदू असतात. श्रद्धास्थानं असतात. त्यांना धक्का लागला की आपण अस्वस्थ होतो. बालगंधर्वांबद्दलचा माझा मुद्दा असा आहे की, त्या सामर्थ्याचा गायक आणि नट लवकर निर्माण होणं शक्य नाही. शिवाजीसारखा छत्रपती जसा एकच झाला तसा नारायणराव राजहंसासारखा (बालगंधर्व) गायक नट एकच झाला असं म्हणावं लागतं. मला गाण्यातलं फार कळतं असा माझा दावा नाही. पण एकदा बालगंधर्वानं आपल्या वृद्धापकाळात आळवलेली एक भैरवी ऐकण्याची दुर्मिळ संधी मला मिळाली. मुंबईला कुठल्याशा हॉलमध्ये ही मैफल झाली. वृद्ध आणि गलितगात्र झालेल्या या कलावंताचं केवळ "दर्शन" घडावं म्हणून मी तिथं गेलो. नारायणराव विलक्षण तन्मयतेनं गायले. त्यांच्या आत्म्याची

तार त्यादिवशी झंकारत होती. हॉलमधलं सारं वातावरण सुरांनी सुगंधी आणि व्याकुळ सुरांनी कंपित झालं होतं. नारायणरावांनी तुकारामाच्या एका अभंगात आपली सारी जीवकळा ओतली होती. वाहवा! तुकयाचे उत्कट शब्द आणि बालगंधर्वांचे भक्तीनं, संगीतानं, चैतन्यानं चिंब भिजलेले ते स्वच्छ, अतिनिर्मळ, भावमधुर स्वर यांचा एक अद्वितीय संगम मला त्यादिवशी पाहायला आणि ऐकायला मिळाला. नारायणरावांच्या डोळ्यांतून अश्रू वाहात आहेत, कंठातून स्वरगंगेचा प्रवाह झुळझुळत आहे आणि आम्ही श्रोते साऱ्या इंद्रियांचे कान करून सर्वांगांनी ते स्वर्गीय संगीत ऐकत आहोत. इतके रोमांचक क्षण एखादा कलावंत आपल्या आयुष्यात देऊन जातो. हे क्षण क्षणभंगुर नसतात. मनाच्या आणि आठवणींच्या शिंपल्यात मोती होऊन जन्मभर सोबत करतात. मी तरी ते मंतरलेले क्षण माझ्या मनात भरून घेतले आहेत. कधी कधी या आयुष्याचा मला वैताग येतो. कधी निराशेनं, कधी दु:खानं विव्हल होऊन जातो. पण अशा वेळी मनाच्या वेलीला भराभर आशेची पानं फुटतात. सुवासिक भावनांच्या कळ्या उमलायला लागतात. "आनंदाच्या डोही आनंद तरंग" भरलेले आहेत असं तो देहूचा तुकोबा पाठीवर हात फिरवून सांगायला लागतो. नानासाहेब फाटकांचा तो विलक्षण जिवंत अभिनय आठवायला लागतो. बालगंधर्वांचं ते अविस्मरणीय गायन गात्रागात्रातून जागं होऊ लागतं. असलेच अनुभव जीवनाला सुंदर आणि सकस बनवतात. हा अनुभव सांगून मी मित्राला म्हणालो,

"असे श्रेष्ठ कलावंत कोणत्या नियमानं किंवा रूढीनं तयार होत नाहीत. सृष्टीची लहर म्हणूनच त्यांचा अवतार होतो." "अवतार" वगैरे शब्द मी भाविकतेनं किंवा आध्यात्मिक अर्थानं योजत नाही, पण असे अभिजात कलावंत जन्मावेच लागतात. आपली कला सादर करताना ते जणू स्वत:ला आणि साऱ्या जगाला विसरतात. मी जेव्हा बालगंधर्वांची रुक्मिणीची भूमिका प्रथम पाहिली तेव्हा हा गंधर्व वृद्ध होण्याच्या मार्गावर होता. मधून मधून खोकत होता. रंगभूमीवर त्याला पाहिल्यावर मला धक्काच बसला. रुक्मिणीची तारुण्यानं अन् सौंदर्यानं न्हालेली प्रतिमा या म्हाताऱ्या होणाऱ्या शरीरातून आता कशी साकार होणार? पण आपल्या वृद्धत्वावरही मात करून नारायणरावांनी त्यादिवशी रुक्मिणीची खेळकर, अल्लड भूमिका रंगवण्याचा प्रयत्न केला. कलावंताला म्हातारपण फारसं अडवू शकत नाही हे माझ्या लक्षात आलं. आपल्या ऐन तारुण्यात बालगंधर्वांनी गाण्यातून आणि अभिनयातून कोणते दिव्य चमत्कार केले असतील कुणास ठाऊक! ज्यांनी ते पाहिले ते धन्य! पण पन्नाशी उलटून गेल्यावरही त्यांनी केलेल्या स्त्री-भूमिका रसिकांच्या मनावर चांदणं उधळून गेल्या.

नाटकाला आपल्या प्रतिभेनं नवं लावण्य देणारे काही नट-नटी मी पाहिले याचा मला अभिमान वाटतो. पण नट होणं किंवा गायक होणं म्हणजे एखादी परीक्षा पास होण्याइतकं सोपं असत नाही. सध्या परीक्षेत नापास होणंच अवघड आहे. चार वाक्यं ज्याला शुद्ध अन् स्वच्छ लिहिता येत नाहीत असा मनुष्य आपण "डबल

ग्रॅज्युएट" आहोत असं ऐटीनं सांगतो तेव्हा विद्यापीठाचा दर्जा काय असेल हे लक्षात येतं. कलावंताला तपश्चर्या करावी लागते. तो तपस्वी असेल तरच यशस्वी होईल. कलेच्या ध्यासानं तो अंतर्बाह्य व्यापलेला असावा लागतो. "एव्हरी आर्टिस्ट डिपूस् हिज ब्रश इन् हिज ओन सोल." प्रत्येक कलावंत आपल्या आत्म्यात कुंचला बुडवून कलेची आराधना करतो. असे कलाकार जेव्हा आपली कला व्यक्त करतात तेव्हाच तिच्या दिव्यत्वाचा प्रत्यय येतो. पण कलावंतांना ही दिव्यपूजा करताना आपल्या आयुष्याची किंमत द्यावी लागते. वैयक्तिक सुखदुःखांची कुंपणं ओलांडून त्यांना कलाविषयाशी तादात्म्य साधावं लागतं. एखाद्या वेडया व्याकुळ प्रियकरानं प्रेयसीचा ध्यास घ्यावा आणि तिच्यासाठी तळमळत राहावं तशी कलावंताच्या जीवाची तडफड होत राहिली पाहिजे. त्याला कधी सुखाची झोप येत नाही. जीवनावेगळ्या मासोळीसारखा कलेसाठी तडफडणारा, जीव गहाण टाकणारा कलावंत पाहिला की तिथं मस्तक नम्र करावं असं वाटतं. विठ्ठलासाठी वेडापिसा झालेला नामदेवासारखा आर्त भक्त आणि नाटकासाठी, गाण्यासाठी वेडावलेला, भारलेला कलावंत मला एकाच जातीचे वाटतात. दोघेही ईश्वराची उपासना करीत असतात. असे कलावंत कधीच मरत नाहीत. आम्हालाही ते मरू देत नाहीत. जीवनाच्या जल्लोषात आपल्या कलेचा रंग भरीत ते चिरकाल नांदत असतात. माझा मित्र म्हणाला,

"तू कलावंतांची अतिरिक्त स्तुती करतोस असं तुला वाटत नाही का?" मी म्हणालो, "मुळीच नाही". काही कलावंत आपली सारी जिंदगी बुडवून टाकतात पण कलेचा धर्म मात्र निष्ठेने पाळतात. अनेक उदाहरणे देऊ शकेन, पण आता बालगंधर्वांचंच देतो."

बालगंधर्वांचा उल्लेख करताच त्याची कळी उमलली. मी म्हणालो, "मानापमान नाटकाच्या प्रयोगाची जाहिरात एका शहरात करण्यात आली. तिकिटांची तडाखेबंद विक्री झाली. बालगंधर्वांची भामिनीची भूमिका पाहण्यासाठी रसिक आतुर होते, पण ज्या दिवशी प्रयोग होता त्या दिवशी सकाळीच नारायणरावांची लाडकी कन्या मरण पावली. त्यांच्या काळजाचा जणू तुकडाच काळानं कापून घेतला. ते अत्यंत विव्हल झाले. एखाद्या लहान मुलासारखं ढसढसा रडले. दुपारच्या वेळी कंपनीच्या व्यवस्थापकानं आजचा प्रयोग रहित करावा असं आग्रहानं सुचवलं. कंपनीतल्या साऱ्याच जणांची ती इच्छा होती. पण ही सूचना ऐकल्याबरोबर नारायणरावातला जन्मजात कलावंत उचंबळून वर आला. कन्येच्या मृत्यूनं दुःखी झालेला पिता आता बाजूला पडला. ते मॅनेजरला निग्रहानं म्हणाले, "देवा, काही झालं तरी आजचा प्रयोग होणारच. हजारो प्रेक्षकांची निराशा करणं बरोबर नाही. जाहीर झालेला प्रयोग झालाच पाहिजे."

रात्री नारायणराव रंगपटात गेले. भामिनीची वेषभूषा करू लागले. भामिनीच्या लालित्यपूर्ण प्रेममय, शृंगारमय, सुंदर व्यक्तित्वात ते विलीन झाले. आता तिथं कोणी नारायणराव राजहंस नावाचा मनुष्य उरला नव्हता. आता तर तिथं धैर्यधराच्या

प्रेमसागराला भरती आणणारी प्रणयचंद्रिका भामिनी, आपल्या सौंदर्याच्या तोऱ्यात उभी होती. नाटकाची तिसरी घंटा झाली. पडदा वर गेला. लावण्यवती गानदेवता भामिनी आपल्या स्त्रीसुलभ डौलदार चालीनं रंगभूमीवर जरतारी वस्त्रांत आणि प्रकाशाच्या झोतात अवतीर्ण झाली. नुसत्या एन्ट्रीलाच टाळ्यांचा कडकडाट झाला. अंगोपांगात भामिनी संचारलेल्या बालगंधर्वांच्या कंठातून एक ढंगदार नाट्यगीताची दाणेदार तान आपला अंगभूत सुगंध घेऊन प्रकट झाली. पारिजातकाचा सडा पडावा किंवा उन्हानं तापलेल्या अंगावर पुनवेच्या चांदण्याच्या दुग्धधारा सांडाव्यात तसं नाटकगृहातलं वातावरण बदलून गेलं. कन्येच्या मरणाचं शल्य आता त्या गंधर्वाला - त्या भामिनीला टोचत नव्हतं. ती भामिनी आता केवळ धैर्यधराच्या प्रेमपाशात गुरफटून स्वत:ला हरवून बसली होती. प्रणयाच्या सुवासात आणि प्रियकराच्या पराक्रमात न्हाली होती. नाटक विलक्षण रंगलं. पहाटेचा कोंबडा आरवला तेव्हाच ते संपलं. जणू हजारो रसिकांनी सुस्वरात आणि सौंदर्यात गुरफटलेलं एक मुलायम स्वप्न रात्रभर पाहिलं होतं. हा रोमांचित करणारा अनुभव त्या कलावंतानं आपल्या रसिकांना दिला होता. नारायणराव रंगपटात आले. भामिनीचा रंग चेहऱ्यावरून उतरला. क्षणार्धात ती मानिनी, ती प्रणयिनी अंतर्धान पावली. आता वत्सल पित्याची प्रकृती पुन्हा नारायणरावात संचारली. लाडक्या लेकीच्या मरणाचं जळतं दु:खं त्यांना चटके देऊ लागलं आणि पुन्हा नारायणराव अश्रू गाळू लागले. कलावंताला आपल्या खाजगी वेदना आणि खाजगी सुखं कुठल्या तरी बासनात गुंडाळून ठेवाव्या लागतात. आपल्याच लहानसहान दु:ख-दैन्याच्या वर्तुळात अंग आखडून बसलेला माणूस कधीच कलावंत होऊ शकत नाही. बालगंधर्वांसारखा, चार्ली चॅप्लीनसारखा, गणपतराव जोशी किंवा नानासाहेब फाटकांसारखा कलावंत जेव्हा जीवनातलं नाट्य रंगभूमीवर किंवा पडद्यावर उभं करतात तेव्हा ते स्वत:च बुडालेले नसतात. दुसरी व्यक्तित्वं आपल्यात निर्माण करून त्या व्यक्तित्वांची सुखदु:खं ते साकार करीत असतात.

श्रेष्ठ नाटक, श्रेष्ठ काव्य असा अद्‌भुत अनुभव देऊ शकतं. ज्याला कोणत्याही भावनेशी आणि व्यक्तित्वाशी समरस होता येतं तो उत्तम नट, उत्तम कवी, उत्तम कलावंत होऊ शकतो. आपलं दररोजचं जीवन हे एक नाटकच आहे. आयुष्याच्या रंगभूमीवर आपल्याला ते करून दाखवायचं आहे. पण जो रंग आपण आपल्या तोंडाला लावू तो प्रामाणिकपणानंच लावला पाहिजे. सारे मुखवटे घेऊन, पण स्वत:शी इमान राखूनच हे नाटक करायचं आहे. नाटक आपल्या रक्तात मुरावं, आपलं नाटक "नाटकी" होऊ नये, त्या नाटकात जीवनातली अनेक सुखदु:खं असावीत अन् त्यांच्या अस्सल गंधातून आपलं जीवननाट्य आकाराला यावं, यापेक्षा अधिक काय सांगू?

□□□

# ४. होनी - अनहोनी

काही दिवसांपूर्वी दूरदर्शनवर "होनी - अनहोनी" या नावाची एक महामूर्खपणावी चित्रमालिका दाखवण्यात येत होती. एकविसाव्या शतकात प्रवेश करताना आपण वैज्ञानिक दृष्टिकोन स्वीकारून आपलं जीवन प्रगत केलं पाहिजे असं आमचे पंतप्रधान दररोज सांगत असतानाच कुठल्यातरी भाकडकथा दूरदर्शनवर दाखवण्यात याव्यात याचं मला आश्चर्य वाटलं. कोणत्यातरी मुलाला म्हणे आपला पूर्वजन्म आठवतो. एखाद्या आठ - दहा वर्षांच्या पोरीला दोनचार दिवसांनी काय घडणार आहे ते म्हणे अचूक कळतं. असल्या अशास्त्रीय , अशक्य समजुतीवर आधारलेल्या काही अद्‌भुत कथा मोठ्या गंभीरपणानं प्रेक्षकांना दाखवण्यात आल्या. भोळ्याभाबड्या अंधश्रद्ध लोकांच्या मनांत असल्या कथा गोंधळ उडवून देतात. वैचारिक प्रबोधनाला या प्रकारच्या निराधार, अर्थहीन गोष्टींनी कसली मदत होणार आहे ? अद्‌भुताचं आकर्षण प्रत्येक माणसाला काही प्रमाणात असतं. यक्षकिन्नरांच्या आणि पऱ्यांच्या कथा आजही मी आवडीनं वाचू शकतो. "अरबी भाषेतल्या सुरस आणि चमत्कारिक गोष्टी" ज्यानं वाचल्या नाहीत तो एका रोमहर्षक अनुभवाला मुकला असंच मी म्हणेन. आपल्या पुराणातही शेकडो अद्‌भुत घटना आहेत. त्या वाचताना मनोरंजन होतं यात शंका नाही. अद्‌भुत वाङ्मयाचा मी काही विरोधक नाही. काव्याप्रमाणेच जीवनातही अद्‌भुताच्या काही छटा असू शकतात हे मी मानतो. पण 'होनी - अनहोनी' ही मालिका केवळ मनोरंजनासाठी नव्हती. निर्मात्यांनी असा दावा केला होता की, या सर्व कथा "सत्यावर" आधारलेल्या आहेत. माझ्या दृष्टीनं हा दावा आक्षेपार्ह आणि हास्यास्पद आहे. घटकाभर स्वैर कल्पनेच्या पंखांवर बसून दुःखद वास्तवाकडं पाठ फिरवून अस्मानात भराऱ्या घेण्याचं सुख मी नाकारीत नाही. त्यात एक प्रकारची गोड फसवणूक असते. वास्तवाच्या सृष्टीत आपल्याला कुठेही एखादी "स्वर्गीय अप्सरा" भेटत नाही. कारण ती अस्तित्वातच नसते. पण कल्पनेच्या तीरावर बसून एखादा रोमँटिक लेखक जेव्हा पऱ्यांच्या आणि अप्सरांच्या कथा लिहितो तेव्हा

वाचकाला त्या अद्भुताचा आस्वाद घ्यावासा वाटतो. हे सारं अवास्तव आहे, खोटं आहे याची जाणीव ठेवूनही त्यातला आनंद चाखता येतो. जगातल्या साऱ्या भाषांतल्या वाङ्मयात कल्पनारम्य अद्भुत कथानकं पुष्कळ आहेत. पण म्हणून त्यावर श्रद्धा ठेवणं आणि या कथा सर्वस्वी वास्तव आहेत असं मानणं हा वेडेपणाच ठरेल. "होनी - अनहोनी" च्या निर्मात्यांनी हा वेडेपणा लक्षावधी भोळ्या लोकांच्या मनांत पेरण्याचा प्रयत्न केला हे खरोखरच आक्षेपार्ह आहे. अंधश्रद्धेला हे उत्तेजन आहे.

माझी ही प्रतिक्रिया ऐकल्यावर विज्ञानशास्त्र शिकवणारे एक प्राध्यापक मला म्हणाले, "तुमचा हा आक्षेप चुकीचा आहे. एखाद्याला आपला पूर्वजन्म आठवतो. आणि मग पूर्वजन्मातल्या सगळ्या घटना तो अगदी बरोबर सांगतो." त्या विज्ञाननिष्ठ प्राध्यापकाच्या भोळेपणाचं मला हसू आलं. मी म्हणालो, "खरं आहे तुमचं म्हणणं. या क्षणी मला तुमचा पूर्वजन्म आठवत आहे. सांगू का पूर्वजन्मी तुम्ही कोण होता ते?" माझ्या स्वरातला मिस्कीलपणा मात्र त्या विज्ञानाभ्यासक प्राध्यापकाला बरोबर कळला. तो म्हणाला, "तुम्हाला आता माझी चेष्टा करण्याची लहर आली आहे. पण माझाच एक अनुभव सांगतो. काही साधुपुरुषांना भविष्यकाळात घडणाऱ्या घटनांचं आकलन होत असतं. मागच्याच महिन्यातली गोष्ट. एके दिवशी भल्या सकाळी एक संन्यासी माझ्या घरी आला. त्याची भगवी वस्त्रं फाटलेली होती. जटा वाढलेल्या होत्या. छातीपर्यंत त्याची दाढी रुळत होती. पुडीतला अंगारा त्यानं माझ्या कपाळाला लावला आणि तो म्हणाला, "बेटा, आजपासून सात दिवसांच्या आत तुला चांगली बातमी ऐकायला मिळेल. प्रभूची तुझ्यावर कृपा झाली आहे. प्रभूला नैवेद्य दाखवण्यासाठी वीस रुपये दे." मी तत्परतेनं त्याच्या हातात पंचवीस रुपये ठेवले. सकाळच्या शुभवेळी त्या महापुरुषानं माझ्या घरी येऊन माझ्या कपाळाला पवित्र अंगारा लावावा या घटनेमागं काहीतरी परमेश्वरी सूत्र आहे किंवा खरं तर मला आशीर्वाद देण्यासाठी प्रत्यक्ष परमेश्वरच संन्याशाच्या रूपात माझ्यासमोर उभा राहिला असावा. पंचवीस रुपयांच्या त्या नोटा त्यानं आपल्या कनवटीला लावल्या आणि मला पुन्हा आशीर्वाद देत म्हणाला, "बेटा, तुझ्या भावभक्तीवर मी प्रसन्न आहे. मधून मधून असंच दर्शन तुला देत जाईन. तुझ्या कल्याणाची वेळ आता जवळ आली आहे." संन्यासी निघून गेला. आणि त्यानंतर चारपाच दिवसांनीच एस.एस.सी. परीक्षेचा पेपर-तपासनीस म्हणून माझी नेमणूक केल्याचं पत्र माझ्या हाती पडलं. त्या महापुरुषाचे शब्द खरे ठरले. असे अद्भुत अनुभव येत असताना "होनी - अनहोनी" ची कथामालिका मूर्खपणाची आहे असं तू म्हणतोस हे मला पटत नाही."

विज्ञानशास्त्र शिकवणारा हा प्राध्यापक! त्याची ही कथा! विद्यापीठाची उच्च पदवी मिळवलेली आणि स्वत:ला ज्ञानवंत म्हणवणारी ही माणसं जर भाकडकथांवर विश्वास ठेवतात तर अशिक्षित माणसांबद्दल काय बोलायचं? कुठलाही बोकेसंन्यासी चिमूटभर अंगाऱ्याच्या बळावर विद्वानाला बनवू शकतो आणि हे विद्वानही खुशाल

त्याच्या पायावर श्रद्धेनं डोकं टेकवायला तयार असतात. स्वतंत्र बुद्धीनं विचार करण्याची सवय या देशात लोकांना लागलीच नाही. शेकडो आणि हजारो वर्षांपूर्वी ज्या समजुती लोकमनात रुजल्या त्या आज अत्यंत दृढ होऊन बसल्या आहेत. त्या समजुतींचे बौद्धिक विश्लेषण करावे असे कुणाला वाटतच नाही. एकदा एका प्रवचनकाराला मी काही प्रश्न विचारले. कदाचित त्यावेळी मी नववी-दहावीच्या वर्गात असेन. प्रवचनकार गांभीर्याने सांगत होते,

"नवस केला की देव पावलाच म्हणून समजा. इथला देव फारच जागृत आहे. त्याला तुम्ही भक्तिभावानं कोंबडं द्या, तो तुमच्या मनोकामना पूर्ण करतो. एका आमदारानं या देवाला विनवलं होतं, 'मला मंत्री कर, मी तुला सोन्याचा मुकुट देईन.' सांगायचं तात्पर्य असं की, अवघ्या तीन आठवड्यांत तो मंत्री झाला. लाल दिव्याच्या गाडीत बसून हिंडू लागला. लोक त्याला हार घालू लागले. मानपत्रं देऊ लागले. ही सारी देवाची कृपा होती. पण त्यानं आपला नवस लवकर फेडला नाही. ते दैवत फार कडक होतं. तीन महिन्यांत त्याचं मंत्रीपद गेलं. आता त्याच्याकडं कुणी ढुंकूनदेखील पाहात नाही." प्रवचन संपल्यावर मी त्या पुराणिकाला म्हणालो,

"सोन्याचा मुकुट मिळाला नाही म्हणून देव चिडला काय? सोन्यानाण्याचा मोह धरणारा देव खरोखरच काही देऊ शकतो का? लाच खाऊन देव भक्तांची कामं करतो असं मानायचं का?" आता मात्र ते पुराणिकबुवा संतप्त झाले. माझ्या अंगावर ओरडून म्हणाले,

"हा सगळा शिक्षणाचा दुष्परिणाम आहे. शाळा-कॉलेजात गेलं की माणसं नास्तिक बनतात. त्यांना शिंगं फुटतात. देवादिकांची कुचेष्टा करतात. सगळ्या शाळा बंद केल्या पाहिजेत."

शिक्षणाच्या प्रभावाने मनुष्य नाना प्रकारचे प्रश्न उत्पन्न करतो आणि त्यांची उत्तरं शोधू लागतो हे अगदी खरं आहे. अशिक्षित माणूस प्रारब्धावर अवलंबून राहतो. परिस्थितीची चिकित्सा करून निर्णय घेण्याची शक्ती त्याच्या बुद्धीत कधीच येत नाही. तो "अनहोनी" वर गाढ विश्वास टाकतो. कुठलातरी बुवा नोटा दुप्पट करून देतो किंवा लोखंडाचं सोनं करतो असं यांना वाटतं. आणि मग त्या बुवाच्या चरणसेवेत हे भक्त लोभानं निमग्न होतात. असलेली संपत्ती दुप्पट करणं शक्य आहे. पण मंत्रानं नव्हे. कुठले तरी निरर्थक शब्द पुटपुटून 'छू' म्हटल्यावर लक्ष्मी प्रकट होते असे मानणे यासारखा दुसरा वेडेपणा असेल का? संपत्ती परिश्रमाने वाढते. व्यापार-उद्योगाने वाढते. विद्यादेखील अभ्यासातूनच वृद्धिंगत होते. सत्तेसाठी परिश्रम करावे लागतात. खाटल्यावर आळसानं पडून राहिलेल्या कुंभकर्णाच्या अंगावर संपत्तीचा वर्षाव होत नसतो. पण कोणत्याही दुःखाचा परिहार अमुक अमुक बुवा करू शकतील, कारण त्यांनी मंतरलेल्या पाण्यात दैवी गुण असतो. ते पाणी प्याल्याबरोबर आपल्या साऱ्या समस्या चुटकीसरशी सुटतात, असं समजून लाखो माणसं बुवांच्या कृपादृष्टीसाठी

तळमळत राहतात. हे सारेच अशिक्षित नसतात. विद्यापीठातील पदव्यांची लांबलचक शेपटी असलेले काही सुशिक्षित प्राणी विचारांचे दरवाजे बंद करून बसलेले असतात. नदीत आंघोळ केली की पुण्य लाभते आणि म्युनिसिपालिटीच्या नळाखाली आंघोळ झाली तर ती वाया जाते, असले केविलवाणे भ्रम बहुसंख्य लोकांच्या डोक्यात पिढ्यान् पिढ्या रुजलेले आहेत. एखाद्या घटनेची तार्किक चिकित्सा करावी, कार्यकारणभाव शोधून काढावा असं त्यांना वाटतच नाही. 'होनी - अनहोनी' सारख्या मालिका माणसाच्या भाबडेपणाला खतपाणी मात्र घालतात. पूर्वजन्म आहे की नाही हे सांगता येत नाही. पण चारसहा वर्षांच्या पोरीला मात्र आपण कलकत्त्यात अमुक एका विभागात राहात होतो. आपलं नाव लीला होतं. पतीचा व्यवसाय कारखानदारीचा होता. एके दिवशी विमानाच्या अपघातात आपला अंत झाला, असं सांगून ती चुणचुणीत पोरगी तारीख आणि वेळही बरोबर सांगते. काही चिकित्सक तिला आणखी माहिती विचारतात. सगळी माहिती ती भराभर सांगते. आणि ती खरी ठरते. हा चमत्कार पाहिल्याबरोबर या पोरीच्या ठायी काही तरी अलौकिक दैवी गुण आहेत याबद्दल सर्वांची खात्री पटली. श्रद्धा दृढ होते. त्या पोरीच्या पायांवर भाविक लोक डोकं ठेवू लागतात. वर्तमानपत्रांत ही आश्चर्यवार्ता प्रसिद्ध होते आणि मग तिच्या "दर्शनासाठी" लोकांची रीघ लागते. कोणी म्हणतो, "ती आदिमाता आहे." तर दुसरा म्हणतो, "साक्षात पार्वतीमातेनं आम्हा पामरांच्या उद्धारासाठी हिच्या रूपानं अवतार घेतला आहे." त्या मुलीच्या हस्तस्पर्शानं कसलाही रोग समूळ नाहीसा होतो, असा अनुभव काहीजणांना आल्याची जाहिरात होते. मुळात जाऊन साऱ्या घटनांची तटस्थपणानं छाननी करावी आणि नंतर निष्कर्ष काढावा असं या भाविकांना ( खरं तर बावळटांना ) वाटतच नाही. हस्तस्पर्शानं रोग बरे होत असते तर सगळी रुग्णालयं आणि औषधनिर्मितीची केंद्रं केव्हाच बंद पडली असती. आपल्या हस्तस्पर्शानं आणि मंत्रोपचारानं आपण अनेकांना रोगमुक्त केलं आहे असा दावा करणारे दैवी सामर्थ्याचे मांत्रिक स्वत:ला एखादा रोग झाला की मुकाटपणानं हॉस्पिटलात जातात. या विसंगतीचा अर्थ काय ? पण घाण्याच्या भोवती डोळ्यांवर झापडं लावून फिरत राहणाऱ्या बैलासारखी बैलबुद्धीची माणसं स्वतंत्र विचाराकडे पाठ फिरवतात. अंधश्रद्धेला कवटाळून बसतात.

एकदा एका भाविकाने मला प्रश्न विचारला, "ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीसारखा काव्य आणि तत्त्वज्ञान या दोन्ही दृष्टींनी श्रेष्ठ असा ग्रंथ वयाच्या सोळाव्या वर्षी कसा लिहिला ? हा चमत्कार नव्हे का ? " मी म्हणालो, "पहिली गोष्ट अशी की, वयाच्या सोळाव्या वर्षीच ज्ञानेश्वरांनी या ग्रंथाची निर्मिती केली काय, याबद्दल काही संशोधक साशंक आहेत. पण सोळाव्या वर्षी सुद्धा उत्तम ग्रंथनिर्मिती करणं अवघड असलं तरी ते सर्वथा अशक्य आहे असं आपण गृहीत धरणं मला सयुक्तिक वाटत नाही. एखादं बीज लवकर अंकुरतं. वाढीसाठी त्याला अनुकूल वातावरण मिळालं तर ते जोमानं फोफावत जातं. ज्ञानेश्वरांची मनोभूमी त्यांच्या आईवडिलांनी जोपासली होती.

तिची कष्टानं मशागत केली होती. लहानपणापासूनच नानाप्रकारचे धार्मिक आणि तात्त्विक ग्रंथ त्यांना अध्ययनासाठी दिले होते. घरातलं वातावरण तत्त्वचर्चेला, परमार्थ-विचाराला, वादविवादाला अनुकूल होतं. निवृत्तिनाथही ज्ञानेश्वरांना गुरुस्थानी होते. लहानपणापासून या संस्कारात वाढलेलं ज्ञानेश्वरांचं मन रसरसून फुललं नसतं तरच आश्चर्य! आता तुम्ही असा प्रश्न विचाराल की, असं वातावरण जन्मापासूनच दुसऱ्या एखाद्या मुलाभोवती निर्माण केलं तर त्याला ज्ञानेश्वर होता येईल का?'' याचं उत्तर असं की, ''सर्वांच्याच बुद्धीत आणि वृत्तीत सारखीच क्षमता असत नाही. पण त्यामुळं एकदम हा सारा दैवी चमत्कार आहे, हे सारंच अद्‌भुत आहे या निष्कर्षाकडं जाणं योग्य नाही. काही गुण सोन्याचा आणि काही गुण सोनाराचा असतो. उत्तम रीतीनं बसवलेल्या नाटकाचे शेकडो प्रयोग होत असले तरी प्रत्येक प्रयोग सारखाच रंगत नाही. नाटक रंगणं आणि न रंगणं हे अनेक घटकांवर अवलंबून असतं. अहो, साधं खाण्याचं पान सुद्धा हमखास रंगेल अशी ग्वाही देता येते का? त्याच्या घटक-द्रव्यांत, ते मसालेदार बनवण्याच्या क्रियेत, इतकेच काय, पण ते पान खाणाऱ्याच्या विशिष्ट मन:स्थितीवरही पान रंगणं अवलंबून असतं. या गोष्टीला तुम्ही अलौकिक चमत्कार म्हणणार काय? प्रत्येक घटनेला विशिष्ट कार्यकारण असतं. त्याचा शोध ज्याला करता येतो त्याला ती घटना चमत्कारिक वाटत नाही. विशिष्ट प्रदेशात पाऊस का पडत नाही याचं संशोधन शास्त्रज्ञांनी केलं आणि आता पृथ्वीवरचे ते ओसाड प्रदेश शास्त्रशुद्ध प्रयत्नांमुळं हिरवेगार झाले आहेत. सामान्य मनुष्य, ''ही सारी देवतेची कृपा'' असं म्हणून मोकळा होतो. कारण त्याला कार्यकारण भाव कळत नाही. बुद्धीच्या प्रभावानेच कोडी उलगडू शकतात. अद्यापी जी रहस्ये उलगडली नाहीत ती सुद्धा शास्त्रशुद्ध बुद्धीच उलगडू शकेल. ज्या प्रश्नाचं उत्तर आपल्याला देता येत नाही ते ''परमेश्वरी इच्छा'' असं म्हणून समाधान मानतो. अडाणी आणि भोळ्याभाबड्या लोकांचे गैरसमज दृढ करणारे कार्यक्रम व जेव्हा दूरदर्शनसारखं लोकशिक्षणाचं महत्त्वपूर्ण माध्यम असलेलं हे साधन या बाबतीत वापरलं जातं तेव्हा आपण एकविसाव्या शतकात कोणते अशास्त्रीय गैरसमज घेऊन प्रवेश करणार आहोत हा प्रश्न मनात उभा राहतो. पुष्कळ वेळा लोक किंवा जनता ही मेंढरासारखी असते. एका मेंढराने खड्ड्यात उडी मारली की बाकीची मेंढरं त्याचं अनुकरण करतात. सभेत एकानं टाळी वाजवली की शेकडो लोक टाळ्यांचा कडकडाट करतात. विचार करण्याचे परिश्रम दुसऱ्यानं घ्यावेत. आपण फक्त त्याच्या पाठीमागं अलौकिक निष्ठेनं जात राहावं ही ''मॉब सायकॉलॉजी'' असते. ''अमुक एकानं मेलेल्या माणसाला जिवंत केलं.'' असं म्हटलं की हजारो लोक ते खरं मानतात. हिटलर आणि गोबेल्सनं राजकारणात याच तंत्राचा वापर केला. ते म्हणत असत, ''एक असत्य शंभर वेळा सत्य आहे म्हणून सांगितलं की ते सत्य ठरल्याशिवाय राहात नाही.'' म्हणूनच जनतेसमोर असत्यं ठेवू नयेत. सत्याचं संशोधन करून त्याची मांडणी करावी. मघाशी उल्लेखिलेल्या

आपला पूर्वजन्म सांगणाऱ्या त्या सहा वर्षांच्या पोरीला, "विवाहानंतर तुला मुलं कशी झाली?" हा प्रश्न विचारला तेव्हा ती निरुत्तर झाली. त्या अजाण बालिकेला अपत्यसंभवाचं रहस्य मुळीच माहीत नव्हतं. धूर्त लोकांनी तिला जेवढं पढवलं होतं तेवढं मात्र पूर्वजन्माचं वृत्त म्हणून ती सांगत होती."

एका संन्याशाच्या आशीर्वादानं आपण एस.एस.सी. परीक्षेचे परीक्षक झालो, असला दयनीय मूर्खपणा हृदयाशी कवटाळून बसलेल्या लोकांना माझा युक्तिवाद पचणार नाही, याची मला खात्री आहे. पण तरीही प्रयत्न केलाच पाहिजे. कुणी सांगावं? अनहोनीचं रूपांतर होनीमध्ये होऊ शकेल. छत्रपती शाहूमहाराजांची एक गोष्ट सांगतात. त्यांच्याकडे एक नामवंत समजला जाणारा ज्योतिषी आला. दिवाणानं त्याची तारीफ करून ज्योतिषाचा परामर्श घ्यावा, अशी महाराजांना विनंती केली. ज्योतिषी म्हणाला,

"महाराज, मी तुमचं भविष्य सांगतो." महाराज म्हणाले, "मी फार घाईत आहे. पुढं केव्हातरी पाहू. पण आज तुमचं भविष्य काय आहे ते पडताळून पाहू." महाराजांनी चार चिठ्ठ्यांवर काही आकडे लिहून त्या चिठ्ठ्या घडी घालून ज्योतिषासमोर टाकल्या. ते म्हणाले, "बघू आता तुमचं भविष्य. पाच रुपयापासून पाचहजारापर्यंत आकडे असलेल्या या चार चिठ्ठ्या आहेत. जी चिठ्ठी उचलाल, त्याप्रमाणं तुम्हाला बिदागी देईन." इतरांचं भविष्य सांगणाऱ्या त्या भविष्यवेत्त्याला स्वत:च्या भवितव्याबद्दल काहीच अंदाज येईना. मनातल्या मनात इष्ट देवतेचं स्मरण करून त्यानं एक चिठ्ठी उचलली. उघडून पाहिली. तिच्यावर "पाच रुपये" असा आकडा होता. महाराज खदखदून हसले. आंबट चेहऱ्यानं ज्योतिष्यानं विचारलं, "चारी चिठ्ठ्यांवर तुम्ही पाच रुपयेच कशावरून लिहिले नसतील?" महाराज म्हणाले, "आपल्या हातानं सगळ्या चिठ्ठ्या उलगडून बघा." ज्योतिष्यानं पाहिले. दुसऱ्या चिठ्ठीत "पंचवीसशे" हा आकडा होता. तिसऱ्या चिठ्ठीत "दोन हजार" आणि चौथ्या चिठ्ठीत "पाच हजार" हा आकडा होता. महाराज म्हणाले,

"तुम्ही लयी नामांकित ज्योतिषी हाय असं म्हनतासा आनि कोनत्या चिठ्ठीत काय लिवलंय तेबी कळंना. जावा आता घरी. तुमच्या नशिबात पाच रुपयेच व्हते." असं म्हणून महाराज ढगाच्या गडगडाटासारखे हसत राहिले. तो महान ज्योतिषी निघून गेला.

□□□

# ५. जगायचं कशासाठी ?

"माझ्या मनात अलीकडं सारखे आत्महत्येचे विचार उचंबळून येतात. तुम्हाला आश्चर्य वाटेल प्राध्यापक महाशय, पण आज तुमच्याशी अत्यंत मनमोकळेपणानं बोलण्याचं मी ठरवलं आहे. कुणी सांगावं, कदाचित ही आपली शेवटची भेटही असू शकेल. माझे फार थोडे दिवस आता या जगात उरले आहेत, असं मला वाटतं. जगण्याची, जगत राहण्यासाठी काहीतरी निरर्थक धडपड करण्याची मला आता शिसारी आली आहे. मी कमालीचा जीवनद्वेष्टा बनलो आहे. हे जीवन म्हणजे साऱ्या सुंदर स्वप्नांची, कल्पनांची, आशाआकांक्षांची राखरांगोळी करून टाकणारी एक पेटलेली भट्टी आहे. हिच्यात होरपळायचं अन् जळायचं. तुम्ही लोकांनी या प्रक्रियेला जीवन अशी संज्ञा द्यायची. त्याची वाटेल तितक्या अतिशयोक्तिपूर्ण शब्दांतून अर्थशून्य पूजा बांधायची, स्वत:ची आणि जगाची फसवणूक करायची, या गोष्टीला मी पुरता विटून गेलो आहे. आयुष्याचं ओझं कशासाठी आपल्या मस्तकावर वागवीत राहायचं? त्याचीसुद्धा अखेरीला मूठभर राखच होणार आहे ना? मला तरी या यांत्रिक रसहीन जीवनाचा वीट आलेला आहे. माझ्या अंगावरचं आयुष्याचं लाजिरवाणं वस्त्र मी लवकरच टरकावून फेकून देणार आहे. मरणाचं नागडंउघडं रूप जीवनाच्या विद्रूपापेक्षा मला तरी जास्त मोहक वाटतं. मरणापूर्वी तुमच्याशी थोडा वेळ निवांतपणानं बोलावं आणि तुमचा निरोप घ्यावा म्हणूनच तुमच्याकडं आलो. आयुष्याच्या काळ्याकुट्ट रात्रीला आता लवकरच मृत्यूची पहाट भेटणार याचा मला आनंद वाटतो. रूक्ष वाळवंटातला प्रवास आता संपणार. सुगंधित मरणवाटेनं जाताना माझ्या ओठावर मृत्यूच्या स्वागताचंच गीत असेल. मला अडवण्याचा मात्र प्रयत्न करू नका. कारण तो मुळीच यशस्वी होणार नाही. मला आता अडवणारी कोणतीच शक्ती अस्तित्वात नाही."

मी आश्चर्यानं थक्क होऊन त्या तरुणाचा भावनाविष्कार ऐकत होतो. पाहात होतो. हा तरुण कवी कधीतरी मला भेटतो. भेटल्यावर माझा हात आपल्या हातात घेऊन तो कपाळाला लावतो आणि आपल्या खांद्याला अडकवलेल्या पिशवीतून एक

वही काढून तिच्यातल्या दोनतीन कविता विलक्षण आवेगानं वाचून दाखवतो. साऱ्या जगाशी तिरसटपणानं वागणारा, जगावर तुच्छतेनं थुंकणारा आणि जगानं वेडा-विकृत असा शिक्का मारलेला हा कवी, का कुणास ठाऊक, माझ्याशी मात्र आपुलकीनं वागतो. त्यानं वाचून दाखवलेली प्रत्येक कविता जीवनाविषयीच्या नैराश्यानं माखलेली होती. हा दुर्दम्य निराशावाद खरं तर मला मुळीच आवडत नाही. पण त्याच्या कवितेत वैफल्याचा इतका गडद रंग पसरला आहे की ती कविता ऐकताना त्या रंगाचे दोनचार तरी शिंतोडे आपल्या अंगावर उडाल्याशिवाय राहात नाहीत. ऐन तारुण्यात त्याच्या कवितेनं प्रणयाच्या आणि पराक्रमाच्या निळाईत उत्कट झेप घ्यायला हवी. या वयात सौन्दर्याचं प्रेम आणि प्रेमाचं सौंदर्य याची जबरदस्त ओढ असते. एखाद्या पद्मिनीच्या ओठावरचा नाजुक लालिमा आपल्या ओठांनी साऱ्या शरीरात आणि आत्म्यात शोषून घ्यावा असं वाटायला हवं. आषाढात नुसते ढग आले की त्यांच्या दर्शनानं एखाद्या कवीचा कल्पनामयूर पिसारा उभारून नाचू लागतो. आणि इथं पाहावं तर या तरुणाच्या जीवनासक्तीची सगळी पिसं केव्हाच गळून पडली आहेत. काय कारण असावं त्याचं ? आत्महत्येच्या काळ्याशार नागिणीनं त्याला असा का विळखा घालावा हे मला समजत नाही. मी त्याच्याकडं पाहिलं. त्याच्या डोळ्यांत तेज होतं, पण मृत्यूच्या कल्पनेनं ते डोळे लुकलुकत आहेत असं मला वाटलं. मी त्याला म्हणालो, "आयुष्याचा कडवट अनुभव प्रत्येकालाच येतो. आपल्या अनेक आशा-आकांक्षा कोसळून पडतात. पण म्हणून काय आपणही कोसळून पडायचं ? मला तरी तुमच्यातली ही अतिरेकी मरणविषयक जाणीव स्वाभाविक वाटत नाही."

तो हसला. काहीच बोलला नाही. जणू त्याला म्हणायचं होतं, "तुमच्या माझ्या दृष्टिकोनातच मूलभूत अंतर आहे. हा प्रश्न वाद करून संपणार नाही. वादातून कोणत्याच मूलभूत प्रश्नांना कधी उत्तर मिळत नाही. बुद्धीच्या अहंकारासाठी आपण वादाच्या आखाड्यात उतरत असतो." तो थोडा वेळ स्तब्ध बसला. काहीशा खिन्नतेनं हसून त्यानं मला विचारलं,

"प्रोफेसरसाहेब, तुम्ही किती वर्षं जगणार आहात ? ऐंशी वर्षं, नव्वद वर्षं किंवा शंभर वर्षं जगाल. पण त्यानंतर एक दिवस मरणारच आहात ना ? मरण हे जर अंतिम उत्तर असेल आणि ते स्वीकारल्याशिवाय गत्यंतरच नसेल तर त्या मरणाकडं डोळेझाक करण्याचा भित्रेपणा करून तुम्ही काय मिळवणार आहात ?"

आता तो तत्त्वज्ञानाच्या खोल पाण्यात शिरला होता. त्याच्या प्रश्नाला उत्तर देणं मुळीच अवघड नव्हतं. पण या मनुष्याशी मला त्या पातळीवरून चर्चा करायची नव्हती. मी त्याला इतकंच म्हणालो,

"उत्पत्ती आणि विनाश, जन्म आणि मृत्यू या दोन्ही अवस्था सृष्टीतल्या प्रत्येक वस्तूला समान आहेत. पण या दोन अवस्थांच्या मध्ये जीवनाचे नाना व्यापार अनंत रीतींनी विस्तारले आहेत. सृष्टीच्या चैतन्याचे तेही आविष्कारच आहेत. मृत्यू येईल

तेव्हा दार उघडून मी त्याचं स्वागत करीन; पण त्याचा ध्यास घेऊन बसण्याचा वेडेपणा मात्र मला मान्य नाही." त्या तरुण कवीला माझ्या शब्दांतली तीव्रता जाणवली असावी. आपल्या कवितेची वही त्यानं पिशवीत ठेवली आणि हात जोडून तो विनयानं म्हणाला,

"माझ्या बोलण्यानं आणि विचित्र वृत्तीनं मी तुम्हाला त्रास दिला, त्याबद्दल क्षमा करा. पण मी जसजसं बारकाईनं पाहू लागलो तसतसं मला जाणवतं की सुख किंवा आनंद हे सुद्धा दु:खाचंच रूप आहे. परवा रस्त्यानं चाललो असताना समोरून येणारी शिशुशाळेतली काही खेळकर हसरी मुलं मी पाहिली. मला बरं वाटलं. पण माझ्या मनाच्या खोल कुहरातून एक वेगळीच शापवाणी माझ्या कानावर पडली. अरे, ही सारी फसवी दर्शनं आहेत. या बालकांच्या गोऱ्यापान गालावरचं अवखळ हास्य आपल्या काटेरी हातांनी ओरबाडून घेणारा मृत्यू इथंच कुठंतरी दबा धरून बसला आहे. त्या विचारानं मी चरकलो. पलीकडच्या वळणावरून एक ट्रक भरधाव वेगानं आला. आणि पाहता पाहता दोन-तीन बालकांच्या अंगावरून बेगुमानपणानं निघून पुढं एका झाडावर आदळून बंद पडला. त्या कोवळ्या बालकांना रक्ताच्या थारोळ्यात माना टाकलेल्या अवस्थेत मी पाहिलं. माझं मन म्हणालं, "जीवनाचं हेच खरं अस्सल स्वरूप आहे. इथं प्रत्येक सौंदर्याला कुरूपतेनं, प्रत्येक सुगंधाला दुर्गंधीनं पछाडलेलं आहे. मी तुम्हाला काही सांगू शकत नाही. पण क्षणाचं जीवन आणि चिरकालाचा मृत्यू अशा अवस्थेची स्तुतिस्तोत्रं गायला माझ्यापाशी शब्द नाहीत. तुम्ही लोक याला निराशावाद म्हणता. मला मात्र या सत्य विचाराला कोणतंही फॅशनेबल लेबल चिकटवायचं नाही. कोणी काही म्हटलं तरी दु:ख, विनाश, मृत्यू याचंच नाव माणसाचं आयुष्य. सारीच सृष्टी या अवस्थेतून जात आहे. चिमणा - चिमणीनं जीवाच्या आकांतानं कुठंतरी वळचणीला गवताची एकेक काडी आणून घरटं बांधायचं आणि कुठल्यातरी क्रूर हातानं ते घरटं उसकटून, फेकून द्यायचं. युगानुयुगं चाललेल्या या निरर्थक खेळाला तुम्ही जीवन असं गोंडस नाव देता. याच फसव्या जीवनाला मला आता अखेरची नोटीस द्यायची आहे."

तो तरुण निघून गेला, पण मला मात्र अस्वस्थ करून गेला. त्याच्या म्हणण्यात काही तथ्य अवश्य होतं, पण त्याचा विचार मान्य करणं शक्यच नव्हतं. अतिरेक आणि विकृत दृष्टी या दोषांनी डागाळलेला विचार कधीच स्वीकार्य नसतो. तरुण वयातच जीवनाविषयी असल्या पराकोटीच्या दु:खविचारानं, विफ़लतावादी वृत्तीनं या माणसाला घेरलेलं असावं याचं मला आश्चर्य वाटलं. पण त्याहून आश्चर्य म्हणजे वयाच्या ऐशीव्या वर्षी अपंग होऊन पडलेल्या एका वृद्धानं जे विचार व्यक्त केले ते ऐकताना तर मी स्तिमितच झालो. हा म्हातारा काही कवी नव्हता. चारचौघांसारखा आपल्या वाट्याला आलेल्या सुख-दु:खांचा निमूटपणानं स्वीकार करीत तो जगत होता. कमरेचं हाड मोडल्यामुळं तो वर्षभर अंथरुणाला खिळून होता. त्याला भेटायला

गेलो असताना मी सहानुभूतीनं म्हणालो,

"बिछान्याला असं खिळून राहणं फार तापदायक असतं. अशावेळी जगणं नकोसं होत असेल! आपण अनेक वर्षं निरनिराळ्या कामात, उद्योग-व्यवसायात रस घेतंलात. आता हे असं पडून राहणं आपल्याला कमालीचं दु:सह वाटत असणार!"

त्या वृद्ध गृहस्थाच्या सुरकुतलेल्या चेहऱ्यावर क्षणभर दु:खाची छटा गडद झालेली दिसली, पण तात्काळ त्याच्या डोळ्यांत उत्साहाची चमक फुलली. आपला अशक्त हात त्यानं वर उचलला. माझ्या हातात तो दिला आणि त्यानं म्हटलं,

"प्रोफेसरसाहेब, माझ्या दृष्टीनं आयुष्य ही लढाई आहे. आता मी जखमी होऊन पडलो असतो तरी लढण्याची रग माझ्या रक्तात आहे. मरायचं तर एक दिवस आहेच. त्यासाठी मरणाच्या वाटेकडं डोळे लावून बसण्याचं काहीच कारण नाही. वर्षभर मी या अंथरुणाला खिळून राहिलो असलो तरी, का कुणास ठाऊक, जगण्यातली सुंदरता, जगण्यातला उन्माद मला पूर्वीइतकाच - मी पंचविशीत होतो - तितकाच आजही जाणवतो. आयुष्याची कुपी आता रिकामी होत आली हे मला समजतं. पण या कुपीतला गंध अजून घमघमत आहे. तुम्हाला आश्चर्य वाटेल. सकाळी मी झोपेतून जागा झाल्याबरोबर माझी नातवंडं माझ्याजवळ येतात. हे छोटे लोक माझ्या हाती त्यांनी स्वत: वेचलेली ओंजळभर फुलं प्रेमानं ठेवतात. त्या फुलांचा सुवास, त्या मुलांचा सहवास माझ्याभोवती दिवसभर दरवळत राहतो. रात्रंदिवस माझ्या भोवतालचं जग आणि त्यांच्या हालचाली यांची मला जाणीव होते. मी जगापासून दूर फेकला गेलो नाही, या जगातच आहे याची जाणीव मला समाधान देते. अपंग झाल्यामुळं आता मला कुठं बाहेर पडता येत नाही ही जाणीव निश्चित दु:खाची आहे. पण मला रेडिओवरची गीतं ऐकता येतात. दूरदर्शनवरील नाट्यदृश्यं मी पाहू शकतो. वृत्तपत्रं आणि मासिकं मी चाळू शकतो. माझा मुलगा वकील आहे. सून चांगली गृहिणी आहे. यांच्या माध्यमातून खरं तर मी माझी जीवन जगत राहण्याची अनिवार इच्छा पुरी करून घेतो. मला या जीविताचं खरोखरच आकर्षण वाटतं."

त्या वृद्धाच्या शब्दांतून ओघळणाऱ्या जीवनप्रेमाकडं पाहून मला आश्चर्य वाटलं. आपल्या दैनंदिन जगण्यातून त्यानं जीवनाचं एक सुंदर तत्त्वज्ञान तयार केलं होतं. तत्त्वज्ञान म्हणजे बुद्धीचा रिकामटेकडा खेळ नव्हे. झाडाच्या फांद्यांना जशी पानं पुटावीत त्याप्रमाणं आयुष्याच्या डहाळीला तत्त्वज्ञानाची पालवी फुटली पाहिजे. आपल्या लाडक्या अपत्याला छातीशी धरून त्याला अंगावरचं दूध पाजणारी आई हे मला जीवनाच्या अखंडतेचं आणि नवनिर्मितीचं प्रतीक वाटतं. आपल्या जीवनातून ती दुसरं जीवन जोपाशीत असते. यातूनच जीवनसातत्य चालू राहतं. अंथरुणावर पडलेल्या त्या अत्यंत समाधानी अपंग म्हाताऱ्यानं जीवनाचं रहस्य आपल्या जगण्यातून जाणलेलं होतं. त्यामुळं एका अर्थानं तो सुखी होता. एखादं फळ झाडावरच पिकत जावं तसा तो पिकत चालला होता. त्या पिकल्या फळात आता अधिक मधुरता आलेली होती. पिकण्याचा

अतिरेक झाल्यावर हे फळ गळून पडणारच आहे. त्यासाठी उगीच आटापिटा करण्याचं कारण नाही. कळीनं वाऱ्याबरोबर डुलावं आणि मग फुलावं. फुलल्यानंतर फुलपाखरांबरोबर खेळावं. त्यानंतर त्यानं आपला रस देऊन सुकावं आणि तृप्त मनानं वेलीवरून गळून पडावं. कारण त्याच वेलीवर नवीन कळ्या निर्माण होण्याची आणि फुलण्याची एक अविरत प्रक्रिया चालू असते. खरं तर ही एक आनंदाचीच वाटचाल असते. माणसं उगीचच दु:खाचं स्तोम माजवतात. सुखदु:खाच्या वाहत्या वाऱ्यात जीवनाच्या वेलीला बिलगून राहण्यातली गंमत ही माणसं का बरं घेत नसावीत? मघाचा तो तरुण कवी जीवनाच्या दु:खमयतेमुळं आणि क्षणभंगुरत्वामुळं जन्माचा बेचैन झाला आहे. ही बेचैनी म्हणजे मनाची दुर्बलताच नव्हे काय? कधी कधी सौंदर्यवादी मनाला सुद्धा उदासीनता घेरून टाकते. निसर्गाच्या फुलण्यात आपलं सुख मानणाऱ्या बालकवीलाही हे दु:ख होतं. तो म्हणायचा,

"कोठूनि येते मला कळेना
उदासीनता ही हृदयाला
काय बोचते ते समजेना
हृदयाच्या अंतर्हृदयाला"

असलं अनाकलनीय रोमँटिक दु:ख हे तर वरदान आहे असं मी मानतो. शरीराची दु:खं कितीही तापदायक असली तरी ती सामान्य पातळीवरचीच असतात. पण मनाचं आणि त्याहून आत्म्याचं दु:ख हे माणसातल्या चैतन्यशीलतेचं द्योतक आहे. अशा प्रकारच्या व्यथांनी व्याकुळ झाल्याशिवाय माणसाच्या माणूसपणाला अर्थ येत नाही.

१९४७ मधली गोष्ट. भारत आणि पाकिस्तान अशी या राष्ट्राची शकलं झाली होती. स्वातंत्र्याचा उत्सव हिंदू आणि मुसलमान रक्ताची रंगपंचमी खेळून साजरा करीत होते. गांधींचा महान आत्मा जखमी झाला. ते नौखालीत धावून गेले. हिंसेचा आणि अत्याचाराचा धडाडून पेटलेला वणवा हा सत्याहत्तर वर्षांचा म्हातारा आपल्या डोळ्यांतल्या अश्रुधारांनी विझवण्याचा प्रयत्न करीत होता. पण माणसांच्या डोक्यांत ज्या सांप्रदायिक आणि जातिविद्वेषाच्या ज्वाळा भडकल्या होत्या त्या लवकर विझणं शक्य नव्हतं. दिवसभर गांधीजी वणवण भटकायचे. अन्यायाचा बळी झालेल्या लोकांच्या दु:खावर फुंकर मारायचे. अहिंसा आणि प्रेम यांचा संदेश घेऊन आलेल्या या देवदूताला ओळखण्याच्या मन:स्थितीत फारसं कुणी नव्हतं. घरं लुटली जात होती. सुरे भोसकले जात होते. किंकाळ्या उठत होत्या. माणुसकीचं प्रेत पडलं होतं. विपण्ण झालेले गांधीजी एके दिवशी थकून-भागून संध्याकाळी आपल्या निवासस्थानी पोहोचले तेव्हा त्यांना पाय धुण्यासाठी त्यांच्या नातीनं गरम पाणी दिलं. गांधीजी म्हणाले,

"लोकांच्या डोळ्यातलं पाणी आटून गेलंय. गरिबीमुळं हजारो लोकांना कदान्न शिजवण्यासाठी पुरेसं इंधनही मिळत नाही. अशावेळी पाय धुण्यासाठी गरम पाणी वापरण्याचा मला कसला नैतिक अधिकार आहे?"

दुःखी झालेल्या गांधीजींचे डोळे पाणावले होते. पण या दुःखातही हिंसा आणि अत्याचाराशी आपण लढतच राहिलं पाहिजे हा निर्धारही होता. आपल्या दुःखांना सुद्धा उदात्त भावनेचं अधिष्ठान असलं म्हणजे जीवनाला जिवंतपण लाभतं. नुसत्याच भौतिक दुःखांनी विव्हल होणारा आणि त्यातच बुडून जाणारा माणूस हे माझ्या दृष्टीनं भेकड निराशावादाचं प्रतीक आहे. भ्याड आणि निष्क्रिय माणूस जीवन बदलण्याचा कधीच प्रयत्न करीत नसतो. जो आजूबाजूची परिस्थिती मुळातून बदलण्याची धडपड करतो त्या वीरांच्या निराशेला आणि वेदनेला नवनिर्मितीच्या जाणिवेचा स्पर्श असतो. जे आहे ते असेच राहणार हा विचार म्हणजे निष्क्रियतेचा आविष्कार आहे. जे आहे ते मी निश्चित बदलून टाकणार आणि मला जसे हवे तसे घडवणार, ही भूमिका आशावादाची व पौरुषाची आहे. जगण्यात कसला अर्थ आहे? कारण हे जीवन विनाशाच्या मृत्यूच्या अंधारात विरघळून जाणार आहे, असं मानणारा तो तरुण कवी मानवी कर्तृत्वावर, प्रतिभेवर विश्वास ठेवीत नव्हता. त्याच्या मनात दाटून आलेले काळेकुट्ट, विफल विचार तसे नवीन नाहीत. "मरणं प्रकृतिः शरीरिणाम्। विकृतिर्जीवितमुच्यते बुधैः॥" असं कालिदासाच्या रघुवंशातला अजराजाही हेच तत्त्वज्ञान सांगतो. आमचे बरेचसे साधुसंत, हरिदास आणि पुराणिक, कथा-कीर्तनकार वैराग्याचं तुणतुणं वाजवताना आयुष्याच्या चंचलपणाचा पुनः पुन्हा आळवून आणि घोळवून उल्लेख करतात. "दुःख पर्वताएवढे" असा हंबरडा फोडतात. सारा पराक्रम, सारा शृंगार, सारा जीवनरस, सारेच वैभव काळाच्या उदरात गडप झाले आणि होणार आहे, याच मुद्यावर नको तितका भर देत बसतात. शेक्सपीअरच्या नाटकातलं एक पात्र याच प्रकारचं तत्त्वज्ञान बोलून दाखवतं. 'Life is a tale, told by an idiot, full of sound and fury, signifying nothing.' आयुष्य ही एका वेड्यानं सांगितलेली अर्थशून्य कहाणी आहे, हे विधान चमत्कृतिपूर्ण असल्यामुळं आपलं लक्ष वेधून घेतं. त्यात सत्याचा अंश असेल, पण ते संपूर्ण सत्य नव्हेच. ते परमसत्य मानायचं असेल तर मानवी संस्कृतीला आणि प्रगतीला काय अर्थ उरतो? कोणे एके काळी गुहेत राहणारा आणि शिकार करून पशूंचं कच्चं मांस खाणारा तो आदिमानव आपल्या बुद्धीच्या आणि कल्पनेच्या बळावर प्रगती करीत करीत चंद्रावरही वस्ती करण्याचे मनसुबे रचू लागला. ही घटना मनुष्याच्या निर्माणशीलतेची द्योतक नव्हे काय? पण साऱ्या गोष्टी बाजूला सारून या जीवनाचा द्वेष करण्याची एक जबरदस्त लाट काही लोकांच्या मनांत पूर्वीपासून उचंबळत आलेली दिसते. भारतीय तत्त्वज्ञानात दुःखवादाला एकप्रकारची प्रतिष्ठा प्राप्त झालेली आहे. हा साराच संसार महाघोर व पापमय आहे. तो दुःखानं अंतर्बाह्य लडबडला आहे ही पक्की धारणा प्राचीन काळापासून प्रकट झालेली दिसते. ती लक्षावधी, कोट्यवधी माणसांच्या मनांत मुरली आहे.

काही वर्षांपूर्वी मी एका अत्यंत यशस्वी कीर्तनकाराचं कीर्तन ऐकलं होतं. त्याची

रसाळ वाणी, अनुरूप दृष्टांत देण्याची हातोटी यामुळं श्रोत्यांवर त्याचा विशेषच प्रभाव पडायचा. परंपरागत दु:खवादी विचार आपल्या कीर्तनातून तो मांडायचा. आपलं नेहमीचं ठरलेलं उदाहरण देताना तो म्हणाला,

"कांचनमृगाच्या पाठीमागं राम धावत गेला नसता तर तो दु:खाच्या वर्तुळात अडकला नसता. तो कांचनमृगही गेला आणि सीताही नाहीशी झाली. त्यामुळं एका प्रचंड दु:खाच्या भोवऱ्यात राम सापडला. याचं मूळ कारण मोह हेच आहे. सारे मोह माणसानं झटकून टाकावेत. कारण मोहातूनच दु:ख आणि आपत्ती यांचं न संपणारं लटांबर निर्माण होतं. कोणत्याही क्षुद्र मोहाला माणसानं बळी पडू नये."

रामायणातून हा निष्कर्ष खरोखरच निघतो काय? माणसाला कसलाही मोह पडू नये असं तत्त्वज्ञान हितकारक आहे काय? मोहिनी पडावी, विलक्षण आकर्षण वाटावं अशी स्थळं तर या सृष्टीत ठायी ठायी विखुरलेली आहेत. सागराला भेटायला धावत निघालेल्या नद्यांची तऱ्हेतऱ्हेची वळणं आणि त्यांचं प्रत्येक ऋतूत बदलणारं रूप हा सौंदर्याचा एक अप्रतिम विलासच नाही काय? कुठं पाणी संथ असतं, कुठं ते खळखळत असतं, कुठं ते डोंगरकड्यावरून उड्या घेतं. कधी ते वादळी आणि प्रमत्त असतं, कधी ते सोळा वर्षांच्या पोरीसारखं अवखळ आणि खेळकर असतं. नद्या, नाले, ओढे आणि क्षितिजापर्यंत अफाट पसरलेला क्षणोक्षणी उचंबळून येणारा समुद्र ही पाण्याची एकापेक्षाही एक चित्रविचित्र रूपं डोळ्यांना केवढी मोहिनी घालतात! सृष्टीतली ही सौंदर्ययात्रा सोडून द्या. आपल्या आजूबाजूला पसरलेली माणसं काय कमी आकर्षक असतात? प्रत्येक माणूस एक वेगळाच आणि आगळाच नमुना असतो. माझ्या समोरच्या घरात एक सत्तर-पंच्याहत्तर वर्षांचा वृद्ध माणूस देवाची पूजा करताना भक्तीनं जे स्तोत्र गातो, त्यातला त्याचा उत्कट भाव मला जाणवतो. त्याच्या स्वरात भाविकतेनं उत्पन्न झालेली कंपनं माझ्याही हृदयाला भिडतात. कोणत्या तरी श्रद्धेला भावपूर्ण असणाऱ्या माणसांच्या जीवनात मधुरता निर्माण होते. दु:खसुद्धा त्यांना चांदण्यासारखं शीतल वाटतं. या माणसानं आयुष्याबद्दल कसलीही तक्रार केलेली मी ऐकली नाही. त्याचा स्वर कधी रागानं किंवा क्षोभानं वर चढलेलाही कुणी ऐकला नाही. देवावरची त्याची परम श्रद्धा हा एक वेडेपणाचा प्रकार आहे असं कुणीतरी म्हणेल. कदाचित केवळ बुद्धिनिष्ठ दृष्टीनं हा भाबडेपणाही असेल. या गृहस्थाचा एकुलता एक मुलगा ऐन तारुण्यात कर्करोगाला बळी पडला. आठ दिवस हा माणूस वेडापिसा झाला होता. देवाची मूर्ती त्यानं कोपऱ्यात भिरकावून दिली. आणि अत्यंत तीव्रतेनं तो म्हणाला होता,

"याच देवाची मी नित्यनेमानं पूजा करीत आलो. देवा, आता माझ्या हिशेबी देवपण संपलं." आठ दिवस त्यानं त्या मूर्तीकडं ढुंकूनही पाहिलं नाही. पण नवव्या दिवशी मात्र त्यानं पुन्हा भाविकतेनं मूर्ती देव्हाऱ्यात ठेवली आणि शांतपणानं तो पूजेमध्ये गढून गेला. घरात दारिद्र्य आहे, पण या भक्ताच्या मनात मात्र अष्टौप्रहर देव असल्यामुळं

दारिद्र्यानं आणि संकटानं त्याचं कधीच सत्त्व हरण केलं नाही. एकदा प्रसन्न चित्तानं तो मला म्हणाला,

"आपलं आयुष्य ही देवानं दिलेली देणगी आहे. तिला नावं ठेवण्यात किंवा तिचा दु:स्वास करण्यात कसला बरं शहाणपणा आहे ? या देवावर माझा संपूर्ण विश्वास आहे. साधं पिंपळाचं पानसुद्धा त्याच्या इच्छेवाचून हलत नाही. अहो, त्यानं आकाशाचा मंडप उभा केला आणि मोठमोठ्या पर्वतांचा त्याला आधार दिला, ज्यानं आभाळात नक्षत्रांच्या रूपानं आपला सारा जामदारखाना उघड्यावर मांडून ठेवला, ज्यानं सूर्य-चंद्राकडून उजेडाचा पाऊस पाडला, आणि ज्यानं माणसाला या धरतीचा स्वामी बनवलं त्याची इच्छा प्रमाण मानून आपण समाधानात का राहू नये ? हजारो माणसं रिकाम्या पोटी फूटपाथवर झोपतात. त्यांच्यापेक्षा तुम्ही आम्ही सुखी नाही का ? एक दिवस देवाकडून बोलावणं आलं की मोठ्या दिमाखानं मी त्याच्यासमोर जाणार आणि अभिनानानं त्याला सांगणार की, "देवा, तू मला दिलेला पार्ट मी इमानेइतबारे रंगवला. हा पार्ट करताना मी माझा जीव त्यात ओतला होता. आता तुला माझी कुठं बदली करायची असेल तर जरूर कर. मी तयारच आहे."

या माणसाचा मला तरी हेवा वाटतो. एक साधे सरळ तत्त्वज्ञान घेऊन हा सद्‌गृहस्थ वाट चालत आहे. कुठल्यातरी भीतिदायक हताश विचारांच्या आहारी जाऊन त्यानं आपलं समाधान हरवलेलं नाही. स्वत:ला बुद्धिवादी समजणारी काही मूर्ख माणसं मी पाहिली आहेत. केवळ मेंदूचं अस्तित्व आयुष्यात ओलावा निर्माण करीत नाही. आयुष्याला रस देण्याचं कार्य हृदयाचं असतं असं म्हणावंसं वाटतं. रसेलनं म्हटलं आहे, "A good life is inspired from love and guided by knowledge.' प्रेम, आत्मीयता हीच जीवनाची आदिशक्ती मानली पाहिजे. हे जीवन नि:सार आहे, ते फेकून देण्याच्याच योग्यतेचं आहे, असं विधान करण्यात केवळ आंधळा जीवनद्वेष आहे, दुसरं काय ? कृष्णानं मुरलीत, एका लाकडाच्या निर्जीव तुकड्यात आपल्या हृदयातलं प्रेमसंगीत ओतताच ती बासरी सुरांच्या रम्य चांदण्यानं ओतप्रोत भरून गेली. आपल्या जीवनाच्या बासरीत असे सूर का भरता येणार नाहीत. ?

तो जीवनद्वेष्टा तरुण कवी म्हणाला होता की, जीवनाच्या भट्टीत सारी सुंदर स्वप्नं जळून जातात. हे काही खरं नाही. जळालेल्या स्वप्नांच्या राखेतूनच नवनवीन स्वप्नांचे पक्षी जन्मायला हवेत. दु:खाची वाट तुडवीत चालताना ओठांवर एखादं धुंद प्रेमगीत असायला काय हरकत आहे ? कुणाचं तरी आपल्यावर प्रेम आहे, किंवा आपण कुणावर तरी प्रेम करीत आहोत इतकं कारण जगायला, जगत राहायला पुरेसं नाही का ?

जगणं ही मुळातच एक काव्यमय, अद्‌भुत प्रक्रिया आहे. ऊन-पावसातून आणि सुखदु:खातून जीवन वाहात राहते ते वाहू द्यावे. कधी ते वाहावतही जाते. त्यातही एकप्रकारचं सौंदर्य आहे. माणसाच्या मनाची पानं हिरवी असली आणि आयुष्याच्या

मुळाशी घातलेल्या दु:खवेदनांच्या खतपाण्यातूनच सत्त्व शोषून घेण्याची शक्ती असली म्हणजे ही हिरवी पानं उन्हात चमकतात. वाऱ्यावर डुलतात. निळ्या आभाळाला आमंत्रण देतात. केव्हातरी ती पिवळी होतात. गळूनही पडतात. पण कुणी काही म्हटलं तरी जीवनमरणाची ही रीत अर्थपूर्ण आहे. हा इहलोक लोभस आहे.

महात्मा गौतमबुद्धानं जीवनाच्या अंतिम क्षणी आजूबाजूला पाहिलं आणि तो म्हणाला, "अस्ताला चाललेल्या सूर्याच्या कोवळ्या प्रसन्न प्रकाशात हे आकाश आणि ही पृथ्वी किती सुंदर दिसत आहे. माणसाचं जीवन खरोखरच चित्रविचित्र आणि सुंदर आहे." जीवनाच्या सौंदर्याचा, सूर्यप्रकाशाचा, आकाश आणि पृथ्वी यांचा आनंदानं उद्घोष करीत जीवनवादी बुद्धानं या जीवनाचा निरोप घेतला. जगण्याला मुळातच एक विलक्षण जिवंतपणा असतो. त्यात आपल्या हृदयातली अमृतकळा ओतली म्हणजे या जीवनाचे रंग खुलत जातात. पाकळ्या फुलत जातात.

"जगायचं कशासाठी?" असा प्रश्न मला कुणी विचारला तर मी फक्त हसतो. हसणं हेच या प्रश्नाला उत्तर आहे असं मला वाटतं.

□□□

# ६. सतारीचा झंकार

काही व्यसने सुंदर असतात. ती जीवनाला संपन्न बनवतात. संपन्नतेच्या व्यावहारिक व्याख्या पुष्कळ आहेत. पण आपल्या अनुभवाला, जीवनदृष्टी आणि अभिरुचीला समृद्धी देणारी अशी काही व्यसनं आहेत. माझ्या एका मित्राला सतार मनस्वी आवडते. दररोजचा काही वेळ तो सतारीच्या तारांशी मन:संवाद करण्यात घालवतो. हळुवारपणे ती तो जवळ घेतो आणि विलक्षण प्रेमाने तिच्या तारांवरून आपली कलावान बोटं फिरवतो. त्या उत्तेजक स्पर्शानं सतारीचं अंगन् अंग जागं होतं. मधुर स्वरांची बरसात होते. संगीताच्या त्या धारांत चिंब भिजून जाण्यातला एक उत्कट आनंद त्याला मिळत असतो. एकदा मी त्याला विचारलं,

"जगण्यासाठी तुला कोणत्या गोष्टी अत्यावश्यक वाटतात ?"

तो म्हणाला, "जगणं याचा अर्थ मी मनानं आणि भावनेनं जगणं असा करतो. सतार ही माझ्या आयुष्यातली सर्वाधिक महत्त्वाची गोष्ट मी समजतो. काय असेल ते असो, कोणत्याही सुखदु:खात हिनं मला साथ दिली. माझ्या आशाआकांक्षा – नव्हे माझ्या साऱ्या जीवनाचं सामर्थ्य आणि दुबळेपण हिच्यातूनच झंकारित होतं. तू माझ्या सतार वाजवण्याच्या सवयीला छंद म्हणतोस, व्यसन म्हणतोस; पण हा तर माझा धर्म आहे. माझी कित्येक सुंदर स्वप्नं मला या सतारीतून निघणाऱ्या सुस्वरांनीच दाखवली. मोहक कल्पनांचे कितीतरी पक्षी हिच्या स्वरांतूनच माझ्या कानाशी किलबिल करतात. उद्या मला कुणी जन्मठेपेची शिक्षा दिली तरी ती मी या सतारीच्या सहवासात आनंदानं भोगीन."

त्याचं हे बोलणं ऐकून मला आश्चर्य वाटलं नाही. कलेवर मन:पूर्वक प्रेम करणारा एक कलावंत यापेक्षा दुसरं काहीच बोलणार नाही. पण इतकं मात्र मला जाणवलं की जीवनाची वेल हिरवीगार ठेवण्यासाठी असलं एखादं वेड माणसानं जोपासलं पाहिजे. कलेत ही अद्भुत शक्ती असते यात संशय नाही. माझा हा मित्र एकदा काही कारणानं अत्यंत हताश झाला होता. या भाबड्या माणसानं कुणावर तरी पूर्ण

विश्वास टाकला होता आणि आपल्या विश्वासघाताचं दुःख त्याला सहन करावं लागलं.

जीवनावरची त्याची श्रद्धाच त्या काळात डळमळीत झाली होती. कुणीतरी त्याला सुचवलं – या दुःखाचा विसर पडण्यासाठी त्यानं दूरच्या प्रवासाला जावं, तीर्थयात्रा करावी. पण असल्या उपायांनी काय होणार? बऱ्याच दिवसांनी त्यानं सतारीवरची गवसणी काढली आणि तिच्याशी तो आपल्या बोटांनी बोलत राहिला. भिन्न भिन्न भावनांचे सूर तिच्या हृदयातून हळूहळू उमलू लागले. कारुण्याच्या सुरांनी प्रथम त्याच्या भोवती एक वर्तुळ तयार केलं. तारा छेडल्या जात होत्या. सूर उमटत होते. या वादकाच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. सतारीला त्याची वेदना समजली होती. वेदनेचा स्पर्श घेऊन आलेल्या त्या स्वरांनी त्याच्या मनावर हळुवार फुंकर घातली. दुःखाची गाणीसुद्धा किती मधुरतम असतात याचं प्रत्यंतर त्याला आलं. दुःखानुभवाचे सूर माणसाच्या मनाला जागं करतात. हा कलावंत मित्र म्हणाला, " त्या दिवशी मला शेलेची कविता समजली. कॉलेजात असताना तोंडपाठ केलेल्या कवितेचा अर्थ दुःखानंच मला समजावून सांगितला. आणि त्या अर्थातला आनंद सतारीनं मला दिला.

> We look before and after
> and pine for what is not,
> our sweetest songs are those,
> that tell us the saddest thought.

कवितेच्या या ओळी म्हणजे केवळ शब्द आहेत असं मला वाटत होतं. पण आता माझ्या लक्षात येतं की, शब्द काय किंवा सूर काय, जेव्हा अनुभवांच्या दुःखगंधातून उचंबळून येतात, तेव्हा ते अधिकच मधुर होतात. माझ्या या सतारीनं किती किती दुःखांत मला सोबत केली आहे म्हणून सांगू! माझी एकुलती एक मुलगी टायफॉईडला बळी पडली. सारं आभाळ माझ्यावर कोसळलं. तिला अग्नी देऊन मी घरी परतलो. ती वास्तू मला खायला उठली. घरातल्या वस्तूवस्तूंत माझ्या मुलीची भावसुंदर रूपं मला दिसू लागली. विकल झालेल्या मनानं हीच सतार मी हातात घेतली. आणि माझ्या मनातला सारा दुःखावेग तिला सांगत गेलो. त्या रात्री ही सतार माझ्याशी कितीतरी सांत्वनाचे शब्द बोलली. माझं दुःख, माझं नैराश्य या सतारीनं त्यादिवशी आपण होऊन स्वीकारलं. पण त्या मोबदल्यात तिनं मला एक समंजसपणा दिला. माझ्या दुःखाला उदात्ताची बैठक तिनंच मिळवून दिली. संगीत हा माझा छंद नाही. केव्हातरी फावल्या वेळेला करण्याची ही चैन नव्हे. गाण्यांच्या सुरात आणि शब्दांत मी पाहता पाहता गुंतून पडतो. ही सतारच केवळ मला आवडते असं नव्हे; सारीच वाद्यं माझ्याशी बोलू लागतात. आपल्याही हृदयात एक सतार वाजत असते. कुठली तरी अज्ञात अंगुली त्या तारा छेडत असते. पण ही सतार ऐकण्याची एक वेगळी श्रवणशक्ती असावी लागते. "

हा माझा मित्र बोलता बोलता अगदी सहजतेनं तत्त्वज्ञानाच्या एका सुंदर उपवनात शिरला होता. मला वाटतं जो अभिजात कलावंत असतो त्याच्या हृदयात एखाद्या कोपऱ्यात तत्त्वविचारांची कोवळी फुलं फुललेली असतात. याच्या बोटांत प्रतिभा होती. ती कोणाच्या कंठात असते, कोणाच्या वाणी-लेखणीत असते. पण खरं तर ती हृदयातच असावी लागते. बहुतेकांची शरीरे वाढतात, काहींची बुद्धी वाढते, पण हृदय मात्र चिमूटभरच असतं. आता असल्या क्षुद्र हृदयाच्या चिमटीत काय मावणार? प्रत्येकाच्याच हृदयात एक सतार असते हे माझ्या मित्राचं विधान मला आनंदाबरोबरच अस्वस्थताही देऊन गेलं. एखाद्या सतारवादकाची सतार आम्हाला नीट ऐकता येत नाही. तिचे सुस्वर टिपून घेता येत नाहीत. हृद्यातली सतार कोणत्या कानांनी ऐकायची? जिचं अस्तित्वही आम्हाला जाणवत नाही, ती सतार कशी समजून घ्यायची हाच एक यक्षप्रश्न आहे. बोथट झालेल्या संवेदना आणि बधिर झालेल्या संवेदना इतकंच ज्याचं भांडवल आहे त्याला संगीताचीच काय, पण कोणत्याही कलेची कदर असू शकणार नाही. पोट भरण्याची कला आणि हृदय संपन्न करण्याची कला परस्परांहून अगदी भिन्न असते. शास्त्रशुद्धपद्धतीने सतार छेडणारा वादक रविशंकरच्या पदवीला पोहोचेल काय? सतारीचं वादन शास्त्रांशी बांधलेलं असेल तर असे बंधनातले स्वर रसिकाला अनिर्बंध सुख किंवा दु:ख देऊ शकतील काय? हृदयातली सतार अंत:करणाच्या बोटांनी छेडल्यावर ती जे दिव्य संगीत देईल त्याला कसली उपमा द्यायची? हे लपलेले स्वर जागवले पाहिजेत. कुणीतरी कवी म्हणाला होता,

"फुलं वेचण्यासाठी तुझ्या मनाची परडी तयार ठेव. तुलाच परडी व्हायचं आहे. तुलाच वेल बनायचं आहे. तुलाच कळी आणि फूल व्हावं लागेल. हे घडल्यावर तुला सुगंधाची कधीच उणीव भासणार नाही. तुला कुणाचं तरी प्रेम हवं आहे ना, मग विचार कशाचा करतोस? तूच हो त्या प्रेमाचं मूर्तिमंत रूप. हे विचार म्हणजे केवळ शब्दांचे बुडबुडे नव्हेत. शब्दाला बुडबुडा म्हणणं हा सुद्धा एक शाब्दिक खेळ आहे. मीरेला जाणीव झाली एका उमलत्या क्षणाला की, एक दिव्य सतार आपल्या मनाच्या अंतर्मनात मंदपणानं झंकारत आहे. बरेच दिवस ते स्वर तिला नीटसे ऐकता आले नाहीत. पण तिची अस्वस्थता वाढू लागली. एक दिवस त्या स्वरांनी तिला स्पष्टपणानं सांगितलं, "तू घुँघट घेऊन बसली आहेस, प्रियकराचं दर्शन कसं व्हायचं? प्रियतमाला भेटण्याची उत्कट इच्छा असेल तर कृत्रिमतेचे, औपचारिकतेचे सारे बुरखे दूर केले पाहिजे. प्रेमाविषयीची भेट प्रेम झाल्याशिवाय - प्रेमस्वरूप बनल्याशिवाय होऊच शकत नाही. हा प्रेमरूपी परमेश्वर प्राप्त करून घ्यायचा असेल तर सारीच बंधने तोडावी लागतील." तिच्या मनाची सतार आता स्पष्टपणानं आणि सुरेलपणानं वाजत राहिली. या सतारीचे सूर दडपून टाकता येत नाहीत. कारण हे सूर गात्रागात्रांतून पसरतात. एके दिवशी राजप्रासादाच्या वैभवशाली भिंतींचं कुंपण ओलांडून मीरा बाहेर पडली, तेव्हा तिच्या मनात आणि आत्म्यात तो गिरिधर गोपाल होता. ती सतार सारखी

झंकारत होती. स्वरांच्या गोड धुंदीतून मीरा कधीच व्यावहारिक भानावर आली नाही. व्यवहार आणि उपचार संपले होते. कृष्णप्रेमाचे सुस्वर आता मीरा नावाच्या सतारीतून सारखे उमटत होते.

ही केवळ कल्पना नव्हे. जे परमसत्य असतं ते आपल्याला काल्पनिक वाटावं हे दुर्दैव आहे. हजारातून किंवा लाखातून एखाद्या व्यक्तीलाच आपल्या मनाचे सूर ऐकायला येतात. माझा सताप्रेमी मित्र सहज बोलता बोलता "प्रत्येकाच्या हृदयात एक सतार असते" असं अत्यंत अर्थपूर्ण वाक्य बोलून गेला. संगीताचा तो भक्त होता. कुमार आणि भीमसेन यांच्या मैफलीत तो देहभान विसरून जातो. एकदा तर भैरवी ऐकताना त्याचे डोळे भरून आले. मी याबद्दल त्याला नंतर विचारलं तेव्हा तो म्हणाला, "रागिणीच्या माध्यमातून जीवनातले सारे हर्ष आणि शोक माझ्या मनात उतरतात. सारे रस आणि सारे रंग मनात उसळतात. या स्वरांच्या स्पर्शानं सारे संघर्ष संपून जातात. क्षुद्र इच्छांची कात गळून पडते. अंत:करणातून एक अनामिक गंध येऊ लागतो. किंवा खरं सांगायचं तर काय वाटतं हे शब्दांतून सांगता येत नाही. कोणत्याही कलेची खोल अनुभूती आणि तिचा परिणाम जड शब्दांतून प्रकट करणं अशक्य आहे. निदान मला तरी ते शक्य नाही. तुमचे ज्ञानेश्वर-तुकारामच "बोली अरूपाचे रूप दावीन" अशी प्रतिज्ञा करू शकतात. पण इतकं खरं की, भीमसेनच्या गळ्यातून, नव्हे चित्तातून बाहेर पडणारी ही भैरवी कोणत्यातरी निराकाराला आकार देते. कसल्या तरी सामान्यत्वाला असामान्य बनवते. या भैरवीमुळे क्षुद्र मातीला कस्तुरीचा सुवास येतो."

जे शब्दांतून सांगता येत नाही ते अत्यंत प्रभावी शब्दांतून त्यानं सांगितलं होतं. प्रश्न इतकाच आहे की, आपल्या हृदयसतारीचे आतुर स्वर ऐकण्यासाठी संवेदनशीलता आमच्यात कशी निर्माण होणार? आम्ही तर आमच्या अतिक्षुद्र निरर्थक द्वेष - मत्सराच्या विळख्यात सापडलो आहोत. स्वार्थाच्या भिंती बांधून त्यांच्या आत स्वत:ला सुरक्षित ठेवीत आहोत. केशवसुतांच्या शब्दांत सांगायचं तर "हर्षशोक हे ज्या सगळे त्या काय कळे, त्या काय वळे." मनातल्या काटचांची फुलं झाल्याशिवाय मनाच्या सतारीचा झंकार ऐकता येत नाही. हे तत्त्वज्ञान बाजूला ठेवून दिले तरी सुरेल स्वरांची मोहिनी ज्याच्यावर पडत नाही आणि स्वरांच्या संगतीत ज्याचं मन काव्यात्म भावांनी उचंबळून येत नाही अशा अरसिकांना देण्याच्या योग्यतेचं विशेषण मला तरी शब्दकोषात सापडत नाही.

सतारीवरूनच हा विषय निघाला म्हणून सांगतो. एकदा एका तरुण मुलीनं एका मैफलीत सतारवादन केलं होतं. सोळासतरा वर्षांची ही मुलगी, साधारण बरं उत्तेजनार्थ असं काही तरी वाजवील इतकीच आमची कल्पना होती. पण त्या रात्री तिनं कमाल केली. त्या दिवाणखान्यातलं वातावरण तिनं छेडलेल्या तारांतून उमटलेल्या लहरींनी पार बदलून गेलं. आम्ही श्रोते अवाक् होऊन ऐकत होतो. वाऱ्याच्या लहरीबरोबर

झाडाखाली फुलांचा सडा पडावा तसा आमच्या भोवताली स्वरपुष्पांचा वर्षाव होत होता. तिच्या मनात फुलून आलेला आनंद त्या सुरांतून व्यक्त होत होता. अत्यंत उल्हसित मन:स्थितीत ती सतार छेडीत होती. निर्जीव वाटणारी ती सतार त्या दिवशी जणू सर्वांगांनी जिवंत झाली होती. आपल्या सुखदु:खांना साथ करणारी ही एक प्रामाणिक सहचरी आहे, असंच मत त्या कलावतीनं व्यक्त केलं. एक दिवस याच आराधनेतून तिला आपल्या हृदयस्थ सतारीची चाहूल लागेल अन् मग तिचं जीवनसंगीत संपन्न सुरांनी बहरून जाईल. या सतारीचा शोध लागण्यासाठी आपण स्वत: गायक किंवा वादक असण्याचं कारण नाही. जीवनावर आणि कलेवर, माणसांवर आणि निसर्गावर लुब्ध झालेला कोणताही रसिक अंत:करणातली संगीतकंपनं ओळखू शकतो. माणुसकीचे सूर ज्याला गवसले त्याच्या हृदयातली सतार अखंड झंकारत राहते आणि मग "आनंदाचे डोही आनंद तरंग" ही त्याची अवस्था झाल्याशिवाय राहात नाही. प्लेटो नावाच्या महान तत्त्ववेत्त्याने म्हटले आहे, "The man who has music in his soul will be most in love with the loveliest."

ज्याच्या रक्तात - आत्म्यात संगीताची माधुरी आहे त्याला सर्वोच्च सौंदर्याचे आकर्षण वाटणारच ! शेक्सपीअरने संगीताबद्दल आपलं मार्मिक मत प्रकट केलं आहे. तो म्हणतो, 'मधुर संगीत ऐकलं की मी आनंदाऐवजी व्याकुळताच अधिक अनुभवतो.' मनाला पर्युत्सुक करणारं गायन आणि वादन अनुभवांच्या एका वेगळ्या प्रदेशात घेऊन जातं. वाद्यसंगीतातून जीवनसंगीत अधिक सुंदर आणि उत्कट करण्याची हिरवी रसिकता आम्हा सर्वांना मिळाली तर जगाची मैफल किती विलक्षण रंगेल ?

□□□

# ७. द्रौपदीचे वस्त्रहरण

महाभारतातली एक अत्यंत प्रक्षोभक घटना म्हणजे द्रौपदीचे वस्त्रहरण. कौरव-पांडवांच्या भीषण युद्धाला हीच घटना प्रामुख्याने कारण झाली. शूर पांडवांच्या उपस्थितीत आणि भीष्म, द्रोण, कृप यांच्यासारख्या महनीय आचार्यांच्या साक्षीने मदोन्मत्त दु:शासन द्रौपदीची वस्त्रे ओढून तिचा निर्लज्ज विनयभंग करतो हा प्रसंग विलक्षण चीड आणणारा आहे. राजसभेत वस्तुत: धर्म आणि नीती यांचे संरक्षण व्हावे. पण राजसभेत बसून सत्ताधारी जेव्हा नैतिकतेचा आणि संस्कृतीचा गळा दाबतात तेव्हा काय बोलायचे ? पांडव निर्वीर्य झालेले असतात. कौरव सत्तेच्या धुंदीने माजलेले असतात. जी सत्ता अधर्म व अनीती यांच्या आधारावर उन्मत्तपणे उभी राहिलेली असते ती जमीनदोस्त करण्याचे सामर्थ्य जोपर्यंत सज्जनांच्या हातात येत नाही तोपर्यंत परमेश्वरही काही करू शकत नाही. द्रौपदीची वस्त्रे ओढताना दुर्योधन, दु:शासनाला केवढा आसुरी उन्माद चढला होता याचे चित्र व्यासांनी रेखाटले आहे. भीम आणि अर्जुन षंढाप्रमाणे खाली मान घालून त्यावेळी बसले होते. अपमानित द्रौपदीच्या शरीराकडे कौरव दरबारातले शेकडो कामांध डोळे अधाशीपणाने पाहात होते.

कित्येक शतकांपूर्वी हा प्रसंग घडला. आता त्याचे काय ? असे म्हणून कोणीतरी अशा गोष्टीकडे दुर्लक्ष करण्याचा उपदेश करील. पण "द्रौपदी वस्त्रहरण" आजही जगात अनेक ठिकाणी होत आहे. वासनेने वखवखलेले हात जोपर्यंत जगात आहेत आणि जोपर्यंत अन्यायावर तुटून पडण्याची प्रवृत्ती निर्माण होत नाही, तोपर्यंत दु:शासनांना तोटा नाही. पाशवी बळापुढे सज्जन समजले जाणारे लोक लोटांगण का घेतात हेच समजत नाही. सज्जनता म्हणजे भित्रेपणा, सुसंस्कृतपणा म्हणजे पलायनवाद, सभ्यता म्हणजे अत्याचारापुढे वाकत राहणे, असे सामान्य समीकरण का व्हावे ? कोणीही यावे आणि त्याने एखाद्या पतिव्रतेकडे बेदरकारपणे तिरका कटाक्ष टाकावा आणि सज्जनांनी या अपराधाचा साधा निषेधसुद्धा करू नये यापेक्षा आणखी अध:पात कोणता असू शकेल ? खरे तर द्रौपदी, दु:शासन आणि पांडव यांची कथा प्रतीकात्मक स्वरूपाची

आहे. महाभारतात चिरंतन असे मानवी जीवन व्यक्त झाले आहे. पुरातनकालातली ही कथा अगदी आजचीही आहे. आजही या कथेतल्या सुष्ट-दुष्ट व्यक्ती वेगवेगळ्या नावांनी जगत वावरत आहेत.

द्रौपदीचा विनयभंग होत असताना दरबारातले "सुसंस्कृत" लोक, विद्वान आचार्य, नीतिविशारद पंडित काय करीत होते, हा खरा प्रश्न आहे. पण या प्रश्नाचे उत्तर मात्र दुःखदायक आहे. सत्तेपुढे कुणाचेही शहाणपण चालत नाही. आणि सत्ताधाऱ्यांना देखील शहाणपणाचे शब्द सहसा रुचत नाहीत. चार शहाणी माणसे त्यांनी धूर्तपणाने आपल्या दरबारात ठेवलेली असतात. कारण त्यांच्यामुळे सत्ताधाऱ्यांची थोडीफार कीर्ती वाढते. पंडितांनी आणि आचार्यांनी नेहमी आपला व आपल्या कर्तृत्वाचा जाहीरपणे उदोउदो करावा ही त्यांची इच्छा असते. विद्वानांना चार सन्मानचिन्हे दिली, त्यांच्या चरितार्थाची सोय केली म्हणजे हे ज्ञानवंत कायमचे मिंधे होऊन बसतात याची जाणीव राज्यकर्त्यांना असते. हा खेळ प्राचीन काळापासून अखंड चालू आहे. चाणक्य आणि रामशास्त्री प्रभुणे यांच्यासारखे निःस्पृह आणि निर्भय विद्वान अपवादभूतच असतात.

पांडित्याला निर्भयपणाची जोड क्वचितच मिळते. पंडितांनाही पोट असते. प्रपंचाचे नाटक त्यांनाही वठवावे लागते. भीष्म-द्रोणांनी हेच केले नाही काय ? त्याग, ज्ञान, तपस्या व पराक्रम या सर्व बाबतीत सर्वश्रेष्ठ असलेल्या भीष्माचार्यांच्या देखत एका सतीचा पदर ओढण्याचे नीच धारिष्ट्य दुःशासन नावाचा सत्तांध भेकड करू शकतो याचा अर्थ काय ? संतप्त झालेली पांचाली अनेक प्रश्नांचा भडिमार तेथे बसलेल्या आचार्यांवर करीत राहते. पण सारे वंदनीय गुरुवर्य मूग गिळून गप्प बसलेले असतात. त्यांच्या तोंडून धिक्काराचा शब्द फुटत नाही. सोन्याचा लगाम तोंडात असलेली ही घोडी न्यायाच्या रस्त्याने धावू शकत नाहीत. भीष्म म्हणाले, "अर्थस्य पुरुषो दासः।" आम्ही मिंधे आहोत. न्याय-अन्याय आम्हाला समजतो. पण आमच्या मिंधेपणामुळेच आम्ही दुर्योधन-दुःशासनाला अडवू शकत नाही."

जीवनातले एक अत्यंत जळजळीत सत्य भीष्माने सांगून टाकले. सज्जन आणि न्यायी प्रवृत्तीच्या ज्ञानवंतांनासुद्धा चांदी-सोन्याच्या नाण्यांनी विकत घेता येते. यापेक्षा दुसरे शोचनीय काय असेल बरे ? पैशाच्या बळावर एखाद्या पतिव्रतेलाही वेश्या ठरवता येते. एखाद्या अधमालाही पुण्यशील म्हणून मिरवता येते. पैशांच्या दुनियेत अज्ञानी माणूसही ज्ञानसंपन्न लोकांचा नेता बनू शकतो. हा प्रकार विषण्ण करणारा असला तरी तो प्रचलीत आहे. एकदा एक श्रेष्ठ पंडित एका सर्वसामान्य माणसाची एका ज्ञानपीठावर नियुक्ती व्हावी म्हणून शिफारस करू लागले. त्यांच्या शब्दाला राजदरबारात वजन होते. तो अतिसामान्य उमेदवार त्या ज्ञानपीठाचा प्रमुख म्हणून नेमण्यात आला. सर्वांना आश्चर्याचा धक्का बसला. एका खाजगी बैठकीत ते पंडित म्हणाले, "खरे तर या माणसाची काडीइतकी योग्यता नाही. त्याची वरिष्ठपदी नियुक्ती होणे ही एक

आपत्ती आहे. पण वातावरण आणि व्यवहार ओळखून मीच त्याच्या नेमणुकीबद्दल आग्रह धरला. जो व्यवहार समजून घेत नाही तो मूर्ख असतो. या व्यवहारात माझाही फायदा झाला आणि त्या मूर्खाच्याही पदरात पुष्कळच मोलाची गोष्ट पडली." हा खुलासा ऐकल्यानंतर काही बोलण्यासारखे उरत नाही.

भीष्मांनी द्रौपदीवस्त्रहरणाच्या क्रियेला कडाडून विरोध केला असता तर भारतीय युद्ध घडलेच नसते. शारीरिक पराक्रमापेक्षा ज्ञान आणि तपस्या व चारित्र्य यांना अधिक मोल असले पाहिजे. भीष्माजवळ तर सर्वांना निस्तेज करून टाकण्याइतके शौर्यही होते. त्यांना वस्तुत: दुर्योधनाच्या रागा-लोभाची क्षिती बाळगण्याचे कारणच नव्हते. पण तरीही या सुसंस्कृत धीरवीर पुरुषाच्या मनात ओशाळेपणाची जाणीव होती. अशावेळी ती जाणीव झटकून आणि तर्कवितर्काचा विचार बाजूला सारून एका स्त्रीच्या पावित्र्य रक्षणासाठी भीष्म पुढे सरसावले असते तर ते श्रीकृष्णापेक्षाही श्रेष्ठ ठरले असते. पण भीष्माची अगतिकता मला तरी दुर्योधनाच्या दुष्टपणापेक्षाही अधिक उद्वेगजनक वाटते. सज्जनांचा दुबळेपणा हे जगावरचे मोठे संकट असते. दुष्ट माणसे तशी भ्याडच असतात. ती वीरांवर हल्ला चढवत नाहीत. जुगाराच्या खेळात जिंकले गेल्यामुळे पांडव हतबल झाले आणि मुळातच सज्जन असल्यामुळे ते नियमांचे उल्लंघन करणार नाहीत याची कौरवांना खात्री होती. अन्यथा द्रौपदीला दरबारात खेचण्याची कल्पना त्या भेकडांना सुचलीच नसती. सुजनत्व, स्वाभिमान आणि शौर्य हे तिन्ही गुण एकत्र आल्याशिवाय नवा इतिहास घडत नाही, हे रामचंद्र आणि शिवाजीमहाराज यांच्या उदाहरणांवरून दिसते. हे दोघेही विचारशील होते. पण केवळ विचारवंत नव्हते. आपल्या विचारांचे कृतीत परिणमन करण्याची क्षमता असलेले सज्जनवीर होते. आज सुजनता आणि वीरता यांचा संगम पाहायला मिळत नाही. पवित्र मूल्यांची चिरफाड करणाऱ्या दुष्टांचा धाक बाळगणारे दुबळे सौजन्य आम्हाला नको आहे.

मनुष्यजातीचा इतिहास कलंकित करणाऱ्या द्रौपदीवस्त्रहरणासारख्या लाजिरवाण्या घटना घडू नयेत यासाठी दुष्टांचे हात मुळापासून उखडून टाकणे हाच वस्तुत: धर्म आहे. प्रत्यक्ष युद्धात भीमाने दु:शासनाला त्या घटनेची आठवण करून दिली. आणि त्याच्या तोंडावर लत्ताप्रहार करून त्याने विचारले, "अरे नीचा, कोणत्या हाताने द्रौपदीचे केस आणि वस्त्र तू खेचत होतास ? दु:शासनाच्या छातीवर पाय ठेवून, नव्हे रोवून भीम उभा होता. आपली आता सुटका होणे अशक्य आहे हे ओळखूनही तशाही अवस्थेत दु:शासनाने भीमाला उद्धट उत्तर दिले. त्याचा उन्मत्तपणा मरणाच्या छायेत देखील कमी झाला नव्हता. जे दुष्ट कधीच आपला दुष्टपणा सोडत नाहीत त्यांना ठेचून काढणे हाच वीरांचा स्वधर्म असतो. भीमाने त्याचे दोन्ही हात मुळापासून उखडून टाकले आणि त्याचा शेवट केला. भीमाचे हे कृत्य काही जणांनी आक्षेपार्ह ठरवले आहे. त्यांच्या मते भीमाने इतक्या भीषण पद्धतीने सूड घ्यायला नको होता. असली "ॲकॅडेमिक" चर्चा एखाद्या परिसंवादात करता येईल. ज्याला जी भाषा

समजते त्या भाषेत उत्तर देणे सयुक्तिक असते. ''मूळ स्वभाव जाईना'' हे तुकारामांचे वचन प्रसिद्धच आहे. दु:शासनाचे वाकडे शेपूट सरळ करण्याचा वेडा उपद्व्याप करण्यापेक्षा दु:शासनालाच संपवणे अधिक सरळ आहे, हे ज्याला कळते तो ज्ञानी. जो द्रौपदीची विटंबना थंडपणे पाहात बसतो त्याला ज्ञानी कसे म्हणता येईल ? अन्यायाचा प्रतिकार न करणारे अन्यायाला उत्तेजन देत असतात, असे का म्हणू नये ? महाभारत ही मला सूडाची कथा वाटत नाही. अनीती आणि अधर्म यांच्याविरुद्ध कणखरपणे उभ्या राहिलेल्या धर्मप्रवृत्तीची कथा वाटते. धर्म आणि सामर्थ्य यांचा संगम झाल्याशिवाय द्रौपदी सुरक्षित राहणे शक्य नाही. अन्यता तिच्या विटंबनेला अंत नाही.

□□□

# ८. तो येक मूर्ख

समर्थ रामदासांना मनुष्यस्वभावाचे सांगोपांग ज्ञान होते. जीवनाचे आणि जगाचे त्यांनी सर्वांगीण सूक्ष्म निरीक्षण केले होते. त्यांनी स्वत: प्रपंच केला नाही, पण प्रपंचातली सुखदु:खे, प्रपंचाची प्रकृती आणि विकृती तटस्थपणे त्यांनी न्याहाळलेली होती. भिन्न-भिन्न प्रकृतीची बरी आणि वाईट, शहाणी आणि मूर्ख, सामान्य व असामान्य माणसे त्यांनी पाहिली होती. 'दासबोध' हा त्यांचा ग्रंथ म्हणजे त्यांच्या जीवनाच्या अभ्यासाचे एक व्यापक भांडार आहे. व्यवहारज्ञान व आत्मज्ञान म्हणजेच प्रपंच आणि परमार्थ याचे विवरण करणारा दुसरा समर्थ ग्रंथ मराठी साहित्यात नाही, असे म्हणता येईल. अनेक प्रकारच्या उपयुक्त विचारांनी भरलेला हा ग्रंथ रामदासांच्या व्यक्तिमत्त्वावर स्वच्छपणे प्रकाश टाकतो. संतांच्या साहित्यात भक्ती, युक्ती आणि शक्ती यांचा कसा संगम झालेला असतो हे पाहायचे असेल तर "दासबोध" हा ग्रंथ घेऊन सहज थोडा वेळ चाळावा. एकापेक्षा एक चातुर्याची मार्गदर्शक वचने आपल्या दृष्टीला पडतात. "दासबोधात" नाना प्रकारचे विषय आले आहेत. आपल्या वाचकांच्या पदरात ज्ञानाचे आणि माहितीचे असंख्य कण मन:पूर्वक टाकण्याची समर्थांची सदैव धडपड होती.

परवा सहज "दासबोधाची" पाने उलटत बसलो होतो. प्रत्येक पानावरची एखाददुसरी ओवी वाचावी, पुन्हा लहर लागेल त्याप्रमाणे वाचावी असा फावल्या वेळेचा उपयोग करीत होतो. एक ओवी अशी होती—

*कुग्रामे अथवा नगरे। पाहावी घरांची घरे।*
*भिक्षामिसे लहान थोरे। परीक्षून सोडावी॥*
*बहुती काहीतरी सापडे। विचक्षण लोकी मित्री घडे।*
*उगेच बैसता काहीच न घडे। फिरणे विवरणे॥*

चातुर्याचे विवरण करताना रामदासांनी या ओव्या लिहिल्या आहेत. मनुष्य सावध मनाचा आणि चिकित्सक वृत्तीचा असला म्हणजे तो एखाद्या कुग्रामात जावो

की महानगरात जावो, तो जाणीवपूर्वक माणसे पाहतो आणि त्यांच्या वृत्ती-प्रवृत्तींची ओळख करून घेतो. चतुर माणसाच्या मनाचे दार कधीच बंद असत नाही. त्यामुळेच भिन्नभिन्न दिशांतून त्यांच्या मनात प्रकाशाचे किरण येत राहतात. खरे तर मनुष्य शाळा-कॉलेजात केवळ पुस्तकेच शिकतो. चार भिंतीत तो काही शब्द शिकतो. पण जगात वावरताना असंख्य तऱ्हांची माणसे जेव्हा त्याला पाहायला मिळतात आणि त्यांच्याबरोबर जेव्हा त्याला वागावे लागते, तेव्हाच खरे चातुर्य अंगी येते. रामदासांनी ज्याप्रमाणे चतुर माणसाची लक्षणे सांगितली आहेत त्याप्रमाणेच त्यांनी विशेष चातुर्याने मूर्खांचीही लक्षणे विस्ताराने विवरून सांगितली आहेत. ही मूर्ख लक्षणे वाचताना माझी करमणूक झाली. पण रामदासांनी फेकलेली एखादी टोपी आपल्याही डोक्याला फिट बसणारी असू शकेल असा चिंतेचा विचार मनात येऊन गेला. किती प्रकारचे मूर्ख जगात असू शकतात, हे 'मूर्ख लक्षण' आणि "पढतमूर्ख लक्षण" या दोन समासांत समर्थांनी सांगितले आहे ते म्हणतात,

*जन्माला जयांचे उदरी। तयांसी जो विरोध करी।*
*सखी मानिली अंतुरी (स्त्री)। तो येक मूर्ख॥*
*आपणास जेथे मान। तेथे अखंड करी गमन।*
*रक्षू नेणे मानाभिमान। तो येक मूर्ख।*
*विद्या वैभव ना धन। पुरुषार्थ सामर्थ्य ना मान।*
*कोरडाच वाहे अभिमान। तो येक मूर्ख।*
*आपली आपण करी स्तुती। स्वदेशी भोगी विपत्ती।*
*सांगे वडिलांची कीर्ती। तो येक मूर्ख॥*

मूर्खपणाची अनेक उदाहरणे समर्थांनी दिलेली आहेत. ज्या आई-बापांच्या पोटी जन्म घेतला, त्या पालनकर्त्या प्रेमळ मातापित्यांना पावलो-पावली अपमानित करणारे "सुपुत्र" पुष्कळ पाहायला मिळतात. आई-वडिलांना घराबाहेर बेदरकारपणे घालवून देणारे कुलदीपकसुद्धा कमी नाहीत. हे केवळ मूर्खपणाचेच नव्हे, तर दुष्टपणाचे चित्र आहे. वर दिलेल्या मूर्ख लक्षणांत स्वतःच स्वतःची स्तुतिस्तोत्रे गाणारे आणि वाडवडिलांच्या कीर्तीवर जगणारे लोक समर्थांनी मूर्खाच्या सदरात टाकले आहेत. आपल्या ठायी नसलेल्या गुणकर्तृत्वाबद्दल आत्यंतिक प्रौढीने हे लोक बोलत असतात. यांच्या अहंकाराचा दर्प असह्य होतो. एकदा एक ग्रामपुढारी चारचौघांत गर्वाढ्यपणाने सांगत होते,

"अहो, या जवाहरलाल नेहरूला त्याची परराष्ट्रनीती कशी चुकीच्या पायावर आधारलेली आहे, हे मी परवा दिल्लीला गेलो असताना अवघ्या पंधरा मिनिटात पटवून दिलं. जवाहरलालांनी आपली चूक कबूल केली. ते मला म्हणाले सुद्धा, आपलं परराष्ट्रखातं खरं म्हटलं तर तुमच्यासारख्या अत्यंत मुत्सद्दी माणसानं सांभाळायला हवं होतं. आम्हाला त्यातलं काही कळत नाही. मधून मधून दिल्लीला येऊन राजकारणाचे

धडे मला द्याल तर मी आभारी होईन. आता बोला! पंतप्रधान जिथं मला असं म्हणतात तिथं आपल्या देशातल्या लुंग्यासुंग्या पुढाऱ्यांची माझ्यासमोर काय कथा!"

कुणा एका अनामिक गल्लीत राहणारा आणि स्वत:ला महान नेता समजणारा हा मणूस जेव्हा स्वत:च आपली अवास्तव स्तुती करतो तेव्हा रामदासांनी दिलेले "मूर्ख" हे विशेषण फारच सौम्य वाटायला लागते. आत्मप्रत्ययाने बोलणे आणि घमेंडखोरपणे बोलणे यात विलक्षण अंतर आहे. परवा पाकिस्तानच्या पंतप्रधान बेनझीर भुट्टो म्हणाल्या, "आम्ही भारताशी एक हजार वर्षे लढा देऊ." भारताच्या पंतप्रधानांनी या हास्यास्पद गर्वोक्तीला चोख उत्तर दिले. ते म्हणाले, "एक हजार वर्षांचे राहू द्या, एक हजार तास तरी भारतासमोर तुम्हाला टिकाव धरता येईल काय, याचा विचार करा." गर्वयुक्त विधाने जेव्हा कर्तृत्वाच्या पोटी जन्माला येतात तेव्हा तो गर्व शोभून दिसतो. युरोपात हिटलर सर्वत्र मुसंडी मारीत होता. अनेक स्वतंत्र देश तो चिरडून टाकीत होता. लंडनच्या आकाशात त्याची विमाने घिरट्या घालू लागली. त्यावेळी पंतप्रधानपद स्वीकारताना इंग्लंडच्या पार्लमेंटमध्ये विन्स्टन चर्चिलने केलेले भाषण त्यांच्या आणि इंग्लंडच्या दुर्निवार आत्मप्रत्ययाचे द्योतक आहे. या भाषणात गर्वाच्या काही छटा आहेत. पण विजयाची परंपरा असलेल्या एका स्वतंत्र जयिष्णू राष्ट्राला गर्व करण्याचा जरूर अधिकार असतो. चर्चिल म्हणाले,

"रक्त, परिश्रम, अश्रू आणि घाम इतकेच यावेळी देण्यासारखे माझ्याजवळ आहे. तुम्ही विचाराल, तुमचे धोरण काय? तुमचे ध्येय काय? एकाच शब्दात उत्तर देतो, "विजय"! पडेल ती किंमत देऊन विजय मिळवीन. विजय हेच आमचे ध्येय आहे. कितीही भीषण परिणाम भोगावे लागले तरीही मी विजय मिळवीन. युद्ध हरण्यासाठी आणि राष्ट्र मोडीत काढण्यासाठी मी पंतप्रधान झालो नाही."

चर्चिलच्या चैतन्यपूर्ण शब्दातून इंग्लिश जनतेचा स्वाभिमान उफाळत होता. चर्चिलच्या पाठीमागे अनुभव, ध्येयवाद आणि जबरदस्त आत्मविश्वास होता. स्वत:ची त्याने काही अंशी स्तुती केली असेल, पण ही स्तुती सर्वार्थांनी संयुक्तिक होती. आकाशात उंच गेलेल्या महावृक्षावर एखादे अहंकाराचे बांडगूळ असले तरी त्यामुळे फारसे बिघडत नाही. पण कित्येक अतिक्षुद्र माणसे गर्वाच्या झाडावर चढण्याचा प्रयत्न करीत राहतात तेव्हा हसू आल्याशिवाय राहात नाही.

महाभारतात एक प्रसंग आहे. राजा विराटाच्या राजवाड्यात पांडव अज्ञातवासात होते. विराटाच्या राजधानीवर शत्रूंनी हल्ला चढवला. अंत:पुरात बायकांच्या मेळाव्यात अर्जुन बृहन्नडेच्या रूपात होता. राजपुत्र उत्तर अंत:पुरात पोरी-बाळींसमोर स्वत:च्या शौर्यधैर्याचे नगारे वाजवू लागला. जगातला कोणताही वीर आपल्याला पराभूत करू शकणार नाही. मला पाहताच शत्रूला पळता भुई थोडी होईल. माझ्यासारखा पराक्रमी कोण आहे? अशा अर्थाच्या त्याच्या वल्गना होत्या. कवी मोरोपंतांनी "बालिश बहु बायकांत बडबडला" असे त्याचे वर्णन केले आहे.

गर्व आणि दुरभिमान ही मनुष्याच्या मूर्खपणाचीच रूपे आहेत. समंजस मनुष्य अकारण गर्व करण्याचा वेडेपणा कधीच करीत नाही. पण वर उल्लेखिलेल्या रामदासी ओवीत "सांगे वडिलांची कीर्ती तो येक मूर्ख" असाही विचार स्पष्टपणे सांगितलेला आहे. पूर्वजांच्या कीर्तीचे भांडवल करीत निष्क्रियपणे जगणारा एक वर्ग असतो. त्याला स्वत:चे कर्तृत्व नसते. नवे काही घडविण्याची, पराक्रम करून आपल्या पायावर उभे राहण्याची त्याच्यात कुवत नसते. मग आपल्या मागील पिढ्यांतल्या कर्तबगार व्यक्तींचे तो केवळ पोवाडे गात बसतो. पूर्वजांच्या गुणांचे संकीर्तन करणे वेगळे आणि पूर्वजांच्या नावावर जगत राहण्याचा केविलवाणा प्रयत्न करणे वेगळे. भिक्षा मागणाऱ्या भिकाऱ्याने आपले आजोबा लक्षाधीश होते हे पुन्हा पुन्हा आळवून सांगण्यातला वेडेपणा उघड आहे. आपल्या पूर्वजांनी स्वत:च्या पुरुषार्थाने सत्ता आणि संपत्ती मिळवली या गोष्टीबद्दल मनात आदरयुक्त अभिमान अवश्य असावा; पण त्या अभिमानातून नवी प्रेरणा मिळावी. वडिलांची कीर्ती गाऊन आपली अकार्यक्षमता कशी झाकता येईल? जे केवळ वाडवडिलांच्या मोठेपणाच्या वलयात वावरत राहतात, त्यांची दुर्बलता अधिकच लाजिरवाणी दिसते. एका बड्या उद्योगपतीचा मुलगा लंडन शहरात सकाळी घरोघर जाऊन वृत्तपत्रे टाकण्याचे काम करीत होता. त्याला ओळखणाऱ्या एका माणसाने त्याला विचारले, "अरे, तू हे काय चालवले आहेस? तुझे वडील या देशातले अत्यंत सधन असे कारखानदार आहेत. पुढच्या सात पिढ्यांनी बसून खाल्ले तरी काही कमी पडणार नाही आणि तू हे काम करतोस?" तो नवतरुण म्हणाला, "माझे वडील कष्ट करून आणि घाम गाळून कारखानदार झाले. मला वडिलांच्या जिवावर उड्या मारायच्या नाहीत. ते फार बुद्धिमान आहेत, याचा मला जरूर अभिमान वाटतो आणि म्हणूनच वडिलांच्या नावावर आरामात जगत राहण्याचा मूर्खपणा मी कधी करणार नाही. मला देखील माझ्या कष्टातूनच माझे आयुष्य घडवायचे आहे. मागच्या पिढीचे ढोल बडवणारे आणि स्वत: काहीच न करणारे लोक मूर्ख असतात. वडिलांच्या खांद्यावर बसून मला जग पाहायचे नाही. मला माझ्या पायांनी चालायचे आहे."

समर्थ रामदासांनी एकेका ओवीतून माणसांच्या मूर्खपणावर मार्मिकतेने बोट ठेवले आहे. हे ज्याच्या लक्षात येत नाही तोही एक मूर्ख समजावा, इतकेच मी म्हणेन.

□□□

# ९. लग्न पहावं करून !

परवा एका लग्नसमारंभाला जाण्याचा प्रसंग आला. मुहूर्ताची वेळ टळून गेली तरी वधू-वरांचा पत्ता नव्हता. भटजींची धावपळ नव्हती. जमलेले लोक काहीसे अस्वस्थ दिसत होते. बोहोल्याजवळ कसली तरी गंभीर कुजबूज चालली असावी. कुणीतरी कुणालातरी सांगत होता, 'नवरदेव रुसून बसला आहे. काही केल्या माघार घेण्याची त्याची तयारी नाही. आपली मागणी पूर्ण झाली नाही तर लग्न मोडून आपण निघून जाऊ, अशी त्याची भूमिका आहे. आम्ही थोडीफार समजूत घालण्याचा प्रयत्न केला पण त्याचा काही उपयोग होत नाही.' मला आश्चर्याचा धक्काच बसला. अठ्ठावीस वर्षांचा हा नवरदेव चार वर्षांच्या पोरासारखा रुसून बसतो या पोरकट प्रकाराला काय म्हणायचे? पण रुसणे आणि फुगणे, भांडणे आणि तंडणे हे आपल्याकडच्या विवाहपद्धतीचे प्रमुख घटक आहेत. लग्नात भांडण नसेल तर त्याला लग्न म्हणण्याची आमची मुळीच तयारी नाही. लग्न कसे गाजत राहिले पाहिजे. ते गाजवण्यासाठी किरकोळ गोष्टीवरून दमदारपणाने भांडत राहण्याची खुमखुमी ही एक अत्यावश्यक बाब आहे. लग्नात दोन पक्ष असतात. एक सत्ताधारी पक्ष असतो. आणि दुसरा केवळ नामधारी पक्ष असतो. सत्ताधारी पक्षाने आपल्या सत्तेचे सार्वजनिक प्रदर्शन शक्य तितक्या सामर्थ्याने केले पाहिजे. आता हा नवरदेव कोणत्या खेळण्यासाठी रुसला होता याची मी चौकशी केली. तेव्हा आपल्याला रंगीत टी. व्ही. मिळाल्याशिवाय आपण लग्नाला मुळीच उभे राहणार नाही अशी उदात्त, गंभीर घोषणा त्या सात्त्विक नवरदेवाने केली आहे असे मला समजले. नवरदेवाच्या बाणेदार स्वभावाचे काही लोक कौतुक करीत होते. आपल्या अत्यंत उचित, न्याय्य मागणीपासून आपण मुळीच विचलित होणार नाही अशी धीरगंभीर प्रतिज्ञा त्या इंजिनियर झालेल्या नवरदेवाने केली होती. रंगीत टी. व्ही. ची मागणी तसे पाहिल्यास वरपक्षाच्या दृष्टीने अगदीच किरकोळ होती. काहीतरी भरीव गोष्टीसाठी रुसून बसण्याचा कार्यक्रम आखायला हवा होता. पण आता रणांगणातून आपल्याला कोणत्याही परिस्थितीत माघार घेणे शक्य नाही अशा निर्णयाची

घोषणा वरपक्षाने केली. त्या पक्षाचा प्रतिनिधी मला म्हणाला,

'अहो, लग्न हे आयुष्यातून एकदाच करायचे असते. नवरदेवाने काही बंगला, मोटार असल्या गोष्टी मागितल्या नाहीत. साधा दहा हजारांचा किरकोळ टी. व्ही. तर मागितलाय! खरं तर न मागताच वधूपित्यानं स्कूटर आणि टी. व्ही. बिनबोभाट द्यायला हवी. वरपक्षाचा तो जन्मसिद्ध हक्क नव्हे का?'

त्या प्रतिनिधीच्या अंगात जणू लोकमान्य टिळकांचा संचार झाला होता. 'टी. व्ही., स्कूटर मिळणे हा आमचा जन्मसिद्ध अधिकार आहे आणि या गोष्टी आम्ही मिळविणारच!' वरपक्षाकडील मंडळी किती पीळदार, ध्येयवादी आणि झुंजार मनोवृत्तीची आहेत याचा प्रत्यय मला आला. तो प्रतिनिधी आपल्या समर्थनासाठी आणखी म्हणाला,

'आमचा नवरदेव चांगला इंजिनियर आहे. असा जावई भेटायला पूर्वपुण्याई लागते. सरकारी खात्यात अधिकारी असल्यामुळं खाण्याची भरपूर सोय आहे. त्यातून आमचा हा गुणी पोरगा फार हुशार आहे. दररोज वरची कमाईसुद्धा भरपूर असते. अहो, वडिलार्जित गुण आहेत हे!! वधूपक्षाने टी. व्ही.ची ही साधीसुधी हौससुद्धा पुरवू नये म्हणजे अन्याय नव्हे का? अन्यायाविरुद्ध नवरदेवाने सत्याग्रह केला तर त्यात काय बिघडले?'

सत्याग्रहाचे तत्त्वज्ञान माझ्या गळी उतरवण्याचा धूर्त प्रयत्न वरपक्षाचा तो महान प्रवक्ता करीत होता. अन्यायाची त्याला विलक्षण चीड आली होती. न्याय मिळवण्यासाठी बिचारा तळमळत होता. माझी मान शरमेने खाली गेली. आमची विवाहसंस्था आणि तिचे पावित्र्य यांचे लाजिरवाणे दर्शन आजच नव्हे, तर अनेक वेळा घडले होते. पण असे चालायचेच हे गृहीत धरून आम्ही सारे खपवून घेतो. निमूटपणे सहन करतो. वरपक्षाच्या बेशरम अरेरावीपुढे, अन्यायी मागण्यांपुढे हतबल होऊन मान वाकवतो, 'आम्हाला पदरात घ्याहो.' म्हणून वरपक्षाच्या पायांवर लोळण घेतो. पोटी आलेली मुलगी म्हणजे आपल्या उरावरची एक धोंड आहे असे समजून ती कोणाच्या तरी गळ्यात बांधली म्हणजे आपण कृतकृत्य झालो असे समजतो. वधूपक्षाचा हा न्यूनगंड आणि वरपक्षाचा अहंगंड शेकडो वर्षांपासून– नव्हे हजारो वर्षांपासून आमच्या समाजात अबाधितपणाने नांदत आहे. विवाह हा म्हणे एक संस्कार आहे. ती म्हणे एक परमपवित्र अशी धर्ममंगल घटना आहे. वधूवरांच्या गाठी म्हणे प्रत्यक्ष परमेश्वर स्वर्गात बसून बांधत असतो. या किडलेल्या लग्नसंस्थेचे कशासाठी देव्हारे माजवायचे हेच कळत नाही. लग्न म्हणजे वरपक्षाला हुंडा वसूल करण्याची मिळालेली एक संधी असते. वधूचा बाप भिकेला लागला तरी चालेल, पण मुलीला जन्म देण्याच्या घोर अपराधाची कठोर शिक्षा म्हणून त्याने हजारो रुपयांचा हुंडा मोजला पाहिजे. किंवा फ्लॅट, गाडी, फर्निचर, फ्रीज, टी. व्ही. असल्या क्षुल्लक गोष्टी तरी नवरदेवाला आंदण दिल्या पाहिजेत. हा वरपक्षाचा अधिकार निसर्गदत्त आहे. आता

या युक्तिवादाला कोणत्या शब्दांनी उत्तर द्यायचे ?

एम्.ए. झालेल्या वधूच्या डोळ्यांतून अश्रू वाहात होते. खरे तर तिच्या डोळ्यांतून ठिणग्या बाहेर पडायला हव्या होत्या. इंजिनियर नवरदेवाचा कान पिरगाळून तिने रणरागिणीच्या आवेशात त्याला सुनवायला हवे होते, 'श्रीमंतीची आणि अधिकाराची मिजास असलेल्या तुझ्यासारख्या माणुसकीशून्य पशूशी लग्न करण्याइतकी आणि तुझ्या मागणीसमोर मान तुकवण्याइतकी मी लेचीपेची नाही. माझ्यापेक्षा कमी शिकलेल्या, साध्या मॅट्रिक्युलेट मुलाशी लग्न करण्यात मला मुळीच कमीपणा वाटणार नाही. तुझा रंगीत टी. व्ही. जिथून मिळेल तिथे खुशाल जा. माझ्या हातात बांगड्या असल्या तरी मी मेलेल्या आईचे दूध प्याले नाही. चालता हो! तुला सुशिक्षित म्हणायलाही मला लाज वाटते. लग्न म्हणजे काही सर्वस्व नाही. माझ्या पायावर उभी राहून मी माझा संसार थाटू शकते. पैशाबरोबर लग्न लावणाऱ्या तुमच्यासारख्या शेळपट नादान नवऱ्यांचा मी धिक्कार करते.' तिने असे ठणकावून सांगायला हवे होते. पण शिक्षण घेऊनही ती अगतिकच राहिली. डबल ग्रॅज्युएट होऊनसुद्धा तिच्यात स्वाभिमानाची चमक दिसू नये ही खेदाची घटना होती. पण काय करणार? हीच आमच्या भारतीय स्त्रीची शोकांतिका आहे. तिची चाकोरी ठरलेली आहे. ज्याच्या गळ्यात माळ घालायची त्याच्या घराच्या चौकटीत, त्याच्या अर्ध्या वचनात, त्याची सेवाचाकरी करीत, त्याच्या नसलेल्या गुणांचे गोडवे गात, त्याच्या पायावर हात ठेवीत 'कशी या त्यजू पदाला' असे म्हणून 'जन्मोजन्मी हाच पती मिळू दे' अशी प्रार्थना करीत स्त्रीने आपल्या जीवनाचे कल्याण करावे ही आमची पुरातन रीतच आहे. कोणी काही म्हटले तरी अजूनही स्त्री हा घराचा केवळ अलंकार आहे. घराला शोभा यावी आणि आपली करमणूक व्हावी यापलीकडे तिला स्वतंत्र अस्तित्व आहे काय हा गैरसोयीचा प्रश्न कोणी विचारू नये. ती सुशिक्षित वधू आपले ओले डोळे पुशीत उभी होती. तिच्या मनात काय पेटले असेल याची माझ्या पेटत्या मनाला जाणीव झाली.

खरे तर लग्न हा एक सुखसोहळा असतो. सुंदर आयुष्याची ती नांदी असते. जीवनाच्या सुंदर काव्याची ती रसमय सुरुवात असते. वैवाहिक जीवन म्हणजे मनाला आलेला मधुर भावनांचा मोहोर असतो. स्वातंत्र्याच्या निळाईत जिवाच्या पाखराने घेतलेली ती एक भरारी असते. पुढे रंगत जाणाऱ्या मैफलीतला तो आरंभीचा आलाप असतो. दोन रोमँटिक मनांना परस्परांच्या प्रेमाचे पडलेले ते एक काव्यपूर्ण बंधन असते. पण लग्नाला उभे राहण्यापूर्वीच पैशाला लालचावलेल्या, टी. व्ही.ला हपापलेल्या, फुकट मिळेल ते गिळंकृत करण्याच्या सवयीला चटावलेल्या, प्रत्यक्ष सासऱ्याकडून लाच खाणाऱ्या या पतिदेवाने तिच्या सगळ्या रम्य कल्पनांचा चोळामोळा करून टाकला होता.

त्या लग्नसमारंभाला उपस्थित राहिल्याची मला फार खंत वाटली. वधूपित्याच्या सुखाची खरे तर ती प्रेतयात्राच नव्हती काय? लग्नातल्या त्या होमात आपण आपल्या

हातांनी मुलीच्या जिवंत मनाचा आणि तिच्या सुखाचा बळी देत आहोत, असेच त्याला वाटले असेल. मी त्याला भेटलो. तेव्हा हताश झालेला तो दुर्दैवी वधूपिता म्हणाला,

"मला ओळीने चार मुली झाल्या. सुदैवाने माझ्या मुली सुंदर आणि हुशार आहेत. या पोरींना उत्तमातले उत्तम शिक्षण देऊन मी सुसंस्कृत केले आहे. सुशिक्षित, सुंदर आणि सुस्वभावी मुलगी मिळणे ही खरोखरच परमभाग्याची गोष्ट असते. पण सध्याचे तरुण आणि त्यांचे लग्नाच्या बाजारात उभे राहिलेले धूर्त बाप आपल्या मालाचा किफायतशीर भाव ठरवून मोकळे होतात. मुलगा म्हणजे यांचे भांडवल असते. त्या भांडवलावर हे धूर्त सटोडिये व्यापार करतात. जावई आम्हाला पैसे मोजून बाजारातून विकत आणावा लागतो. डॉक्टर पाहिजे असेल तर पन्नास-पाऊणशे हजारापर्यंत भाव चढतो. इंजिनियरला चाळीस हजारात भाव सुटतो. असे सगळे भावफलक बाजारात राजरोस लावून ठेवले आहेत. 'कॅश अँड कॅरी' अशी ही रोखठोक योजना आहे. दोन मुलींची लग्ने कशीतरी पार पाडली. कर्जाचा डोंगर शिरावर आहेच. आता या तिसऱ्या मुलीसाठी माझ्या मालकीचे लहानसे घर गहाण टाकले आहे. पण या इंजिनियरसाहेबांनी चरकातल्या उसाप्रमाणे पिळून पिळून माझे चिपाड करून टाकले आहे. अशावेळी मनात चमत्कारिक विचार येतो. मुलीचा जन्म झाल्याबरोबर तिच्या नरडीला नख लावून मोकळे झालेले काय वाईट ?"

त्याच्या स्वरात तीव्रता होती. एक अत्यंत कटुतेची भावना तो विलक्षण विषण्णतेने बोलून दाखवीत होता. दोन मुलींची लग्ने करून दरिद्री बनलेला हा दुर्दैवी बाप मूर्तिमंत कारुण्याचा विषय होता. त्याचा अपराध कोणता होता ? त्याचे दुःख हलके करावे म्हणून मी त्याला धीर देण्याचा प्रयत्न केला.

'असे निराश होऊ नका. आता या जुन्या राक्षसी रूढी नाहीशा होत चालल्या आहेत. शिक्षणाने माणसांची मने बदलत आहेत. स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन हळूहळू प्रगत होत आहे.' मी असे म्हणालो तरी केवळ त्याची समजूत काढण्यासाठी, त्याला धीर देण्यासाठी मी हे बोलत होतो. आजही स्त्री हा केवळ उपभोगाचा पदार्थ मानला जातो. आम्ही स्वतःला प्राध्यापक म्हणवणारे लोक स्त्रीमुक्तीबद्दल सभापांडित्य करतो. पण प्रत्यक्षात स्त्री-स्वातंत्र्याच्या चळवळीला किती लोक हातभार लावतात ? स्त्री हा दयेचा किंवा उपहासाचा अथवा करमणुकीचा विषय आहे असे ज्या समाजात मानले जाते तो समाज अधःपाताच्या अखेरच्या पायरीवर उभा आहे असे मी समजतो.

तो वधूपिता कडवट हसला आणि म्हणाला,

'आमच्या सगळ्या सुधारणा पुस्तकांत आणि व्याख्यानांत होतात. शेकडो वर्षे झाली तरी हा रेड्यासारखा मठ्ठ असलेला समाज बदललेला नाही. आधुनिक शास्त्रीय युगात वावरणारे लोक विमानातून प्रवास करीत असले तरी मनाने ते बैलगाडीच्या युगातच रेंगाळत आहेत. बदल फक्त बाह्यसृष्टीत घडला. तुपाचे आणि तेलाचे दिवे

गेले. आता ट्यूबलाईट आली. पण कालही डोक्यात प्रकाश नव्हता, आजही अंधार तसाच आहे. तुम्ही जिला सुधारणा म्हणता ती केवळ कपड्यांत झाली. टेरिलिन कपड्यांच्या आतला माणूस सायन्सला अजून काही बदलता आला नाही. माकडाने अंगावर सूट घातला म्हणून त्याचे माकडपण काही जात नाही. कोणे एके काळी मुलीचा जन्म झाला की तिला ताबडतोब पुरून टाकणारी एक रानटी जमात होती. आज तिच्याकडून हुंडा वसूल करायचा, लग्न झाल्यानंतरही तिला रात्रंदिवस छळत राहायचे आणि पैसा, दागिने मिळत नाहीत असे पाहिल्यावर तिच्या अंगावर रॉकेल ओतून तिला शांतपणे पेटवून द्यायचे अशी सुधारलेल्या सुशिक्षित समाजाची प्रगत संस्कृती आहे.' तो जे बोलत होता त्याचे खंडन करणे मला शक्य नव्हते. एकंदर समाजजीवनावर त्याने केलेले मर्मभेदी प्रहार अचूक होते. पण एक कोडगी वृत्ती समाजाच्या रक्तातच रुजून बसली आहे त्याला कोण काय करणार? अखेर वधूपित्याने शरणागती स्वीकारली. नवरदेवाचा सत्याग्रह यशस्वी झाला. आपल्या मुलीला पदरात घ्या, ·अशी टी.व्ही. देण्याच्या कबुलीसकट पुन्हा पुन्हा विनवणी केल्यानंतर इंजिनियरसाहेबांचे परमदयाळू अंत:करण द्रवले. ते काहीशा प्रेमळ स्वरात आपल्या सासऱ्याला म्हणाले, 'अहो, तुमचा आशीर्वाद असल्यानंतर काय होणार नाही? तुम्ही वडीलधारी माणसे आहात. आम्ही मुलांनी तुमच्याजवळ लाडिक हट्ट करायचा नाही तर कोणाजवळ करायचा? तुमच्यासारख्या ज्येष्ठांच्या आशीर्वादाने आमचा संसार सुखाचा होईल.'

आता 'मंगल' वाद्ये वाजू लागली. एक 'पवित्र' लग्नकार्य परमेश्वरी कृपेने - नव्हे वरपक्षाच्या मेहेरबानीने सानंद पार पडले. त्यानंतर पक्वान्नांचे भोजन झाले. भोजनभाऊंनी या कार्यक्रमाला चोख न्याय दिला. पंक्तीत अत्यंत प्रेमाने लाडू, जिलेबीचा आग्रह होत होता. तृप्तीच्या ढेकरा देताना मंडळी आपल्या भरलेल्या पोटावरून समाधानाचा हात फिरवीत होती. वधूच्या डोळ्यांत अश्रू नव्हते. पण एक प्रकारचा भकास केविलवाणेपणा मात्र तेथे तरंगत होता. अपमानित झालेल्या आणि सारी सुंदर स्वप्ने लग्नमंडपातच हरवून बसलेल्या त्या सुशिक्षित, सुंदर वधूच्या डोळ्यांसमोर भावी संसाराचे भेसूर चित्र उभे होते. आता तिच्या संसाराला खरे तर सुरुवात झालेली होती. लग्नापूर्वी ती सौभाग्यकांक्षिणी होती आता सौभाग्यवती झाली होती. इंजिनियरसाहेबांचा सुसंस्कृत हात हातात धरून ती सात पावले चालली होती. त्या सज्जन माणसाच्या नावाने तिने गळ्यात मंगळसूत्र बांधले होते. मुलीला संसाराचे परमिट मिळवून देताना त्या गरीब बापाला साठ-सत्तर हजार रुपयांची उधळण कर्ज काढून करावी लागली. सध्या कोणतेही परमिट पैसे मोजल्याशिवाय मिळत नाही. साधे सिनेमाचे तिकीटसुद्धा काळ्या बाजारातच घ्यावे लागते. मग संसाराची रंगीबेरंगी फिल्म पाहायची असेल आणि सुगृहिणी होण्याचे परमिट मिळवायचे असेल तर साठ-सत्तर हजार रुपये काय फार झाले?

चला, आनंद वाटला. एक गोड कार्य करून मंडळी तृप्त मनाने आपापल्या घरी परतली. त्यातले काही चतुर वरपिते आपल्या मुलाच्या लग्नात काय काय मागून घ्यायचे, कशा पद्धतीने लग्नाचा सौदा पटवायचा याचे धूर्त बेत मनाशी रचत होते. परमेश्वर त्यांचे कल्याण करो! माझ्या डोळ्यांसमोर तो खचलेला वधूपिता आणि ती पिचलेली नवरीमुलगी दिसत होती. माथ्यावरचे आभाळच फाटले आहे, हातातल्या सुईदोऱ्याने ते कसे शिवता येईल?

□□□

# १०. खेळ मांडियेला...

एकदा एक तरुण विवाहित स्त्री माझ्याकडे आली आणि म्हणाली, "तुम्ही मला एका बाबतीत मदत केली पाहिजे." मी काहीसा गोंधळून गेलो. या तरुणीची आणि माझी ओळख नव्हती. तिचे नाव देखील मला माहीत नव्हते. तिची वेषभूषा आधुनिक पद्धतीची व नीटनेटकी होती. दिसण्यातही ती बरी, चारचौघीत उठून दिसण्यासारखी होती. यापेक्षा तिचे अधिक वर्णन मला करायचे नाही. वाचकांनी मला क्षमा करावी. खरे तर स्त्रीसौंदर्याच्या वर्णनाची येथे अनायासे संधी आली आहे. पण हा माझ्या लेखनाचा प्रमुख विषय नसल्यामुळे हे विषयांतर करण्यात अर्थ नाही. एखाद्या कादंबरीची नायिका होऊ शकेल इतकी ती तरुणी आकर्षक होती. इतके सांगितले म्हणजे जिज्ञासू वाचकांचे थोडेफार समाधान होईल असे मला वाटते. मी विचारले,

"मी आपल्याला कोणत्या बाबतीत मदत करू शकतो? पीएच.डी. साठी एखादा प्रबंध लिहायचा असेल तर त्या संदर्भात..."

माझे वाक्य पूर्ण होण्याच्या आतच ती म्हणाली,

"कोणताही प्रबंध लिहिण्याचा माझा विचार नाही. मी एका अगदी घरगुती खाजगी गोष्टीत आपलं सहकार्य मिळावं म्हणून आले आहे. परवा महिला मंडळात स्त्री-स्वातंत्र्याबद्दलचे तुमचे विचार ऐकले. तेव्हापासूनच तुम्हीच मला आपुलकीने मदत करू शकाल असे वाटले म्हणून मी आले आहे. अधिक प्रस्तावना न करता माझे काम सांगून टाकते. "माझे लग्न होऊन दोन वर्षे झाली. पतीसंबंधीच्या माझ्या अनेक अपेक्षा या दोन वर्षांत पार धुळीला मिळाल्या." "नवरा म्हणू नये आपला" ही म्हण मला विनोदी वाटायची, पण आता मात्र या म्हणीतून एक कडवट सत्य सांगितले आहे, याबद्दल मला तरी शंका नाही. मला घटस्फोट हवा आहे. तो मिळवून देण्याच्या बाबतीत तुम्ही मला मदत करावी, हीच विनंती करण्यासाठी मी आली आहे." तिच्या मुद्रेवर निर्धार होता. मोजक्या शब्दांतून तिने आपला दृढ निश्चय बोलून दाखवला.

मी मात्र अधिकच गोंधळलो. महिला मंडळात दिलेल्या व्याख्यानाबद्दल आता मला पश्चात्ताप वाटू लागला. माझ्या व्याख्यानाचा असा काही परिणाम होईल याची मला कल्पना नव्हती. त्या भाषणात मी इतकेच म्हणालो होतो की,

"स्त्रिया अन्याय सहन करतात आणि त्यामुळेच त्यांच्यावर अन्याय होत राहतो. गुलामगिरी ... मग ती कोणाचीही असो, ती झुगारून देण्यासाठी जोपर्यंत स्त्री ठामपणे उभी राहात नाही तोपर्यंत ती गुलामगिरीतच पिचत पडणार. कोणताही अन्याय सोसत राहण्याची लाचार सवय आपल्या रक्ताला लागली की त्या अन्यायाला परंपरेची प्रतिष्ठा लाभते आणि मग प्रतिष्ठित झालेली ही परंपरा स्त्रीच्या मनाला आणि साऱ्या आयुष्याला करकचून बांधून टाकते. म्हणून गुलामगिरीचे पाश तोडून टाकण्याची आवश्यकता आहे."

माझ्या व्याख्यानाचे हे सार होते. स्त्रीच्या स्वातंत्र्याचा त्या भाषणातून मी नि:संशय पुरस्कार केला होता. आणि आता एक स्त्री चक्क घटस्फोटाच्या बाबतीत मदत मिळावी म्हणून मला विचारणा करीत होती. मी प्रश्नार्थक दृष्टीने तिच्याकडे पाहिले. ती म्हणाली,

"गेल्या दोन वर्षांत मी नवरेशाही खपवून घेतली. पण आता सहन करणार नाही. मला माझे स्वातंत्र्य मिळवलेच पाहिजे. मी न्यायालयात दाद मागणार आहे. तुम्ही मला एखादा चांगला वकील मिळवून द्या."

मी तिला विचारले, "पण तुमच्यावर नेमका कोणता अन्याय होत आहे? घटस्फोट हा अंतिम उपाय आहे. एकदम या टोकाला जाण्यापूर्वी शांत मनाने साधकबाधक विचार करून पाहिला पाहिजे. या निर्णयाला येण्याइतका कोणता घोर अन्याय तुमच्यावर झाला आहे तो मला सांगू शकाल का?"

ती आपली हकीकत सांगू लागली. तिचे म्हणणे असे होते की, "नवरा घरातले कोणतेच काम करीत नाही. तो आळशी आहे. साधे भाजी आणण्याचे कामसुद्धा टाळतो. दोनचार टोळभैरव मित्र जमवून चहा-चिवडा आणि गप्पा यातच वेळ घालवतो. सिगरेटी फुंकतो. माझ्याबरोबर कधी फिरायला येत नाही. गेली दोन वर्षं हा प्रकार चालला आहे. असल्या आळशी, खुशालचेंडू नवऱ्याच्या संसारात मी निमूटपणाने राहावे याला काय अर्थ आहे? अशाच काही तक्रारी तिने अभिनिवेशाने मांडल्या, एका आळशी बेजबाबदार नवऱ्यामुळे तिची मानसिक कुचंबणा होत असावी यात संशय नव्हता. घर म्हणजे लॉजिंग-बोर्डिंग हाऊस समजून राहणारे नवरे बायकांना तापदायक होणारच. पण तिने सांगितलेली ही कारणे घटस्फोट घेण्यासाठी मला पुरेशी वाटेनात. नवरा नावाचा प्राणी पुष्कळसा बेजबाबदार आणि उनाड स्वभावाचा असतो. बायकोच्या सहनशीलतेमुळे त्याची उनाड प्रवृत्ती पोसली जाते. दोन वेळा जेवणासाठीच घराकडे येणारे व पत्नीची आठवण ठेवणारे हे महापुरुष कोणत्याही स्त्रीला रुचणार नाहीत, हे खरेच आहे. अशा नवऱ्यांना हळूहळू लगाम घालावा लागतो. हे कौशल्य पत्नीत असायला हवे. घोडा कितीही नाठाळ असला तरी अशा नाठाळ आणि चुकार

घोड्याला चुचकारून व फटकारून काबूत आणावे लागते. एकदा एक विदुषी वाद करताना मला म्हणाली होती,

"पुरुषांची वृत्ती पिसाळलेल्या जंगली जनावरासारखी असते. त्याला युक्तीप्रयुक्तीने शिस्तीच्या पिंजऱ्यात कोंडून ठेवता आले पाहिजे." त्या स्त्रीला मी मिस्कीलपणाने म्हणालो होतो,

"तुमच्या धाकात राहण्यापेक्षा तो नवरा नावाचा गरीब प्राणी कुठेतरी रानोमाळ भटकणं अधिक पसंत करील". त्यावर ती विदुषी आवेशाने आक्रमक स्वरात म्हणाली,

"पुरुषांसारखा स्वार्थी, अप्पलपोट्या, ऐतखाऊ, बेजबाबदार आणि उडाणटप्पू प्राणी या पृथ्वीतलावर दुसरा नसेल." मी हसत हसत म्हणालो, "बाईसाहेब, किती प्राणी आपण पाहिले आहेत? पुरुष तेवढा नादान आणि आळशी व स्त्रिया तितक्या उद्योगी, सुस्वभावी हे गणित मांडताना थोडा तरी विचार करा. पण जाऊ द्या, हा वाद सनातन आहे. तो कधी संपायचा नाही. जे वाद कधी संपू नयेत असे वाटते त्यातला हा एक आहे. वाद आहेत म्हणूनच आयुष्यात रस आहे. संघर्षाशिवाय जीवन मिळमिळीत वाटेल. स्त्री-पुरुषांनी भांडण्यासाठी का होईना, पण एकत्र यावे असे मला वाटते." माझा हा विचार त्या विदुषीला कितपत पटला कुणास ठाऊक! घटस्फोटाच्या बाबतीत माझा सल्ला मागायला आलेल्या तरुणीला मात्र मी विरोध केला. कदाचित मी तिला जुनाट बुरसटलेल्या विचारांचा एक प्रतिगामी माणूस आहे असेही वाटले असेल. पण हा धोका पत्करूनसुद्धा मी तिच्या विचाराला विरोध केला. निष्प्रेम संसारात अन्याय सहन करीत राहण्यात कसलेच स्वारस्य नाही हे मी मान्य करतो. पण अन्याय करणाऱ्या नवऱ्याच्या प्रवृत्तीत बदल घडवून आणण्याची युक्ती पत्नीला अवगत असली पाहिजे. स्त्रिया स्वभावत:च संयमी, मधुरभाषिणी असतात. आपल्या मृदू शब्दांनी आणि आर्जवी वर्तनाने घरात निर्माण झालेले तणाव कमी करू शकतात. पुरुषाच्या मनावर स्त्रीच्या या स्वभावाचा निश्चितच परिणाम होतो. याबद्दल पुरावे देण्याची जरूर नाही. ललितसाहित्याचा रसिक मनावर अधिक प्रभाव पडतो याची कारणमीमांसा करताना मम्मट नावाच्या एका समीक्षकाने "कान्तासम्मित उपदेश" असा शब्दप्रयोग केला आहे. कान्ता किंवा पत्नी ज्या ललितसुंदर पद्धतीने उपदेश करते तशीच स्थिती साहित्याची असते, असे त्याचे म्हणणे आहे. हा प्रभाव दीर्घकाळ मनावर राहतो. ज्या संसारात पतिपत्नींचे तीव्र स्वरूपाचे मतभेद होतात आणि अखेर दोघेही घटस्फोटाच्या सीमेवर येतात तेथे हा "कान्तासम्मित उपदेश" निरुपयोगी तरी ठरलेला असतो किंवा त्याचा उपयोग तरी केलेला नसतो. माझे हे मत कदाचित वादग्रस्तही असेल. कुणीतरी मला विचारील,

"साहित्य आणि संसार यांची तुलना कशाला करता? संसारात तरी अनेक वेळा तुमचा हा "कान्तासम्मित" म्हणवणारा उपदेश अगदी निष्फळ ठरला आहे. 'एकच प्याला' तल्या सुधाकराची सिंधू सुंदर होती. पतिनिष्ठ आणि सद्‌गुणी होती.

अशा स्त्रीचा उपदेश तरी सुधाकराच्या मनाला रुचला काय? या निष्ठावंत स्त्रीचा तो तुमचा विद्वान सुधारक राक्षसी छळ करीत राहिला. त्याच्या मनात कसलेही परिवर्तन होऊ शकले नाही. सुधाकराचा नाश दारूने केला आणि सिंधूचा शेवट तिच्या पतिनिष्ठेमुळे झाला. खरे तर निष्ठा हा शब्द योग्य वाटत नाही. याला गुलामगिरी का म्हणू नये?' या प्रश्नाला तर्कशुद्ध उत्तर नाही हे मला माहीत आहे. पण एक गोष्ट मात्र निर्विवादपणे मान्य केली पाहिजे ती ही की सिंधूचे सुधाकरावर आत्यंतिक प्रेम होते. प्रेमापोटीच तिने सारे काही सहन केले. दारूबाज नवऱ्यापासून कायद्याच्या मदतीने ती सहज घटस्फोट घेऊ शकली असती आणि दुसरा एखादा संसार उभा करू शकली असती. तसे तिने केले असते तर त्यात तिचे काही चुकले असते असे मला वाटत नाही. पण प्रेमाच्या आणि निष्ठेच्या चिवट धाग्याने ती सुधाकराशी जोडली गेली होती. हा धागा तोडला असता तर दुसऱ्या संसारात ती सुखी झालीच असती असे म्हणता येणार नाही. संसार निष्ठेच्या बळावर उभा राहतो. स्वातंत्र्याच्या आणि अधिकाराच्या अतिरेकी कल्पनांचे वारे प्यालेल्या स्त्रीपुरुषांना संसाराची नीट उभारणी करता येत नाही. एखाद्या लॉजिंग हाऊसच्या खोलीत राहिलेल्या दोन अनोळखी उतारूंप्रमाणे ते राहतात आणि संसाराला केवळ कर्तव्य समजून तो कसाबसा पार पाडतात. सिंधू आणि सुधाकर ही अपवादात्मक उदाहरणे घेऊन सांसारिक चर्चा करता येणार नाही. पण त्याबरोबरच आजच्या आधुनिक जगात आधुनिक विचारवंतांनी सिंधू म्हणजे जुनाट परंपरेचे आणि पातिव्रत्याचे एक निरुपयोगी प्रतीक आहे असे समजण्याचा अविचार करू नये. गडकऱ्यांसारखा प्रतिभावंत नाटककार सिंधूच्या रूपाने स्त्रीमनातील एका उज्ज्वल आणि उदात्त प्रेमभावनेचे मंगल दर्शन घडवीत असतो. बिघडत चाललेल्या संसारावर घटस्फोट हा एकमेव उपाय आहे असे मानणारे लोक मला तरी उथळ वाटतात. याचा अर्थ स्त्रीने नको असलेल्या संसारात किंवा तिला सर्वार्थांनी जखडून टाकणाऱ्या निष्प्रेम प्रपंचात निमूटपणाने दासी-बटकीप्रमाणे जगत राहावे असा नाही. मनासारखा डाव पडला नाही म्हणून तो ताबडतोब उधळून टाकण्यातही शहाणपणा असतो असेही समजण्याचे कारण नाही.

माझे विचार ऐकल्यावर ती तरुणी चिडली. तिच्या बोलण्यात आता काहीसा फटकळपणा आला. ती म्हणाली,

"तुम्ही आधुनिक मताचे आहात असा समज झाल्यामुळे मी तुमचा सल्ला विचारायला आले. पण तुम्ही तर मला जुनाट साचेबंद स्वरूपाचा उपदेश करीत आहात. एका आळशी नवऱ्याचा संसार मी कसलीही तक्रार न करता करीत राहावे असे तुम्हाला वाटते काय? खुशाल घटस्फोट घेऊन मी दुसरा पार्टनर निवडावा हाच विचार मला अधिक रुचतो. उनाड नवऱ्यांना बायकांनी बेदरकारपणे घटस्फोट द्यावेत त्याशिवाय त्यांचे डोळे उघडणार नाहीत. संसार चालवण्याची जबाबदारी काय एकटच्या स्त्रीवर असते? तिने मात्र पावलोपावली नमते घ्यावे आणि त्याने अरेरावीपणा करावा याला

संसार म्हणण्याचा मूर्खपणा मी तरी करणार नाही. ''

त्या संतापलेल्या तरुणीचा युक्तिवाद बरोबर होता. पण सारे प्रश्न केवळ युक्तिवादाच्या बळावर सोडवता येत नाहीत. पुरुषापेक्षा स्त्रीलाच प्रपंचात कष्ट अधिक पडतात हे दुर्दैवाने खरे आहे. तिच्या सहिष्णुतेमुळेच प्रपंचाची नाव समाधानाच्या किनाऱ्याला लागू शकते. तिनेच सहनशीलता सोडली तर पाहता पाहता मांडलेली घरे उद्‌ध्वस्त होतील. याचा अर्थ तिने फक्त दु:ख सहन करीत जबाबदाऱ्या पेलायच्या असा मात्र नाही. त्या तरुणीला मी प्रश्न टाकला, ''दुसरा पार्टनर शोधावा हा विचार तुम्हाला इतका साधा आणि सोपा वाटतो काय? दुकानातून एखादी वस्तू आणावी आणि ती काहीशी बिघडलेली आहे असे पाहिल्यावर ती परत करून तिच्या बदली दुसरी वस्तू आणावी इतके हे काम सरळ आहे काय? दुकानात सुद्धा समोरच फलक लावलेला असतो, ''एकदा विकलेली वस्तू परत घेतली जाणार नाही.'' दहा-वीस रुपयांच्या निर्जीव वस्तूंच्या बाबतीत सुद्धा ही अडचण निर्माण होते, मग लग्नाच्या बाजारात मिळवलेला जिवंत नवरा किंवा बायको बदलताना केवढ्या अडचणी येत असतील, याचा विचार करा. संसार हा खेळ आहे हे खरे! पण तो खेळताना त्याचा खेळखंडोबा होऊ नये याची दक्षता घ्यावीच लागेल. काही खेळ गमतीने खेळायचे असतात, पण या खेळातली गंमत त्यातल्या गांभीर्यात आहे हे समजले पाहिजे. दोन वर्षांत आळशी नवऱ्याचा स्वभाव तुम्ही बदलू शकला नाही याची काही अंशी जबाबदारी तुमच्यावरही येऊन पडते. माणसाच्या वृत्ती-प्रवृत्तीत प्रयत्न केला तर अवश्य बदल होतात. संसार म्हणजे फक्त उपभोग नाही. भोग आणि त्याग, सुख व दु:ख, यांच्या संगमातून रंगणारा खेळ म्हणजे संसार. वर्षानुवर्ष अंथरुणावर अपंग अवस्थेत पडलेल्या बायकोची सेवा करणारा पुरुष मी पाहिला आहे. तिच्या मुद्रेवर हास्य दिसावे, समाधानाचे चांदणे फुलावे म्हणून तो धडपडत होता. तिला टाकून तो कुठेतरी उनाडत राहिला असता तर... ?''

ती तरुणी काहीशा रागातच निघून गेली. पण तिचा पूर्वीचा आवेग आता ओसरला होता. तिच्या मनात आता थोडाफार बदल होत होता. घटस्फोट देण्याचा तिचा अतिरेकी विचार आता क्षीण झाला होता. काय असेल ते असो, स्त्रीच्या ठिकाणी ही तडजोडीची प्रवृत्ती आहे म्हणूनच संसारातली लहानमोठी वादळे लवकर शांत होतात. पुरुष मात्र अधिक वादळी, आक्रमक स्वभावाचा आहे. कित्येक वेळा तो चौखूर उधळतो, पण त्याला प्रेमाने वेसण घालण्याची अवघड कला स्त्रीजवळ असल्यामुळे कुटुंबजीवनाला स्थैर्य आले आहे यात शंका नाही. तुकारामांची पत्नी कर्कशा होती असे म्हणतात. कसलाही व्यापार, उद्योग न करणाऱ्या या संताचे आणि त्याच्या मुलाबाळांचे भरणपोषण करण्याची जबाबदारी तिच्या अंगावर येऊन पडलेली. भजन-कीर्तन संपले की बुवा पाटावर येऊन बसायचे. उधार-उसनवार करून त्यांच्या ताटात घासभर अन्न टाकताना तिची त्रेधातिरपीट उडत असेल. हे करताना तिच्या

तोंडून चार शिव्या बाहेर पडल्या, थोडी आदळआपट झाली तर ते स्वाभाविकच होते. "ब्रह्मानंदी टाळी" लागलेल्या संताचे रक्षण परमेश्वराने कितपत केले, कुणास ठाऊक ? ते त्याच्या पत्नीने केले. ही पराकोटीची माया आणि सहनशीलता जिजाईच्या ठिकाणी होती. म्हणूनच तुकारामांची अभंगवाणी बहराला आली. त्याच्या दरिद्री संसारातही त्यांना "आनंदाचे डोही, आनंद तरंग" ही विलक्षण अनुभूती आली. जग तिला विसरून गेले. किंवा खरे तर तिच्या कर्कशपणाची नको तितकी जाहिरात करण्यासाठी तिचे नाव घेत राहिले. तुकारामांच्या व्यक्तित्वाची वाढ त्यांच्या प्रेमळ, क्षमाशील, संसारदक्ष, वत्सल, पतिनिष्ठ, तडजोडवादी, संयमी, प्रांजळ अशा पत्नीमुळेच झाली, हे एक वादातीत सत्य आहे. मांडलेला खेळ उद्ध्वस्त करायला वेळ लागत नाही, पण खिलाडू वृत्तीने तो खेळत राहण्याची रसिकता आणि सोशिकता असावी लागते.

काही दिवसांनी नाटकगृहात एक नाटक पाहण्यासाठी मी गेलो. "खेळ मांडियेला" हे त्या नाटकाचे नाव असावे. पहिला अंक संपला. तेव्हा ती घटस्फोटासाठी उत्सुक असलेली तरुणी माझ्याकडे आली आणि तिने एका तरुणाबरोबर माझी ओळख करून दिली. तो तिचा पती होता. रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचा, हसऱ्या चेहऱ्याचा हा तरुण आळशी आणि उनाड असेल असे मला मुळीच वाटले नाही. मी मिस्कीलपणाने विचारले, "कसे काय, ठीक आहे ना ?" त्यावर ती दोघेही खळखळून हसली. तो म्हणाला,

"कधी वीज कडकडते, कधी मुसळधार पाऊस पडतो. पण दुसऱ्याच दिवशी आकाश स्वच्छ होते. पिवळेधमक ऊन पडते, कधी धुके, कधी ऊन असा खेळ चालला आहे." मी म्हणालो, "खेळ असाच असावा, अगदीच संथ गतीने शांतपणाने चाललेल्या धीम्या खेळात कसलेच आकर्षण राहात नाही. खेळात मधून मधून असा रंग भरला पाहिजे की खेळाडू आणि प्रेक्षक दोघेही दंग व्हावेत. ती तरुणीही आता हसण्यात सामील झाली आणि म्हणाली, "ज्यांना नीट खेळता येत नाही ते मैदान सोडून पळून जातात. खेळाची सूत्रे आमच्या हातात आहेत. हा खेळ आम्हाला असाच चालू ठेवायचा आहे."

□□□

# ११. संवाद तुकोबाशी

प्रिय आणि पूज्य तुकोबा, आज मी तुझ्याशी थोडा संवाद करणार आहे. मानवतावादाची पताका खांद्यावर घेऊन अखंड वाटचाल करणाऱ्या तुझ्यासारख्या निष्ठावंत वारकऱ्याला खरं तर कोणतंही गौरवशाली विशेषण देण्याचं कारण नाही. प्रिय आणि पूज्य म्हणण्याचंही कारण नाही. केवळ 'तुकोबा' म्हटलं की लक्षावधी मराठी माणसांच्या अंत:करणाची तार झंकारित होते. तुझ्याशी बोलायचं म्हणतो, पण मी काय बोलणार? वासना - विकारांच्या ओघाबरोबर वाहवत चाललेली आमच्यासारखी अतिसामान्य माणसं 'आकाशाएवढ्या' तुकोबाबरोबर काय संभाषण करणार ? पण आम्हा सामान्य माणसांचाच तुझ्यावर विशेष अधिकार आहे. तुझं बोट धरून आम्ही आमची वाट चालू इच्छितो. तू देखील सर्वसामान्यच होतास. देहू नावाच्या एका सामान्य खेड्यात तू चारचौघांसारखाच प्रपंचाच्या सुखदु:खात्मक गाळात गळ्यापर्यंत फसला होतास. काहीतरी व्यापार-उदीम करून संसाराचा भार खांद्यावर वागवीत होतास. चाचपडत होतास. पावलोपावली अडखळत होतास. दुष्काळाच्या जीवघेण्या लाटेत तुझं घरदार वाहून गेलं. डोळ्यांदेखत बायको आणि मुलगा अन्नान्न करून मरण पावले. तुझा सारा संसार उद्ध्वस्त झाला. पण आपल्या संपूर्ण आयुष्याला तू स्वत:च एक नवीन, समर्थ आकार दिलास. माथ्यावर कोसळलेले आपत्तींचे पहाड आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीनं दूर करू शकलास. चिरफळ्या झालेल्या आपल्या आयुष्याच्या एकतारीतून भक्तीचे प्रेमाचे सुंदर सूर तू निर्माण केलेस. म्हणूनच तुकोबा, लक्ष लक्ष दुबळ्या जीवांना तू आपला आधार वाटतोस.

आम्ही साधारण माणसं दु:खवेदनांनी कोसळून पडतो किंवा मुर्दाड मनानं दु:खाला शरण जातो. तू दु:खाच्या स्पर्शानं उफाळून उठलास. मनाच्या बंद खिडक्या भराभर उघडल्यास. आपलं जीवन आपणच घडवलं पाहिजे, हा आग्रह तुझ्या रक्तात होता. म्हणून तर 'नित्य नवा दीस जागृतीचा' तुझ्या आयुष्यात उगवू लागला. 'रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग' हे जळजळीत जीवनसत्य तू आम्हाला सांगितलंस. पुरुषार्थाची

गाणी गाऊन सामान्य माणसांना नवी वाट दाखवलीस.

तू मला माझ्या शालेय वयातच भेटलास. माझ्या आजोळच्या गावी एका रात्री शेजारच्या मंदिरात आठदहा माणसं भजन करीत होती. भक्तीच्या भावनेने भिजलेले तुझे काही अभंग रात्रीच्या त्या शांत वातावरणाला भेदीत गावभर पसरत होते. त्या अभंगांतली आर्तता माझ्या हृदयाला सर्व बाजूंनी भिडली. साधे, स्वच्छ शब्द आणि त्यातला उदात्त भाव तुझ्याच निर्मळ अंत:करणातून उचंबळून आला आहे, हे मला कळलं. आणि त्या रात्री तुझ्या अभंगांच्या शतधारांत स्नान करून मी पावन झालो. माणसाच्या काळजाला एकाच शब्दात स्पर्श करून त्याला आपल्याकडं ओढून घेण्याची आणि त्याच्या पाठीवरून मायेनं हात फिरवण्याची विलक्षण किमया तुकोबा, तू कोणत्या विद्यापीठात शिकलास? काव्याचं शास्त्र शिकवण्यात जन्म घालवलेल्या विद्यापीठीय विद्वानांना तुझ्यासारखे अस्सल शब्द लिहिता येऊ नयेत हा चमत्कारच नव्हे काय? तुझे शब्द अश्रू पुसणारे आहेत. चांदणं फुलवणारे आहेत. वात्सल्य, क्षमा आणि शांती आणि त्याबरोबर सात्त्विक क्रोध, त्वेष अशा भिन्न भिन्न भावनांचे जातिवंत रंग तुझ्या अभंगांत झळकतात. कितीतरी वेळा तुझे अभंग वाचले आणि ऐकले. तुझे शब्द कधीच शिळे होत नाहीत. तीनशे वर्षांच्या वाटचालीत या शब्दांची अंशमात्रही झीज झाली नाही. मोडतोड झाली नाही. प्रत्येक शब्दाचं नाणं खणखण वाजवून घ्यावं इतकं ते समर्थ आहे. तू म्हणालास तेच खरं,

*'आम्हां घरी धन शब्दाचीच रत्ने।*
*शब्दाचीच शस्त्रे यत्न करू॥*
*शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन।*
*शब्दे वाटू धन जनलोकां॥'*

तुझ्या अभंगांची गाथा वाचून मी इतकंच शिकलो की, ज्याच्या शब्दांना सहानुभूतीचा ओलावा नाही आणि ज्याच्या अंत:करणाला करुणेची बैठक नाही, त्याचे शब्द अलंकृत असले तरी ते प्रेतावर घातलेल्या दागिन्यासारखे निरुपयोगी आहेत. करुणाशून्य पांडित्य काय करायचे? वेदनेनं रडणारं असहाय्य बालक पांडित्याच्या प्रवचनानं शांत होत नाही. आईच्या मायेचाच हात बाळाच्या पाठीवरून फिरला पाहिजे. तुकोबा, तू दु:खितांची माऊली आहेस. पीडितांची साऊली आहेस. तुझ्या शब्दांत आणि दृष्टीत आईच्या दुधाची माधुरी भरलेली आहे. तुकोबा हे नावच मानवतेच्या प्रगाढ सुंदर आविष्कारांशी आता कायमचं निगडित झालं आहे.

नियतीनं तुझ्या पदरात अवघं बेचाळीस वर्षांचं आयुष्य टाकलं. ज्ञानेश्वर एकविशीत गेले. त्यांनी पाया रचला आणि तू त्या मंदिराचा कळस झालास. तुम्हां दोघांच्या जीवनदृष्टीत एकवाक्यता असली तरी तुमची अभिव्यक्ती मात्र वेगळी, वैशिष्ट्यपूर्ण आहे. ज्ञानेश्वर सुंदरतेकडे, कोमलतेकडे, कल्पकतेकडे अधिक आकृष्ट होतात. तू शब्दांच्या ओजस्वितेकडे, जीवनाच्या वास्तविक कठोरतेकडे अधिक

वळतोस. सौंदर्य हे ज्ञानेश्वरांच्या भाषेचं सामर्थ्य आहे, तर सामर्थ्य हे तुझ्या भाषेचं सौंदर्य आहे. 'ग्यानबा-तुकाराम' आमच्या मराठी भाषेतून आणि साहित्यातून वगळले तर मराठी भाषाच उरणार नाही. महाराष्ट्राची संस्कृती तुमच्या सशक्त खांद्यांवर उभी आहे. तुकोबा हे मी भाबडेपणानं बोलत नाही. तुम्हां दोन कवीश्वरांच्या काव्याची मी माझ्या आयुष्यात अनेक पारायणं केली आहेत. माझ्या अभिरुचीवर, वाङ्मयीन पिंडावर तुमचे थोडे तरी संस्कार झाले याचा मला अभिमान वाटतो. तुकोबा, तुझी कविता तर कित्येक वर्षं मला भावनिक सोबत करीत आली आहे. तुझ्या अभंगांच्या प्रत्येक शब्दात तू आहेस. खरं सांगू? भावभक्तीनं, मानव्यावरील प्रगाढ निष्ठेनं, जीवनावरील श्रद्धेनं भारलेला तूच एक 'अभंग' आहेस. तुझ्या काव्यात एक प्रकारचा अतिशय सच्चा असा काहीसा उग्र, कडवट पण परिणामी मधुर वाटणारा गंध आहे. तो तुझ्या आयुष्याचाच सुवास आहे. परमेश्वराचा शोध घेताना ज्या अंधारातून व्यथित मनानं तू प्रवास केलास त्याच्याही खाणाखुणा तुझ्या अभंगवाणीत स्पष्ट दिसतात. तुझी अभंगगाथा हे मराठीतलं एक विलक्षण आत्मचरित्र आहे. अनेक रसांनी ओथंबलेली ही आत्मकहाणी प्रत्येकाच्याच आयुष्याची कहाणी ठरावी इतकी विश्वात्मकता त्यात आहे. मी तर तुझ्या काव्याला 'आनंदाचा डोह' म्हणतो.

*'नव्हे हे कवित्व, टाकसाळी नाणे।*
*समर्पिली वाणी। पांडुरंगे घेते धणी॥'*

आमची मराठी भाषा तू तुझ्या श्रीमंत, गुणवंत शब्दांच्या पालखीत प्रतिष्ठित केलीस. तुझ्या हृदयीच्या समृद्धीनं मराठी साहित्याला सौभाग्याचं सिंहासन मिळालं. तुझ्या एकतारीनं आमच्या भाषेला जी विलक्षण मधुर लय दिली तिच्यामुळं आमच्या मराठी प्रकृतीलाही एक विशिष्ट लय आली. म्हणून म्हणतो, तुकोबा, प्रलयातसुद्धा ही लय आम्ही जीवाच्या मोलानं जतन करू, किंवा ही लयच आमचं जतन करील.

तुझ्याशी संवाद करताना तुझं व्यक्तित्व कितीतरी गुणांनी विकसित झालं आहे हे ध्यानात येतं आणि माझं मन रोमांचित होतं. तू म्हणजे सात्त्विकतेच्या आणि नैतिकतेच्या वेलीवर उमललेलं माणुसकीचं सुंदर फूल आहेस. निःस्वार्थपणा आणि निर्भयवृत्ती यांचं इतकं उत्कट मीलन तुझ्यात झालं आहे की, त्याकडं आम्ही आमच्या स्वार्थी भूमिकेवरून केवळ पाहातच राहावं. तुझ्या घरात दारिद्र्य असेल, पण तुझ्या मनात कुबेराचं ऐश्वर्य होतं. शिवाजीराजानं पाठवलेलं धनधान्य, हत्ती-घोडे, उंची वस्त्रे आणि सारी संपत्ती तू इतक्या सहजपणानं नाकारलीस की त्या नाकारण्यालाही अहंभावाचा लेशही चिकटलेला नव्हता. सत्ता आणि संपत्ती लाथाडणाऱ्या कित्येक व्यक्तींत अहंकाराचा दर्प असतो. आपल्या त्यागाचा डिंडिम ते वाजवीत राहतात. त्यागाचाच भोग घेतात. पण तुझ्यापाशी इतकी अलिप्तता आहे की भोग आणि त्याग दोन्हीलाही तू तटस्थतेनं पाहू शकतोस. आकाशाला लेप लागत नाही तसा तुकोबालाही कसला लेप लावता येत नाही. 'नसावे ओशाळ मग मानिती सकळ' हे तुझं अर्थपूर्ण वचन

आहे. पण तुझ्या बाबतीत बोलायचं झालं तर, कुणी मानावं म्हणून तू अभिमानी बनलास असं मुळीच नाही. शिवाजीराजाला तू पाठवलेला निरोप म्हणजे विचारवंतांनी, साधुसंतांनी, लेखक - कवींनी कसं स्वाभिमानानं जगावं याचा तेजस्वी वस्तुपाठ आहे. आज जिकडं - तिकडं लाचारांचा बाजार भरलेला दिसतो. ज्ञानी समजली जाणारी माणसं सत्ताधीशांच्या पुढ्यात लोचटपणानं शेपट्या हलवीत कशी रांगेत श्वानवृत्तीनं उभी राहतात हे तू पाहिलं असतंस तर तुझ्या शब्दांच्या आसूडानं त्या तथाकथित ज्ञानवंतांच्या पाठी तू सडकून काढल्या असत्यास. सध्या 'सरकारी विद्वान' आहेत तसेच 'सरकारी संतही' आहेत. तू मात्र शिवाजीराजाला लिहिलंस. –

"राजे, आम्ही पांडुरंगाचे आश्रित आहोत. 'पतिव्रतेचे पतीच्या ठायी, तसे आमचे मन विठ्ठलाचे पायी.' तुमच्याकडून काहीतरी मिळवावे ही आशा आमच्या चित्तात अल्पांशानेही नाही. सारे विश्व आम्हाला विठ्ठलरूप आहे. आम्हाला काहीही उणे नाही. पाषाणाच्या आसनावर निद्रा करतो, वर आकाशाचे आवरण आहे. ही वस्त्रे - भूषणे, दिवट्या, छत्री, घोडे याचा आम्हाला काय उपयोग? आम्ही तुला इतकेच सांगतो की, भल्याचा वीट मानू नये. निंदक, दुर्जनांची युक्ती चित्ती आणू नये. अनाथांना साहाय्य करावे, त्यांचे तुम्ही रक्षक व्हावे. सर्वांभूती एक आत्मा पहावा. 'आत्मारामी मन ठेवूनिया राहे' यापेक्षा अधिक काय सांगावे?"

तुझं हे विरक्तीचं वैभव कोणत्याही सम्राटाला लज्जित करू शकेल. सारे राजप्रासाद आणि धनिकांचे महाल वासनाविकारांच्या दुर्गंधीनं भरून गेले आहेत. लक्ष्मीसुद्धा तेथे नीट श्वासोच्छ्वास करू शकत नसेल. उंची अत्तरांचे आणि नानाप्रकारच्या सुगंधी द्रव्यांचे सुवास ही दुर्गंधी दूर करू शकत नाहीत. तुकोबा, तुमच्या चंद्रमौली घरात आणि तुमच्या अंत:करणाच्या देव्हाऱ्यात शुद्ध भावनेचा, आत्मिक समाधानाचा जो चंदनी सुगंध आजही दरवळताना आम्हाला आढळतो त्याची तुलना राजेरजवाड्यांच्या हवेल्यांशी करण्यात काय अर्थ? तूच म्हटलं आहेस, 'नाही निर्मळ जीवन, काय करील साबण?' आज आम्ही सारेच क्षुद्र स्वार्थाचे आणि सत्तेचे पुजारी बनलो आहोत. आत्म्याचा बळी देऊन शरीराला मढवण्यात खरं शहाणपण आहे, या भ्रमात बुडालो आहोत. कोणतीही लाजिरवाणी तडजोड क्षणार्धात करण्याचं अनैतिक, निर्लज्ज धैर्य आज भल्याभल्या लोकांत आलं आहे. तुकोबा, आजची शोककथा काय सांगू? आज द्रौपदीच दु:शासनाला बेमुर्वतपणानं डोळा घालीत आहे. आज धर्मराजच अधर्माच्या सिंहासनावर दुर्योधनाच्या मदतीनं बसला आहे. तू सहज संतापानं म्हणाला असतास, 'ऐशा नरा, मोजून माराव्या पैजारा.' अशा वेळी तुकोबा, आमचे कान पिरगाळायला तूच हवा आहेत. ज्ञानेश्वर कानात सांगतात, पण तू कान धरून कानाखाली एक आवाज काढून आपल्या रोखठोक धारदार वाणीनं सांगू शकतोस. म्हणूनच आजच्या जगाला तुझी फार गरज आहे.

राहून राहून मला एका गोष्टीची खंत वाटते. लोकांनी आणि काही समीक्षकांनी

तुझ्यावर प्रारब्धवादी, निवृत्तिवादी असे शिक्के मारून तू लोकव्यवहाराशी अनभिज्ञ असलेला केवळ एक संत आहेस असं म्हटलं आहे. संतत्व तर तुझ्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूत आहे. पण प्रपंचाचा चिखल चिवडीत बसलेल्या सामान्य माणसाला प्रवृत्तीची आणि पुरुषार्थाची तू वाट दाखवली. एक नवा धार्मिक आणि ध्येयवादी समाज उभा करण्यासाठी तू धडपडत होतास हे या अज्ञानी लोकांच्या लक्षात आलेलं नाही. तुझं कीर्तन देवळातल्या देवाचं असण्यापेक्षा माणसातल्या परमेश्वराचं होतं. 'तीर्थी धोंडा आणि पाणी। देव रोकडा सज्जनी' ही तुझी बुध्दिवादी भूमिका केवढी तरी व्यापक आहे. समाजाच्या रक्षणासाठी नाठाळांच्या माथां काठी हाणावी आणि देव्हाऱ्यावर चढलेल्या विंचवाची नांगी पायताणानं ठेचावी, हा तुझा संदेश प्रवृत्तीचा आणि प्रखर पौरुषाचा आहे. आजच्या राज्यकर्त्यांना सत्तेची खुर्ची टिकवण्यासाठी राष्ट्रद्रोही प्रवृत्तीशी केविलवाणी तडजोड करण्याची राजनीती अवलंबावी लागत आहे. तू म्हणाला असतास,

*'जळो तुमची राजनीती।*
*जळो तुमची सत्तालालसा !!'*

निरपराधी लोकांच्या आणि लेकराबाळांच्या रक्ताचे पाट वाहात असताना तुम्ही नेभळे लोक सहन करीत राहिलात. सामोपचाराच्या गोष्टी करीत राहिलात. 'भला भेटला तर कासेची लंगोटीसुद्धा द्या, पण दुष्ट दुर्जनांचं निर्दालन करा.'

तुकोबा, तुझ्या बलदंड प्रवृत्तीचा मला अभिमान वाटतो. तू समाजाला झडझडून सांगितलंस. जेव्हा शालीन शब्द समजत नाहीत तेव्हा चार शिव्या हासडूनच परिणाम करावा लागतो. सोंगाढोंगावर संतत्वाचा देखावा करणाऱ्या भगव्या दांभिकावर, जातीपातीच्या बुरसटलेल्या कल्पनांवर, साऱ्या कर्मकांडावर तू चढवलेले हल्ले क्रांतिकारक स्वरूपाचे आहेत. आणखी काय सांगू? तुझ्याशी सतत संवाद करण्यात आगळा आनंद आहे. काय आणि किती बोलू? अनुभवाच्या शाळेत शिक्षण घेऊन तू एक श्रेष्ठ विचारवंत झालास. एखाद्या गुरूच्या पायाशी बसून अभ्यास करण्याची संधी तुला मिळाली नाही हेच बरं झालं. गुरूच्या नावावर जगणारे आणि गुरूच्या पावलांवर प्रत्येक पाऊल मोजून मापून टाकणारे शिष्य कधीच नवी वाट चोखाळू शकत नाहीत. तू वाटा शोधल्यास. वाटा तयार केल्यास. आपल्या अंत:करणाला पटेल ती आपली वाट, असं मानून बिनदिक्कत चालू लागलास.

*'सत्य असत्याशी मन केले ग्वाही।*
*मानियेले नाही बहुमतां॥'*

हा तुझा बाणा! आज खेड्यापाड्यांत, शाळा-कॉलेजं निघाली, विद्यापीठाची सर्टिफिकिटं घेऊन पदव्यांची झूल खांद्यावर घातलेले असंख्य नंदीबैल रस्तोरस्ती हिंडताना दिसतात. शिक्षणाच्या भरलेल्या बाजारात सुसंस्कृतपणा मात्र मिळत नाही. तुझ्या कल्पनेतला समाज प्रत्यक्षात आणण्यासाठी तुलाच वैकुंठाहून यावं लागेल. तुझ्या काळातला समाज अशिक्षित असेल, पण आजच्यापेक्षा तो निश्चितच अधिक सुसंस्कृत

होता. त्या समाजानं तुझे अभंग इंद्रायणीत बुडवले हे खरं; पण त्याच्या मनात तुझ्या अभंगवाणीचं पाणी खोलवर रुजलं होतं.

तुकोबा, तीनशे वर्षं उलटून गेली, पण तुझी कविता, तुझा जीवन-विचार आणि तुझं व्यक्तित्व आजही मला ताजं टवटवीत वाटतं. राहून राहून असं मनात येतं की, आमचं सर्वस्व गेलं तरी चालेल पण आमच्या हृदयात तुझ्या वाणीचं अधिष्ठान असेल तर आम्हाला आनंदानं जगता येईल. तूच या जीवनाचा आधारस्तंभ होऊ शकतोस. 'भाग्य आम्ही तुका देखियेला' असं म्हणण्याची संधी मला मिळावी हीच इच्छा.

तुकोबा, मी एक अतिसामान्य मनुष्य. माझ्याभोवती अंधाराचं एक वेटोळं आहे. पायाखाली काटेकुटे आणि खाचखळगे. पण तुझ्या अभंगांनी मला स्वप्न दिलं जगण्याचं. कधी माझी जीवनेच्छा क्षीण होते, मनाला झालेल्या जखमा ठसठसू लागतात, अशावेळी तुझ्या अभंगांची गाथा मी उघडून बसतो. तुझ्या भावार्त, प्रसादपूर्ण भक्तीनं दाटलेल्या शब्दांच्या झरोक्यातून तुझा वात्सल्यपूर्ण हात माझ्या अंगाखांद्यावरून फिरू लागतो. तू मला म्हणत असतोस, मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास आहोत, पण वज्रालाही आपण भेदू शकतो. धीर धर. अरे वेड्या, तुझ्याच अंत:करणात एक उजेडाचं रोपटं आहे. त्याला आत्मविश्वासाचं पाणी घाल. थोड्याच दिवसांत त्याच्या सोनेरी किरणात तू न्हाऊन निघशील. दु:खं क्षणाची आहेत. संकटं घटकाभराची आहेत. पण सुख मात्र जन्मजन्मांतरीचं आहे. दररोजचा दिवस गेलेल्या दिवसापेक्षा नवा आहे. अधिक चांगला आहे. 'नित्य नवा दीस जागृतीचा.' तुझ्या अभंगांतून तू केव्हाही - अगदी मध्यरात्रीच्या काळोखातही - मला भेटू शकतोस. अभंग बुडवणारे बुडून गेले, पण आज तुझे अभंग आम्हा बुडणाऱ्यांना तारू शकतात.

तुला एकेरी नावानं संबोधून इतका वेळ बोलत राहिलो, याचा राग तर आला नाही ना? पण खरी गोष्ट अशी आहे की, तुझ्याबाबतीत 'तुम्ही' आणि 'आपण' हे बहुमानार्थी औपचारिक शब्द मला उच्चारताच येत नाहीत. आईला आईसाहेब म्हणणं खरं आहे काय? तुला 'तुकोबा' या एकेरी शब्दानं संबोधताना मला अधिक मोकळं वाटतं. म्हणून म्हणतो तुकोबा,

*'आता असो द्यावी दया।*
*तुमच्या लागतसे पाया॥'*

□□□

# १२. मुलखावेगळी माणसे

माणसं हजार प्रकारची असतात. माणसांचे चेहरेसुद्धा किती परस्परभिन्न असतात! कुणाच्या मुद्रेवर नेहमीच स्मितहास्य असतं, तर कुणाचा चेहरा आनंदाच्या प्रसंगीसुद्धा रडकाच असतो. हसतानाही काही माणसं रडत असल्यासारखी वाटतात. माणसांच्या बोलण्याच्या, चालण्याच्या आणि वागण्याच्याही तऱ्हा विलक्षण असतात. काही व्यक्ती वाघ पाठीमागे लागल्याप्रमाणे सदैव घाईघाईने चालतात, तरकाहीजणांच्या रेंगाळत चालण्याची चीड येते. बोलण्याचे तर अनंत प्रकार आहेत. प्रत्येकाची लकब निराळी. सारांश, हे वैचित्र्य मनोरंजक असतं. पण मला मनुष्याची बाह्य वैशिष्ट्यं तितकीशी महत्त्वाची वाटत नाहीत. तो दिसतो कसा यापेक्षा तो जगतो कसा आणि वागतो कसा हेच अधिक महत्त्वाचं आहे. ऑथेल्लो नाटकात शेक्सपीअरचा आयागो एका ठिकाणी म्हणतो, "माणूस जसा दिसतो तसा असत नाही आणि जसा असतो तसा तो दिसत नाही." स्वत: आयागोच्या बाबतीतही हेच म्हणता येतं. तो बाह्यत: सज्जन आणि स्नेहशील वाटायचा. मैत्रीचा मुखवटा धारण करून ऑथेल्लोचा गळा त्यानं इतक्या सफाईनं कापला की आपण पार फसवले गेलो हे देखील त्याला कळलं नाही. येशू ख्रिस्ताचे काही शिष्य त्याच्यावर उलटल्याची कथा प्रसिद्ध आहे. सहज मनात विचार येतो की, आपल्या दांभिक आणि विश्वासघातकी शिष्यांविषयी ख्रिस्ताच्या मनात कोणते विचार आले असतील? पण कल्पना करणं अवघड नाही. श्रेष्ठतम व्यक्तींच्या महनीय मनोवृत्तीत क्रोध आणि द्वेष यांची मुळं रुजू शकत नाहीत. किती भिन्न आणि बऱ्यावाईट रंगांत माणसं रंगून निघालेली असतात. त्यांचा एकच रंग नसतो. सरड्याप्रमाणे कित्येक माणसं आपले रंग आणि ढंग सहजासहजी बदलतात. आपल्या बदलाचं समर्थनही करताना त्यांना संकोच वाटत नाही. माझ्या माहितीचे एक गृहस्थ एका भल्या सकाळी मला भेटले. त्यांच्या हातात एक पुष्पहार आणि गुच्छ होता. मंत्रीमंडळात नव्यानं दाखल झालेल्या एका मंत्र्याच्या स्वागतासाठी ते सरकारी विश्रामगृहात चालले होते. मला आश्चर्य वाटलं. कालपर्यंत त्या पुढाऱ्याच्या

नावानं जाहीरपणानं शिमगा करणारा हा माणूस आज तो पुढारी मंत्र्याच्या खुर्चीवर बसल्याबरोबर एकदम अशी भूमिका कशी घेऊ शकतो ?

ते सद्गृहस्थ हसून म्हणाले, "तुम्हाला कळणार नाही. व्यवहारी जग अजून तुम्ही पाहिलेलं नाही. लहान आहात, लक्षात घ्या. जो खुर्चीवर असतो तो आपला नेता. जोपर्यंत तो खुर्चीवर आहे तोपर्यंत त्याची आरती करणं हे आमचं कर्तव्यच आहे. माझ्या दृष्टीनं तो माणूस महत्त्वाचा नाही. त्याचं मंत्रीपद हेच सर्वाधिक मोलाचं असतं. संस्कृतात एक सुभाषित आहे, ज्याच्याजवळ संपत्ती असते तोच गुणवान आणि सुंदर असतो. तोच महान असतो. कारण सगळे गुण श्रीमंतीला चिकटतात. ज्यानं हा विचार लिहिला तो खरा प्रतिभावान कवी होता. अहो, शेवटी आम्हाला जगायचं आहे. पाण्यात राहून माशांशी वैर करण्याचा मूर्खपणा माझ्या हातून होणार नाही. आता हा कसलीही कुवत नसलेला माणूस सत्तेच्या खुर्चीवर बसला आहे ना, त्याला विरोध करून आमचं कसं चालेल ? "सुसरबाई तुझी पाठ मऊ" असं म्हणून त्याच्या गळ्यात फुलांचा हार घालण्यात व्यावहारिक शहाणपणा आहे. बाकी मला खात्री आहे की याची खुर्ची सहा महिनेसुद्धा टिकणार नाही. पण आज त्याच्याशी मुत्सद्दीपणानं वागणं जरूरीचं आहे. कारण तोसुद्धा असल्याच "व्यावहारिक" मार्गानं खुर्चीवर बसला आहे. लक्षात घ्या, आम्ही खुर्चीला मान देतो. माणसाला नाही."

त्या गृहस्थाचा हा व्यवहारवाद ऐकून मी सर्दच झालो. त्याच्या हिशेबी माणूस महत्त्वाचा नव्हता. माणसाची किंमत मोजण्यासाठी त्याच्यापाशी असलेली मोजमापं वेगळी होती. पण थोडासा विचार केल्यानंतर त्याच्या म्हणण्यात जे अत्यंत दाहक सत्य होतं ते स्वीकारण्याशिवाय गत्यंतर नव्हतं. बाह्यत: बुद्धिवादाचा जहाल पुरस्कार करणारी काही माणसं मी पाहिली आहेत. त्यांचं लेखन आणि भाषण ऐकताना आगरकरांनंतर हाच बुद्धिवादाचा मुकुटमणी आहे असं वाटतं. "स्त्री आणि पुरुष समान पातळीवर असलेले स्वतंत्र घटक आहेत. दोघांनाही समान अधिकार आहेत. पण जुनाट कल्पनांच्या आहारी जाऊन स्त्रीला अजूनही आपण करकचून बांधून ठेवलं आहे." असे तेजस्वी विचार एक विचारवंत बोलून दाखवायचे. पण आपल्या मुलीनं प्रेमविवाह करण्याचा निर्णय घेतला आणि ती आंतरजातीय विवाह करणार आहे हे समजल्याबरोबर त्यांच्या अंगाचा तिळपापड झाला. आपली उच्च जात, आपली सामाजिक प्रतिष्ठा, आपल्या मुलीनं धुळीला मिळवली असा त्रागा त्यांनी सुरू केला. वस्तुत: वधू-वर दोघेही एकमेकांना अत्यंत अनुरूप होते. जातीपातीतले काही मानीव फरक सोडले तर त्या विवाहात काहीही लौकिकावेगळे नव्हते. पण हे बुद्धिवादी विद्वान कमालीचे अस्वस्थ झाले. आपल्या मुलीला त्यांनी मारहाण केली. इथं असा प्रश्न उद्भवतो की, सामाजिक सुधारणा, बुद्धिवाद वगैरे गोष्टी बाहेर ठीक आहेत. आपल्या घरात मात्र त्या नकोत, असा बचावात्मक पवित्रा या विचारवंतांचा का असावा ? माणसं अशी का वागतात ? दाखवायचे दात निराळे आणि खायचे निराळे असं का

असावं ? याचं उत्तर इतकंच असेल की मनुष्य हे एक चमत्कारिक रहस्य आहे. त्याच्या मनाचा पार कधी लागत नाही. म्हणून तर त्याच्यासंबंधीचं आकर्षण कायम असतं.

इतिहासाच्या प्रत्येक पानावर मानीव प्रवृत्तीचं हे चित्रविचित्र दर्शन होतं ते खरोखरच स्तिमित करणारं आहे. या जगाला नित्यनवीनतेचं जे वरदान मिळालं ते माणसाच्या व्यक्तित्वात अनेकरंगी छटा आहेत म्हणूनच! दुष्ट समजल्या जाणाऱ्या लोकांच्या मनोभूमीतून कारुण्याची आणि माणुसकीची वेल फुलू शकते हे पाहिल्यावर आश्चर्य वाटतं. सज्जनांच्या चित्तातसुद्धा एखादी पापी अभिलाषा उत्पन्न होते. कोणताही मनुष्य एकाच रंगाचा किंवा एकाच प्रवृत्तीचा असतो असं विधान करण्यात काहीच अर्थ नाही.

माणसांचं वर्गीकरण मी दुसऱ्या एका प्रकारानं करतो. शेकडा नव्याण्णव टक्के माणसे मळलेल्या वाटेने चालत राहतात. चारचौघांसारखे जगतात. एखादी बरीवाईट नोकरी करीत राहतात. सकाळी खाली मान घालून मंडईत जातात. मिरच्या-कोथिंबीर घेताना भाजीवालीशी दोनचार पैशावरून हुज्जत घालतात. ऑफिसात "साहेब" नावाच्या प्राण्यासमोर शेपटी हालवीत उभे राहतात. त्याची मर्जी संपादन करण्यासाठी त्याच्याशी बोलताना मुद्रेवर कमालीचा भक्तिभाव आणतात. संध्याकाळी घराकडे परतताना आपल्या कर्तबगारीमुळे ऑफिस कसं छान चाललं आहे याचं आपल्यापरीनं रसभरित वर्णन करतात. घरी आल्यावर साहेबानं केलेल्या अपमानाची भरपाई करण्यासाठी बायकोवर गुरगुरतात. "साधा चहासुद्धा चांगला करता येत नाही" याबद्दल तिची कानउघाडणी करतात. या निरर्थक प्रसंगाकडे बायकोही नेहमीप्रमाणे दुर्लक्ष करते. या बहुसंख्य लोकांचा प्रपंच या आखलेल्या रस्त्याने वर्षानुवर्षे चालत राहतो. पण असले मिळमिळीत आणि बुळबळीत जीवन कित्येकांना कधीच रुचत नाही. मुंगी होऊन साखर खाण्यापेक्षा हत्ती होऊन अंकुशाचा मार खाणे काही जणांना पसंत असते. हाताच्या बोटावर मोजण्याइतकी ही अल्पसंख्य माणसे स्वत:च्याच नव्हे, तर जगाच्या आयुष्यक्रमात काही तेजस्वी बदल घडवून आणतात. माझ्या माहितीचा एक तरुण एके दिवशी ऑफिसातल्या नोकरीवर लाथ मारून माझ्याकडे आला. तो म्हणाला,

"सर, त्या भिकार नोकरीवर आज मी लाथ मारली. आता मी स्वतंत्र आहे. स्वातंत्र्याचा आनंद तुम्हाला सांगायला आलो आहे."

मी त्याला विचारलं, "एकाएकी नोकरी सोडण्याचं कारण काय ? थोडीशी तडजोड करायला हवी होती. जगताना आपल्याला काहीतरी तडजोड करणं भाग असतं." त्याबरोबर तो उसळून म्हणाला,

"आता तडजोडीचं नावच काढू नका. कशासाठी तडजोड करायची ? आमचा ऑफिसर म्हणजे एक पहिल्या प्रतीचा मूर्ख आणि घमेंडखोर माणूस आहे. काडीचीही योग्यता नसलेला हा नालायक माणूस सर्व कारकुनांवर पिसाळलेल्या कुत्र्यासारखा भुंकत असतो. भुंकत राहणं म्हणजे "ॲडमिनिस्ट्रेशन" करणं असं त्याला वाटतं.

बिचारी कारकूनमंडळी सदैव धास्तावलेली असतात. आज माझ्या नसलेल्या चुकीबद्दल तो जेव्हा सर्वांसमक्ष कुर्रेबाजपणाने मला बोलू लागला तेव्हा दोन वाक्यांतच मी त्याला अडवलं आणि ठणकावून सांगितलं, "मिस्टर सो ॲन्ड सो, मी न केलेल्या चुकीबद्दल तुम्ही मला दोषी धरू शकत नाही, आणि दुसरं असं की तुमच्या बोलण्यात सौजन्य असावं. माजोरीपणानं कोणावरही भुंकण्याची तुम्हाला सवय झाली आहे. वस्तुत: कुणाच्या तरी वशिल्यानं तुम्ही "साहेब" म्हणून चिकटलात. नाहीतर हे ऑफिस झाडायलासुद्धा तुम्हाला कोणी ठेवून घेणार नाही. असं बोलताना मला खेद होतो. वस्तुत: मी तुम्हाला असं अपमानकारक बोलायला नको आहे. पण केव्हातरी तुमची नांगी ठेचलीच पाहिजे. इथं काम करणारी आम्ही माणसं पोटार्थी असलो तरी आम्ही स्वाभिमानी आहोत हे लक्षात घ्या. कोणत्याही माणसाला निष्कारण छळू नका. हातात सत्तेचं कोलीत मिळालं म्हणून बेफाम होऊ नका. तुमची ही दीडदमडीची सत्ता फार तर पाच-दहा वर्षं टिकेल. पण हातात सत्ता आल्यानंतर माणुसकी विसरून माणसांवर अन्याय करण्याची, कनिष्ठांना लाथा मारण्याची आणि वरिष्ठांचं "बूटपॉलिश" करण्याची नादान प्रवृत्ती सोडून द्या. आमच्याही रक्तात अभिमान आहे. आता प्रश्न उरला तुमच्या दीडदमडीच्या नोकरीचा! हा घ्या माझा राजीनामा. मी चाललो." आमच्या ऑफिसातले सगळे लोक अवाक् होऊन हा प्रकार पाहात होते. माझ्या प्रत्येक शब्दानं त्या हुकूमशहाची दाणादाण उडवून दिली. ऑफिसच्या बाहेर पडताना शिपायानं माझ्याकडं अत्यंत आत्मीयतेनं पाहिलं. त्याच्या डोळ्यांत प्रेम, अभिमान आणि कृतज्ञता होती.

त्या तरुणाचा हा पराक्रम - होय, मी त्याला पराक्रमच म्हणतो. आपल्या स्वाभिमानाची त्यानं जपणूक केली आणि नोकरी लाथाडली हे कदाचित व्यावहारिक शहाणपणाच्या चौकटीत बसणार नाही. पण प्रत्येक वेळी व्यवहाराचं नाव घेऊन माणसानं आपलं व्यक्तित्व, माणूस म्हणून आपली प्रतिष्ठा हीन-दीन अवस्थेला जाऊ द्यावी काय? त्या तरुणानं स्वत:बरोबर ऑफिसातल्या साऱ्याच नोकरांना एक नवी प्रतिष्ठा मिळवून दिली. तो ऑफिसर त्या दिवशी स्वस्थपणानं झोपू शकला नसेल. त्याच्याही मनात कदाचित आत्मपरीक्षणाचे काही क्षण उचंबळून आले असतील, आणि त्याच्या दैनंदिन वर्तनात कदाचित सुधारणा झाली असेल. तो तडफदार तरुण नोकरी गेल्यामुळं हतबल मात्र झाला नाही. त्याच्या प्रवृत्तीत साहस होतं. डोळ्यांत नवी स्वप्नं होती. आपल्यावर होणारे नाना प्रकारचे अन्याय माणूस निमूटपणाने सहन करतो हे त्याला कधीच पटले नाही. तो माणसांना जागवीत राहिला. त्यांना संघटित करीत राहिला. आज त्याच्या या प्रयत्नातून त्याच्या रूपानं पीडित आणि छळित लोकांना एक बंडखोर नेतृत्व मिळालं आहे. तो केवळ कारकून राहिला असता तर कदाचित आपल्या वैयक्तिक सुखदु:खाच्या वर्तुळातून बाहेर पडला नसता. साहेबाची खुशामत करण्याची सवय त्याच्याही रक्तात मुरली असती. पण हा माणूस आपल्या अंत:करणप्रवृत्तीला पटेल

त्या वेगळ्या वाटेने बिनदिक्कत चालणारा होता. सर्वसामान्य माणसांचे हिशेब आणि मोजमापे त्याला नको होती. त्याने शोधलेली नवी वाट काट्याकुट्यांची होती. पण ते काटे तुडवीत तो चालत राहिला. आज मात्र त्या काट्यांची फुलं झाली आहेत. परवाच दहा हजार पीडितांचा एक मोर्चा घेऊन तो मंत्रालयावर गेला होता. त्याची मागणी न्यायाची होती. आणि मुख्यमंत्र्यांना त्यानं ती पटवून दिली. मुख्यमंत्री म्हणाले,

"मोर्चे घेऊन येणारे अनेक प्रकारचे पुढारी मी पाहिले आहेत. त्यांच्या पुढारीपणातसुद्धा एकप्रकारचे ढोंग आणि स्वार्थ दबा धरून बसलेली असतात. जनतेच्या कल्याणापेक्षा पुढारी म्हणून आपला लौकिक वाढावा, वर्तमानपत्रांतून आपला फोटो यावा आणि सत्ताधाऱ्यांनी आपल्या पदरात असं काही टाकावं की त्यामुळं आपलं एकट्याचं भलं होईल. अशा वृत्तीचे धूर्त पुढारी मला माहीत आहेत. तुम्ही मात्र तत्त्वनिष्ठ आहात. "चार बन चुके" पुढाऱ्यांपेक्षा तुमची वाट वेगळी आहे. ज्या गरिबांची बाजू घेऊन तुम्ही आलात त्यांच्या सर्व मागण्या मान्य करताना मला आनंद वाटतो." मोर्चेवाल्यांनी नंतर जबरदस्तीनं त्याच्या सत्काराचा कार्यक्रम आखला. पण हा तत्त्वनिष्ठ नेता त्या समारंभाला उपस्थित राहिला नाही. मानपान, हारतुरे, जयजयकाराच्या घोषणा या सामान्य वाटांनी प्रवास करण्यात त्याला कधीच आनंद वाटला नाही. तो मुलखावेगळा होता. अशीच मुलखावेगळी माणसं माणसाची ध्वजा उंच धरू शकतात. थैली आणि खुर्ची या दोन गोष्टींवर डोळे खिळवून बसलेली नेहमीची एक प्रवृत्ती जीवनाच्या सर्व क्षेत्रांत असते. या मळलेल्या आणि रुळलेल्या वाटेनं इतके लोक चालत असतात की लवकरच त्या वाटेचे रूपांतर राजमार्गात होते. या मार्गावरून चालणाऱ्या बहुसंख्य लोकांत नवनिर्मितीची आकांक्षा असत नाही. ते आपले मुंगी होऊन आपल्या वारुळात सुखेनैव साखरेचे कण चघळीत असतात.

एके दिवशी कोलंबस नावाच्या धाडसी खलाशाच्या मनात एक नवी जाणीव रसरसून फुलली. दूरवरची क्षितिजे त्याला साद घालू लागली. हजार लाटांनी उचंबळणारा आणि बेफाम खवळलेला समुद्र त्याला आव्हान देऊ लागला. कोलंबसानं आपल्या काही मित्रांना बोलावलं आणि त्यांना तो म्हणाला, "घरकोंबड्यासारखं घराच्या चार भिंतींत राहून शेळपट आयुष्य जगण्यासाठी आपण जन्माला आलो आहोत काय? उन्मत्त समुद्रात आपल्या होड्या ढकलू या. ठरलं तर मग! आपण दर्यावर्दी आहोत. आपल्या होड्या नवनवीन किनाऱ्यांना भेटल्या पाहिजेत. प्रक्षुब्ध सागराशी दोन हात करण्यातली रोमँटिक मर्दुमकी आपण अनुभवली पाहिजे. मित्रहो! सागर महान आहे. पण आपण पुरुषार्थाचे महासागर आहोत्त. गल्लीबोळात हिंडून पोरीबाळींची चेष्टा करीत बसण्यापेक्षा आपण समुद्राच्या उफाळत्या लाटांबरोबर मस्तवालपणे खेळू या. हिंदुस्थानचा शोध आपल्याला लावायचा आहे. ही स्वप्नभूमी आपल्याला भेटली पाहिजे. शेळपटाप्रमाणं शंभर वर्षं जगण्यापेक्षा मर्दाप्रमाणं मरण्यातला आनंद लुटू या."

कोलंबसाच्या काही मित्रांनी त्याला साथ दिली. पण बरेचसे तरुण मित्र त्याच्या

या "मूर्ख मनोराज्यात" सामील झाले नाहीत. ते म्हणाले, "अरे आपल्या गावच्या गल्लीबोळात हिंडावं, वाईनचे दोन ग्लास झोकावेत. आपल्या स्वीटगर्लला लव्हलेटर्स लिहावीत हे सोडून त्या वेडचा कोलंबसाबरोबर मरण्यात काय अर्थ आहे? बहुसंख्य शहाणे लोक कोलंबसाला वेड लागलं आहे अशीच साक्ष देतील. मरू द्या त्याला! आपली सगळी गुलजार स्वप्नं या फेसाळलेल्या मद्यात कशी तरंगत आहेत पहा. चिअर्स!"

कोलंबस निघाला. कदाचित आपल्याला या साहसात जलसमाधीच मिळेल हे त्याला माहीत होते. पण आपल्या पराक्रमाचा झेंडा महासागरावर उभारायचाच या महत्त्वाकांक्षेनं तो झपाटलेला होता. चार संसारी लोकांची आळणी, मिळमिळीत वाट त्याला नको होती. दिवस उलटून गेले, कित्येक महिने खाली समुद्र आणि वर आकाश यापलीकडे त्याला काहीच दिसत नव्हते. अन्नपाण्याचा साठा जवळजवळ संपला होता. काही सहकारी हालअपेष्टांनी मरून गेले होते. उरलेले मित्र त्याला केविलवाणेपणाने सांगत होते, "हट्ट सोड, आपण परत फिरू. आपल्या गावचे गल्लीबोळ पुष्कळ सुंदर आहेत." पण कोलंबसाच्या क्षीण झालेल्या डोळ्यांतली स्वप्ने मात्र अद्यापी धगधगत होती. त्याच्या अशक्त झालेल्या शरीरातले रक्त मात्र उष्ण होते. तो म्हणाला,

'आता मागे परतणे नाही. मरण आलं तरी बेहत्तर! नव्या भूमीची साद मला स्पष्ट ऐकू येत आहे. आपल्याला हा प्रवास चालूच ठेवला पाहिजे." आणि काय आश्चर्य! एका नव्या भूमीचं विलक्षण दर्शन त्याला घडलं. विजयोन्मादाने त्याने उंच आरोळी ठोकली. अमेरिका नावाचं एक नवं खंड शोधण्याचा त्याला बहुमान मिळाला. आपल्या देशात परतल्यानंतर कोलंबसाचा टोलेजंग सत्कार करण्यात आला. काही मत्सरी सरदारांना हा सत्कार-समारंभ पाहवला नाही. ते म्हणाले, "अहो, काय केलं या उडाणटप्पू माणसानं की त्याचा एवढा प्रचंड सत्कार करावा? हा कानफाट्या माणूस! याचं संसारात कधी लक्ष नव्हतंच. पहिल्यापासून असाच उंडारत होता. पण आम्ही म्हणतो त्यानं अद्भुत असं काय केलं? अमेरिका तर आपल्या ठिकाणावरच होती ना? अरे, आम्हीही होड्यांत बसून असं जलपर्यटन केलं असतं तर आम्हालाही अमेरिका सापडली असती. यात विशेष ते काय?"

मत्सराने जळणाऱ्या या क्षुद्र जीवजंतूंना धडा शिकवण्यासाठी एके दिवशी भर दरबारात कोलंबसाने आपल्या कोटाच्या खिशातून एक कोंबडीचे अंडे बाहेर काढले आणि सर्व सरदारांना उद्देशून तो म्हणाला,

"हे कोंबडीचे अंडे या टेबलावर जो कोणी स्थिर उभे करील त्याला मी एक लाख नाणी देईन." प्रत्येक सरदार प्रयत्न करू लागला. पण विशिष्ट आकारामुळे ते अंडे स्थिर उभे करणे कुणालाच शक्य झाले नाही. सरदार चिडून म्हणाले, "तुम्हाला तरी हे उभे करता येईल काय?" कोलंबस हसत हसत टेबलाजवळ गेला. त्याने

ते अंडे खालच्या बाजूला किंचित फोडले आणि टेबलावर उभे करून दाखवले. सर्व सरदार ओरडून म्हणाले, "हे तर आम्ही सुद्धा करू शकलो असतो." तेव्हा कोलंबस उपहासाने हसून म्हणाला, "पण ते तुम्ही करू शकला नाहीत आणि मी ते केले हे लक्षात घ्या. तुमची वाट मळलेली आणि रुळलेली होती. माझी वाट काटचाकुटचांची पण साहसाची आणि पुरुषार्थाची होती. इतकाच तुमच्या माझ्यातला फरक आहे. समजलं ना?"

सर्व सरदारांच्या माना शरमेनं खाली झुकल्या. दरबारात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला.

□□□

# १३. कीर्ती सदा कुमारी!

कवी रेंदाळकरांची एक काव्यपंक्ती मला नेहमी आठवते. "अजुनि चालतोचि वाट माळ हा सरेना. विश्रांतिस्थळ केव्हा यायचे कळेना." या ओळीत कवीच्या मनात रुजून बसलेले गडद कारुण्य व्यक्त झाले आहे. रेंदाळकरांच्या पदरात दैवाने फुले क्वचितच टाकली. काटे मात्र भरपूर टाकले. या कवीच्या मनातली हिरवळ लवकरच कोमेजून गेली. खडतर वाटेने चालताना काट्याकुट्यांनी पाय रक्ताळले. आपल्या ठायी असलेल्या कवित्वामुळे कवी म्हणून मानमान्यता लाभेल, आपल्याभोवती कीर्तीचे एक वलय निर्माण होईल अशी त्यांना फार आशा होती. एकदा कोणा सुविख्यात कवीच्या सत्कार-समारंभाला ते आपल्या अनंततनय या कविमित्राबरोबर गेले होते. समारंभातली गौरवाची भाषणे, मानपत्र आणि हारगुच्छ वगैरेमुळे ते फार प्रभावित झाले. अनंततनयांना त्यांनी म्हटलं,

"तुमचा आणि माझाही असाच एक दिवस गौरव-समारंभ होईल. आपण वाचकांना चांगली कविता दिली आहे. एक दिवस आपल्याही गळ्यात अनेक हार पडतील. आपल्या काव्याबद्दल स्तुतीची भाषणे होतील." रेंदाळकरांची आशा पल्लवित झाली. "उघडि नयन रम्य उषा हसत हसत आली" यासारख्या प्रसन्न मधुर काव्यपंक्ती लिहिणारा रेंदाळकर नावाचा कवी केव्हा हे जग सोडून गेला याची वाचकांना आणि समीक्षकांना नीटशी कल्पनाही आली नाही. मग तो सत्कार-समारंभ वगैरे एक कविकल्पनाच ठरली. आयुष्यातल्या कडवट अनुभवांमुळे त्यांच्या काव्यात पुढे पुढे नैराश्य आणि तुच्छता यांचे रंग अधिकच दाट होत गेले. माळरान कधी संपलेच नाही. फुलांनी सजलेली वाट दिसली नाही. एके दिवशी या कवीच्या मृत शरीरावर मात्र काही पुष्पहार पडले असतील.

असे विपरीत का घडते? खरे तर ज्यांच्याजवळ कर्तृत्व आहे, योग्यता आहे असे लोक उपेक्षेच्या अंधारात जन्मभर खितपत पडतात. त्यांची दखल घ्यायला जगाला वेळ नसतो. त्यांच्या अस्तित्वाचीही काही वेळा जगाला कल्पना नसते. कवी चंद्रशेखर

हा मराठीतला एक तपस्वी कवी. "गोदागौरव" आणि "काय हो चमत्कार?" यासारखी प्रसादमधुर रचना करून मराठी कवितेचे वैभव या कवीने वाढवले. बडोद्यात वैद्यकीयखात्यात कारकुनी करण्यात या कवीचे आयुष्य गेले. बडोद्यात अनेक कवी लेखकांचा गौरव झाला. पण वर्षानुवर्षे भक्तिभावाने आराधना करणाऱ्या या पंडित कवीला मात्र मानाचे पान कधी लाभले नाही. चंद्रशेखरांनीही असल्या सन्मानाची केव्हाही अपेक्षा केली नाही. त्यांची प्रसन्नता ढळली नाही. त्यांच्या कवितेतही विफलतेचे सूर उमटले नाहीत. ते लिहीत राहिले. खडीसाखरेसारखी मिष्ट कविता त्यांच्या लेखणीतून झरतच राहिली. पण आपली उपेक्षा होत आहे हे जाणवून त्यांना किंचितही खंत वाटली नसेल काय ? कवी आणि कलावंत अत्यंत संवेदनाक्षम मनाचे असतात. आपल्या अंगभूत प्रतिभेविषयी त्यांना सार्थ अभिमान असतो. सुप्रसिद्ध कवी आणि नाटककार भवभूती यांची जाणूनबुजून उपेक्षा करण्यात आली होती. उत्तम नाटककारांच्या मालिकेत त्यांचे नाव गुंफले जात नसे. अरसिक समीक्षकांनी त्याची दखल घेतली नाही. त्यामुळे अस्वस्थ झालेल्या भवभूतीने काही उत्कट तीव्र उद्गार काढले. तो म्हणाला,

"जे स्वतःला शिष्ट समजतात त्यांच्यासाठी मी लिहीत नाही. त्यांना काही कळो वा न कळो, माझा "समानधर्मा"रसिक कधीतरी, कुठेतरी निर्माण होईलच. काळ अनंत आहे आणि पृथ्वी विशाल आहे." भवभूतीच्या या शब्दात काहीसा खेद पण विलक्षण आत्मप्रत्यय आहे. त्याच्या 'उत्तररामचरितात' त्याने कारुण्यातले व्याकुळ सौंदर्य कलात्मक हळुवारपणे प्रकट केले आहे.

प्रतिभावंतांची उपेक्षा होण्याचे मुख्य कारण समकालीन समाज अरसिक व अज्ञानी असतो हेच आहे. धर्मसंस्थापकांची, साधुसंतांचीही समाजाने अशीच उपेक्षा केल्याची नोंद इतिहासाने घेतली आहे. काव्यप्रतिभेचे आणि संतत्वाचे उत्तुंग शिखर म्हणून ज्या ज्ञानेश्वरांचा आज जयजयकार होत आहे त्या ज्ञानदेवाला तत्कालीन समाजाने बहिष्कृत केले नव्हते काय ? "शुद्धिपत्र" मिळवण्यासाठी निवृत्ती, ज्ञानदेवादी चार भावंडे महाराष्ट्रात वणवण फिरली. पण "संन्याशाची पोरे' म्हणून हेटाळणी करण्यात आली. भागवतधर्माचा कळस असलेल्या तुकोबांना अपमानाच्या व विरोधाच्या माळरानातून कष्टाने वाट चालावी लागली. त्यांची कविता अरसिक कर्मठांनी इंद्रायणीत बुडवून टाकली. ज्ञानेश्वर शांतपणे अन्याय सहन करीत राहिले. पण तुकोबा आक्रमकवृत्तीचे आणि फटकळ वाणीचे, निर्मळ मनाचे संत होते. आपल्या कवित्वाचा द्वेष करणाऱ्या प्रवृत्तींवर त्यांनी बिनादिक्कत कोरडे ओढले.

पतिव्रतेची कीर्ती वाखाणिता। सिंदळीच्या माथां तिडीक उठे॥

पतिव्रतेची कुणी स्तुती केली म्हणजे सिंदळीच्या कपाळात तिडीक उठावी हे बरोबरच आहे. तुकोबा म्हणतात, "याला आम्ही काय करणार? आम्ही जे प्रामाणिकपणे बोलतो ते कुणाच्या तरी टाळक्यात बसते याला आमचा निरुपाय आहे." ज्ञानेश्वर आणि तुकाराम या संतश्रेष्ठांना, कविश्रेष्ठांना आपल्या आयुष्यात उपेक्षा, मानभंग

सहन करावा लागला. इतरांची काय कथा ? समकालीन लोक सहसा न्याय देत नाहीत हे लक्षात घेऊन कर्तृत्वसंपन्न माणसाने शांतपणे आपले कार्य करीत राहावे. लोकप्रियतेसारखी चंचल गोष्ट नाही दुसरी. जी कीर्ती आज गळ्यात पडते आणि उद्या लहरीपणाने पाठ फिरवते तिच्या नादी लागण्यात कसला शहाणपणा आहे ? काही राज्यकर्त्यांचे पुतळे त्यांच्या हयातीत जनता उभी करते. ( ते सत्ताधीशच या बाबतीत प्रयत्नशील असतात. ) त्यांचे प्रचंड सत्कार होतात. विद्यापीठे त्यांना सन्मान्य पदव्या देतात. पण अल्पकाळातच जनतेला त्यांचा विसर पडतो. त्यांचे पुतळेही हलवले जातात. असल्या अतिचंचल, अनिश्चित कीर्तीसाठी धडपडण्यात काही स्वारस्य आहे का ? What is fame? An empty bubble. कीर्ती म्हणजे केवळ बुडबुडा ! क्षणात फुटून नाहीसा होणारा. कुणीतरी आपल्याकडे बोट दाखवून गौरवाने म्हटले, " हेच ते बरं का ! मी तुम्हाला सांगितलं होतं. " एवढ्यानेसुद्धा हुरळून जाणारे काही महाभाग असतात. अशा लोकांना उद्देशून एक कवी म्हणतो,

"Your fame is like a summer flower which blooms and dies in one short hour."

फार लवकर कोमेजून जाणाऱ्या फुलासारखी ही कीर्ती आहे यात शंका नाही. एका प्रसिद्धिलोलुप माणसाने एकदा स्वत:ची महती सांगताना मला म्हटलं, " अहो, तुम्ही मला ओळखत नाही म्हणजे कमाल झाली ! मागच्याच महिन्यात " दुधगाव वार्ता " या वर्तमानपत्रात माझा फोटो प्रसिद्ध झाला आहे. तुम्ही पहिला नाही का ? " मी म्हटले, " या नावाचे एक वर्तमानपत्र आहे ही माहिती प्रथमच तुमच्याकडून मला समजली. पण कशाबद्दल आलाय तुमचा फोटो ? " माझ्या अज्ञानाची कीव करीत तो म्हणाला,

" आता काय सांगायचं ? गावातल्या शाळेला मी पन्नास रुपयांची देणगी दिली. अशा देणगीदारांचे फोटो त्यात आले आहेत. हे बघा ते वर्तमानपत्र. फ्रेम केलेले ते पान त्याने मला दाखवले. हा माणूस त्या प्रसिद्धीने मनोमन सुखावला होता. वर्तमानपत्राचे ते पान तो जन्मभर जपून ठेवणार यात शंका नव्हती. त्याचा बालिश आनंद मी हिरावून घेतला नाही. त्याचे अभिनंदन केल्यावर तो आणखीनच खूष झाला.

काही ध्येयवादी व्यक्ती मात्र लौकिकाकडे जाणूनबुजून पाठ फिरवतात. हिरवळ सोडून काटेरी वाटेने चालू लागतात. कीर्तीचा कटाक्ष त्यांना भुरळ घालू शकत नाही. पावलोपावली कीर्ती त्यांना एखाद्या अनुरक्त प्रेयसीप्रमाणे आमंत्रण देत असते. पण तिचा मोहपाश झुगारून या व्यक्ती आपल्या ठरलेल्या उद्दिष्टासाठी झगडत राहतात. कवी कुसुमाग्रजांनी या प्रवृत्तीचे वर्णन करताना म्हटले आहे,

*पदोपदी पसरून निखारे, आपुल्याच हाती*
*होऊनिया बेहोष धावलो ध्येयपथावरती*

*कधी न थांबलो विश्रांतीस्तव, पाहिले न मागे*
*बांधु न शकले प्रीतीचे वा कीर्तीचे धागे*

अशा ध्येयनिष्ठ पराक्रमी व्यक्तींचा पाठलाग करीत कीर्ती धावत असते. पण त्या व्यक्तींना त्याचे काहीच वाटत नाही. म.फुले, आणि सुधारकाचार्य आगरकर यांना प्रसिद्धीची तमा नव्हती. लौकिकाची अपेक्षा नव्हती. समकालीनांनी त्यांच्यावर चिखलफेक केली. त्यांचा छळ केला. पण समाजाविषयीची त्यांची आस्था उत्कट होती. अविचल निष्ठेने ते कार्य करीत राहिले.

एक संस्कृत सुभाषित आहे. त्याचा आशय असा की, कीर्ती ही सदैव कुमारिकाच राहते. ती सज्जनांच्या मागे जाते. पण सज्जन तिचा स्वीकार करीत नाहीत. दुर्जन तिला मिळवण्यासाठी तिचा पाठलाग करतात. पण ती दुर्जनांचा स्वीकार करीत नाही. तिला कुमारी राहण्याशिवाय गत्यंतर नाही. एक गोष्ट मात्र निश्चित आहे की अनिश्चित असलेल्या कीर्तीचा अनुनय करण्यात आयुष्य व्यर्थ का घालवावे?

□□□

# १४. अशी पुस्तकं !

काही पुस्तकं आपल्याला झपाटून टाकतात. अंत:करणात भावनांची प्रचंड खळबळ उडवून देण्याची त्यांच्यात शक्ती असते. अशी पुस्तकं कधी विसरता येत नाहीत. दीर्घकाळ टिकणाऱ्या सुगंधाप्रमाणे ती पुस्तकं मनात दरवळत राहतात. उत्तम साहित्यकृतींचं वाचन करीत राहणं यासारखं दुसरं उत्तेजक आणि आनंददायक काही असेल का ? मॅकबेथ आणि किंगलियर या नाटकांतले काही संवाद इतके काव्यात्म, इतके अर्थगर्भ आणि इतके भावस्पर्शी आहेत की प्रत्येक वाचनाच्या वेळी अधिक उत्कट अनुभूती देत राहतात. अशा वाचनाची नशा और असते. सुखाविषयीच्या माझ्या कल्पनेतून पुस्तकं वगळली तर सारं सुखच संपुष्टात आलं असं म्हणावं लागेल. जवळचे मित्र दुरावतात. ज्यांच्यावर प्रेम केलं त्यांनाही त्या प्रेमाची विस्मृती होते आणि वैराचा अग्नी ते पेटवीत ठेवतात. हातात आलेला पैसा कसा आणि केव्हा नाहीसा होतो ते कळतही नाही. पण पैसा आणि मित्र यांच्याप्रमाणं पुस्तकं कधीच विश्वासघातकी असत नाहीत. त्यांना स्पर्श करण्याचा अवकाश, भावनांनी आणि विचारांनी ओसंडणारं आपलं अंत:करण ते उघडं करतात. "माझ्या अंतरंगात त्या थोर लेखकानं साठवलेलं हे भांडार तुझंच आहे. जे आवडेल ते खुशाल घेऊन जा " असंच जणू पुस्तक आपल्याला सांगत असतं. पुस्तकांवर आत्यंतिक प्रेम करणारी माणसं मी पाहिली आहेत. आपल्या कपाटात जिवापाड जपून ठेवलेलं पुस्तक दुसऱ्याला देताना ते अगदी व्याकुळ झालेले असतात. एकदा एका ग्रंथप्रेमी वाचकाकडून दोन दिवसांसाठी एक पुस्तक मी वाचायला आणलं होतं. ते देताना तो ग्रंथप्रेमी मला काकुळतीनं सांगत होता, "अतिशय काळजीपूर्वक वापरा. दुसऱ्याच्या हाती देऊ नका. पुस्तकाची पानं मुडपू नका. कोणताही मजकूर पेन्सिलीनं किंवा शाईनं अधोरेखित करू नका, वरचं कव्हर काढू नका. तिसऱ्या दिवशी कटाक्षानं मला पुस्तक परत करा. " त्या सूचना मला अपमानकारक वाटल्या नाहीत. आपल्या प्रेयसीपेक्षाही पुस्तकांवर अधिक उत्कट प्रेम करणारा हा पुस्तक-प्रियकर माझ्या आदराचाच विषय झाला. हातात पडलेल्या कोणत्याही पुस्तकाशी निर्दय चाळा

करणारे अनेक पुस्तकशत्रू मी पाहिले आहेत. त्यांच्या हिशेबी छापलेलं एक चोपडं म्हणजे पुस्तक. त्याला कसलं महत्त्व द्यायचं? पुस्तकाचा उपयोग तरी किती? भूक लागल्यावर ते शिजवून थोडंच खाता येतं? वेडे लोक वाङ्मयात अनेक रस असतात असं म्हणतात. तहान लागल्यावर तुमच्या कालिदासाच्या "शाकुंतलातला" रस पिणं शक्य आहे काय? फार तर एकदा वाचावं किंवा चाळावं आणि मग येईल त्या भावानं फुंकून टाकावं. ही विचारसरणी अनेकांची असते. पण त्या पुस्तकप्रियकरानं मला ज्या अटी घातल्या होत्या त्या खरोखरच अत्यंत सयुक्तिक होत्या. माझ्या हाती पुस्तक देताना त्यानं त्यावरून मायेनं अलगद हात फिरवला. मी त्याला म्हणालो,

"कसलीही काळजी करू नका. माझ्या घरीसुद्धा तुमच्या पुस्तकाला माहेरी आल्यासारखंच वाटेल. त्याला सासुरवास सहन करावा लागणार नाही. ते अगदी "योग्य स्थळी" तुम्ही देत आहात." तो हसला. त्याचं समाधान झालं असावं. मी म्हणालो, "एका संस्कृत सुभाषितात म्हटलं आहे, "मूर्खहस्ते न दातव्यम् एवं वदति पुस्तकम्" मूर्खाच्या हाती मला देऊ नका, असं पुस्तकाचं म्हणणं आहे. माझ्या हाती ते देताना तुम्हाला माझ्या शहाणपणाबद्दल शंका आली नाही ना?" आता तो खळखळून हसला आणि म्हणाला, "अहो, दुधाने पोळल्यामुळं मी ताक फुंकून पितो आहे. काही दिवसांपूर्वी एका कवीनं माझी दोन पुस्तकं नेली. मी पंधरा दिवस वाट पाहिली. पुस्तकं मागायला गेलो तेव्हा त्यानं चक्क कानावर हात ठेवले. आपण पुस्तकं आणलीच नाहीत असं त्याचं म्हणणं आहे. आता काय करणार? पैसा खाणारी माणसं मला चालतील, पण पुस्तकं गिळंकृत करणं म्हणजे माझ्या दृष्टीनं भयानक प्रकार आहे. तेव्हापासून मी ठरवून टाकलं की प्रत्यक्ष परमेश्वर आला तरी त्याला पुस्तक द्यायचं नाही. माझी पुस्तकं हीच माझी अपत्यं. वाचायला भरपूर ग्रंथ असले तर मी जन्मठेपेची शिक्षासुद्धा आनंदानं सहन करीन. पण पुस्तकं नसतील तर राजवाडासुद्धा मला स्मशानासारखा वाटेल."

सहज माझ्या मनात विचार आला– असे निष्ठावंत वाचक आता दुर्मिळ झाले. शिक्षणाचा सर्वत्र प्रसार होत आहे. खेड्यापाड्यातही महाविद्यालयं निघाली आहेत. सुशिक्षितांची संख्या वाढत आहे. पण ग्रंथांच्या वाचनात-चिंतनात रस घेणारे, ग्रंथांची भक्ती करणारे निष्ठावंत वाचक कुठे आहेत? कसलं तरी सुमार दर्जाचं सवंग बाजारी पुस्तक वाचण्यातच आनंद मानणाऱ्या वाचकांची पैदास प्रचंड प्रमाणात झाली आहे. परवा मी बी. ए. च्या वर्गातल्या वाङ्मयविषयाच्या विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला,

"जी. ए. कुलकर्ण्यांचा एखादा कथासंग्रह तुम्ही वाचला आहे काय? संग्रह जाऊ द्या, या लेखकाची एखादी कथा तरी तुमच्या वाचनात आली आहे काय?" साहित्य या विषयाचे रसिक विद्यार्थी - विद्यार्थिनी माना खाली घालून बसले होते. कदाचित जी. ए. कुलकर्णी हे नावसुद्धा त्यांना फारसं परिचित नव्हतं. मी निराश झालो. एका आधुनिक श्रेष्ठ कथालेखकाचं नावही सुशिक्षितांच्या, अभ्यासकांच्या

कानापर्यंत पोहोचलं नाही या कर्माला काय म्हणावं ?

एक गोष्ट मात्र खरी की, उत्तम साहित्यकृती आपल्याला जन्मभर भावनिक सोबत करतात. मनाला धीर देतात. जीर्ण होत चाललेल्या जीवनशक्तीला चैतन्यानं न्हाऊ घालतात. मनातल्या अंधाराला उजेडाची स्वप्नं दाखवतात. काही दिवसांपूर्वी ऐशी वर्षांचे एक साहित्यप्रेमी सद्गृहस्थ भेटले. मी त्यांना सहज विचारलं, "सध्या कशाचं वाचन चाललं आहे? ते म्हणाले, "गेले दोन दिवस "मेघदूत" वाचत होतो. नुकतंच ते संपवलं. आता टॉलस्टॉयची 'ॲना कॅरेनिना' ही कादंबरी हाती घेतली आहे." मी काहीशा आश्चर्यानं त्यांना म्हणालो, "या वयात मेघदूताची रुची कशी काय वाटते?" ते थोडेसे रागावून म्हणाले, "रसिकतेचा आणि वयाचा संबंध जोडणं हेच अरसिकपणाचं आहे. आपल्या कांतेच्या विरहानं व्यथित झालेला "मेघदूतातला प्रेमी यक्ष मला प्रथम माझ्या वयाच्या विसाव्या वर्षी भेटला. दर पाच-दहा वर्षांनी मी त्याची भेट घेतो तेव्हा तो मला केवळ पुन:प्रत्ययाचाच आनंद देतो असं नव्हे, तर प्रणयभावनेची नवनवीन रूपंही दाखवतो. शरीराचा वृद्धपणा मनाच्या तारुण्याला प्रतिबंध करू शकत नाही. आजही "मेघदूत" वाचताना मी स्वत:च एक विरही यक्ष आहे आणि मला माझ्या प्रेयसीला भेटण्याची उत्कट ओढ लागली आहे असं वाटतं. साठ वर्षांपूर्वी माझ्या प्रेयसीला लिहिलेल्या प्रेमपत्रात मी मेघदूतातलाच एक शृंगारिक श्लोक उद्धृत केला होता. त्यावेळचा मी आणि आता साठ वर्षांनंतरचा मी यांच्या मनोवृत्तीत, भावनोत्कटतेत, रसिकतेत, खट्याळपणात काही फरक पडला आहे असं मला वाटत नाही. कालिदासाच्या शृंगाररसाच्या प्रमत्त प्रवाहात आजही मला डुंबत राहावंसं वाटतं. तुम्हाला खरं सांगू? कलात्मक आनंद देणारं श्रेष्ठ साहित्य मला म्हातारा होऊ देत नाही. गांधीजींची आत्मकथा, व्हिक्टर ह्यूगोची आणि मुन्शी प्रेमचंदाची कादंबरी, रवींद्रांची "गार्डनर" व "गीतांजली", शेक्सपीअरची नाटकं, तुकारामाचे अभंग असं विविध प्रकारचं आणि अनेक रंगाढंगाचं पण रसमय साहित्य वाचण्याचा मी जन्मभर षोक केला. नवं पुस्तक दिसलं की ते केव्हा हस्तगत होईल अशी बेचैनी आजही मला वाटते. एखाद्या विलासी लंपट पुरुषाला नवी स्त्री दिसली की तिच्या अभिलाषेनं तो तळमळायला लागतो तसं माझं पुस्तकांच्या बाबतीत होतं. या पुस्तकांनी तर मला जिवंत ठेवलं आहे. शेक्सपीअरची सर्व नाटकं माझ्या संग्रहात आहेत याचा मला अभिमान वाटतो. अहो, सुंदर सुंदर पुस्तकांवरून नुसता हात फिरवणंसुद्धा केवढं सुखाचं आहे! मला कुणी पुस्तकातला किडा म्हटलं तरी चालेल. क्षुद्र सत्तेच्या चिखलात कीटकप्रमाणं लोळण्यापेक्षा ग्रंथातला कीटक होऊन जगणं मी अधिक पसंत करतो. आता या ऐशी वर्षांच्या शेलारमामाला म्हातारा म्हणणं शक्य आहे काय? वाचन हेच त्याचं भोजन होतं. त्यातूनच त्याला व्हिटॅमिन्स मिळत होती. उत्तम ग्रंथ म्हणजे आत्म्याचं अन्न!

कधीकधी बऱ्याच दिवसांत चांगलं पुस्तक वाचायला मिळत नाही अशा वेळी

मीसुद्धा जुन्या साहित्याकडं वळतो. खरं सांगायचं तर साहित्यात जुनं आणि नवं असं काही असत नाही. केवळ काळाच्या अपेक्षेनं हे शब्द आपण योजतो. ज्ञानेश्वराचे अभंग कोणत्या अर्थानं "जुने" आहेत ? आणि कुसुमाग्रजांची कविता कोणत्या दृष्टीनं "नवी" आहे ? आपल्या सोयीसाठी आपण हे शब्द वापरतो. एके दिवशी अत्यंत विमनस्क अवस्थेत मी होतो. त्या दिवशी माझा एक कलावंत मित्र एका अपघातात मरण पावला होता. जगण्यासाठी त्याच्याजवळ कितीतरी सुंदर सामुग्री होती. कलावंताचं जिवंत मन असलेला हा भाबडा हळवा माणूस अचानक एका मोटार अपघातात ठार झाला. सबंध दिवसभर मी अस्वस्थ होतो. रात्री कपाटातलं हेमिंग्वेचं "द ओल्ड मॅन अँड द सी" हे छोटेखानी पुस्तक बाहेर काढलं. त्याच्यावरची धूळ झटकली आणि ते वाचायला सुरुवात केली. पुस्तकावरची धूळ ज्याप्रमाणं मी झटकली त्याप्रमाणं माझ्या मनावर साचलेली दु:खी, निराश विचारांची धूळ त्या पुस्तकानं झटकून टाकली. पहिल्या दोन-तीन पानांतच त्या छोट्या कादंबरीनं मला आपल्या जबरदस्त आकर्षणपाशात घट्ट बांधून टाकलं. हेमिंग्वेचे ते शब्द माझ्या चित्तवृत्ती पेटवू लागले.

अर्नेस्ट हेमिंग्वे हा एक विलक्षण प्रतिभेचा मिजासखोर लेखक होऊन गेला. जितक्या कौशल्यानं त्यानं लेखणी चालवली तितक्याच चातुर्यानं बंदूकही चालवली. बंदुकीच्या गोळीप्रमाणेच त्याच्या लेखणीतून निघालेले शब्द गोळीबंद असायचे. ते जणू सणसणत बाहेर पडायचे. शब्दात जोम येण्यासाठी शब्दांच्या मागे उभं असलेलं व्यक्तिमत्त्व जोमदार असावं लागतं. बुळबुळीत वृत्तीच्या लेखकानं सारा शब्दकोश पाठ केला तरी त्याच्या शब्दांत जिवंतपणा कसा बरं येईल ?

हेमिंग्वे हा स्वत:ला झोकून देणारा ("झोकून" अनेकवेळा हा पडलाही होता) रंगेल आणि रंगेल, उनाड आणि उदात्त असा माणूस होता. एका मनस्वी आणि स्वच्छंदी भटक्या माणसाचं अनेक रंगांनी रंगलेलं कलंदर आयुष्य तो जगला होता. तो साहसी, पुरुषार्थी होता. साहजिकच त्याची ही जीवनदृष्टी त्याच्या साहित्यातून प्रकट झाली आहे. "दी ओल्ड मॅन अँड दी सी" ही कादंबरी याच बलदंड वृत्तीनं भारलेली आहे. एक म्हातारा कोळी देवमाशाची शिकार करण्यासाठी अथांग सागरात आपली होडी ढकलतो. त्याला सामान्य मासे नको होते. देवमाशाला जिंकण्याचे धाडसी मनसुबे मनात रचून हा काटक म्हातारा होडी वल्हवीत कित्येक मैल अंतरावर गेला. पोटात अन्न नव्हतं. तहानेनं त्याला शोष पडला होता. पण मागं फिरायचं नाही हा त्याचा बाणा होता. त्याच्या थकलेल्या हाडात अजूनही खवळलेल्या लाटांबरोबर झुंजण्याची आणि सागरावर मात करण्याची जिद्द होती. कधी न सापडलेला महाप्रचंड देवमासा आज आपण मिळवायचा या आकांक्षेनं रोमरोमांतून पेटून निघालेला हा कणखर आशावादी म्हातारा पुढेपुढेच चालला होता. देवमासा मिळण्याचे चिन्ह दिसत नव्हते. उपाशी पोट कुरकुरत होतं. थकलेले हातपाय होडी मागे घेण्याचा सल्ला देत होते. पण हटवादी मन परतायला तयार नव्हतं. तो तसाच होडी वल्हवीत पुढे चालला.

एकाएकी प्रचंड खळबळ झाली. म्हाताऱ्याच्या जाळ्यात तो महाकाय देवमासा सापडला होता. आपल्या बुलंद मुसंडीनं जाळं तोडून तो सहज सुटून गेला असता, पण आता म्हाताऱ्याच्या हातात वज्राचं बळ आलं. जिवाची शर्थ करून हातातल्या भाल्यानं देवमाशाला त्यानं तास-दोन तासांत झुंजून ठार केलं. ते धूड होडीला बांधून विजयोन्मादाने तो परतू लागला. आज त्याच्या जाळ्यात कधीच न सापडलेला आणि आपल्या शेपटीच्या तडाख्यानं मोठमोठ्या होड्या उलथून टाकणारा महाबलिष्ठ देवमासा त्याच्या पराक्रमानं सापडला होता. किनाऱ्याकडं परतताना शार्क माशांच्या टोळीनं त्या देवमाशावर हल्ले चढवले. ते त्याचे लचके तोडू लागले. त्यांच्याशीही म्हाताऱ्याला झुंजावं लागलं. तो परतला आणि उन्मादानं आरोळी ठोकून म्हणाला, ''अरे, मी देवमाशाची शिकार केली. तुम्हाला ते कधी जमलं नाही. पणं आज मी तो पराक्रम केला. मी देवमासा पकडला.'' पण म्हाताऱ्याला हे समाधान फार वेळ मिळालं नाही. देवमाशाचं बहुतेक मांस शार्क माशांनी मटकावलं होतं. आता उरला होता तो त्याच्या हाडांचा प्रचंड सांगाडा. देवमासा जाळ्यात सापडूनही आणि त्याची शर्थीनं शिकार करूनही तो मिळाल्याचा आनंद उरला नव्हता. म्हातारा थोडासा हसला. पुन्हा एकदा हा प्रयत्न करायचा असं म्हणून तो निघून गेला.

बस्स! इथं कादंबरी संपली. पण यातून हेमिंग्वेला काय सांगायचं आहे? अतिबलाढ्य, क्रूर नियती आणि दुबळा महत्त्वाकांक्षी माणूस यांच्यात हजारो, लाखो वर्षांपासून कधीच न संपणारं एक सनातन व चिरंतन द्वंद्वयुद्ध चालू आहे. नियती जबरदस्त असेल, पण दुबळ्या माणसातही अदम्य आकांक्षेची आणि संघर्षशीलतेची ज्वाला पेटलेली आहे. जयिष्णू वृत्तीनं तो माणूस आपल्या प्रारब्धाशी झगडत आहे. निष्ठुर नियती त्याला हुलकावण्या देत असली आणि त्याचा तेजोभंग करीत असली तरी एक क्षण असा येणार आहे की दुर्बल वाटणारा माणूस नियतीला पराभूत करून विजयाच्या सिंहासनावर निश्चित बसणार आहे, असं तर हेमिंग्वेला सुचवायचं नाही ना? ते काहीही असो, पण या छोट्या कादंबरीनं माझ्या मनातलं वैफल्य आणि उद्विग्नता पार धुवून टाकली. मी पुन्हा ताजा टवटवीत झालो आणि मनाशी म्हणालो, जगण्या-मरणाचा खेळ तर अखंड चाललेलाच आहे. मरण्याच्या जाळ्यात आपण सापडायचं नाही. नियतीनं जाळं टाकलं तरी ते तोडून, फेकून द्यायचं आणि जीवनाच्या अथांग सागरात स्वैर संचार करायचा. हेमिंग्वेला कदाचित हीच भूमिका अभिप्रेत असेल. त्याच्या कादंबरीनं मला झपाटून टाकलं हे मात्र खरं! अशी मंत्रमुग्ध करणारी, गदगदा हलवणारी, हृदयाच्या हृदयाला कडकडून दंश करणारी, आनंदाच्या आणि उन्मादाच्या अस्मानात बेहोष भराऱ्या घ्यायला लावणारी, हसवणारी आणि रडवणारी, जीवनाचा सुगंध उधळणारी, नाना प्रकारची पुस्तकं वाचण्यात आणि त्यांच्या माध्यमातून महान लेखक कवींच्या अंतरंगाला भिडण्यात केवढा तरी आनंद सामावलेला आहे. अशी पुस्तकं जगण्याचा अर्थ सांगतात. जगण्याला एक सुवासिक स्पर्श देतात.

ललित आणि वैचारिक साहित्यातून मिळणारे अनुभव वैशिष्ट्यपूर्ण तर असतातच, पण त्यांतून काही नव्या प्रेरणा वाचकाला आवाहित करतात. जीवन कसं आहे एवढंच सांगणं हे पुस्तकाचं काम नाही. ते कसं असावं हेही समर्थपणानं सांगणारी पुस्तकं आपल्याला जगण्याची हिंमत देतात. माणुसकीचा पक्ष घेऊन उभी राहिलेली, न्यायाचा जयजयकार करणारी, माणसाच्या पायांतले साखळदंड तोडायला दंड थोपटून उभी राहिलेली काही बंडखोर पुस्तकं मी जेव्हा वाचतो तेव्हा माणसावरचा विश्वास वाढायला लागतो. पुस्तकं वेळ घालवण्यासाठी वाचायची ही हास्यास्पद कल्पना मला चुकीची वाटते. पुस्तकं आपल्याला घडवतात. काही वेळा उद्ध्वस्तही करतात. पुस्तकं म्हणजे प्रतिभावंतांची, विचारवंतांची फुललेली स्वप्नं असतात. या स्वप्नांतूनच उद्याचं वास्तव जन्माला येत असतं. फुले - आगरकरांचे निबंध, ग्यानबा - तुकारामाच्या स्वप्नांचाच वारसा सांगत अवतीर्ण झाले. म्हणूनच जगातल्या सौन्दर्यपूर्ण वस्तूंत मी तरी पुस्तकांचा समावेश करतो. अशी पुस्तकं आनंदही देतात आणि दुःखही देतात. दुसऱ्यांच्या दुःखानं दुःख करण्यासाठी मन व्यापक आणि उदार व्हावं लागतं. ही किमया पुस्तकं करीत आली आहेत. पुस्तकांचा अवीट सुगंध मनाच्या गाभाऱ्यात दरवळत राहिला म्हणजे जीवनाची सतार मस्त झंकारत राहते.

□□□

# १५. काळपुरुषाची भेट

आणखी एक वर्ष उलटून गेले. पण यात आश्चर्य कसले? दिवसामागून दिवस आणि वर्षामागून वर्षे अखंड वेगाने धावत आहेत. कालचक्राची गती कधीच कुंठित होत नाही. हा असा खळखळता प्रवाह आहे की ज्याला कोणीही बांध घालू शकत नाही. हे रहाटगाडगे चालूच राहणार. कोणी चक्रवर्ती राजा येतो आणि गर्वाने म्हणतो, "मी माझ्या नावाची मुद्रा या काळावर ठोकणार आहे. काळाला कलाटणी देणारा मी पराक्रमी पुरुषोत्तम आहे. मीच तो युगंधर. काळही ज्याच्यासमोर अवनम्र होतो तोच मी. महाकाल आहे." पण या साऱ्या वल्गना आहेत. अर्थाचा आधार नसलेले केवळ शब्द आहेत. काळावर सत्ता गाजवण्याचा प्रयत्न अनेकांनी केला. कोणाच्या मुठीत राहण्याइतका हा कळिकाळ तुम्हाला क्षुद्र वाटला काय? काळाच्या या अतिबलाढ्य वेगवान ओघाबरोबर आजपर्यंत शेकडो, हजारो साम्राज्ये अशी वाहून गेली की इतिहासाला त्यांचा ठावठिकाणाही माहित नाही. स्वत:ला सामर्थ्याचे आणि सत्तेचे मेरुमणी समजणारे शूरवीर राजेमहाराजे आज कोठे गेले? पाहता पाहता त्यांचे मुकुट आणि सिंहासने या अदम्य लोंढ्याबरोबर वाहात जाऊन कोणत्या किनाऱ्याला लागली? कुठल्या चिखलात फसली कुणास ठाऊक? या कालचक्राला विश्रांती नाही. त्याचे भ्रमण अविराम चालूच आहे. ते चालूच राहणार आहे. आम्ही मूर्ख माणसे असे समजतो की, हा काळ आमचा आहे. आम्ही त्याला घडवू शकतो. आम्ही त्याला अडवू शकतो. पण आमच्या हे लक्षात येत नाही की तो काळ आम्हाला तुडवू शकतो, रडवू शकतो आणि बुडवू शकतो. पण माणसे एका मूर्ख कल्पनाविलासात हरवून गेली आहेत. खवळलेल्या सागराची उचंबळती लाट जशी धरून ठेवता येणार नाही त्याप्रमाणेच असंख्य उदग्र लाटांनी हेलकावणारा हा प्रचंड काळसमुद्र रोखण्याची आणि त्यावर स्वामित्व गाजवण्याची कोणाची बरे हिंमत आहे?

अनंत काळाकडे आम्हाला नीटसा दृष्टिक्षेप करता येत नाही म्हणून आम्ही आमच्या सोयीसाठी काळाचे तुकडे पाडण्याचा प्रयत्न केला आहे. अकरावे शतक,

विसावे शतक असे त्याला संबोधताना आपण काळालाही मोजू शकतो असा एक गोड भ्रम आमच्या मनात आहे. एकोणिसशे नव्वदपूर्वी लक्षावधी वर्षे आणि नंतर कोट्यवधी वर्षे हा काळ होता व राहणार आहे. त्याने असंख्य सूर्य उगवताना आणि मावळताना पाहिले आहेत. जेव्हा सूर्य-चंद्र नव्हते, तेव्हाही काळपुरुष अस्तित्वात होता. तो अनादि आहे, तो अनंत आहे आणि तो अखंड आहे. एका चक्रवर्ती सम्राटाची अशी गोष्ट सांगतात की, त्याने षट्खंड पृथ्वी जिंकली. आपला अभूतपूर्व पराक्रम कुठेतरी नोंदवला पाहिजे म्हणून त्याने एक शिलालेख खोदण्याची आज्ञा केली. त्या शिलालेखात आपल्या नावाचा गौरवपूर्वक उल्लेख व्हावा ही त्याची इच्छा होती. सम्राटाचीच आज्ञा ती! लेख खोदण्याचे काम सुरू झाले. सम्राट आनंदात होता. आपल्या शौर्याचा त्याला उन्माद चढला होता. आपल्यासारखा महापराक्रमी या साऱ्या पृथ्वीतलावावर दुसरा कोणीही नाही ही जाणीव त्याच्या श्वासनि:श्वासातून लहरत होती. आपल्या ऐश्वर्याचा आणि सत्तेचा मद त्याला चढलेला होता. दरबारातले भाट त्याची स्तुतिस्तोत्रे गात होते. त्याच्या मस्तकावर छत्रचामरे ढाळली जात होती. अनेक लावण्यवती नृत्यांगना त्याच्यासमोर नृत्य करीत होत्या. त्यांच्या पायांतल्या नूपुरांचा झंकार कानांना सुखवीत होता. त्या नर्तकींच्या केशकलापातल्या सुगंधी पुष्पांचा दरवळ दरबारात कोंदला होता. मादक सौंदर्याने आणि तारुण्याने मुसमुसलेल्या नर्तकींच्या अंगचेष्टितांनी, सूचक कटाक्षांनी सम्राट प्रतिक्षणी घायाळ होत होता. एका प्रमत्तयौवना ललनेने सुवर्णचषकात फसफसणारी मदिरा ओतली आणि लाडिक आविर्भाव करीत तिने तो चषक सम्राटाच्या हाती दिला. चषकातली वारुणी लालसर होती. पण या वारुणीपेक्षा त्या तरुणीच्या ओठावरची आरक्तमदिरा त्याला आरक्त बनवीत होती. त्याने मनात म्हटले,

"माझ्यासारखा संपन्न, पराक्रमी आणि सुखी आजपर्यंत कुणी झाला असेल का? मूर्तिमंत काळ देखील माझ्या शौर्याला वचकून आहे. या काळाच्या कपाळावर माझ्या व्यक्तित्वाची आणि कर्तृत्वाची नाममुद्रा मी माझ्या हाताने कोरून ठेवली आहे. काळाचा हात कितीही समर्थ असला तरी माझे नाव त्याला पुसता येणार नाही. मी म्हणजे शौर्यधैर्याचा मुकुटमणी आहे. मी म्हणजे राज्यलक्ष्मीचा कंठमणी आहे. मी साऱ्या जगाचा चिंतामणी आहे. तो काळपुरुष माझ्या चरणाशी आज लोटांगण घेत आहे. तो माझा दासानुदास बनला आहे."

तरुणींच्या सहवासात आणि वारुणीच्या स्पर्शात भान हरवून बसलेला हा सम्राट आता तृप्त झाला होता. मदिरेच्या नशेत तो गाढ झोपी गेला. स्वप्नातही त्याच्या गालांवर सौंदर्यवतींचे सुगंधी श्वास लहरत होते. आपला जयघोष तो झोपेतही ऐकत होता. पण उत्तररात्री त्याला एक चमत्कारिक स्वप्न पडले. ज्याच्या डोळ्यांत कोटीकोटी सूर्यांची दीप्ती एकवटली आहे असा एक बलदंड, प्रचंड पुरुष खदखदा हसत त्याच्या समोर उभा राहिला. त्या तीव्र तेजाने सम्राटाचे डोळे दिपले. प्रखर प्रकाशाचे किरण

त्याला असह्य वाटू लागले. त्याने विचारले,

"तू कोण आहेस ? कशासाठी माझ्याकडे आला आहेस ? तुझी काय अपेक्षा आहे ? मला सांग. हा सम्राट तुझी कोणतीही इच्छा पूर्ण करू शकेल." तो प्रचंड पुरुष पुन्हा एकदा खदखदून हसला. हजारो मेघांची एकत्रित गर्जना व्हावी तसे त्याचे गडगडाटी हास्य होते. हसण्याचा आवेग ओसरल्यानंतर तो तुच्छतेने सम्राटाला म्हणाला,

"तोंडपुज्या कवींनी आणि दरबारातल्या लाचार भाटांनी स्तुतिस्तोत्रं गायिल्यामुळं तुझ्या बुद्धीवर भ्रमिष्ट कल्पनांचा फेस आला आहे. आपण काळालाही जिंकणारे महावीर आहोत. आपल्यासमोर ही पृथ्वी आणि काळ गुलाम आहेत, अशा उन्मत्त घमेंडीत तू वावरत आहेस. चषकातल्या मद्याची नशा घटकेपुरती असते. पण मेंदूत मुरलेल्या भ्रमाची धुंदी लवकर ओसरत नाही. शुद्धीवर ये आणि विचार कर. अरे, तू कोण ? तू कोण्या झाडाचा पाला ? तू कोणत्या बिळात राहणारा उंदीर ? तू कोणत्या जमिनीवरून सरपटणारा कीटक ? तू म्हणजे अफाट वाळवंटात पसरलेल्या वाळूचा एक नगण्य कण आहेस. दुर्बिण लावूनही तू दिसत नाहीस. माझ्या उदरात तुला मोजता येणार नाही इतक्या परार्धलक्ष वर्षांचा इतिहास साठला आहे. अरे, जेव्हा हे सूर्यचंद्र आणि तुमचे सारे ग्रह अजून जन्मालाही आले नव्हते तेव्हापासून मी ठामपणाने येथे उभा आहे आणि साऱ्या ज्ञात-अज्ञात विश्वावर माझी अधिसत्ता अखंड चालू आहे. अरे, तुम्ही माणसं तर आत्ता कुठे परवा परवा म्हणजे दहालक्ष वर्षांपूर्वी या तुच्छ मातीतून वर आलात आणि तोंडाला कसलेतरी रंग चोपडून नाचू लागलात. एखाद्या झुरळाने थोडा वेळ जमिनीवर तुरतुरावे आणि नंतर मरून पडावे तशीच तुमची गत आहे. मी कोण म्हणून तू प्रश्न विचारतोस ? मीच तो महाकाळ आहे. ज्याला जिंकण्याची बेताल बडबड तू अनेक वेळा केलीस तोच मी काळपुरुष आहे. तुमचे युगंधर राम आणि कृष्णसुद्धा मला जिंकू शकले नाहीत. ते आले आणि गेले. त्यांनाही माझ्या पोटात सामावून घेतले. आणि वेड्या माणसा, काही दिवसांत तू सुद्धा माझ्या प्रचंड जबड्यात विलीन होऊन जाणार आहेस. मी अजिंक्य आहे. मला जिंकण्याची भाषा तुमच्यासारख्या क्षुद्र लोकांनी असंख्य वेळा केली असली तरी त्याचा काहीही परिणाम होणार नाही. शिलालेखावर आपलं महान नाव खोदण्याचा निरुद्योग चालू आहे. अज्ञानी कीटका, हे पहा, या पर्वतावर लाखो शिलालेख पसरलेले आहेत आणि प्रत्येक शिळेवर हजारो नावे खोदली आहेत तुझेही एक नाव आता तू खोदून ठेवीत आहेस. फक्त खोदण्याचे परिश्रम होणार. वाचणार कोण ? या पाषाणावर शतशतकांची धूळ पसरते आणि निर्जीव नावे पुसली जातात. गाडली जातात. ती कुणाच्या लक्षातही येत नाहीत. काही लाख वर्षे प्रकाश देणारे पण पुढे मरून गेलेले हजारो सूर्य मी गिळंकृत करून बसलो आहे. तुझा काय पाड ? एखादा मशक मला जिंकण्याची वल्गना करतो तेव्हा मला हसू येतं. तुम्ही माणसं किती महामूर्ख आहात ?" काळपुरुष पुन्हा गडगडाट करीत हसला व अदृश्य झाला.

सम्राट खडबडून जागा झाला. त्याचं सर्वांग भयानं थरथरत होतं. आता त्याचा उन्माद पार ओसरला होता. आता लावण्यवतींनी आपल्या कोमल हातांनी सुवर्ण-चषकात ओतलेली सुवर्णमदिरा त्याला आठवत नव्हती. नृत्यांगनांच्या पायांतल्या नाचऱ्या घुंगरांचा नाद त्याला ऐकू येत नव्हता. त्यांच्या विलोल नेत्रांतले ललित आव्हान आता त्याला दिसत नव्हते. भाटचारणांचे चाटुशब्द त्याला खुलवीत नव्हते. त्याच्या भेदरलेल्या दृष्टीसमोर तो महाकाय महाकाळ उभा होता. जे जे दिसेल आणि जे जे असेल ते आपल्या विक्राळ दाढांखाली रगडीत बसलेला तो सर्वसंहारक सर्वभक्षक काळ त्याच्या दृष्टीसमोरून हलत नव्हता. शयनमहालातून तो बाहेर आला. सेवकांनी त्याचा जयजयकार केला. चारणकवी काव्यातून त्याचा महिमा गाऊ लागले. "हे राजाधिराजा, पृथ्वीवल्लभा, पराक्रमभास्करा, षट्खंड भूमीवर आणि महासागरावर स्वामित्व मिरवणाऱ्या पुरुषोत्तमा, तुझा सर्वकाळ विजय असो. भूतकालात तुझ्यासारखा बाहुबली झाला नाही. वर्तमानकाळात तुझ्यासारखा नरपुंगव नाही. आणि भविष्यकाळात तुझ्याशी तुलना करता येईल असा कोणीही वीरोत्तम निर्माण होणार नाही. प्रत्यक्ष काळपुरुषही तुझ्या पायाशी विनम्र होऊन प्राणभयाने तुझी प्रार्थना करील अशी तुझी योग्यता आहे. काळाच्या अतिविशाल सागरावरची प्रत्येक लाट तुझ्या पुरुषार्थाचे उद्गान करीत आहे. सूर्यचंद्राचा प्रत्येक किरण तुझ्या मस्तकावर प्रेमाच वर्षाव करीत आहे. जगाच्या उद्यानात फुललेले प्रत्येक फूल तुझ्या कीर्तिसुगंधाने सुवासिक झाले आहे. हजारो प्रमत्त यौवनासुंदरी तुझ्या कृपाकटाक्षासाठी सदैव आतुर असतात. सृष्टीतले सारे ऋतू तुझ्याच भोवती आनंदाने प्रदक्षिणा घालीत आहेत. तू महाकाव्यांची प्रतिभा आहेस. तू नादब्रह्माचा प्राण आहेस. चराचर विश्वाचे तू त्राण आहेस. चंद्रसूर्य असेपर्यंत तू या पृथ्वीचा उपभोग घे. राजाधिराजा ! तुझा जयजयकार असो."

सम्राटाच्या मुद्रेवर एक केविलवाणी स्मितरेषा उमटली. तो कमालीचा विषण्ण झाला. स्तुतिपाठ करणाऱ्या कवींना तो म्हणाला,

"अरे चारणभाटांनो, काव्यात अतिशयोक्तीला स्थान असावे हे मी मान्य करतो. पण अतिशयोक्तीचे टोक किती ताणावे हे तुम्हाला समजत नाही. मी तुम्हाला कसा बरे दोष द्यावा ? कारण मीच अतिशयोक्त कल्पनेच्या आणि भ्रमाच्या जंजाळात गळ्यापर्यंत बुडालो होतो. अवास्तव स्वप्नांची झापडे लावून मी स्वतःकडे आणि जगाकडे पाहात होतो. तुम्ही तर काही सुवर्णमुद्रांसाठी भडक आणि भंपक शब्दांची रंगीबेरंगी फुले माझ्यावर उधळीत आहात. त्या शब्दांतून तुमचे अंतःकरण बोलत नाही. हृदयाच्या खाली असलेले ते बापडे पोट तुमच्या ओठांतून शब्दांचे तांडव करीत आहे. तुमच्या दृष्टीने मी आज सम्राट आहे. उद्या दुसरा कोणी असेल. सम्राट बदलतात, पराभूत होतात किंवा पदभ्रष्ट होतात, पण तुम्ही तसेच राहता. तुमच्या खोट्या, दांभिक शब्दांचे नाटक रंगतच असते. व्यक्तीवर पडदा पडतो पण तुमच्या प्रशंसानाट्यावर पडदा पडत नाही. मला आता या ढोंगाची शिसारी आली आहे. तो काळपुरुष आज

मी माझ्या डोळ्यांनी पाहिला. मी किती क्षुद्र आहे, कसा क:पदार्थ आहे याची जळजळीत जाणीव त्याने मला करून दिली. जा ! कवींनो आणि भाटांनो, तुमचे हे अफाट स्तुतीचे शब्द दुसऱ्या कोणा मूर्खाच्या मस्तकावर खुशाल उधळा. आज एका विदारक सत्याचे धगधगीत दर्शन मी घेतले आहे. त्या काळपुरुषाची भेट झाल्यामुळे माझे सगळे भ्रम वितळून गेले आहेत. कुठल्यातरी नगण्य झाडाचे मी एक वाळलेले पान आहे. आजचे पान म्हणजे उद्याचा पाचोळा असतो. आजचा जन्म उद्याच्या मृत्यूत परिवर्तित होतो. पाचोळ्यावर पाचोळ्याची भर पडते आणि साराच पाचोळा त्या काळपुरुषाच्या पायाखाली दडपला जातो. मला आता काळपुरुषाच्या भेटीमुळे सारे रहस्य समजले आहे. ''

सम्राटाने कंठातली अमोल वैजयंतीमाला खसकन ओढून फेकून दिली. अंगावरची भरजरी वस्त्रे त्याने क्षणार्धात फाडून टाकली. राजप्रासादाच्या बाहेर रस्त्यावर येऊन तो उभा राहिला. क्षणभर त्याने आपल्या महालाकडे एक दृष्टिक्षेप केला आणि वाट फुटेल तिकडे तो चालत राहिला. काळपुरुषाची भेट झाल्यानंतर एका आमूलाग्र परिवर्तनाच्या विराट पंखांवर आरूढ झालेला तो सम्राट, अज्ञाताच्या अभूतपूर्व पराक्रमाची ध्वजा फडकावण्याची लालसा असलेला तो चक्रवर्ती अनवाणी पायांनी चालत होता. पाषाणावर खोदलेली नावे समर्थ काळपुरुष आपल्या क्रूर कराल हातांनी सहज ओरबाडून काढतो याचे भान आता त्याला आले होते. पण तरीही त्याच्या हृदयातल्या हृदयात काळाला पराजित करण्याची एक ऊर्मी उचंबळत होती. सत्तेने आणि संपत्तीने नव्हे, शस्त्राने आणि शास्त्राने नव्हे किंवा पौरुषाने आणि पराक्रमाने नव्हे, तर अंत:करणातल्या निर्मळ, कल्याणकारक धर्मभावनेनेच आपण त्या महाकाळाला जिंकू शकतो असे त्याला वाटत होते. तो चालत राहिला. काळपुरुषाशी त्याचा संघर्ष चालूच राहिला.

□□□

# १६. प्रकाशवेड्या पतंगाची कहाणी

रामायणातल्या सीतेला रामचंद्राने आपल्या शुद्धतेची ग्वाही देण्यासाठी अग्निदिव्य करायला सांगितल्याची कथा आहे. सीतेने बेदरकारपणे त्या भडकत्या ज्वालांत उडी घेतली. पाहता पाहता ज्वाला विझून गेल्या. सीतेसारख्या पवित्र व्यक्तित्वाला त्या स्पर्श करू शकल्या नाहीत. जाळण्याची त्यांची शक्ती संपून गेली. ही कथा मला तरी अद्भुत वाटत नाही. या रूपकात्मक कथेचा अर्थ नीट समजून घेतला पाहिजे. शुद्ध व्यक्तित्वाला जाळून टाकण्यासाठी अनेक प्रकारच्या संकटांचे वणवे पेटलेले असतात. या वणव्याशी समर्थ सामना करीत काही व्यक्तित्वसंपन्न माणसे जमिनीवर पाय रोवून ठाम उभे राहतात. आग पचवण्याची, होरपळूनही टवटवीत राहण्याची विलक्षण अदम्य शक्ती त्यांच्या नसानसांत खेळत असते. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अलौकिक आयुष्याचा विचार करताना मला सीतेच्या अग्निदिव्याची साहजिकच आठवण झाली.

सावरकर हे एक प्रतिभावंत कवी होते. उत्कट भावनेने रसरसलेली त्यांची कविता त्यांच्या आयुष्याची रोमहर्षक कथा आणि व्यथा सांगून जाते. एका कवितेत ते म्हणतात,

'जे दिव्य दाहक म्हणूनि असावयाचे
बुध्याचि वाण धरिले करि हे सतीचे'

दिव्य आणि दाहक यांचे आकर्षण असलेला ज्वलंत मनाचा हा जिवंत कवी पेटत्या ज्वालांच्या तांडवात स्वत:चे जीवन हसतमुखाने लोटून देतो. यात एक प्रकारची खिळून टाकणारी जादू आहे. धैर्य आणि त्याग, आपत्ती आणि दु:ख, साहस व पराक्रम, महत्त्वाकांक्षा आणि दुर्दैव अशा विविध आणि विचित्र रंगांनी रंगलेली एक स्तिमित करणारी कहाणी म्हणजे विनायक दामोदर सावरकर. सावरकरांच्या राजकीय विचारसरणीबद्दल मतभेद असू शकतील, पण त्यांच्या स्वातंत्र्यप्रेमाबद्दल, ध्येयवादाबद्दल, उज्ज्वल राष्ट्रभक्तीबद्दल कोणालाही कणभरही शंका घेता येणार नाही. या माणसाने आपल्या सर्वस्वाची होळी केली ती अन्यायी पारतंत्र्याविरुद्ध लढण्यासाठी !

पतीच्या चितेवर सतीने अतुल शांतीने जळत राहावे तसे सतीचे वाण घेतलेल्या सावरकरांचे आयुष्य आहे. रोमँटिक प्रवृत्तीचे अनेक गुणधर्म त्यांच्यात सामावले होते. त्यांच्या आत्मचरित्रातली एक घटना –

ब्रिटिश सरकारने पन्नास वर्षे काळ्या पाण्याची शिक्षा या तरुणाला ठोठावली आहे. सत्तावीस - अठ्ठावीस वर्षांचा हा तेजस्वी तरुण भायखळ्याच्या तुरुंगातल्या एका अरुंद कोठडीत जखमी वाघासारखा येरझारा घालीत आहे. त्याला अखेरचे भेटण्यासाठी त्याची पत्नी आत्यंतिक व्याकुळ होऊन आली आहे. जीवनमृत्यूच्या सीमेवर उभा असलेला आपला पती आता पुन्हा कधीही दिसणार नाही या जाणिवेने आक्रंदत असलेली आपली पत्नी खिडकीशी उभी आहे हे पाहताच त्या तरुणाच्या मुद्रेवर एक स्मितरेषा उमटते. पतीशी दृष्टादृष्ट झाल्याबरोबर ती हुंदके देऊन रडू लागते. तिच्यावर आभाळ कोसळलेले असते. तिच्या पायाखालची धरणी दुभंग झालेली असते. तिचा सारा संसार दैवाने उद्ध्वस्त केलेला असतो. तिच्या स्वप्नांचा चोळामोळा होऊन ती आता सर्वार्थांनी एकटीच उरलेली असते. ती रडतच राहाते. हा तरुण धीरगंभीरपणे तिला म्हणतो,

"चार काटक्या एकत्र आणायच्या, घरटे बांधायचे आणि त्यात मुलाबाळांची वीण वाढवायची याला जर संसार म्हणत असतील तर असला संसार कावळे आणि चिमण्यासुद्धा करतात. पण संसाराचा याहून भव्यतर अर्थ घ्यायचा असेल तर इतरांच्या चुली नीट पेटाव्यात म्हणून आपल्या चुलीवरची गाडगी, मडकी फोडून टाकली पाहिजेत. कधीकाळी या क्षुद्र संसाराचा मोह पडला तर आपल्या मनाला हे समजावून सांगा, मणामणाच्या बेड्या पायांत पडलेला पण तरीही मनाने सदैव मुक्त असलेला हा तरुण आपल्या पत्नीशी या धीरोदात्त शब्दांतून हितगुज करीत होता. आणि त्याची पत्नी तशाही अवस्थेत आपल्या पतीच्या असीम धैर्याने हेलावून गेली. पन्नास वर्षे काळ्या पाण्यावर निघालेला हा तरुण परत येणे शक्य आहे काय? त्यालाही याची कल्पना आहे. तिला देखील हे कटुसत्य माहीत आहे. वाघाच्या जबड्यातला कोवळा ससा एखाद्यावेळेस जिवंत बाहेर येणे शक्य आहे. समुद्राने गिळलेला मोती कदाचित प्रयत्नाने बाहेर काढता येईल. पण अन्यायी, राक्षसी शक्तीने आपल्या अक्राळविक्राळ काटेरी पंजात पकडलेला हा कोवळा तरुण पुन्हा कोणाला दिसणे कसे शक्य आहे? पण म्हणून सावरकरांच्या मुद्रेवर भीती होती काय? दयेची केविलवाणी याचना करून आपण सरकारी कचाट्यातून सुटावे किंवा सरकारी चाकरी करून पोट भरावे अशी पोटभरू इच्छा या तरुणाच्या मनाला कधीतरी शिवणे शक्य आहे काय? येन केन प्रकारेण पोट भरणाऱ्या आणि वारा वाहील तशी पाठ देणाऱ्या नामर्दांच्या जातकुळीतला हा माणूस नव्हता. तो ताठ मानेने उभा राहिला. कितीही जबरदस्त लाट आली तरी ती आपल्या छातीवर घ्यायची आणि आपल्या वज्रबाहूंनी तिच्याशी झुंजत राहायची बलवत्तर इच्छा त्याच्या धमन्यांतून जन्मभर उचंबळत राहिली. माझ्या दृष्टीने सावरकर

हा एक महाकाव्याचा विषय आहे. अलीकडे महाकाव्ये निर्माण होत नाहीत. दोनचार निरर्थक ओळी प्रसवल्या की कवीची क्षीणबल प्रतिभा पार थकून जाते. टॉनिक्स घेऊनसुद्धा ती आपल्या पायांवर उभी राहू शकत नाही. महाकाव्याला चालना मिळावी असे कितीतरी विषय आपल्या देशात पसरलेले आहेत. सावरकर, सुभाषचंद्र यांच्यासारख्या पौरुषपूर्ण व्यक्तित्वाबर एखाद्या कवीची प्रतिभा का अनुरक्त होत नाही ? गरुडावर प्रेम करायला प्रतिभेचे पंख गरुडाचेच असावे लागतात. सावरकरांच्याच एका कवितेत एक गमतीदार कल्पना आली आहे. कोणाच्या तरी शापाने कावळ्याच्या पोटी जन्म घेतलेली गरुडप्रवृत्तीची एक पक्षिणी आपल्या मूळ स्वभावाप्रमाणे एका गरुडावर आसक्त होते. उष्ट्या अन्नाचे कण गोळा करीत बसलेली कावळ्यांची प्रकृती तिला तिरस्करणीय वाटते. एका गगनभेदी गरुडाच्या पराक्रमावर ती लुब्ध होते. आणि त्याच्या प्रणयसंगमाची स्वप्ने पाहू लागते. परिस्थितीपुढे हतबल झालेल्या भेकड जनतेने आपल्या मूळ पराक्रमी प्रवृत्तीला भिडले पाहिजे अशी जळजळीत शिकवण देणारी ही कविता सावरकरांच्या उग्र, मनस्वी, पुरुषार्थी, महत्त्वाकांक्षी व्यक्तित्वाची द्योतक आहे. असली कविता केवळ सावरकरांनाच सुचणे शक्य आहे. मिळमिळीत लेखणीतून फार तर गुळमुळीत शब्द सांडतात. पण जळजळीत मनाची लेखणी निखाऱ्यासारखे रसरसलेले शब्द सहजपणे लिहून जाते. सावरकरांची पुष्कळशी कविता अशीच आशेची आणि शौर्याची आहे. एका कवितेत तर त्यांनी शत्रूला - साक्षात मृत्यूला - आव्हान देऊन म्हटले आहे,

'अनादि मी, अनंत मी, अवध्य मी भला
मारिल रिपु जगति असा कवण जन्मला ?'

आपल्याला कोणीच मारू शकत नाही. कोणीही मला पराजित करू शकत नाही. कारण मी तर अजित आहे. मृत्युंजय आहे. अनादि आणि अनंत आहे. असे प्रचंड आत्मबल ज्या मनात ओथंबलेले होते त्या मनातून ही कविता एखाद्या वावटळीसारखी प्रकट झाली आहे. धगधगणाऱ्या अग्निकुंडासारखी ज्वलंत कविता आणि जीवन हे सावरकरांचे एक रूप आहे. पण त्याबरोबरच या कवीचे आणखी एक सुंदर कोवळे प्रणयविलासी रसिकतेने नटलेले व कल्पनेने फुललेले दुसरे एक लोभस रूप आहे. सावरकरांच्या कवितेत आणि जीवनात बंदुकीच्या गोळीची दाहकता आणि कठोरता जशी आहे त्याप्रमाणेच फुलांची कोमलताही आहे. म्हणूनच मला हा कवी विशेष आवडतो. त्यांचे एक विलक्षण आवेशपूर्ण भाषण मी ऐकले होते. त्यांचे शब्द विस्तवासारखे होते. ते ऐकताना पोटातून अनेक विचारांचा जाळ उठत आहे असे वाटत होते. पण त्याच भाषणात त्यांचे काही शब्द आणि विचार चांदण्याचा सुगंध घेऊन भिरभिरत आले होते. हे रूप देखील मनाला मुग्ध करणारे होते. त्यांच्या जीवनात वीररसाची उचंबळ आहेच; पण शृंगार आणि प्रणय, भक्ती आणि उदारता या रसभावनांचाही प्रत्यय येतो.

अंदमानच्या अंधारकोठडीत जबरदस्तीने जेरबंद करण्यात आलेला हा तरुण कवी आपल्या कल्पनेचे पंख फुलवून प्रणयाच्या उपवनात भरारी घेतो हे खरे वाटेल का ? पायांत तर बेड्या पडल्या आहेत. दिवसभराच्या सक्तीच्या कष्टाने थकवा आला आहे. कोठडीतले वातावरण कुबट आणि अंधारलेले आहे. मृत्यू त्या वातावरणात दबा धरून बसला आहे. मरणाची उपेक्षा करून हा तरुण शृंगाराची कविता गुणगुणू लागतो. त्याच्या दृष्टीसमोर कमला नावाची एक नवयौवना लावण्यवती उभी राहते. तिचा संगमोत्सुक पती तिला प्रणयाचे आवाहन करू लागतो. सावरकरांच्या हृदयातली प्रतिभेची सतार छेडली गेली. प्रेमभावनेचे मादकमोहक सूर उमटू लागले. जमिनीवर पडलेल्या घायपाताच्या काट्याने अंदमानच्या अंधारकोठडीतल्या त्या निर्जीव भिंतीवर सावरकर शृंगाराची कविता लिहू लागले. तुरुंगाच्या भिंतीवर फार तर कैद्याचे अश्रू सांडलेले असतात. कुणाच्या रक्ताच्या चिळकांड्या उडतात, कुणी दुर्दैवी कैदी आपले मस्तक आपटण्यासाठी ह्या भिंतीचा उपयोग करतो. पण शृंगार, प्रेम आणि तारुण्य यांच्या उन्मादाने सळसळणारी कविता सावरकरांशिवाय कुणीही तुरुंगाच्या भिंतीवर लिहिली नसेल. "कमला" हे खंडकाव्य सावरकरांच्या जीवनात आणि मराठी काव्याच्या इतिहासात अपूर्व आहे यात काय संशय ? सावरकरांचे साहित्य मुर्दाडांच्या मनात मर्दुमकीचा संचार करील असेच स्फूर्तिदायक आहे. स्वतंत्रतेचे स्तोत्र लिहिणारा हा महाकवी स्वातंत्र्याच्या ध्यासाने जन्मभर जळत आणि उफाळत राहिला. त्यांचे सारेच साहित्य त्यांनी केलेली विविध आंदोलने, त्यांनी दिलेली व्याख्याने, फार काय त्यांचे समग्र आयुष्य म्हणजे ज्योतीचा ध्यास घेतलेल्या आणि आत्माहुती देण्यास सिद्ध झालेल्या प्रकाशवेड्या पतंगाची कहाणी आहे. ही कहाणी एका दिव्य बलिदानाची आहे. ती नीटपणे आणि धीटपणे समजून घेतली पाहिजे. काहीतरी पूर्वग्रह मनात ठेवून कोणत्याच व्यक्तित्वाकडे पाहू नये.

सावरकरांच्या आयुष्यातला आणखी एक प्रसंग – लालबहादुर शास्त्री त्यावेळी भारताचे पंतप्रधान होते. पाकिस्तानने आपल्या देशावर आक्रमण केले. त्या आक्रमणाचा प्रतिकार करून भारतीय सेनेने मुसंडी मारून लाहोर शहराला वेढा दिला. परकीय आक्रमण भुईसपाट झाले. रुग्णशय्येवर खिळून राहिलेल्या वृद्ध सावरकरांना ही बातमी कळवण्यात आली. त्यांच्या क्षीण डोळ्यांतल्या ठिणग्या लकाकू लागल्या. चेहऱ्यावर आनंदाचे किरण पसरले. विजयाचे हास्य चमकले. आपल्या स्वातंत्र्याचे संरक्षण पूर्णपणे करण्याइतकी आपल्या देशाची सेना कणखर आहे ही हर्षाची जाणीव सावरकरांच्या देहातून-मनातून दौडत गेली. गालावर आनंदाश्रू ओघळले. ते म्हणाले,

"लालबहादूर हा बहादूर आहे. भारताच्या या पंतप्रधानाला तारेनं माझ्या शुभेच्छा कळवा आणि त्यांचं अभिनंदन करा." देश स्वयंपूर्ण व्हावा, बलवान व्हावा त्याच्यातले कृत्रिम भेद नष्ट व्हावेत आणि जगातल्या राष्ट्रांत तो आपल्या पराक्रमाने दिग्विजयी व्हावा, त्याचे स्वातंत्र्य चिरकाल नांदावे, हीच त्यांची एकमेव इच्छा होती.

जन्मभर ते याच इच्छेने झगडत राहिले. पण संघर्षाच्या या आयुष्यात त्यांनी उदंड साहित्याची निर्मिती केली. सावरकर हे स्वातंत्र्याच्या इतिहासातले आणि साहित्याच्याही इतिहासातले एक सोनेरी पान आहे. सदैव हिरवे राहणारे हे पान आमच्या मनात आम्हाला ठेवायचे आहे. सावरकरांच्या काही वाटा आणि विचार विवाद्य असतील, पण त्यांच्या चारित्र्यातली, त्यांच्या कर्तृत्वातली अनेक निर्विवाद, श्रेष्ठ स्थळे अशी आहेत की, ती एकटक दृष्टीने पाहावीत. क्षुद्र मतभेदांचे भांडवल करून जगत राहिलेल्या क्षुद्र जीवांना भव्यतेतले जगणे काय आणि कसे असते हे कधीच कळत नाही. त्यांनी थोडा वेळ वळवळ करावी आणि नष्ट व्हावे. पण ज्या जगण्याच्या मागे उत्कट ध्येयवाद असतो त्या जगण्यातली आणि मरण्यातली उज्ज्वलता पुरुषोत्तमांच्या चरित्रात सापडते. आम्हाला कदाचित असले दिव्य जीवन जगता येणार नाही. पेलणारही नाही. पण काहीतरी घडवण्यासाठी स्वत:ला उद्ध्वस्त करणारी वेडी माणसे किती शहाणी असतात हे आम्ही वेड्यांनी समजून घेण्याचा शहाणपणा केला पाहिजे. यापेक्षा अधिक काय सांगू ?

□□□

# १७. रुपेरी पडद्यावरची स्वप्ने

गेल्या आठवड्यातली गोष्ट. मला मूर्खपणा करण्याची जबरदस्त लहर आली म्हणून मी एक हिंदी चित्रपट पाहण्याचं ठरवलं. थिएटरवर शेकडो लोकांची गर्दी उसळली होती. तिकीट कसं मिळवायचं हा प्रश्न पडला. पण त्या चित्रपटगृहाचा व्यवस्थापक मला ओळखत असल्यामुळं हा प्रश्न ताबडतोब सुटला. चित्रपटाला सुरुवात झाली तेव्हा प्रेक्षकांनी शीळ घालून, चीत्कार करून आपला आनंद प्रदर्शित केला. आपल्या आवडत्या नटनटींची छबी पडद्यावर दिसताच टाळ्या आणि शिट्या यांना ऊत आला. माझ्या शेजारी बसलेला एक प्रेक्षक आपल्या सहकाऱ्याला त्या नटनटींच्या चरित्राविषयी आणि चारित्र्याविषयी इतकी तपशीलवार माहिती देत होता की, तितकी माहिती स्वत: त्या नट-नटीलाही नसेल. एका बाजूला त्या "तज्ञ" प्रेक्षकाची कॉमेंटरी आणि समोर पडद्यावरची निरनिराळी दृश्यं यांचा मी "आस्वाद" घेत होतो. हा चित्रपट सुमार दर्जाचा होता असं विधानही मी करू शकत नाही. कारण त्यामुळे त्याला काहीतरी दर्जा होता असा अर्थ होईल. भिकार, अर्थशून्य, कसलीही संगती नसलेला, अकारण भडक आणि हाणामारीने भरलेला तो चित्रपट विलक्षण "रस" घेऊन प्रेक्षक पाहात होते. मधून मधून टाळ्या वाजवीत होते. कुणी उत्साही रसिक नायक-नायिकांना प्रेम कसं करावं याचं ओरडून मार्गदर्शन करीत होते.

मध्यंतराच्या वेळी व्यवस्थापकांबरोबर चहा घेताना मी म्हणालो, "कसला भिकार चित्रपट तुम्ही प्रदर्शित केलाय! मला तर वेळ फुकट घालवल्याचा पश्चात्ताप झाला."

व्यवस्थापकांनी म्हटलं, "या भिकार वाटणाऱ्या चित्रपटानं देशात उत्पन्नाचं रेकॉर्ड मोडलं आहे. गर्दी हटता हटत नाही. तुम्ही म्हणाल असं आहे तरी काय यात? अहो, यात नायिकेच्या स्नानांचा देखावा आहे. बलात्काराचं दृश्य आहे. तुफान हाणामारी आहे. नायक बाराव्या मजल्यावरून बेदरकारपणे जमिनीवर उडी घेतो आणि त्याला साधे खरचटतसुद्धा नाही. मद्यपानाच्या पार्ट्यांचे देखावे आहेत. प्रेमगीते आणि अनेक

गोष्टी आहेत."

मी म्हणालो, "पण यात कथानकाचा पत्ता नाही. कोणत्याही घटनेच्या मागे कार्यकारण नाही. यातली सतरा वर्षांची कोवळी नायिका हेलिकॉप्टर चालवते. खवळलेल्या समुद्रात उडी घेते आणि दहा-बारा मैल पोहत जाऊन किनाऱ्यावर उभ्या असलेल्या आपल्या प्रियकराला भेटते. ती गाते, नाचू शकते, अनेक प्रकारची वाद्ये सफाईने वाजवते. चार-पाच मस्तवाल गुंडांशी लढून त्यांना पळवून लावते. छे... छे! माझं तर डोकंच गरगरायला लागंलय!

चित्रपटगृहाचे ते चतुर व्यवस्थापक खळखळून हसले.

"असे चित्रपटच आम्हाला पैसा मिळवून देतात. घटकाभर करमणूक करून घेण्यासाठी लोक येतात. त्यांना असल्याच घटना आवडतात. सिनेमा पाहायला येताना तुम्ही डोकं घेऊन येता म्हणून तुम्हाला त्रास होतो. चित्रपट सुरू झाल्याची घंटा झाली. आता पुढचा भाग पाहण्याची मुळीच इच्छा नव्हती. पण मला प्रेक्षकांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करायचा होता. धीर धरून पुन्हा चित्र पाहू लागलो. सारे प्रसंग गडद रंगात दिग्दर्शकाने बुचकळून काढले होते. भडक कारुण्य, भडक प्रणय, सारी भडकलेली दृश्ये, प्रेक्षक मात्र श्वास आवरून पाहात होते.

मनोरंजनाचा गरम मसाला ठासून भरलेले चित्रपट सर्वसाधारण प्रेक्षकांना अत्यंत आवडतात याचे कारण काय असावे? मला वाटते, माणसाच्या ठायी एक प्रकारची पलायनवादी प्रवृत्ती असते. आजूबाजूच्या रूक्ष आणि तापदायक वास्तवतेच्या वातावरणातून एखाद्या रम्य, काव्यमय, अद्भुत सृष्टीत रममाण होण्याची त्याची धडपड असते. जेव्हा सत्य असह्य वाटू लागते तेव्हाच एखाद्या मायावी पण सुंदर कल्पनेच्या किंवा स्वप्नांच्या भोवती पिंगा घालण्याची वृत्ती मूळ धरू लागते. ही वृत्ती काहीशी दुबळेपणाची आहे यात शंका नाही. पण कोणत्यातरी मधुर कल्पनेचा क्लोरोफॉर्म घेतल्याशिवाय माणसाला आयुष्याची काटेरी वाट चालता येत नाही. नानाप्रकारच्या जीवघेण्या विवंचना आणि समस्या काही काळ विसरून जाण्यासाठी पडद्यावरची असंभवनीय दृश्ये या प्रेक्षकांना शक्य कोटीतली आहेत असे वाटत होते. स्टेशनवर हमाली करणारा एखादा गरीब तरुण थिएटरमधल्या काळोखात असे स्वप्न रंगवतो की, एक दिवस फर्स्ट क्लासमधून वातानुकूलित डब्यातून आपण आपल्या प्रेयसी-बरोबर, जी एका बड्या भांडवलवाल्याची सुशिक्षित मुलगी आहे - तिच्याबरोबर काश्मीरच्या प्रवासाला निघालो आहोत. दाल सरोवरातून नौकाविहार करताना एक प्रणयगीत गात आहोत. कोळशाच्या वखारीत काम करणारा पन्नाशी उलटलेला एक कामगार चित्रपट पाहताना आपल्या कल्पनेने एका भव्य, सुसज्ज बंगल्याचा मालक बनलेला असतो. आणि त्याच्या वास्तव सृष्टीतल्या मालकाला त्याने आपले बूट पॉलिश करण्यासाठी सांगितलेले असते. असली वेडी, विसंगत, सर्वस्वी अशक्य पण तरीही हवीहवीशी वाटणारी स्वप्ने थोडा वेळ या प्रेक्षकांनी विकत घेतलेली असतात.

तुफान ठोसेबाजी करुन दहावीस गुंडांना पळवून लावणारा आणि नंतर नायिकेबरोबर प्रणयरंग उधळणारा तो नायक आपणच आहोत किंवा ती अनुपम लावण्यवती, नृत्यनिपुण नायिका आपणच आहोत असे आभास काही वेळ का होईना, आपलेसे करण्यासाठी हे प्रेक्षक आलेले असतात.

माणसाला थोडी स्वप्ने पाहिजे असतात. पण स्वप्ने काही विकत मिळत नाहीत. कुणा झाडालाही ती लागत नाहीत. अंधारानं माखलेला, काळवंडून गेलेला आणि सतत बोचत राहिलेला वर्तमानकाळ तर आपल्याला विसरायचा आहे. विस्मृतीचे समाधान मिळवण्यासाठी चित्रपटाप्रमाणेच नृत्य - संगीत, नाटक, जादूचे खेळ किंवा केवळ रंजनासाठीच लिहिली गेलेली सवंग दर्जाची पुस्तके यांच्याकडे माणसे वळतात. पण केवळ फसवी आणि गुळचट स्वप्ने घेऊन आयुष्याचा प्रवास करता येत नाही. आपल्या भोवतालचे वास्तव केवळ विसरल्यामुळे आपण बदलू शकत नाही. दुबळी झालेली मने स्वप्नरंजनाच्या वाटेने जावीत हे स्वाभाविक असले तरी ते अनिष्ट आहे. कारण त्यामुळे वास्तवातल्या संकटाशी झगडून त्यावर मात करण्याची कणखर वृत्ती क्षीण होत जाते. आपले आयुष्य अर्थपूर्ण घडवण्यासाठी संघर्षशीलतेची जरूर असते. उगीच दोनचार हळवी आणि भाबडी, कणा नसलेली हास्यास्पद स्वप्ने घेऊन बसण्यात काय अर्थ आहे ? शहामृग पक्षाची अशी गोष्ट आहे की, वादळ सुरू झाले म्हणजे तो डोळे बंद करून आपली चोच वाळूत खुपसून स्वस्थ बसतो. भोवताली वादळ होत नाही अशी कल्पना करून घेतो. वादळाला तोंड देण्याची आणि अस्मानात भरारी घेण्याची शक्ती त्याच्यात नसते. हीच पलायनवादी, भेकड आणि निष्क्रिय अवस्था खोटी स्वप्ने कवटाळणाऱ्या लोकांत असते.

त्या चित्रपटाला आलेली पंधरा - वीस वर्षांची पोरे प्रापंचिक दु:खाचे फणकारे विसरण्यासाठी निश्चित आलेली नव्हती. पण विलक्षण कुतूहलाने समरस होऊन चित्रपट पाहात होती. त्यातील भिकार घटनांना आणि अर्थशून्य भडक संवादांना मनापासून दाद देत होती.

त्यांच्या तारुण्याला उद्दीपित करणारे, आवाहन करणारे कित्येक प्रसंग त्या चित्रपटात होते. गुळचट प्रणयदृश्ये त्यांना आवडावीत हे स्वाभाविकच होते. पण प्रेमासंबंधीच्या काही अत्यंत विपर्यस्त आणि सांकेतिक कल्पना असले चित्रपट त्यांच्या मनात पेरीत असतात. "मैने अपना दिल दिया, लेकिन तूने मेरे दिलको खिलौना समझकर उसको ठुकरा दिया। इसके हजार टुकडे हो गये।" असे मूर्खपणाचे संवाद बोलणे म्हणजे प्रेमाचा आविष्कार करणे आहे असा एक गैरसमज नवथर तरुण-तरुणींत दृढ झालेला दिसतो. प्रेमभंग झाला की सिनेमातले हे तथाकथित हीरो आपल्या जळत्या हृदयाची आग प्याला हातात घेऊन शमवण्याचा प्रयत्न करतात. कुठले तरी दर्द भरलेले गाणे गात गात रडतात आणि रडता रडता गातात. प्रेमभंग झाल्यावर असेच करायचे असते, अशा मूर्ख समजुतीने काही तरुण पछाडलेले असले तर त्यात आश्चर्य नाही.

चित्रपटाचेच उदाहरण घ्यायचे झाले तर व्ही.शांताराम यांचा "माणूस" चित्रपट मला विशेषच आवडला. बुळबुळीत प्रेमाने ग्रासलेल्या रडक्या "दळूबाई" प्रेमाची एका प्रसंगातून शांतारामांनी रेवडी उडवली आहे. खरे तर केवळ हळवे, केवळ दुबळे आणि वास्तवाचे किंचितही भान नसलेले प्रेम, अतिरंजित स्वप्नाळू कल्पना तरुण-तरुणींच्या डोक्यांत भरवण्याचे काम उथळ चित्रपट करीत असतात. एका हायस्कूलच्या वसतिगृहात राहणाऱ्या एका तेरा - चौदा वर्षांच्या मुलीने कुठले तरी विषारी औषध पिऊन आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. डॉक्टरांच्या उपचाराने ती वाचली. काही दिवसांनी मी तिला विचारले,

"असला वेडेपणा कशासाठी केलास? तो करण्यापूर्वी आपल्या आई - बापांचा, भावंडांचा थोडातरी विचार तुझ्या मनात येऊ नये याचं आश्चर्य वाटतं." ती शाळकरी मुलगी निष्पापपणे मला म्हणाली,

"सर, "एक दुजे के लिए" या सिनेमात प्रेमासाठी आत्महत्या करणारे हीरो हिरॉईन दाखवले आहेत. मलाही प्रेमासाठी मरून अमर व्हावं असं वाटलं, म्हणून मी तसं केलं." चित्रपट, नाटकं आणि कथाकादंबऱ्या यांचा आस्वाद तारतम्यानं घ्यायचा असतो हे यांच्या लक्षात येत नाही. सिनेमा-नाटकांतली काही सुभाषितवजा अर्धसत्यात्मक वाक्यं बडबडून आपण मोठे प्रेमतपस्वी आहोत असा आभास निर्माण करणारे तरुण - तरुणीही मी पाहिले आहेत. प्रेमकल्पनेला किंवा प्रेममय जगण्याला माझा कधीच विरोध नाही. पण आपण कुणावर तरी प्रेम करीत आहोत किंवा कुणीतरी आपल्या प्रेमात पडलेला आहे याचा नेमका अर्थ काय हे पाहायला नको काय?

जाऊ द्या! हे सारे विचार त्या भिकार चित्रपटामुळे माझ्या मनात आले. कधी कधी खोटच्या आशा - आकांक्षांची आणि मनोराज्यांची इंजेक्शन्स माणसाला घ्यावी लागतात. मानसिक थकवा नाहीसा करण्यासाठी त्यांचा काही प्रमाणात उपयोग होतो. पण या इंजेक्शन्समुळे आपल्याला जगता येणार नाही. नाना प्रकारच्या समस्यांनी भरलेल्या आयुष्याला निर्धाराने तोंड देण्यासाठी वास्तवाचे भान ढळता कामा नये. वास्तवावर आपल्या सामर्थ्याची पकड बसवण्यासाठी हळव्या स्वप्नांच्या कोषात पलायनवादी वृत्तीने गुरफटून जाण्यात कसला अर्थ आहे? संघर्ष करण्यासाठी मन आणि मनगट तयार ठेवले पाहिजे.

□□□

# १८. आमच्या माँसाहेब इतक्या सुंदर असत्या तर...!

छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भात एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. एकदा कल्याणच्या सुभेदाराची सून आबाजी सोनदेव नावाच्या सेनाधिकाऱ्याच्या हाती लागली. ही लावण्यवती स्त्री आपण महाराजांना नजर करावी, असा त्याचा हिशेब होता. कल्याणस्वारीत सापडलेली ही दौलत पाहून महाराज आपल्यावर अत्यंत संतुष्ट होतील, अशी त्याची कल्पना असावी. भर दरबारात त्या यवनसुंदरीला शिवाजी राजांसमोर उभं करण्यात आलं. आपण शत्रूच्या हाती सापडलो आहोत. आपली विटंबना होणं आता अटळ आहे याबद्दल त्या यवनीची खात्री झाली होती. सारा दरबार तिच्या विलक्षण सौंदर्यानं मंत्रमुग्ध झाला. असलं अनुपम, अमूल्य स्त्री-रत्न आपल्या भांडारात असावं असा लोभ कोणालाही व्हावा असंच तिचं लावण्य होतं. महाराजांनी क्षणभर तिच्याकडं पाहिलं आणि दुसऱ्याच क्षणी ते उद्गारले,

"अहाहा! आमच्या माँसाहेब इतक्या सुंदर असत्या तर आम्हीसुद्धा असेच सुंदर झालो असतो." शिवाजीचे ते उदात्त बोल ऐकून दरबारातली प्रत्येक व्यक्ती विस्मयचकित झाली. त्या यवनसुंदरीला दरबारात अशा रीतीनं सादर केल्याबद्दल महाराजांनी त्या अधिकाऱ्याची तीव्र शब्दांत कानउघाडणी केली आणि त्या स्त्रीचा उचित आदरसत्कार करून तिला तिच्या कुटुंबियांकडे पाठवण्याची व्यवस्था केली.

इतिहासात मात्र या प्रसंगाचा उल्लेख नाही. जदुनाथ सरकार, रियासतकार सरदेसाई, डॉ.बालकृष्ण, सेतुमाधवराव पगडी यांच्या शिवजीविषयक लेखनात हा प्रसंग कुठेच आलेला नाही. तो काल्पनिक आहे, अशी टीका इतिहासाचे लेखक व अभ्यासक करतात. त्यांचे म्हणणे कदाचित खरेही असेल, पण नाटक, कथा व चित्रपट यांच्या माध्यमातून ही अनैतिहासिक आख्यायिका लोकमानसात अत्यंत खोल रुजली आहे. शिवाजीच्या धवल चारित्र्याची उज्वलता या नाट्यपूर्ण प्रसंगातून स्पष्ट झाली आहे.

हा प्रसंग लोकांना विशेष आकृष्ट करून घेतो असं मी पाहिलं आहे. एकदोन वेळा ही दंतकथा मी व्याख्यानातून सांगितली. “आमच्या माँसाहेब इतक्या सुंदर असत्या तर...” हे शिवाजीचं विधान उच्चारल्याबरोबर सभेनं टाळ्यांचा प्रचंड कडकडाट केला. या प्रसंगाची ऐतिहासिकता निश्चित नाही, ही केवळ एक दंतकथा आहे, असं सांगितलं तरी बहुसंख्य लोकांनी तिकडं लक्ष दिलं नाही. शिवाजीराजांच्या महान व्यक्तित्त्वाचं या कथेतून होणारं निष्कलंक दर्शन मलासुद्धा सदैव प्रभावित करतं. ही घटना घडलेली असो वा नसो, ती शिवाजीच्या निर्मल चरित्र्याशी कायमची निगडित झाली आहे. इतिहास या घटनेबद्दल मुग्ध राहिला असेल. कारण इतिहासाला नेहमीच ठोस पुरावे लागतात. असा प्रसंग घडल्याची नोंद जुन्या कागदपत्रांत कुठेच नसल्यामुळं इतिहासाच्या कसोटीवर ही घटना पारखून घेता आलेली नाही. पण तरीही मला वाटतं की, केवळ शिवाजी महाराजच त्या यवनसुंदरीच्या दर्शनानं इतके उच्च प्रतीचे दिव्य आणि भावपूर्ण उद्‌गार काढू शकतात. कारण शिवाजी हा खरं तर योगी वृत्तीचा एक संत होता. सामान्य माणसांच्या वासनाविकारांचा प्रभाव या महापुरुषावर पडणे शक्यच नव्हते. सुजन आणि सुसंस्कृत प्रकृतीचा हा “श्रीमंत योगी” सर्वांच्या परित्राणासाठी राजसिंहासनावर आरूढ झाला होता. त्याचे आठ विवाह झाले होते. पण या बहुपत्नीत्वाचा संबंध, आपले राजकीय हितसंबंध राखावेत आणि वाढवावेत, या विचारांशीच प्रामुख्याने होता. जनानखाने बाळगणारे राजे-महाराजे स्त्रीला य:कश्चित भोगदासीपलीकडे किंमत देत नव्हते. त्या वृत्तीशी शिवाजीराजाची वृत्ती कधीच जुळण्यासारखी नव्हती. त्यांनी केलेल्या लग्नसंबंधातही स्नेहसंबंध जोडून आपले राजकीय व सांस्कृतिक उद्दिष्ट साधण्याचीच कल्पना होती. शिवाजीच्या समग्र आयुष्यावरून हाच निष्कर्ष निघतो. तो काळही बहुपत्नीत्वाला मान्यता देणारा होता. पण शिवाजीचे चारित्र्य अत्यंत उन्नत दर्जाचे होते यात कसलीही शंका नाही. तारुण्याच्या आणि सत्तेच्या उन्मादात शिवपुत्र संभाजीने अनेक प्रमाद केले. हे दोषच त्याच्या शत्रूने बरोबर हेरले होते. शिवाजी मात्र स्वच्छ चारित्र्याचा राज्यकर्ता म्हणून गौरविला जावा हे स्वाभाविक आहे. वर उल्लेखिलेली आख्यायिका केवळ शिवाजीच्याच संदर्भात सयुक्तिक वाटते आणि या वीराबद्दलचा आदर शतगुणित होतो.

कदाचित कुणी टीकाकार मला म्हणेल, “तुम्ही अगदीच जुन्या विचारांचे दिसता. शिवाजीच्या या गुणाबद्दल गौरवानं बोलण्यासारखं काय आहे? सुंदर परस्त्रीकडे विकाररहित दृष्टीनं पाहणं हा एक मध्ययुगीन सद्‌गुण आहे झालं! आता आपण आधुनिक काळात वावरत आहोत. आम्ही सिंहासनावर असतो आणि कुणीतरी अशी स्त्री आम्हाला नजर केली असती तर आम्ही आनंदानं त्या सुंदर भेटीचा स्वीकार रसिकतेनं केला असता. त्यात कसली अनैतिकता आहे? सौंदर्याचं स्वागत न करता त्याकडं पाठ फिरवणं आम्हाला तरी सयुक्तिक वाटत नाही.”

आता अशा रसिकाला म्या पामरे काय सांगावे? पण हा रसिकसुद्धा जेव्हा

शांत मनानं विचार करील तेव्हा शिवाजीच्या श्रेष्ठ, विशुद्ध वृत्तीबद्दल त्याला मुजरा केल्याशिवाय राहणार नाही. परस्त्रीचा अपहार करणं, तिला आपल्या जनानखान्यात ढकलणं हा दुर्गुण सर्वच काळातल्या अनेक राज्यकर्त्यांत दिसून येतो. द्रौपदीचा तर भर दरबारात निर्लज्ज विनयभंग सत्ताधीश कौरव करीत होते. एकवस्त्रा द्रौपदीला दुःशासनानं जेव्हा फरफटत दरबारात आणलं तेव्हा तिच्याकडं पाहून दुर्योधनानं विकृत चाळे केल्याचा उल्लेख महाभारतात आहे. दुःशासन तिला विवस्त्र करण्याचा प्रयत्न करीत होता. आणि अपमानित झालेल्या पांडवांना मूग गिळून स्वस्थ बसणं भाग पडलं होतं. सत्ताधीशाला एखाद्या स्त्रीच्या चारित्र्याचा आणि व्यक्ति त्वाचा अवमान करण्याचा अधिकार असतो काय ? केवळ त्याच्या जबरदस्त सत्तासामर्थ्याकडं पाहून माणसं भीतीनं निमूट बसतात. भीष्म आणि द्रोण यासारखे आचार्यही या प्रसंगी शाब्दिक विरोधसुद्धा करू शकले नाहीत. पण एका स्त्रीशी याप्रकारचं घृणास्पद वर्तन करणं हे माणसाच्या नीचतम, किडक्या मनोवृत्तीचं निदर्शक आहे. द्रौपदीला दरबारात लज्जित केल्यामुळं कौरवांची प्रतिष्ठा वाढली काय? कौरवांच्या संस्कृतिहीन, लज्जाशून्य कृत्याची कोणालाही चीडच आली असेल. द्यूतात हरल्यामुळं नियमाप्रमाणं द्रौपदी आमची दासी आहे. पण तिला दासी समजून तिचा अवमान करणं आम्हाला कधीच रुचणार नाही. आमचं वैर पांडवांशी आहे. त्यांच्या बायकां - मुलांशी नव्हे. रणांगणात आम्ही आमचा पराक्रम गाजवू. पण एका दुबळ्या स्त्रीला दरबारात ओढणं आणि तिच्याविषयीची पापी अभिलाषा प्रकट करणं हा अधर्म आहे. "जा द्रौपदी, दुःशासनानं जो अविचार केला त्याबद्दल मी तुझी क्षमा मागतो." असे उद्‌गार जर धृतराष्ट्रानं किंवा दुर्योधनानं काढले असते तर पुढचं महाभारत घडलंच नसतं. दुर्योधनालाही त्याचे शेकडो गुन्हे पांडवांनी माफ केले असते. पण हा माझा कल्पनाविलास झाला. दुर्योधन सत्प्रवृत्त व्हावा असं म्हणणं म्हणजे विंचवाच्या नांगीनं गुदगुल्या व्हाव्यात असं म्हणण्यासारखं आहे. माणसातल्या रोगट, हीन आणि पापात्मक प्रवृत्ती क्षीण होऊन जाण्यासाठी विवेकबुद्धीला उज्ज्वल करणारे काही संस्कार व्हावे लागतात. सत्तेच्या नशेनं बेताल झालेल्या मनात सुसंस्कारांची वेल उगवू शकत नाही, हा एक इतिहास आहे. जे मोठमोठ्या सम्राटांना करता आलं नाही ते शिवाजीसारखा एक पुरुषोत्तम करू शकतो याचं कारण त्याच्या अंतःकरणाच्या भूमीत सुविचारांची बीजं पेरली गेली होती. काही बीजं आईनं पेरली. काही गुरूनं पेरली. पण बहुसंख्य बीजं त्यानं स्वतःच आपल्या हातानं आपल्या मनात पेरली. साधुसंतांच्या वाणीचं पाणी या भूमीवर त्यानं शिंपडलं आणि व्यापक, उच्च ध्येयनिष्ठा घेऊन त्यानं आपलं मन सुंदर आणि समर्थ बनवलं. शिवाजीबद्दल आम्हाला विलक्षण आदर वाटतो तो या कारणामुळं. पराक्रमाला जेव्हा उत्तम संस्करांचं अधिष्ठान लाभतं तेव्हा तो वीरपुरुष देवत्वाच्या पायरीवर जाऊ शकतो. रामाच्या बाणाला धर्माचं अग्र होतं. आणि शिवाजीच्या समशेरीला याच धर्माचं पाणी मिळालं होतं. "आमच्या माँसाहेब अशा सुंदर असत्या तर ... "

हे शब्द शिवाजीच्याच तोंडून निश्चितपणे उमटलेले असतील. इतिहासाचे नेत्र या घटनेपर्यंत आणि शिवाजीच्या हृदयापर्यंत पोहोचू शकले नाहीत हे इतिहासाचं दुर्दैव ! इतिहासाच्या दृष्टीतून अनेक अधम प्रवृत्तीची दृश्यं जशी निसटली, त्याप्रमाणंच अनेक भव्य आणि उदात्त घटनाही त्याच्या डोळ्यांना दिसल्या नाहीत.

जेव्हा एखाद्या स्त्रीचा राज्यकर्त्यानं अनैतिक मोह धरणं किंवा तिच्यावर बलात्कार करणं अनुचित मानलं जात नव्हतं अशा काळात एखाद्या राजानं संयम धारण करणं आणि चारित्र्याची जपणूक करणं हेच मला अधिक मोलाचं वाटतं. बहुतेक जण जेव्हा बुडत असतात त्यावेळी एखादा आपल्या शौर्यानं किनाऱ्याला सुरक्षितपणानं येतो तेव्हा त्याचा गौरवच केला पाहिजे. पण इतिहासात, भारतीय इतिहासातही शिवाजीसारखे संयमी, सुविचारी, माताभगिनींच रक्षण करणारे धार्मिक मनोवृत्तीचे राज्यकर्ते फार थोडे दिसतात. "राजानं मारलं आणि पावसानं झोडलं तर तक्रार कुणाकडं न्यायची ?" असं म्हणून माणसं गप्प बसतात. राजा दुष्यंतसुद्धा "नवपुष्पावरचा भ्रमर" होता. फूल हुंगल्यानंतर ते फेकून द्यायचं हा अपराध या रसिक राजानंही केला होता. इतरांच्याबद्दल काय बोलायचं ?

काही वर्षांपूर्वी इद्दीअमीन या नावाचा एक हुकूमशहा होता. आजही तो कोठेतरी असेल. इतिहास त्याची दखल घेऊ शकत नाही. कारण तो केव्हाच सत्ताभ्रष्ट झाला. पण जेव्हा या राक्षसाच्या हातात सत्ता होती तेव्हा आपल्याला सुंदर व हव्याशा वाटणाऱ्या स्त्रियांची आयुष्यं त्यानं बेदरकारपणानं कुस्करून टाकली. त्यांची उपयुक्तता संपली असं वाटलं की त्यांना खुशाल ठार करायचं हा त्याचा सहजधर्म होता. एका स्त्रीचे तर त्यानं काही तुकडे करून रेफ्रिजरेटरमध्ये व्यवस्थित ठेवून दिले होते असं म्हणतात. त्याच्यासंबंधीचे काही लेख माझ्या वाचनात आले होते. ते वाचताना माणसाच्या रूपात साक्षात सैतान कसा अवतीर्ण होत असेल याची कल्पना आली. आधुनिक काळातला हा इद्दीअमीन सतराव्या शतकात शिवाजीच्या जागी महाराष्ट्रात असता आणि ती कल्याणच्या सुभेदाराची सुंदर सून त्याला दरबारात अधिकाऱ्यानं नजर केली असती तर त्या अधिकाऱ्याला या राजानं प्रचंड संपत्ती दिली असती आणि अत्यानंदानं तो दरबारात म्हणाला असता,

"अहाहा ! ही स्वर्गातली सुंदरी केवळ मला भेटण्यासाठी पृथ्वीवर आली आहे. ती कुणाची सून असो, कुणाची मुलगी असो की कुणाची बायको असो ! या गैरलागू गोष्टींशी मला काही कर्तव्य नाही. ती एक अत्यंत सुंदर स्त्री आहे आणि तिला मी माझ्या जनानखान्यात ढकलून दिलं तरी माझं काहीच चुकणार नाही. हे सुंदरी, पुढं ये. या इद्दीअमीनच्या बाहुपाशात सुखानं निवास कर. सुंदर स्त्रिया आम्हा सत्ताधीशांच्या मनोरंजनासाठीच असतात. नीती आणि धर्म यांचा बकवास करणारी जीभ मी कलम करून टाकीन. मी करतो तो धर्म आणि मी म्हणतो ती नीती ! ही माझी सरळ व्याख्या आहे." या इद्दीअमीनला कोण रोखणार ? पित्याच्या वात्सल्यानं

रक्षण करणारे हातच जेव्हा दुबळ्या स्त्रीवर अत्याचार करण्यासाठी उत्सुक होतात तेव्हा असे पापी हात मुळापासून उखडून टाकण्याची "शिवशक्ती" जोपासली पाहिजे. जोपर्यंत भेकडांची औलाद कुठल्यातरी नपुंसक तत्त्वज्ञानाचं पांघरूण घेऊन स्वत:ची अन् जगाची वंचना करीत राहते तोपर्यंत अन्यायाच्या पोटात वाघनखं खुपसून त्याचा कोथळा बाहेर काढण्याची धगधगीत शक्ती कशी निर्माण होणार? आजच्या घडीला शिवजीसारखा सज्जनांना शुभंकर आणि दुर्जनांना प्रलयंकर वाटणारा, जितका वत्सल तितकाच उग्र, जितका सृजनशील तितकाच संहारक, जितका शामक तितकाच दाहक असा शासक निर्माण झाल्याशिवाय भेकडांच्या अंगात भरलेलं हींव नाहीसं होणार नाही. शिवाजी शूर वीर होता म्हणूनच त्यानं त्या यवनसुंदरीचा गौरवपूर्ण शब्दात उल्लेख करून आणि तिला सुवासिनींची वस्त्रे-आभरणे देऊन सन्मानपूर्वक तिच्या कुटुंबात पोहोचती केली. शासन आणि शासक यांचं कार्य प्रजेचं रक्षण आणि संगोपन हे असतं. रक्षणापेक्षा भक्षणाकडे वळलेले शासक इतिहास घडवू शकत नाहीत. आणि घडवला तरी तो इतिहास मुर्दाडांचा असतो. मर्दाच्या इतिहासात उत्तम संस्कार, मनुष्यधर्म आणि नैतिक आदर्श यांचे प्रकाशकिरण असतात. हे जेथे नसेल तेथे जीवघेण्या काळोखात मरतुकडे रातकिडे मात्र शिरजोर होऊन बसतात.

मी काहीतरी पुराणमदवादी भूमिकेतून लिहीत आहे असा गैरसमज करून घेण्याचं कारण नाही. धर्म, संस्कार, निर्मोहीपण या शब्दांचे व्यापक अर्थ मला अभिप्रेत आहेत. सत्ताधीशानं किंवा समाजनेत्यानं साऱ्या वैयक्तिक सुखविलासांचा त्याग केला पाहिजे असं मला मुळीच म्हणायचं नाही. एखाद्या रसिकानं मद्याच्या प्याल्याला स्पर्श केल्याबरोबर तो भ्रष्ट झाला असंही मी म्हणणार नाही. पहिला बाजीराव मस्तानीच्या रोमँटिक सहवासात आणि मद्याच्या चषकात काही क्षण अवश्य साजरे करीत होता; पण त्याची खरी मस्तानी म्हणजे त्याच्या हातातली समशेरच होती. अन्यायाची त्याला चीड होती. राजा छत्रसालानं आपल्या दरबारची कंचनी मस्तानी त्याला नजर केली होती. पण ही मस्तानीही बाजीरावावर आषक झाली होती. तिचा त्यानं अपहार केला नव्हता. दुसरा बाजीराव मात्र पराक्रमशून्य, ध्येयशून्य व लंपट होता. एखाद्या कादंबरीकारानं "मंत्रावेगळा" म्हणून त्याला "हीरो" ठरवण्याचा प्रयत्न केला तरी सारा इतिहास त्याच्या विरुद्ध आहे. आपल्या पदरीच्या सरदारांना चार-चार लग्ने करायला भाग पाडून त्यांच्या बायकांना शनिवारवाड्यात सेवेसाठी बोलावून घेणाऱ्या आणि हौदात त्यांच्याबरोबर जलक्रीडा करीत बसलेल्या या "रसिक" पेशव्यामुळे मराठी स्वराज्यावर पाणीच पडले. वैयक्तिक चारित्र्याला फार महत्त्व देऊ नका, असे म्हणणाऱ्या टीकाकारांना दुसऱ्या बाजीरावाचं समर्थन करता येईल काय? कदाचित युक्तिवाद म्हणून कुणी असंही विचारील, "दुसरा बाजीराव स्त्रीलंपट होता म्हणून मराठी राज्य बुडालं नाही, तर तो भेकड आणि नादान होता म्हणून स्वराज्य गेलं." लंपटपणा आणि कर्तव्यभ्रष्टता या एकाच नाण्याच्या दोन बाजू नव्हेत काय? या प्रश्नाचं उत्तर

टीकाकारांनी द्यावं.

मी शिवाजीचा विभूतिपूजक नाही. भाबडेपणानं मला त्याचं उद्‌गान करायचं नाही. पण त्याच्या ठायी जे उत्कट आणि उन्नत गुणधर्म होते त्यांचा मात्र मी स्तुतिपाठक आहे. सामर्थ्य आणि सत्ता असूनही या महापुरुषाची मती कधी चळली नाही, हे खरोखरच त्याच्या असामान्यत्वाचं लक्षण आहे. भल्याभल्यांचा ज्यावेळी तोल सुटतो त्यावेळी हा मध्ययुगातला शिवाजीराजा आपल्यासमोर उभ्या असलेल्या एका रूपसुंदरीला "माँसाहेब" म्हणून साद घालतो तेव्हा त्याच्या व्यक्तित्वाची, त्याच्या चारित्र्याची, त्याच्या शौर्यधैर्याची, त्याच्या सिंहासनाची उंची आकाशाला भिडलेली असते असं मला वाटतं. आणि मग मी ज्ञानोबा-तुकोबानंतर आमचा शिवबा हाच आमचा आधार असं म्हणालो तर त्यात माझी काही "ऐतिहासिक"चूक आहे काय, हे माझ्या टीकाकारांनी मला जरूर सांगावं. कारण मलाही इतिहास समजून घ्यायचा आहे.

□□□

# १९. स्वप्नांविषयी थोडेसे...

रस्त्यावर भीक मागणाऱ्या एका अपंग भिकाऱ्याला एक स्वप्न नेहमी पडत असे. स्वप्नात तो एका प्रचंड हवेलीचा मालक बनलेला असे. उंची वस्त्रे परिधान केलेला तो धनिक नाना प्रकारच्या सुखविलासात गुरफटून जायचा. त्याने शब्द उच्चारण्याचा अवकाश, की तो शब्द तत्परतेने झेलण्यासाठी सेवक अदबीने उभे राहात. स्वप्नात तो पूर्णपणे समर्थ आणि सुदृढ असायचा. त्याच्या पुढ्यात खाद्यपेय, पदार्थांची रेलचेल असायची. काही सुंदर नर्तकी त्याच्यासमोर उन्मादक नृत्य करायच्या. त्याच्या आजूबाजूचे सारे वातावरण संगीताच्या लहरींनी भारून गेलेले असायचे.

हे स्वप्न अनेक वेळा त्या भिकाऱ्याने पाहिले. स्वप्न वितळून गेल्यावर सभोवतालच्या कठोर वास्तवाशी पुन्हा जमवून घेणे त्याला कठीण व्हायचे. पण तरीही त्या दिव्य स्वप्नाची धुंदी त्याच्या मनावर काही काळ राहायची. खरं तर आता त्या स्वप्नाची त्याला सवय झाली होती. दोन्ही पायांनी रस्त्यावरून खुरडत जाणारा, केविलवाण्या स्वरात सहानुभूतीची याचना करणारा तो भिकारी एक वैभवशाली स्वप्न आपल्या हृदयात बाळगून होता. त्याच्या बळावरच तो सत्य परिस्थितीशी सामना करीत होता. स्वप्नात मिळालेले धन आणि ऐश्वर्य निष्फळ असते. सत्यस्थितीशी त्याचा काहीच संबंध नसतो, हे त्याला समजत असूनही वास्तवाकडे पाठ फिरवून आपल्या स्वप्नसृष्टीत तो भिकारी वावरत होता. स्वप्न हाच त्याचा एकमेव आधार होता. त्या स्वप्नामुळे तो जगत होता. काळ्याकुट्ट ढगाला एखादी रुपेरी किनार असावी त्याप्रमाणे त्याच्या कंगाल आयुष्याला या स्वप्नाचे संपन्न वलय होते आणि ते त्याने जिवापाड प्रेमाने जपले होते. कोणी काही म्हटले तरी माणसे कोणती तरी स्वप्ने पाहातच जगत असतात. स्वप्ने नसती तर त्यांना वेड लागले असते. वेडी स्वप्ने उराशी बाळगून शहाणी माणसे जीवनाचा खडतर प्रवास धीराने करू शकतात. ज्यांना कसलेही स्वप्न पडत नाही त्यांच्यासारखे दुःखी आणि दरिद्री तेच असतील.

माणसाच्या अनेक व्याख्या करण्यात आल्या आहेत. कोणी त्याला विचार

करणारा प्राणी म्हटले आहे, तर कोणी समाजात राहणारा असे संबोधले. मनुष्य हा हसणारा प्राणी आहे असेही सांगितले जाते. पण माणसाचे माणूसपण सर्वार्थांनी स्पष्ट करणारी व्याख्या करायची झाल्यास मी म्हणेन की, मनुष्य हा स्वप्ने पाहणारा, स्वप्नांचा संग्रह करणारा आणि त्यांच्या संगतीत जगणारा प्राणी आहे.

माणूस हा एकमेव प्राणी आपल्या दृष्टीसमोर निरनिराळी रंगीबेरंगी स्वप्ने रेखाटू शकतो. पशू-पक्ष्यांना स्वप्ने पडतात की नाही हे सांगता येणार नाही. बहुधा नसावीत. स्वप्ने पाहण्यासाठी कल्पनाशक्तीचे पंख असावे लागतात. वास्तवाच्या जमिनीवरून सरपटणाऱ्या जीवजंतूंना हे पंख कुठून मिळणार? त्यामुळेच जेवढे निसर्गाने दिले तेवढ्यावरच त्यांची गुजराण चाललेली असते. नवनिर्मितीचा आनंद ते घेऊच शकत नाहीत. वास्तवाची सृष्टी अपूर्णतेने भरलेली आहे. या वास्तव जगात सुंदर व शीतल अमृताचे सिंचन करणारा चंद्र आहे. पण त्याच्यावर डाग पडलेले आहेत. त्याला क्षयरोग जडला आहे. तो एकेक कलेने अधिक-उणा होत जातो आणि अमावास्येचा काळोख त्याला गिळू शकतो. ताजी टवटवीत फुले थोड्याच वेळात सुकून जातात. उन्हाळ्यात नदी कोरडी पडते. पक्ष्यांची पिसे गळून पडतात. आज सुंदर असलेल्या स्त्रीच्या तारुण्याची जादू काही वर्षांतच ओसरून जाते. वास्तवाच्या या जगात कितीतरी उणीवा आहेत. पण या साऱ्या मर्यादांचे पाश स्वप्नांच्या स्पर्शाने तुटून जातात. स्वप्ने कशी तारुण्याच्या रसायनाने अखंड रसरसलेली असतात. म्हणून तर ज्ञानेश्वरांसारखा जातिवंत कवी साऱ्या जगासमोर निष्कलंक चंद्राचे स्वप्न फुलवीत राहतो. त्यांच्या नेत्रांना तो " अलांछित-चंद्रमा " रात्रंदिवस दिसत होता. " तापहीन मार्तण्ड " त्यांच्या जगात प्रकाशाची उधळण करीत होता. ज्ञानाच्या ईश्वरालाही वास्तवाच्या मर्यादा पुसून टाकण्यासाठी स्वप्नांची समर्थसृष्टी उभी करावी लागते. जितकी ज्याची स्वप्ने विशाल तितका तो महान असतो. भिकाऱ्याची स्वप्ने सोन्यानाण्यांच्या पेटाऱ्यात बंदिस्त असतात, पण महात्म्यांची स्वप्ने मुक्त असतात, भव्य असतात.

स्वप्नाळूपणावर अनेकांनी टीका केली आहे. शेख महंमदी मनोराज्ये करणारे व्यवहारशून्य लोक मूर्ख असतात, असा निष्कर्ष कित्येक विचारवंतांनी काढलेला दिसतो. पण जगण्यासाठी काही सुखस्वप्नांची शिदोरी बांधून घ्यावी लागते. काही मनोराज्ये करावी लागतात. सदैव वास्तवाला बिलगून बसलेला माणूस प्रगती करू शकेल काय याची शंका वाटते. याचा अर्थ केवळ स्वप्नातच गुरफटून जावे असा नाही. वास्तव आणि स्वप्न यांचा समन्वय करणारी काही माणसे असतात. पण तरीही निर्जीव वास्तवाला चैतन्यपूर्ण आधार मिळाल्याशिवाय जीवनाला सुगंध येत नाही.

नाशिकच्या एका अरुंद बोळातल्या जुनाट अंधाऱ्या घरात स्वप्ने पाहणारा एक कवी राहत होता. अपंग अवस्थेतल्या या कवीच्या डोळ्यांत एक तेजस्वी स्वप्न तरळत होते. त्याची प्रतिभा त्यामुळे पल्लवित झाली. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या पेटलेल्या लढ्याची ज्वाला त्याच्या कवितांनी अधिकच फुलवली. स्वा. वीर सावरकर त्यावेळी

विद्यार्थीदशेत होते. ते या अपंग कवीला आपल्या खांद्यावर बसवून सभास्थानी नेत असत. या कवीचे नाव गोविंद. त्याच्या काव्यातले शब्द स्वातंत्र्य भावनेच्या उष्णतेने रसरसलेले होते. कवी सावरकरांच्याही मनात त्या शब्दांनी काही स्वप्नांच्या ज्योती प्रकाशित केल्या. कविता लिहिणारा गोविंदा पांगळा नव्हता. "नवे पंख अन् नवा पिसारा, सर्व सर्व मिळणार, सुंदर मी होणार" अशा अव्यंग सुंदरतेचा आणि स्वातंत्र्याचा ध्यास लागलेल्या या राष्ट्रवादी कवीच्या ओजस्वी वाणीने कित्येक तरुणांना नवे पंख फुटले आणि क्रांतीच्या आकाशात ते झेपावू लागले. कवी गोविंद स्वप्नांमुळेच जगला. त्याचे सिंहासन स्वप्नांचे होते. त्याच सिंहासनावर सावरकरांची प्रतिभाही दिमाखात आरूढ झाली आणि तेजाची गीते गाऊ लागली. अंदमानच्या कोठडीत केवळ अंधार होता. आजूबाजूला मृत्यू तांडव करीत होता. किंकाळ्यांशिवाय दुसरे संगीत नव्हते. पायांत साखळदंड होते. तुरुंगाच्या भिंतीवर कैद्यांच्या रक्ताचे डाग होते. कोठडीच्या लहानशा झरोक्यातून आकाशाचा एक निळसर तुकडा कसाबसा दिसत होता. आता पन्नास वर्षांची काळ्यापाण्याची शिक्षा इथेच भोगायची होती. मरण हीच येथे मुक्ती होती. पण सावरकरांच्या अतिभव्य स्वप्नांनी त्या भिकारभणंग वास्तवावर मात केली. आपल्या पायांतले आणि देशाच्या पारतंत्र्याचे बंध आता तुटले असून स्वातंत्र्याचा मनमोकळा वारा वाहात आहे हे दृष्य त्यांना दिसायला लागले. अंधाऱ्या जुलमी कोठडीत स्वप्नांचे किरण सावरकरांना भेटले नसते तर त्या काळकोठडीने या स्वातंत्र्यवीराला केव्हाच गिळून टाकले असते. स्वप्ने आणि महत्त्वाकांक्षा हीच वीरांची दौलत असते. आपल्या पराक्रमी समशेरीने भविष्याच्या क्षितिजावर नव्या कर्तृत्वाचा लेख ते लिहितात. जुने झालेले शिळे शब्द पुसून टाकतात.

स्वप्नांची तरफदारी करताना सारीच स्वप्ने महनीय असतात, असे विधान मी करणार नाही. आपल्या मनोराज्यांनाही विचार आणि वास्तव याचा भरभक्कम आधार असावा लागतो. दोरी तुटलेला पतंग कुठेही झेपावत जातो. इच्छाशक्ती नसलेली काटकी प्रवाहाच्या वेगाबरोबर वाहवत जाते आणि कोणत्याही किनाऱ्याला जाऊन लागते. स्वप्नांचा अधिकार सर्वांनाच आहे. पण त्यातही तो शूरांना आणि शहाण्यांना अधिक आहे. शहाण्यांचीसुद्धा अनेक स्वप्ने पाहता पाहता वितळून जातात. समाजाची आणि राष्ट्राची स्वप्नेसुद्धा उद्ध्वस्त होतात. स्वातंत्र्याचे अनेक लढे लढल्यानंतर आमचा देश स्वतंत्र झाला. या स्वतंत्र-सार्वभौम देशाचे एक भव्य स्वप्न चितारले होते. पण हजारो, नव्हे लक्षावधी निरपराध माणसांच्या रक्ताने ते पार वाहून गेले. आजच्या भारतात रक्तपात आणि अन्याय दररोज कुठे ना कुठे घडत असतो. जात आणि धर्म यांच्या अतिरेकी विचारातून रक्त सांडत राहिले आहे.

सावरकर, टिळक, गांधी आणि सुभाष यांनी रंगवलेल्या स्वप्नांचे काय झाले ? अंदमानच्या आणि मंडालेच्या तुरुंगातील भिंतींवर नव्या आशा-आकांक्षांचे रंग ज्यांनी उधळलेले होते त्या भिंतींच्या डोळ्यांत आज वैफल्याचे अश्रू आल्याशिवाय राहणार

नाहीत. शूरांनी स्वप्ने पाहावीत आणि नामर्दांनी त्यांच्या चिंधड्या कराव्यात हा एक इतिहासाचा क्रम मानावा काय?

"फुलिश मेन हॅव फुलिश ड्रीम" मुर्खांची स्वप्ने मूर्खपणाने ओथंबलेली असावीत यात आश्चर्य नाही. पण तरीही असली स्वप्ने जीवनात थोडा आनंद आणि उत्साह निर्माण करतात यात शंका नाही. म्हणूनच मी म्हणतो, " आपली स्वप्ने खुशाल फुलवा. ती अशक्य कोटीतली असली तरी ती पाहण्याचा तुम्हाला जन्मसिद्ध अधिकार आहे." ज्याचा कशावरच अधिकार नसतो त्याचा निदान स्वप्नांवर तरी अधिकार असावा. शहाण्या समजल्या जाणाऱ्या माणसांनी आजच्या जगाला भेसूर अवकळा आणली आहे. अशा गुदमरलेल्या वातावरणात आपल्या वेड्या स्वप्नांचा सुगंध खुशाल छातीत भरून घ्या. स्वप्न म्हणजे आपल्या अपुऱ्या राहिलेल्या इच्छांची पूर्ती असते. आपल्या अनेक कल्पनांचा तो उत्तुंग मनोरा असतो. त्या हस्तिदंती मनोऱ्यात बसून आपल्या आयुष्याचे पीस फुलवण्याचा तुम्हाला अवश्य अधिकार आहे. वास्तवात अशक्य असलेल्या गोष्टी कल्पनेतच आणि स्वप्नातच उपलब्ध होतात. नेपोलियनचा पराभव झाल्यानंतर आणि एल्बाबेटात त्याला कैदेत डांबल्यानंतर तो काही दिवस सुन्न झाला होता. त्याचे पंखच दुर्दैवाने कापून टाकले होते. पण हळूहळू तो पुन्हा स्वप्ने पाहू लागला. आपल्याला पुन्हा सत्ता मिळणे शक्य नाही. या तुरुंगातच आपले मरण दबा धरून बसले आहे, याची स्पष्ट जाणीव खंगत चाललेल्या एकेकाळच्या त्या वीराला होती. पण तरीही पुन्हा जेतेपणाची स्वप्ने आपल्या उराशी तो कवटाळीत राहिला. "स्वप्नीही स्वप्ने बघत स्वप्नांतच व्हावा अंत" बालकवींचे हे शब्द माझ्या मनात खोल रुजले आहेत. या स्वप्नांची महती काय सांगावी? मेवाडच्या वाळवंटात कृष्ण नावाचे एक सुंदर स्वप्न घेऊन मीरा वर्षानुवर्षे भटकत राहिली. तिचे स्वप्न तिच्या जीवनात खोलवर उतरले होते. ते एक मूर्तिमंत सत्य बनले होते. जगाच्या हिशेबी मीरा वेडी होती. पण मीरेच्या दृष्टिकोनातून जग वेडे होते. माझ्या मते ज्याच्याजवळ स्वप्ने आहेत त्याच्या जगण्याला एक सुंदर अर्थ प्राप्त होतो. जीवनाला एक धुंद लय येते.

□□□

# २०. नियतीवादाचे तुणतुणे

नियतीच्या किंवा परमेश्वराच्या इच्छेमुळे सर्व काही घडत असते, असे बहुसंख्य लोक मानतात. "आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे चालेना" अशासारखी अनेक वचने सर्व भाषांत आहेत. अवतारी पुरुषाला देखील प्रारब्धाने बांधून टाकलेले असते, असे सांगण्यात येते. नियतीच्या जबरदस्त लाटेसमोर रामकृष्णासारखे समर्थ वीरसुद्धा हतबल झाल्याची उदाहरणे दिली जातात. हा नियतीवाद मला पटत नाही. सारे काही देवावर किंवा दैवावर अवलंबून असते असे समजणे म्हणजे मनुष्याला त्याचे स्वत:चे काही कर्तृत्व नसते असेच म्हणावे लागेल. याबाबतीत मी एका दैववादी माणसाशी वाद केला होता. आपला मुद्दा तो माणूस घट्ट धरून बसला होता. काही केल्या प्रयत्नवादाला तो संमती देत नव्हता. तो म्हणाला, "नियतीपेक्षा पुरुषार्थ श्रेष्ठ ही तुमची कल्पना अगदी निरर्थक आहे. अहो, रामाला चौदा वर्षे वनवास घडला. वनवासात सीतेचे रावणाने अपहरण केले. धर्मराजाला द्युत खेळण्याची दुर्बुद्धी झाली. पांडवांनाही वनवास घडला. ही दैवाची इच्छा नव्हती काय ? ज्या कृष्णाने युक्तीप्रयुक्तीने पांडवांना युद्ध जिंकून दिले, त्या कृष्णाची द्वारका आणि त्याचे यादव सैन्य त्याच्या डोळ्यांसमोर आगीत जळून गेले. कृष्णालाही एका सामान्य व्याधाच्या हातून मरण आले. या सर्व घटना माणसाच्या प्रयत्नापेक्षा त्याच्या नियतीच्याच हाती असतात, हेच दाखवीत नाहीत काय ? तुम्ही उगीच मानवी प्रयत्नाचे तुणतुणे वाजवता. त्याचा काहीही उपयोग नाही. ज्यावेळी जे घडायचे असेल ते घडणारच असते. ब्रह्मदेव आडवा आला तरी अशावेळी तो प्रतिबंध करू शकत नाही."

नियतीवादाचे जोरदार समर्थन त्या व्यक्तीने चालवले होते. मुंबईच्या एका प्रशस्त रस्त्याच्या फूटपाथवर उभे राहून आम्ही हा वादविवाद करीत होतो. प्रारब्ध म्हणजे प्रारब्ध, त्याला कसलाही पर्याय नाही. माणसाचा प्रयत्नवाद तिथे लटका पडतो, हा त्याच्या प्रतिपादनाचा मध्यवर्ती आशय तो निरनिराळी उदाहरणे घेऊन मला पटवून देण्याची पराकाष्ठा करीत होता. मला पटत नव्हते हे त्याचे दुर्दैव ! वाद

रंगात आला असताना समोरच्या रस्त्यावरून भरधाव वेगाने आलेली ट्रक सरळ फूटपाथवर चढली. एका हातगाडीला तिने धडक दिली आणि आमच्या दिशेने ती वळली. हे सारे क्षणार्धात घडले. माझ्याशी वाद करणाऱ्या माणसाच्या पाठीमागून ती ट्रक येत असल्यामुळे त्याला त्या प्रसंगाची नीटशी जाणीव झाली नाही. पण जीवाच्या आकांताने मी त्याला ओढून समोरच्या भिंतीकडे ढकलले आणि तो माणूस अत्यंत थोडक्यात बचावला. ट्रक एका दुकानात घुसली. तीनचारजणांचा तिने बळी घेतला. आम्ही दोघेही घाबरलो होतो. थोड्या वेळाने तो नियतीवादी मला म्हणाला, "तुम्ही अत्यंत चपळाईने मला बाजूला ओढले, फार उपकार झाले. तुमच्या प्रयत्नांमुळे मी आज जगलो." तशाही परिस्थितीत मी हसून त्याला म्हणालो, "मी तुम्हाला वाचवावे हे तुमच्या प्रारब्धातच लिहिले होते. जाऊ द्या! मनुष्य की नियती हा वाद जगाच्या अंतापर्यंत कायम राहणार आहे. दैव नावाची शक्ती असेलही; पण आपल्या दैवाला वळवण्याची आणि घडवण्याची प्रचंड शक्ती माणसाच्या मनगटात व मेंदूत आहे. माणूसच इतिहास घडवतो. माणूसच घडलेला इतिहास पुसून टाकतो. माझ्या मते मनुष्य हाच इतिहासाचा शिल्पकार आहे. त्याच्या निर्माणशक्तीला तुलना नाही."

"राजा कालस्य कारणम्!" असे महाभारतात म्हटले आहे. काळ आणि परिस्थिती यांना आकार देण्याची क्षमता मानवी सामर्थ्यात निश्चित आहे. राम-कृष्णांची उदाहरणे घेऊन प्रारब्धवादाचे समर्थन कसे होऊ शकेल? आपली पत्नी रावणाने जबरदस्तीने नेली आणि आपल्यावर व तिच्यावर विलक्षण अन्याय केला हे पाहिल्यावर रामाच्या क्रोधाला आणि क्षोभाला पारावार उरला नाही. त्या धनुर्धराला हे एक प्रचंड आव्हान मिळाले होते. सीतेचे अपहरण करणाऱ्या रावणाचा शिरच्छेद करण्यासाठी त्याचे बाहू स्फुरण पावू लागले. त्याने प्रयत्नांची पराकाष्ठा केली. समुद्रावर पूल बांधला आणि लंकेला बेगुमान धडक दिली. नियतीची इच्छा, हे आपले प्रारब्ध आहे, जे जे होईल ते ते पहावे. परमेश्वराची मर्जी असेल तर सातासमुद्रापलीकडे गेलेली सीता आपोआप परत येईल असला विचार रामचंद्राने केला असता तर आदर्श पुरुषांच्या मालिकेत आम्ही त्याची गणना केली असती काय? प्रयत्नवाद हा दुबळ्या आणि निष्क्रिय प्रारब्धवादापेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे. राज्ये निर्माण होतात. संस्कृती आणि साम्राज्ये उभी राहतात, ती मानवी पराक्रमाने आणि प्रयत्नाने, हे सांगण्यासाठी उदाहरणे घेण्याचेसुद्धा कारण नाही. पण काय करावे? एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभे राहून आम्ही अजूनही प्रारब्ध, नियती, नशीब यांचे डांगोरे पिटत आहोत. भारताची फाळणी झाली याची कारणमीमांसा नियतीवादाच्या आधाराने करणाऱ्या माणसाच्या बुद्धीचे दिवाळे निघाले आहे, असेच मी म्हणेन. काश्मीर आणि पंजाब येथे निर्माण झालेले ज्वलंत प्रश्न हे दैवाधीन आहेत की आपल्या दुर्बलतेचे, मुत्सद्दीपणाच्या अभावाचे, विचारदारिद्र्याचे आविष्कार आहेत हे जाणून घेतले पाहिजे. भारताचे पडणारे तुकडे नियतीच्या इच्छेनेच पडत आहेत काय? आणि तशीच नियतीची इच्छा

असेल तर त्या नियतीला आपली चरणदासी करण्याची हिंमत भारताच्या बुद्धीत आणि शक्तीत उरली नाही काय, याचा विचार केला पाहिजे. प्रतिकूल परिस्थितीचे तुणतुणे तर सारेच नेभळे लोक वाजवीत असतात. कारण त्यांच्या हातात तेवढेच असते. वाजवीत बसणे, गळा काढून रडणे आणि सारे खापर परिस्थितीच्या माथी फोडून पळ काढणे हाच तर त्यांचा धर्म असतो. म्हणूनच पुरुषार्थाचे स्फुल्लिंग पेटवणारी "गीता" रणांगणात सांगणे श्रीकृष्णासारख्या विचारवंताला भाग पडले. आज आपल्या देशात भ्रष्टाचाराला भरती आलेली दिसते. प्रत्येक क्षेत्रात भ्रष्टतेची असंख्य उदाहरणे दृष्टीस पडतात. हे माणसाचेच कर्तृत्व नव्हे काय? मनुष्याला दुर्बुद्धी सुचणे हे जर नियतीच्या हाती असेल तर त्या माणसाला शासन करण्यासाठी न्यायसंस्थेची उभारणी कशासाठी करायची? हतबल झालेल्या, कोणतीही महत्त्वाकांक्षा नसलेल्या आणि केवळ सुखविलासातच गुरफटून गेलेल्या निष्क्रिय समाजाने नियतीचे स्तुतिस्तोत्र गाणे समजण्यासारखे आहे. आपल्या कर्तृत्वातून नव्या वैभवाची रचना करणारा समाज हाच इतिहासाचा निर्माता असतो. जे जीर्ण झाले आहे ते मोडीत काढून तो नव्याची निर्मिती जिद्दीने करीत राहतो.

दुसऱ्या महायुद्धात युरोपातली काही राष्ट्रे बेचिराख झाली. जर्मनी तर पंख जळून गेलेल्या पक्ष्यासारखा लोळागोळा होऊन पडला होता. पराभव आणि सर्वनाश यांच्या काळ्याकुट्ट छायेत रखडणाऱ्या जर्मनीला पाहून दोस्त राष्ट्रे मनोमन सुखावली होती. आता दोन-तीन शतके तरी हे लुळे-पांगळे झालेले निर्वीर्य राष्ट्र आपल्या पायावर उभे राहू शकत नाही, याचा त्यांना विश्वास वाटत होता. जपानचीही हीच अवस्था होती. पारतंत्र्य आणि पराभव यांचा जळता शाप मस्तकी घेऊन फिरणारे त्या देशाचे नागरिक हतोत्साह झालेले होते. एक प्रचंड मरगळ त्यांना वेढून बसली होती. जर्मनीचा पराभव हा नियतीचा आविष्कार नव्हता. हिटलरच्या अतिरेकी व उतावळ्या महत्त्वाकांक्षेचा आणि चुकीच्या धोरणाचा तो परिपाक होता. आपल्या बळाविषयीच्या फाजील उन्मत्तपणाचा तो अपरिहार्य परिणाम होता. नियती काय करणार?

अंधाऱ्या खोल विहिरीत स्वत:ला अविचाराने झोकून देणाऱ्या माणसाचे प्रारब्ध ठरलेले असते. पण पराभूत झालेल्या, बेचिराख झालेल्या जर्मनीत पुनरुत्थानाची जोरदार लाट उचंबळून आली. प्रत्येक जर्मन नागरिक आपली शक्ती पणाला लावून नवा जोमदार जर्मनी उभा करण्यासाठी अटीतटीने प्रयत्न करीत होता. वर्षानुवर्षे खपून ते राष्ट्र पुन्हा दिमाखाने, ताठ मानेने उभे राहिले. पुरुषार्थाच्या पायावर प्रारब्ध लोळण घेत असते. जर्मनीच्या पुनर्जन्माच्या पार्श्वभूमीवर आमच्या देशाचा विचार आम्ही कधी करणार आहोत काय हा प्रश्न आहे. एखाद्या खेड्यातली निरक्षरता आम्हाला पूर्ण हटवता आलेली नाही. "गाव साक्षर झाले, आता कोणीही निरक्षर उरलेला नाही" अशी जाहिरातबाजी करण्यात "ग्रामपुढारी" धन्यता मानतात. स्वत:चे फोटो वर्तमानपत्रांत छापवून आणतात. इतकेच त्यांचे कर्तृत्व!

इतिहास आपोआप घडत नाही. तो योजकतेने व परिश्रमाने आणि पुरुषार्थाने घडवायचा असतो. तो ज्यांनी घडवला त्यांच्याविषयी आत्मीयता आणि अभिमान बाळगायचा असतो. इतिहास हा पूजेचा विषय नाही, पण तो प्रेरणेचा आणि मार्गदर्शनाचा निश्चितच विषय आहे. "सारा इतिहास पुसून टाका किंवा विसरून जा. इतिहास हाच आमच्या प्रगतीच्या मार्गातला अडथळा आहे. तो झुगारून द्या," असा विचार काही "विचारवंत" व्यक्त करतात. इतिहासाबरोबर पडलेले डाग सुद्धा आपल्याला मार्गदर्शन करू शकतात. नव्या इतिहासाची निर्मिती करताना मागील इतिहासातील वैगुण्ये आणि दोषस्थळे लक्षात घ्यावी लागतात. सारा इतिहास कसा विसरता येईल? विसरणे योग्य ठरेल काय? कोणत्याच राष्ट्राला, समाजाला आणि व्यक्तीला इतिहास विसरणे शक्य नाही. जो विसरतो त्याला तो नवा घडवणे शक्य होईल काय याची शंका आहे. जिवंत मनाच्या ऊर्मीतून इतिहासाचा उदय होतो. नियती किंवा प्रारब्ध नव्हे, तर आकांक्षांनी फुललेली व पेटलेली माणसे इतिहासाचे शिल्पकार असतात. बुद्धी आणि प्रयत्न यांच्या संगमातून पुरुषार्थ सिद्ध होतो. पुरुषार्थाच्या उपासनेतून आपल्याला हवा तसा समाज आणि देश साकार करता येतो. प्रारब्धवादाचे तुणतुणे आता बंद करू. ते हळवे नि दुबळे सूर छेडीत राहण्यात काय अर्थ आहे?

□□□

# २१. अजून येतो वास फुलांना...

जीवनाचा अर्थ कुणाला कळला आहे का ? जीवनाला अर्थ तरी असतो का ? या प्रश्नांची उत्तरं निश्चितपणानं देता येतील असं वाटत नाही. पंडितांनी आणि तत्त्ववेत्त्यांनी याबद्दल पुष्कळच घोळ घातला आहे. माझ्यासारखा सामान्य मनुष्य, जीवनाचा अर्थ जगण्यात आहे, असंच म्हणेल.

भर्तृहरी नावाच्या तत्त्वचिंतक कवीनं, जीवनाचं स्वरूप नेमकं काय ते आपल्याला सांगता येत नाही, असं म्हणून आपली असमर्थता प्रकट केली आहे. या प्रतिभावंतानं अनेक सुखं भोगली. अनेक दुःखंही त्याच्या पदरात पडली. खाचखळग्यांनी भरलेल्या मानवी जीवनाकडं अलिप्तपणानं पाहण्याचा त्यानं प्रयत्न केला. तो म्हणतो –

"हे जीवन अमृतमय आहे की विषमय आहे काही कळत नाही. अनेक परस्परविसंगत गोष्टींनी ते ठासून भरलेलं आहे. कुठं वीणेचे मधुर सूर कानांवर पडत आहेत, तर कुठं शोकमग्न झालेल्या लोकांचा आक्रोश ऐकू येत आहे. कुठं विद्वानांची आनंददायक चर्चा चाललेली आहे, तर कुठं दारू पिऊन धुंद झालेल्या उन्मत्त लोकांची शिवीगाळ आणि भांडणं चालली आहेत. एखाद्या ठिकाणी यौवनानं विकसित झालेल्या चारुगात्रीचं सुखद दर्शन होत आहे, तर दुसऱ्या ठिकाणी म्हातारपणानं वाकलेल्या, सुरकुतलेल्या वृद्धेचं केविलवाणं दर्शन मनाला व्यथित करीत आहे. जीवनाबद्दल नेमकं काहीच कळत नाही." काहीच कळत नाही हे भर्तृहरीला दीर्घ आयुष्य जगल्यानंतर कळलं.

सामान्य माणसांच्या आयुष्यातही असेच चमत्कारिक चढउतार असतात. माझ्या एका मित्राच्या मरणाची बातमी एके दिवशी आकस्मिकपणे कानांवर आली. या मित्राच्या सहवासात घालवलेले हास्यविनोदाचे, आनंदाचे आणि दुःखाचे असंख्य क्षण मला आठवले. मी कमालीचा अस्वस्थ झालो. कितीतरी दिवस माझ्यातली जीवनेच्छा काळवंडली होती. जीवनानं माझ्या पदरात दाहक वंचनेचे क्षण का टाकावेत, या प्रश्नानं जडमूढ झालो होतो. पण एके दिवशी माझ्या धाकट्या भावाच्या हृदयावर

अवघड शस्त्रक्रिया करावी लागली आणि त्यातून तो ठणठणीत बरा झाला. या घटनेनं मित्राच्या मृत्यूचं दु:खं पुष्कळसं निवळून गेलं. सारं मोडून पडलं असं वाटतं, पण पुन्हा कुठल्यातरी अदृश्य हातांनी ते रचलं जातं. काळेकुट्ट ढग जमतात, उत्पाती वारा वाहू लागतो. या वादळात आपलं आयुष्य उद्ध्वस्त होऊन जाणार या कल्पनेनं आम्ही हादरून जातो. पण एकाएकी ढग वितळून जातात, वारा सौम्य होतो, क्षितिजावर चंद्राची कोर दिसू लागते. जीविताची ही परस्परविरोधी दर्शनं खरोखरच गूढ आहेत. 'क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरुनी ऊन पडे' हेच आहे का जीवनाचं स्वरूप?

मला वाटतं चमत्कृतीतच या जीवनाचं सौंदर्य साठवलेलं आहे. कोणत्या वेळी या जीवनप्रवाहाला कोणतं वळण मिळेल हेच सांगता येत नाही. कोणत्या तरी तर्कशुद्ध नियमाप्रमाणं माणसाचं आयुष्य घडत असतं तर ते सुंदर वाटलं नसतं. प्रत्येक क्षण बेभरवशाचा आहे. चंचल आहे. म्हणूनच या आयुष्यात खिळवून टाकणारी जबरदस्त शक्ती आहे. मरत्या क्षणीसुद्धा आयुष्याला बिलगण्याचा प्रयत्न माणूस करतो. आईच्या मांडीवर पहुडलेल्या बालकासारखी आपली अवस्था असते. जीवनाची वळणं किती वेडीवाकडी आणि किती गमतीदार असतात. आफ्रिकेतून प्रवास करताना गांधीजींचं बेडिंग फर्स्टक्लासच्या डब्यातून रेल्वेअधिकाऱ्यानं बाहेर फेकून दिलं नसतं आणि 'काला आदमी' म्हणून मध्यरात्री कडाक्याच्या थंडीत एका लहानशा स्टेशनवर त्यांना अपमानित करून उतरवलं नसतं तर कुणी सांगावं, कदाचित गांधीजींच्या आयुष्याला वेगळी कलाटणी मिळालीही नसती. धुक्याचं एक दाट वलय कुठल्या तरी अगम्य शक्तीनं जीवनाच्या भोवती निर्माण केलेलं दिसतं. व्यक्तींच्या आणि राष्ट्राच्या जीवनातही कितीतरी वावटळी उत्पन्न होतात. काही योगायोग अर्थपूर्ण असतात. काही निरर्थकही असतात. मध्यरात्रीच्या अंधारात, कंसाच्या कारागृहात श्रीकृष्णाचा जन्म व्हावा, आणि मुसळधार पावसात दुथडी भरून वाहात असलेल्या यमुनेच्या प्रवाहातून त्या बालकाला गोकुळात त्याच्या पित्यानं पोहोचवावं, ही घटना विलक्षण आहे. शंभर टक्के कृत्रिम वाटणाऱ्या या घटनेला सत्याचा आधार असावा. 'Truth is stranger than fiction.' कल्पितापेक्षाही सत्य अधिक चमत्कृतिपूर्ण असतं. अनेक अघटित घटनांनी आणि योगायोगांनी जीवन भरलेलं असतं. खरं तर जीवन हे सुद्धा योगायोगाचं प्रतीक मानता येईल.

एका विचारवंतानं जीवनावर एक आक्षेप घेतला होता. तो म्हणाला,

"जीवन ही कंटाळा आणणारी गोष्ट आहे. रसहीन पुनरावृत्ती हे तिचं स्वरूप. कुठल्या तरी एका चाकोरीतून मरण येईपर्यंत चालत राहायचं यापेक्षा जीवनात अधिक काय असतं? साऱ्या मानवजातीचाच हा इतिहास आहे. कोवळ्या लालसर पानांनी हिरवं व्हायचं. हिरव्यांनी पिवळं व्हायचं. आणि पिवळ्यांनी गळून पडायचं. गळलेल्यांनी कुठं तरी वाऱ्याबरोबर वाहून जायचं. या ठराविक घटनांच्या पलीकडे जीवनात काहीच नाही." त्या विचारवंतानं रखरखीत विरक्तीचा चष्मा डोळ्यांवर ठेवून जीवनाकडं

पाहिलं असावं. प्रत्येकाच्या दृष्टीत कितीतरी अंतर असतं. हा विचारवंत कशामुळं विरक्त झाला होता, जीवनाचा एवढा उबग त्याला का आला होता, हे समजत नाही. सुंदरत्वाचं ग्रहण करण्याची संवेदना बोथट झाली की सुरूपतेच्या जागी कुरूपता दिसू लागते. नवविवाहित आनंदी दांपत्याचं अभीष्टचिंतन करण्याऐवजी ते केव्हा घटस्फोट घेतात असा विचार करणाऱ्या माणसाला काय म्हणायचं? माणूस आणि निसर्ग कंटाळवाण्या पुनरुक्तीच्या चाकोरीतून प्रवास करीत असतात असं मला वाटत नाही. प्रतिवर्षी येणारा पावसाळा नव्या आनंदाच्या धारा घेऊन येतो. पावसाळ्याच्या दिवसांत केवळ पाऊस पाहण्यासाठी आणि तो अंगावर घेण्यासाठीही कितीतरी लोक लोणावळा-खंडाळ्याला जातात. पावसात भिजण्याच्या कल्पनेनंच हुडहुडी भरणारी जी माणसं असतील ती दारं-खिडक्या बंद करून, अंगावर गरम कपडे घेऊन सुरक्षितपणे बसलेली असतात. 'या पावसाची रिपरिप लवकर संपली तर बरं होईल' हा भाव त्यांच्या मुद्रेवर असतो. त्यांच्या दृष्टीनं 'नेमेचि येतो मग पावसाळा' ही एक निरर्थक पुनरावृत्ती असते. प्रत्येक पावसाळ्यातलं पाणी नवीन असतं. पावसाचे थेंब प्रतिवर्षी अंगावर घेणारी आणि रोमांचित होणारी धरित्री नवीन असते. आकाशातले काळे मेघ नवीन असतात. आकाशही नवीनच असतं. ही नाविन्याची अनुभूती माणसाला येत असते म्हणूनच त्याला आयुष्य चाकोरीसारखं एकसूरी वाटत नाही. किती शतकं आणि सहस्रकं उलटून गेली कुणास ठाऊक! पण प्रत्येक दिवशीच्या सूर्यकिरणातली जादू अजून ओसरलेली नाही. त्यांच्या स्पर्शाबरोबर येणारी जाग नवीन असते. खरं तर आयुष्याला शिळेपणाचा वास कधीच येत नाही. ते सुखाचं असेल की दु:खाचं असेल, पण दु:खालाही नवीनपणा असतो. सुखदु:खांचे अनंत रंगीबेरंगी प्रकार आहेत म्हणून तर दु:खी माणसालाही जीवनाची संगत सोडवत नाही.

अनेक तत्त्वचिंतकांनी जीवनाच्या क्षणभंगुरत्वावरच बोट ठेवलं आहे. होय! हे जीवन चंचल आहे. काचपात्रासारखं ठिसूळ आहे. केव्हातरी खळ्कन फुटणारं आहे. पण म्हणूनच ते अमोल आहे. केव्हातरी आपण मरणार या जाणिवेची भीती उरात बाळगलेले अनेक लोक खऱ्या अर्थानं जगायला सुरवातच करीत नाहीत. मरण्यापूर्वीच त्यांचा मृत्यू झालेला असतो. जगण्याची दुर्दम्य इच्छा ज्याच्या नसा-नसांतून लहरत असते त्याला जीवनाची किंमत कळते. सेनेका नावाचा तत्त्वचिंतक म्हणतो,

'He who does not wish to die cannot have wished to live.' ज्याला मरण आवडत नाही त्याला जगण्याची इच्छा नसते, असं काहीसं विरोधाभासात्मक विधान त्यानं केलं आहे. जितकं जीवन नैसर्गिक तितकंच मरणही निसर्गसिद्ध असतं हे सांगायला कुणा तत्त्वज्ञाची जरूर नाही. आयुष्य हे कमळाच्या पानावरील दवाच्या थेंबासारखं अल्पजीवी आहे हे कुणाला माहीत नाही? अल्पकाळ का असेना, पण जीवनाचा हात माझ्या हातात असू द्या असंच मनुष्याला वाटत असतं.

एकदा एक गृहस्थ डॉक्टरांकडे गेले. आपल्याला कोणता तरी भयानक रोग झाला असून आपण थोड्याच दिवसांत मरणार आहोत ही कल्पना त्यांच्या डोक्यात घट्ट बसली होती. सर्व तपासण्या पूर्ण झाल्यानंतर डॉक्टरांनी हसतमुखानं त्यांना सांगितलं, 'तुमची प्रकृती ठणठणीत आहे. कुठलाही रोग तुमच्या जवळपास आलेला नाही. आणि मृत्यूचं म्हणाल, तर आणखी कित्येक वर्षं यम तुमच्याकडं ढुंकूनही पाहणार नाही.' ते गृहस्थ म्हणाले, 'डॉक्टर, माणसाच्या जीवनाबद्दल तुम्ही शंभर टक्के हमी देऊ शकता काय? मी आज-उद्या किंवा आणखी अर्ध्या तासात मरणारच नाही असं म्हणायला तुमच्यापाशी कोणता आधार आहे?' डॉक्टर हताश झाले. थोडेसे चिडले. उपरोधानं ते म्हणाले, 'तुम्हाला वाचवण्याची आता परमेश्वराची तरी हिंमत होईल काय याबद्दल मी साशंक आहे. मरणाची जपमाळ ओढीत बसलेल्या तुमच्यासारख्या मानसिक रुग्णाला मी काय सांगणार? तुम्ही मनानं मृत्यूच्या सरहद्दीवर उभे आहात. अखेर आपली मानसिकताच निर्णायक असते. तुमच्यासारख्याच्या जीवनाची हमी निदान मी तरी देऊ शकत नाही.'

जीवनाची चंचलता साऱ्यांच्याच प्रत्ययाला येते. सामान्यांची सामान्यता असो की असाधारण व्यक्तीचं माहात्म्य असो, मृत्यूच्या स्पर्शानं संपुष्टात येतं. सर्वांकडे समदृष्टीनं पाहणारा मृत्यू हा अलौकिक समतावादी म्हणावा लागेल.

क्षणभंगुर असूनही जीवनाला एक गहिरं, अवीट असं सौंदर्य आहे. त्याच्या चंचलतेपेक्षा त्याच्या विविधतेचं आणि विचित्रतेचं आकर्षण अधिकांशानं वाटतं. लेखक-कवींनी हे रंगीबेरंगी जीवित आपल्या शब्दांच्या कवेत पकडण्याचा प्रयत्न शतकानुशतकं चालवला आहे. माणसे सहस्रावधी वर्षांपासून समुद्रातले मासे जाळ्यात पकडत आली आहेत. समुद्रातले मासे कधी संपत नाहीत. जीवनाच्या अतिविशाल समुद्रात प्रतिभावंतांनी हजारो जाळी टाकून आजवर सुखदुःखांच्या अनंत मासोळ्या पकडल्या, पण हा सागर कधीतरी रिता होणार आहे का? त्याचा तळ सापडणार आहे का? जीवनाचे काही क्षण आणि कण त्याच्या हातात येतात. आपल्या ओंजळीतल्या या अत्यल्प अंशात्मक जीवनाची मिरवणूक लेखक-कवी शब्दांच्या पालखीतून काढतात. विराट सागराचा पार त्याला लागतच नाही. एक चित्रकार आपल्या चित्रांविषयी म्हणाला,

"गेली पन्नास वर्षे माझ्या अधाशी डोळ्यांनी या सृष्टीच्या आणि माणसांच्या जीवनाचे मनोज्ञ रंग मी न्याहाळत आहे. त्याच्या अनेक छटा माझ्या मनाच्या फलकावर मी चित्रित केल्या. पण त्यातल्या अत्यंत मोजक्या, फार थोड्या रेषा मला चित्रांतून रेखाटता आल्या. जितक्या माझ्या मनात भरल्या त्यापेक्षा सहस्रपटीनं अधिक मला घेताच आल्या नाहीत. आणि त्यापेक्षा लक्षपटीनं अधिक मला दिसल्याच नाहीत. परमेश्वरानं माझी कुंचली इतकी का बरं दुबळी ठेवली?"

कोणताही कलावंत हेच म्हणत असेल. व्यासांनी तर जीवनाचं विराट मंथन

करून महाभारताची रचना केली. 'व्यासोच्छिष्टं जगत्सर्वं'' व्यासांनी सारं जीवन उष्टावलं असं म्हणण्यात येतं. त्यांची प्रतिभा सर्वस्पर्शी आहे यात शंका नाही. पण तरीही जीवनाचे सारे विशेष, प्रत्येक सूक्ष्म आणि तरल छटा, जीवनाची साद्यंत कथा आणि व्यथा महाभारताच्या लाख श्लोकांत ते समग्रपणे सांगू शकले काय, असा प्रश्न त्या महर्षीला विचारला तर ते खिन्नपणानं हसतील आणि संथ स्वरात बोलू लागतील –

"अरे, जीवनाला अथांग आकाशाची किंवा असीम महासागराची उपमादेखील अपुरी पडेल. माझ्या चिंतनात, निरीक्षणात आणि अनुभवात या आकाशाचा एखादा तुकडा, किंवा या सागराचा एखादा कोपरा येऊन गेला. समग्र जीवन कवटाळण्याची क्षमता केवळ परमेश्वरातच असू शकते. माझ्या कल्पनेलाही अगम्य आणि प्रज्ञेलाही अस्पृष्ट असा कितीतरी विशाल प्रदेश क्षितिजापर्यंत पसरला आहे. पण म्हणून कलावंतांनी निराश होण्याचं कारण नाही. समुद्राचं चुळकाभर पाणी ओंजळीत आलं तरी त्यात त्याचे सारे गुणधर्म असू शकतात."

कालिदासासारखा महाकवी रघुवंश लिहिताना नम्रतेनं म्हणाला, "सूर्यापासून निर्माण झालेला हा महावंश कुठे आणि त्याचं कथन करणारी माझी अल्पस्वल्प प्रतिभा कुठे! लहानशी होडी घेऊन महासमुद्र तरून जाण्याचा हा प्रयत्न आहे."

गौतमबुद्धानेही आपल्या शिष्यांना म्हटलं होतं, "झाडाची एक फांदी माझ्या हातात आली आहे. तिची जेवढी पाने माझ्या मुठीत आहेत त्यापेक्षा या भव्य वृक्षाची अगणित पाने माझ्या हातात नाहीत. हातात नसलेल्या पानांविषयी मी काय बोलणार?"

शब्दांतून, रंगरेषांतून, स्वरांतून आणि शिल्पांतून हे अतिरहस्यमय जीवन थोडंथोडं प्रकट झालं आहे. बुरखा घेतलेल्या विलक्षण लावण्यवतीच्या ललित हालचालींचं किंचित दर्शन व्हावं आणि अधिक दर्शनासाठी आशाळभूतपणानं तिचा अनुनय करावा त्याप्रमाणं कलावंत, तत्त्वज्ञ, संत-महंत जीवनाचा अनुनय करीत आहेत. हुलकावण्या देण्यात, वंचना करण्यात हे जीवन अत्यंत वाकबगार आहे. आजपर्यंत त्यानं भल्याभल्यांची प्रतारणा केली. कधी त्यांना सिंहासनावर बसवलं आणि लहर लागेल तेव्हा काटच्याकुटच्यांत भिरकावून दिलं. या लहरी जीवनाचा शोध घेण्याची आणि त्याला प्रकट करण्याची आपली ऊर्मी कधी थांबणार नाही. जीवनाची गती ही कधी कुंठित होणार नाही. त्याच्याविषयी विचार करताना मी तर थकून जातो. विचारापेक्षा भारावलेल्या मनानं त्याचा स्वीकार करणं आणि त्याच्यात गुरफटून जाणं, त्याच्याबरोबर हसणं आणि रडणं, त्याला बिलगून राहणं यातच आगळा आनंद आहे. मला कुणी प्रश्न विचारला तर या जीवनासंबंधी पुष्पळ जगूनसुद्धा मी काही सांगू शकेन असं मला वाटत नाही.

नित्य नव्या वस्त्राभरणांनी नटून आणि नित्य नव्या स्वरांचा नजराणा घेऊन हे जीवन आपल्या पुढ्यात नवनवीन गंध उधळीत नाचत असते. त्याचा मोह दुर्निवार आहे. ते थोडेसे कळले असे वाटते आणि पुष्कळसे कळले नाही हे समजते. पण

या जीवनमोहाची वारुणी वर्षानुवर्षे भरभरून प्यावी, केव्हातरी हातातला चषक रिता होणारच आहे. पण त्यातला बिंदून्‌ बिंदू चाखून घ्यावा, तो कडवट असेल किंवा गुळचट असेल, कसाही असो; बेदाकारपणानं तो शोषून घ्यावा. कदाचित हे कुणाला वेडेपणाचं वाटेल. जीवन हे असं रसायन आहे की त्यात चंद्रिकेच्या धारा, सूर्याची ऊर्जा, फुलपाखरांचे रंग, कमलिनीच्या पाकळ्या, विषाची दाहकता, साधुसंतांची वत्सलता, युवतींच्या नेत्रातली चंचलता आणि नर्तकींच्या नूपुरांतली नादमयता यांची सरमिसळ कुणा अनामिक कलावंताच्या परमेश्वरी हातांनी करून टाकली आहे कुणास ठाऊक? असं जीवन केव्हा आणि कुणाला कळणार? आपापल्या नेत्रांत सामावेल तितके आणि गात्रांत जमेल तितके काठोकाठ भरून घ्यावे. यातूनच त्याचे रंग आणि ढंग समजून घ्यावे. कुणीतरी मला म्हणेल,

"अरे वेड्या, मानवी इतिहासाचं प्रत्येक पान रक्तलांछित आहे. अन्याय, सूड, हिंसा यांचं थैमान चालू असलेल्या जगात जीवनाच्या सुंदरतेचं गीत गात बसणं हा पलायनवाद आहे. इथं रात्रंदिवस शोषण चालू आहे. इथं जीवनावर प्रतिक्षणी मृत्यूचा बलात्कार होतो आहे. कशाला जीवनाचं हे निरर्थक तुणतुणं वाजवायचं?"

या प्रश्नाला माझ्याजवळ उत्तर नाही. प्रश्न चुकीचाही नसेल कदाचित! मला मर्ढेकरांच्या त्या प्रसिद्ध ओळी आठवतात –

*अजून येतो वास फुलांना*
*अजून माती लाल चमकते*
*अजून खुरट्या बुंधावरती*
*चढून बकरी पाला खाते*

यापेक्षा अधिक काय सांगणार?

□□□

## डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे साहित्य

१) लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व (१९७३)

२) साहित्यवेध (१९७८)

३) संतकवी तुकाराम : एक चिंतन (१९७८)

४) काही रंग काही रेषा (१९८६)

५) हिरव्या वाटा (१९८६)

६) आनंदाची डहाळी (१९८८)

### संपादित -

७) ज्ञानेश्वरी अध्याय १ ला (१९६५)

८) तीन निबंध (१९७४)

९) प्रबोधनातील पाऊलखुणा (१९७८)

१०) यात्रिक (सहकार्याने) (१९८५)

११) निवडक लोकहितवादी (सहकार्याने) (१९८४)

''जीवनाचा अर्थ कुणाला कळला आहे का?

हे चमत्कृतिपूर्ण जीवन थोडं कळलं असं वाटतं आणि पुष्कळस कळलं नाही हे ही समजतं. पण या जीवनाची वारुणी भरभरून प्यावी केव्हातरी हातातला चषक रिता होणारच आहे. त्यातला बिंदू न बिंदू चाखून घ्यावा. तो कडवट असेल किंवा गोड असेल. कसाही असो! बेदरकारपणे तो शोषून घ्यावा. जगणं ही मुळातच अेक काव्यमय, अद्‌भुत प्रक्रिया आहे.

'जगायचं कशासाठी?' असा प्रश्न कुणी मला विचारला तर मी फक्त हसतो. हसणं हेच या प्रश्नाला माझं अुत्तर''.

निर्मलकुमार फडकुले यांच्या चिंतनाला लालित्याची, रसिकतेची प्रसन्न बैठक आहे. त्यांच्या काव्यात्म शैलीतून त्यांनी जीवनाच्या, माणसांच्या वृत्ती-प्रवृत्तींचे काही रंग साकार करण्याचा केलेला हा अेक लक्षणीय प्रयत्न. ललित लेखनाचे मनोज्ञ विशेष यात प्रकट झालेले दिसतात. लेखकाच्या रुचिर, आशावादी जीवनदृष्टीचा हा आविष्कार रसिकांना आनंद देअील.

प्रतिमा प्रकाशन